जॉईसी मेयर

# राखेच्या ऐवजी शिरोभूषण

भावनिक आरोग्य मिळवणे

# राखेच्या
ऐवजी
# शिरोभूषण

# राखेच्या
ऐवजी
# शिरोभूषण

## भावनिक आरोग्य मिळवणे

---

## जॉईसी मेयर

JOYCE MEYER
ministries

Post Bag No.1, Jublee Hills, Hyderabad - 500 033

BEAUTY FOR ASHES - Marati
*Joyce Meyer*

*Printed at*
Caxton Printers,
Red Hills, Hyderabad - 500 004

*हे पुस्तक मी माझे पती डेव्ह यांना अर्पण केले आहे. मी आजारातून बरी होत असताना त्यांनीच मला येशूची प्रीती दाखवली.*

*डेव्ह तुम्ही माझ्याशी नेहमी संयमाने, धीराने वागलात, माझ्यात बदल होणे अशक्यप्राय वाटत असताना त्यासाठी तुम्ही येशूवर विश्‍वास ठेवला, माझी कुरकूर सहन केली. माझा चिडखोरपणा मनावर घेतला नाही म्हणून मनापासून धन्यवाद.*

*हे पुस्तक केवळ माझेच नव्हे, तर तुमचेही आहे. देवाने तुम्हांला माझ्या जीवनात आणल्याबद्दल मी त्याचे आभार मानते. तुम्ही नेहमीच माझे लखलखीत चिलखत घालणारे सरदार आहात!*

# अनुक्रमणिका


प्रस्तावना 9

*भाग पहिला :* **एकदा मी बंधनात होते**

1 कृपेची विजयचिन्हे 13

2 छळणुकीचे निखारे आणि राख 17

3 सहभागिता भयभीतीची 23

4 छळणुकीमुळे बिघडलेले वर्तन 33

5 प्रीतीने सोडवणूक 43

6 पवित्र आत्म्याला अनुसरणे 53

7 दोन प्रकारच्या वेदना 59

8 ओलांडून पुढे जाणे हाच एक सुटकेचा मार्ग 67

9 झालेगेले विसरून जा 73

10 उद्धारलेले आणि नीतिमान ठरलेले 85

11 स्वत:ला नाकारणे आणि स्वत:ला स्वीकारणे 97

12 नाकारले जाण्याने नातेसंबंधात बिघाड 107

13 असावे ते होण्यासाठी भरंवसा 113

14 क्षमा तुम्हांला पुन्हा जगण्यास मुक्त करते 123

*भाग दुसरा :* **पण आता मी मुक्त, स्वतंत्र आहे**

15 तुम्हांला छळणाऱ्याला क्षमा करणे 131

16 तुमच्या शत्रूंना आशीर्वाद देणे 137

17 सूड घेणे परमेश्वराकडे आहे 147

18 दुसऱ्यांबरोबर आनंद करण्यास मोकळीक 153

19 भावनिक स्थैर्य 163

| | | |
|---|---|---|
| 20 | आपुलकी, जवळीक आणि विश्वास | 169 |
| 21 | मागा आणि मिळवा, स्वीकारा | 177 |
| 22 | अंतरंगात शक्ती मिळणे | 187 |
| 23 | अखेरीस मुक्तता | 195 |
| 24 | भिंती नको, पूल बांधा | 203 |
| 25 | काहीही वाया जाणार नाही | 209 |
| 26 | दुप्पट नुकसानभरपाई | 217 |
| 27 | झटकून टाका ते | 225 |
| 28 | अद्‌भुत प्रतिफळ | 237 |

# प्रस्तावना

भावनिक वेदनांमुळे तुमच्या आनंदावर विरजण पडले असेल, तुमचा छळ झाला असेल, अगर दुसऱ्यांनी नाकारल्यामुळे तुम्हांला मानसिक क्लेश झाले असतील तर जरूर हे पुस्तक वाचा हे माझे आग्रहाचे सांगणे आहे. तुम्ही माझी रेडिओ, टेलिव्हिजनवरची भाषणे ऐकली असतील, तर लहानपणापासून अगदी तरुणपणापर्यंत माझा छळ झाला हे तुम्ही माझ्याच तोंडून ऐकले असेलच. खरे सांगायचे तर प्रभूची आणि माझी भेट होईपर्यंत माझे जीवन केवळ राखेचा ढिगारा असे होते. प्रभूला भेटल्यानंतर त्याच्या वचनाच्या सत्याने मी मुक्त झाले.

माझ्या गत आयुष्यातील सर्वच दु:खांची, छळणुकीची कहाणी मी येते सांगितलेली नाही. पण निराशेच्या गर्तेत पडणे आणि कोणाचे लवभरदेखील प्रेम न मिळणे म्हणजे काय हे मला पुरतेपणी माहीत आहे. तो माझा स्वत:चा अनुभव आहे एवढे तरी तुम्हांला समजावे म्हणून माझ्या आरंभीच्या जीवनातील काही भाग सांगणार आहे. अशाच स्थितीत असणाऱ्या, तळमळणाऱ्या लोकांना सहाय्य व्हावे यासाठी हे सत्य तुम्हांला सांगावे ही प्रेरणा मला देवाने कित्येक वर्षांपूर्वी दिली आहे. या पुस्तकाची पहिली आवृत्ती प्रसिद्ध झाली तेव्हापासून हजारो लोकांनी माझ्याशी संपर्क साधून प्रार्थना व मार्गदर्शन मागितले. देवाने त्यांच्यासाठी नेमलेल्या जीवनाच्या वाटेवरून विजयाने चालण्यासाठी त्यांना सहाय्य व प्रोत्साहन हवे असते. या पुस्तकाने त्यांना भरपूर लाभ झाला अशी त्यांची साक्ष आहे.

अलीकडेच या पुस्तकातील शिक्षणाचा आणखी विस्तार करावा असे देवाने मला सुचवले. ज्यांना आपला भूतकाळ मागे सोडून पुढे देवाने नेमलेल्या सुंदर जगाकडे वाटचाल करायची आहे त्यांना आणखी भक्क, विस्तृत आधार मिळावा हाच येथे उद्देश आहे. माझा स्वत:चा अनुभव आणि छळणुकीमुळे अंगवळणी पडलेल्या भयमूलक विपरीत सवयी यांचा मी केलेला अभ्यास यांच्या आधारे देवाची प्रती गतकाळातील नकारात्मक परिणाम, प्रभाव नामशेष करून उज्ज्वल प्रकाशाकडे कशी नेते ते दाखवले आहे.

या प्रकारे छळाला बळी पडलेल्या व्यक्तीला सोसाव्या लागणाऱ्या दोन प्रकारच्या वेदनांचा उल्लेखही मी केला आहे. बदल होतानाच्या वेदना अगर जैसे थे राहण्याच्या वेदना आणि भावनिक आरोग्य साधण्यासाठी उचलावयाची सहा पावले हे येथे समजावून सांगितले आहे.

गतकाळाकडे पाठ फिरवून पळ काढल्याने प्रश्न सुटत नाहीत म्हणूनच हे लोक गतकाळापासून पळ काढणारे लोक कोणत्या युक्त्या करतात तेही मी येते दाखवले आहे,

त्यामुळे तुम्हांला विजय मिळवण्यासाठी वळणावळणांनी जावे लागणार नाही. विजय मिळण्यास विलंब होणार नाही, वेदनांच्या कवाडांचा अडसर, अडथळा भविष्यकाळाच्या वाटेत आहे. हे अडथळे ओलांडून पुढे कसे जावे हेही मी स्पष्ट करून सांगणार आहे.

तुम्हांला खरोखर भूतकाळाचे बंद तोडून देवाकडून अंतरंगात शक्ती मिळवायची असेल तर हे पुस्तक खास तुमच्यासाठी आहे. तुम्हांला दुसऱ्यांवर विश्वास ठेवता यावा, दुसऱ्यांशी जवळीक साधून मैत्री जोडता यावी आणि जीवनाचा पुरेपूर आनंद घ्यावा असे वाटत असेल तर हे पुस्तक तुमच्याचसाठी आहे. हे पुस्तक वाचायला आरंभ केल्यानंतर मध्ये थांबू नका. अखेरपर्यंत मन लावून लक्षपूर्वक वाचा. देवाने तुम्हांला ज्यासाठी पाचारण केले आहे ते प्रतिफळ काय आहे ते जाणून घ्या.

कसून, आस्थेने शोध करणाऱ्यांना देव निश्चित प्रतिफळ देतो हा माझा स्वतःचा अनुभव आहे. दु:ख, संकटे, निराशा, दुबळेपणा हे सर्व झटकून टाकायचे आणि आजवर सोसलेल्या वेदनांमुळे झालेल्या हानीची दुप्पट भरपाई कशी मिळवावी हे तुम्हांला येथे शिकून घेता येईल.

# भा ग   प हि ला

# मी एकदा बंधनात होते

*काही जण क्लेशांनी व बेड्यांनी जखडले होते, ते अंधकारात व मृत्युछायेत बसले होते, कारण त्यांनी देवाच्या आज्ञांविरुद्ध बंडाळी करून परात्पराचा बोध तुच्छ मानिला होता.*

स्तोत्र.१०७:१०-११

# 1

# कृपेची विजयचिन्हे

अनेक लोकांची जीवने बाह्यात्कारी नीटनेटकी, एकसंध असल्याचे दिसते, पण अंत:करणात पाहावे तर ते खचलेले, उद्ध्वस्त झालेले असतात; कारण छळणुकीमुळे त्यांच्या मनावर मोठा आघात झालेला असते. अशा आघाताला बळी पडलेल्या व्यक्तीला अचानकपणे काही शारीरिक अगर मानसिक इजा पोचलेली असते. त्यामुळे त्या व्यक्तीची मानसिक वाढ होत नाही, विकास खुंटतो.

मला वाटते आज जगात अशा आघातांना बळी पडलेल्या लोकांची संख्या बरीच मोठी आहे. गतकाळात त्यांचा परोपरीने एवढा छळ झालेला असतो की, ते मानसिक दृष्टीने उणे असतात. परिणामी चारचौघांसारखे सरळ जीवन कसे जगावे तेच मुळी त्यांना समजत नाही. माझ्या जीवनात झालेल्या आघातातून कसे सावरावे, पुन्हा विजय कसा मिळवावा हे शिकून घेण्यापूर्वी माझीही स्थिती अशीच दयनीय, शोचनीय होती.

मी देवाचा शोध केला, त्याचे वचन वाचले आणि मला समजले की प्रभूला आमच्या *आंतरिक* जीवनाचीच अधिक काळजी आहे. कारण तेथेच — अंतरंगात — आम्हांला त्याच्या समक्षतेचा अनुभव येतो. येशूने म्हटले आहे, ‘‘कारण पाहा देवाचे राज्य *तुमच्यात* [तुमच्या अंत:करणात] आणि *तुमच्यामध्ये* [तुमच्याभोवती] आहे’’ (लूक.१७:२१ तिरपा टाईप माझा).

माझ्या जीवनात मी फार फार सोसले. छळणुकीमुळे माझ्या जीवनाची शोकांतिका झाली होती. या अवघड परिस्थितीतून ख्रिस्ताच्या द्वारे विजयी कसे व्हायचे ते देवाने मला कसे शिकवले तेच सारांशाने या पुस्तकातून सांगितले आहे. मी कित्येक वर्षे त्याच्या वचनाचा संदेश देत होते. मग एक दिवस त्याने मला २ करिंथ.२:१४ हे वचन दाखवले : ‘‘जो देव

आम्हांला सर्वदा ख्रिस्ताच्या ठायी जयोत्सवाने नेतो, आणि सर्व ठिकाणी आमच्याद्वारे आपल्याविषयीच्या ज्ञानाचा परिमल प्रगट करतो त्याची स्तुती असो.''

उपकारस्मरण करण्याच्या एका दिवशी देवाने माझ्यासाठी जे जे केले त्यावर विचार करताना माझे अंत:करण उपकारस्तुतीने भरून आले. त्या दिवशी तो माझ्या अंत:करणाशी बोलला. तो म्हणाला, ''जॉयस, तू माझ्या कृपेचे विजयचिन्ह आहेस, आणि अशीच आणखी विजयचिन्हे मिळवण्यासाठी तू मला सहाय्य करीत आहेस.'' आणि मग माझ्या मनाच्या डोळ्यांसमोर स्वर्गात एक मोठे कपाट विजयचिन्हांनी भरलेले आहे असे दिसले. एखादी व्यक्ती एखाद्या खेळात, कलेत वगैरे चांगली प्रवीण असली की तिला विजयचिन्ह दिले जाते हे मला माहीत होते. लोकांच्या घरामध्ये पदक, पेले, ढाली वगैरे मांडलेली असतात. त्यावरून त्यांनी खेळ, क्रीडा, शिक्षण, संगीत वगैरे क्षेत्रात उत्तम कामगिरी केलेली आहे हेच दिसून येते.

विनाशाच्या, पराभवाच्या ठिकाणाहून लोकांना उचलून त्यांना संपूर्ण विजयाच्या ठिकाणी नेण्याचे कामी देव अनन्य आहे, आणि ते त्या विजयाच्या ठिकाणी पोचले की ते त्याच्या कृपेची विजयचिन्हे होतात. आणि देवाच्या चांगुलपणाची मधुर सुगंधी स्मृती म्हणून त्यांना लोकांपुढे सादर केले जाते. जे देवासाठी विजयचिन्हे होणार आहेत, होत आहेत, त्यांना सहाय्य, मार्गदर्शन व्हावे म्हणून मी या पुस्तकातून माझा अनुभव सांगितला आहे.

दु:ख, शोक, पराभव आणि आनंद, विजय यांच्या अनुभवांमधून येशू माझा राजा आहे हे मी शिकले आहे. तुमचाही राजा व्हावे हीच त्याची इच्छा आहे. आमचे अंतरंग हेच त्याचे राज्य, आमचे मन, इच्छा, भावना, वासना आणि विचार यांच्यावर तो सत्ता चालवणार आहे. देवाच्या वचनामध्ये स्पष्टपणे शिकवले आहे : ''कारण [आपल्याला आवडते ते अन्न] खाणे व पिणे ह्यात देवाचे राज्य नाही, तर नीतिमत्त्व [देवासमोर उभे राहण्यास लायक अशी अवस्था] आणि [अंत:करण] शांती व पवित्र आत्म्याच्या द्वारे मिळणारा आनंद ह्यात ते आहे. कारण ह्या प्रकारे जो ख्रिस्ताची सेवा करतो तो देवाला ग्रहणीय व मनुष्यांना पसंत आहे'' (रोम.१४:१७-१८).

म्हणजेच आमच्या अंतरंगात देवाची राजसत्ता असेल तर आम्हांला पवित्र आत्म्यामध्ये नीतिमत्त्व, शांती आणि आनंद यांचा लाभ होईल. तसेच आम्ही देवाच्या पसंती व लोकांच्या मान्यतेस उतरलेले असे असू. आम्ही अन्नवस्त्र, निवारा अशा बाह्य गोष्टींविषयी चिंता करीत बसू नये, तर [आम्ही] पहिल्याचे त्याचे राज्य व त्याचे नीतिमत्त्व मिळविण्यास झटावे म्हणजे त्यांच्याबरोबर ह्याहि सर्व गोष्टी तुम्हांला मिळतील (मत्तय.६:३३). देवाचे नीतिमत्त्व म्हणजे त्याचे अनुकरण करून न्यायनीतीने वागणे.

इतर कोणत्याही गोष्टीपेक्षा आपण सर्वप्रमथ देवाचे राज्य मिळवण्यास झटले पाहिजे. हे राज्य आपल्या अंतरंगातच आहे आणि मग आपल्या सर्व बाह्य गरजा पुरविल्या जातील, चिंता, अडचणी दूर होतील. आम्ही येशूला आमचा प्रभू म्हणून स्वीकारतो तेव्हा तो आमच्या

अंतर्गत जीवनावर सत्ता चालवतो. तोच आम्हांला नीतिमत्त्व, शांती आणि आनंद देतो. आमच्या बाह्य जीवनात कोणत्याही अडचणची आणि संकटे आली तरी आम्ही अंतरंगात परिपूर्ण असलो की चिंतेचे कारण नाही. आम्ही सर्व प्रसंगी टिकून राहू आणि आमच्या जीवनात आनंदी राहू.

आमच्या बाह्य जीवनापेक्षा देवाबरोबरचे आमचे आंतरिक जीवन खूपच महत्त्वाचे आहे. म्हणूनच भावनिक आरोग्य, म्हणजेच आंतरिक आरोग्य या विषयाची चर्चा पवित्र शास्त्रानुसार, समतोल साधून केली पाहिजे, त्यातून सात्विक सुपरिणाम साधतील. प्रेषित पौलाने आम्हांला ठामपणे सांगितले आहे की, ''ज्याने प्रभू येशूला उठविले तो येशूबरोबर आम्हांलाही उठवील व तुमच्याबरोबर ... त्याच्या समक्षतेमध्ये सादर करील'' (२ करिंथ.४:१४). पुढे या वचनांमधून त्याने सांगितले आहे :

> म्हणून आम्ही धैर्य सोडीत नाही; परंतु आमचा बाह्य देह क्षय पावत आहे, तरी अंतरात्मा दिवसानुदिवस नवा होत आहे.
> कारण आम्हांवर येणारे तात्कालिक व हलके संकट हे आम्हांसाठी अत्यंत मोठ्या प्रमाणात सार्वकालिक गौरवाचा भार उत्पन्न करते.
> आम्ही ह्या गोष्टींकडे नाही तर अदृश्य गोष्टींकडे लक्ष लावतो; कारण दृश्य गोष्टी क्षणिक आहेत, पण अदृश्य गोष्टी सार्वकालिक आहेत.

''तात्कालिक व हलके संकट'' पौल सांगतो तसे प्रत्येकावरच येते. काहीजणांना तर अशा दु:खासंकटात असह्य, भावनिक वेदना सोसाव्या लागतात. आमच्यापैकी काहींनी अशा वेदना सोसल्या आहेत, परंतु ''धरून नेलेल्याची सुटका व अंधळ्यास पुन्हा दृष्टीचा लाभ ह्यांची घोषणा करावी [संकटांनी] ठेचले जात आहेत त्यांस सोडवून पाठवावे यासाठी येशू आला'' (लूक.४:१८-१९).

पवित्र शास्त्राच्या एका भाषांतरात ठेचलेले या शब्दाचा अनुवाद भग्नहृदयी असा केला आहे. मूळ ग्रीकमध्ये ''हृदय'' व ''भग्न-ठेचलेले'' असे दोन शब्द आहेत. ठेचणे, भग्न करणे म्हणजे चक्काचूर करणे असा अर्थ आहे. जे *आतून* घायाळ झाले आहेत, मोडलेले आहेत, त्यांना बरे करण्यसाठी येशू आला असा माझा विश्वास आहे.

छळ झाल्यामुळे तुम्ही मोडून, खचून गेला असाल तर मला खात्री आहे की, हे पुस्तक तुमचे मार्गदर्शन करील आणि उद्ध्वस्ततेच्या राखेतून तुम्हांला निरोगी करील. परिपूर्णता व आरोग्य यांचे सौंदर्य तुमच्या अंतरंगात प्राप्त होईल. हा संदेश तुम्हांला अगदी सरळ सुबोध, सुस्पष्ट व समर्थ वाटेल आणि पवित्र आत्मा तुम्हांला शक्ती देईल व त्याला अनुसरून अखेर तुम्ही शांती व आनंद ह्या मुक्कामांवर नेईल हीच माझी प्रार्थना आहे. तुमच्यासाठीची माझी प्रार्थना इफिस.३:१६ मध्ये आहे :

***मी गुडघे टेकून अशी विनंती करतो की त्याने आपल्या ऐश्वर्याच्या समृद्धीप्रमाणे तुम्हांला असे दान द्यावे की, तुम्ही त्याच्या आत्म्याच्या द्वारे अंतर्यामी बलसंपन्न व्हावे.***

तसेच इब्री.१३:५-६ या वचनांमधून देवाने दिलेले अभिवचन सदोदित स्मरणात ठेवावे ही माझी तुम्हांला आग्रहाची विनंती आहे.

तुमची वागणूक द्रव्यलोभावाचून असावी, जवळ आहे तेवढ्यात तुम्ही तृप्त असावे कारण त्याने स्वत: म्हटले आहे ''मी तुला सोडून जाणार नाही व तुला टाकणार नाही.'' म्हणून आपण धैर्याने म्हणतो, प्रभू माझा सहाय्य करणारा आहे, मी भिणार नाही, मनुष्य माझे काय करणार?

हे देवाचे दृढ, सत्य अभिवचन आहे. कोणत्याही परिस्थितीत तो आम्हांला निराधार असे सोडणार नाही आणि टाकणार नाही.

# 2

# छळणुकीचे निखारे आणि राख

मला वाटते की, बहुतेक लोकांचा त्यांच्या हयातीत केव्हा ना केव्हा या ना त्या प्रकारे छळ होतच असतो. आपणाला केव्हा तरी, एकदा वाईट वागणूक मिळाली, छळ झाला हे प्रत्येक व्यक्तीला नेहमीच आठवत असते. छळणुकीची ती आठवण पुसता पुसली जात नाही. छळणुकीच्या आघातांनी खचून गेलेले, आतून पार मोडून गेलेले असे असंख्य लोक आहेत हे मी नक्की सांगते.

छळ, छळणूक, छळवाद या शब्दाच्या अनेक अर्थछटा आहेत. वाईट वागणूक देणे, फसवणे, कपटाने गैरफायदा घेणे, निंदा करणे, शिव्याशाप देणे, गैरशब्द वापरणे, अन्याय करणे, संतापून घालून पाडून बोलणे, मारहाण करणे वगैरे.

छळणुकीचे असंख्य प्रकार आहेत. छळणूक म्हणजे शोषण हे शारीरिक, शाब्दिक, मानसिक, भावनिक आणि लैंगिक असू शकते. सतत छळ, शोषण झाल्याने त्या व्यक्तीच्या मनामध्ये नाकारले गेल्याची भावना दृढ होते. मग अशी व्यक्ती कासवासारखी आपल्यातच आखडून बसते, आपण सर्वस्वी अपात्र, नालायक आहोत अशा समजुतीने जगापासून दूर, अलिप्त राहते. त्यामुळे अशा व्यक्तीच्या सामाजिक जीवनात अनेक समस्या उभ्या राहतात. आज आपल्या समाजात जिकडे पाहावे तिकडे असे असंख्य लोक आहेत, त्यांना दुसऱ्यांशी कसे वागावे, हेच कळत नाही. आता त्यांची छळणूक थांबी असली तरी त्या छळाच्या आघातांच्या खुणा आणि वण तसेच राहतात. परिणामी त्यांना दुसऱ्यांशी संपर्क साधणे जमत नही. ते एकलकोंडे, उदास होतात.

आम्ही प्रीती करावी, एकमेकांना स्वीकारावे याचसाठी देवाने आम्हांला उत्पन्न केले आहे, पण आमच्या मनातील नाकारले जाण्यीच भावना व भय कामय तसेच राहावे यासाठी सैतान

सतत झटत असतो. कारण स्वत:च्या लायकीची जाणीव पुसली गेली आणि नाकारले गेल्याची भावना वाढत राहिली की व्यक्ती, कुटुंबे, आणि मैत्री या सर्वांचेच नुकसान होते, कोणाचा कोणाला मेळ राहत नाही.

वर छळणुकीचे काही प्रकार नमूद केले आहेत - त्यांचा परिणाम तुटलेली नाती, टाकून दिले जाणे, घटस्फोट, खोटे आरोप, गटातून, समूहातून बाहेर फेकले जाणे, शिक्षकांनी हिडिसफिडिस करणे, वडीलधाऱ्या मंडळींनी हेळसांड करणे, बरोबरीच्या लोकांनी टिंगलटवाळी करणे या आणि अशाच इतर अनेक दुखारणाऱ्या कृतींतून भावनांना, अंत:करणांना झालेल्या जखमा पुन्हा नव्या होतात, आणि परिणामी दुसऱ्यांशी चांगले टिकाऊ निकोप नातेसंबंध जोडणे अशक्य होते.

## तुमचा छळ झाला आहे का?

तुम्हांला कधी कोणी वाईट वागवले असेल अगर छळले असेल, तुमचा गैरफायदा घेतला असेल तर त्याचा तुमच्या भावनांवर निश्चितच विपरीत परिणाम झाला असणार. पण या छळ, वेदना, आघात, वेदना या दुष्ट चक्रातून सुटायचे असेल तर प्रथम आपण बरे व्हायचे अशी इच्छा तुमच्या मनात असली पाहिजे.

शास्त्रलेखांमधील अनेक वचने, भाग माझ्या आवडीचे आहेत. योहान.५ हा त्यातलाच एक (पण जरा धक्कादायक) आहे. योहान.५ मध्ये येशूने बेथेसदा तळ्याजवळ पडलेला एक माणूस पाहिला. तो मनुष्य दीर्घकाळापासून, सुमारे ३८ वर्षांपासून काही जुनाटा दुर्धर रोगाने आजारी होता. तो माणूस त्या भयानक स्थितीत फार काळ पडून आहे हे जाणून येशूने त्याला विचारले, ‘‘तुला बरे होण्याची इच्छा आहे का?’’ [खरोखर बरे व्हावे असे तुला मनापासून वाटते का?] (योहान.५:६).

एवढा दीर्घकाळ आजाराने खितपत पडलेल्या त्या माणसाला अगर दुसऱ्या कोणालाही असा प्रश्न विचारणे योग्य आहे का? आहे, कारण जे करणे आवश्यक आहे ते करून आपण बरे व्हावे असे सर्वांनाच वाटत नाही. दुखावलेल्या भारना कारागृहाच्या उंच उंच भिंतीसारख्या होऊन स्वत:ला कोंडून ठेवतात आणि दुसऱ्यांना आत येऊ देत नाहीत. तथापि, कारागृहाचे दरवाजे उघडून कैद्यांना मुक्त करण्यासाठी येशू आला (पाहा लूक.४:१८-१९).

बेथसैदा येथील हा माणूस आमच्या अनेक लोकांच्या सारखा होता. त्याच्या अंगात जुनाट आजार दीर्घकाळ ठाण मांडून बसला होता. ३८ वर्षे रोगाचे दु:ख सोसल्यावर आता, त्याला त्याची सवय झाली होती असे मला वाटते. आपली नित्याची कामे तो केवळ सवयीने पार पाडीत होता. तुरुंगातल्या लोकांचेही असेच असते. ते रोजची कामे करतात पण ते स्वतंत्र नसतात. केव्हा केव्हा असे शारीरिक अगर/आणि मानसिक बंधनात पडलेले लोक त्याच गुलामीत राहण्यास शिकतात आणि त्यातच समाधान मानून राहतात.

तुम्ही असे भावनांचे ''मानसिकतेचे कैदी'' आहात का? असाल तर या स्थितीत तुम्ही किती काळापासून आहात? ही विकृती तुमच्या हाडीमाशी खिळून राहिली आहे का? त्यातून सुटका व्हावी असे तुम्हांला वाटते का? तुम्हांला खरंच बरं व्हायचं आहे? तुम्हांला बरे करारे ही येशूची इच्छा आहे. तो तत्पर आहे. तुम्ही तयार आहात का?

## तुम्हांला मुक्त आणि निरोगी व्हायचे आहे का?

मानसिक, भावनिक गुलामगिरीतून सुटका करून घेणे वाटते तेवढे सोपे नाही. मी अगदी आरंभीच खरे खरे परखडपणे सांगते की, गतकाळातील वेदनांपासून सुटका करून घेणे कित्येक लोकांना अतिशय कठीण आहे, या चर्चेतून त्यांच्या अंतरीच्या कळा पुन्हा उफाळून येतील. ते झाकून ठेवू पाहतात त्या जखमा पुन्हा उघड्या होतील. अंतरंगात भावनांचा कल्लोळ माजेल. कदाचित तुम्हीही ह्यांच्यापैकी एक असाल.

कदाचित तुम्हांला गतकाळात काही दारुण, वेदनाकारी भावभावनांचा अनुभव आला असेल आणि जेव्हा जेव्हा त्या जुन्या आठवणी जाग्या होतात, वर येतात तेव्हा तेव्हा तुम्ही व्याकुळ होऊन देवाला म्हटले असेल : ''हे प्रभू, नको, अद्याप माझी तयारी झाली नाही. मी या प्रश्नाला नंतर सामोरा जाईन, आता नको.'' या पुस्तकामध्ये दुसऱ्यांच्या करुणीमुळे तुमच्या मनाला झालेल्या यातनांचा विचार केला आहे, तसेच हे भावनिक आघात दूर करून परत निरोगी होण्याची तुमची देवासंबंधीची जबाबदारी यांचाही विचार केला आहे.

काही लोकांना (खरे तर पुष्कळशा लोकांना) आपल्या मानसिक आरोग्याची जबाबदारी घेणे खूपच अवघड जाते. या पुस्तकामध्ये आम्ही क्षमा, दाबून दडपून ठेवलेला राग, आत्मदया, आपल्यावव अन्याय झाला आहे अशा समजुतीचा भार वाहणे, जगावर राग काढणे, तुम्हीच माझे देणे लागता अशी कृती या आणि अशाच अनेक विषारी वृत्तीप्रवृत्तींचा समाचार योग्य प्रकारे घेतला आहे. तुम्हांला बरे व्हायचे असेल तर या सर्व प्रवृत्तींचा नायनाट करणे अगत्याचे आहे.

तुम्ही म्हणाल हे सर्व ठीक आहे, पण मुळात ज्याने माझी ही अशी अवस्था केली त्याचे काय? त्यााल कोण शासन करणार? अर्थात, आपण ह्याही मुद्द्याचा विचार करणार आहोत. कदाचित तुमच्या मनात असाही विचार आला असेल : ''कोण ही बाई? हिला या भावनिक प्रश्नांवर बोलण्याचा काय अधिकार? विशेषत: माझ्या भावनांचा विचार ती कसा करणार? कदाचित तुम्ही मला असे प्रश्नही विचाराल : ''तुम्ही मानसशास्त्राचे शिक्षण घेतले आहे? पदवी घेतली आहे? तुम्ही कुठे शिकला? माझी अवस्था तुम्हांला काय माहीत? तुम्ही स्वत: असा अनुभव घेतला आहे का? भावनांच्या बंदिशाळेत खितपत पडण्याचा प्रकार काय असतो ते तुम्हांला समजणार कसे?''

या सर्व प्रश्नांची उत्तरे माझ्याकडे आहेत. तुमच्या स्वत:च्या परिस्थितीचे समोरासमोर निरीक्षण परीक्षण करण्याचे धैर्य तुमच्यामध्ये असेल आणि आपणाला खरोखर बरे व्हायचे आहे असा तुमचा निश्चय असेल तर पुढे वाचीत राहा.

## माझी छळणूक झाली

या विषयाचे शिक्षण देणे, चर्चा करणे यासाठी आवश्यक ते शिक्षण, पदव्या, अनुभव आणि गुणवत्ता हे सर्व माझ्या वैयक्तिक अनुभवातूनच मला मिळाले आहे. ''मी जीवनाच्या पाठशाळेतून पूर्ण शिक्षण घेतले आहे'' असे मी नेहमीच सांगते. यशया संदेष्ट्याची ही वचनेच माझ्या पदवीचे प्रमाण आहे. पाहा :

> प्रभु परमेश्वराचा आत्मा मजवर आला आहे; कारण दीनांस शुभवृत्त सांगण्यास परमेश्वराने मला अभिषेक केला आहे; भग्नहृदयी जनांस पट्टी बांधावी, धरून नेलेल्यांस मुक्तता, व बंदिवानांस बंधमोच विदित करावे.
>
> परमेश्वराच्या प्रसादाचे वर्ष व आमच्या देवाचा सूड घेण्याचा दिवस विदित करावा, सर्व शोकग्रस्तांचे सांत्वन करावे. सीयोनातील शोकग्रस्तांस राखेच्या ऐवजी शिरोभूषण घालावे, त्यांस शोकाच्या ऐवजी प्रशंसारूप वस्त्र द्यावे; खिन्न आत्म्याच्या ऐवजी प्रशंसारूप वस्त्र द्यावे. ते अर्थात अशासाठी की, परमेश्वराच्या गौरवार्थ त्यांस धार्मिकतेचे वृक्ष, परमेश्वराने लाविलेले रोप म्हणता यावे म्हणून त्याने मला पाठविले आहे. (यशया ६१:१-३)

देवाने माझी राख घेऊन बदल्यात सौंदर्य दिले आहे आणि त्याला इतरांसाठीही असेच करता यावे म्हणून दुसऱ्यांना शिकवण्यासाठी, मार्गदर्शन करण्यासाठी मला पाचारण केले आहे.

मला आठवते तसे सांगते. अगदी लहानपणापासूनच माझा परोपरीने छळ झाला. लैंगिक अत्याचार, कठोर बोलणे, मानसिक व भावनिक शोषण या सर्व बाबतींत माझा छळ झाला. लैंगिक अत्याचार, कठोर बोलणे, मानसिक व भावनिक शोषण या सर्व बाबतीत माझा छळ झाला. वयाच्या अठराव्या वर्षी मी घर सोडून बाहेर पडले तेव्हापर्यंत हा छळ चालूच होता. खरे तर माझ्या बालपणी अनेक पुरुषांनी माझी छळणूक केली. त्यांनी मला टाकले, सोडले, माझा विश्वासघात केला, मला घटस्फोट दिला. भावनांचा बंदिवान होणे म्हणजे काय हे मला चांगले माहीत आहे.

या पुस्तकात मी माझे चरित्र तपशीलवार सांगितलेले नाही. तो माझा उद्देश नाहीच. दुखावलेले असणे, अगतिक होणे म्हणजे काय हे मला चांगले माहीत आहे याची खात्री तुम्हांला पटावी यासाठी आवश्यक तेवढेच माझे अनुभर मी सांगितले आहेत. छळणुकीचे आघात आणि अगतिकता आणि वेदना यांच्यातून सुटका कशी करून घ्यावी ते मी तुम्हांला

दाखवणार आहे. तुम्हांला मदत करावी हीच माझी इच्छा आहे आणि तुमची स्थिती, अवस्था मला नीटपणे समजते हे तुम्ही लक्षात घेतले, खरे मानले तर हे सहाय्य अधिक चांगल्या प्रकारे देता येईल.

माझ्या बालपणातील कडू आठवणी आणि भयानक अनुभव सांगण्यापूर्वी मला एक गोष्ट सांगू दे. हे अनुभव सांगताना माझ्या आईवडिलांचा कोणत्याही प्रकारे अपमान अगर निंदा करण्याचा माझा मुळीच उद्देश नाही. हे पुस्तक प्रथम प्रकाशित झाले तेव्हापासून देवाने कृपाळूपणे माझे व त्याचें नातेसंबंध पुन्हा पूर्वपदावर आणले आहेत.

परंतु मी एक गोष्ट शिकले आहे. स्वत: दु:खी अगर दुखावले गेलेले लोकच दुसऱ्यांना दुखावतात, त्यांचा छळ करतात, दुसऱ्यांना त्रास देणाऱ्या, सतावणाऱ्या बहुतेक लोकांना अगोदर दुसऱ्या कोणीतरी त्रास दिलेला असतो. पण ''हे पित्या, त्यांना क्षमा करा, कारण ते काय करीत होते ते खरोखरी त्यांना समजत नव्हते,'' असे बोलण्यास देवानेच मला कृपाळूपणे शक्ती पुरवली आहे.

माझ्याप्रमाणे ज्यांचा छळ झाला होता त्यांना सहाय्य व मार्गदर्शन व्हावे याच उद्देशाने मी हा वृत्तान्त सांगितला आहे.

# 3

# सहभागिता भयभीतीची

माझ्या घरातच बालपणी माझा लैंगिक आणि भावनिक छळ झाला. परिणामी माझे संपूर्ण बालपण भयाच्या काळ्या छायेतच थरथर कापण्यात गेले. माझे वडीलच माझा छळ करीत. त्यांचा संताप पाहण्यात आणि धाकदपटशा, धमक्या ऐकण्यात माझे बालपण संपले. त्यांनी माझ्यावर कधी जबरदस्ती केली नाही. पण त्यांच्या रागाचा मी एवढा धसका घेतला होता की ते सांगतील ते सर्व काही मी निमूटपणे करीत असे. आणि ते माझ्याशी, मला जे काही करीत ते मला अतिशय आवडते असा बहाणा करण्यास ते मला भाग पाडीत. तसेच त्यांनी असेच करावे, करीत राहावे ही इच्छा मी बोलून दाखवावी असेही त्यांचे म्हणणे होते.

माझ्या एकंदर परिस्थितीविषयी मी एकदा दोनदा घाबरत घाबरत खरे खरे बोलण्याचा प्रयत्न केला तेव्हा परिणाम फारच वाईट झाले. माझ्या वडिलांनी तेव्हा रागाने आकाशपाताळ एक केले. एवढी बडबड केली, हातपाय आपटले. ते पाहून मी अतिशय घाबरून गेले आणि एक शब्दही न बोलता ते सांगतील ते मी निमूटपणे करण्यास शिकले. मला जे काही केले जात होते, त्याविषयी माझ्या खऱ्या भावना बोलून दाखवण्यास मनाई होती आणि त्यांनी माझ्याशी केलेले विपरित, विकृत वर्तन मला खरोखर आवडते असे सांगण्याची सक्ती यामुळे माझ्या मनावर नित्य नवेनवे घाव बसत होते. भावनांचा चोळामोळा होत होता. परिणामी आतल्या जखमा खोल खोल झाल्या असे मला वाटते.

माझे वडील दुपारनंतर कामावर जात आणि रात्री अकरा-बारा वाजता घरी परत येत. दार उघडून ते आत आल्याची चाहूल लागली की ते माझे अंगअंग भीतीने गारठून जाई असे मला

पक्के आठवते. माझे हातपाय आखडले जात, कारण ते कधी काय करतील याची शाश्वती नव्हती. कधी ते माझ्या खोलीत येऊन माझ्या अंगावर हात टाकीत अगर आत येऊन रागाने आरडाओरडा करीत.

ते केव्हा काय करतील, कसे वागतील हे कधीच नक्की नसे, त्यामुळे नेहमीच माझे काळीज धडधडत राही. मी काय करावे, काय करू नये हे मला कधीच निश्चित समजत नसे. समजा आज मी एखादी गोष्ट केली आणि ती वडिलांच्या पसंती येई, पण पुन्हा काही दिवसांनी मी तीच गोष्ट केली तर त्यांचा संताप उसळून येई आणि मला लाथाबुक्क्यांचा मार मिळे. भय तर नेहमीच माझ्या सोबत असे. माझ्या वडिलांचे भय, त्यांच्या संतापाचे भय, उघडकीस येण्याचे भय, घडणाऱ्या गोष्टी आईला समजल्या तर काय हे भय, मित्रमैत्रिणी असण्याचे भय, सर्वत्र भयच भय.

मित्रमैत्रिणी असल्या तरी मला भय वाटे. त्याला दोन कारणे होती. एक म्हणजे माझे वडील माझ्या मैत्रिणींना आपल्या जाळ्यात ओढण्याचा धोका व भय होते. आणि मित्र असले तर माझे वडील त्यांना आणि मलाही मारहाण करतील ही भीती होती. शाळेतील ओळखीच्या मुलांशी माजे लैंगिक संबंध आहेत असे गलिच्छ आरोप ते माझ्यावर करीत आणि वर फटकेही मारीत. मी खास ''त्यांची'' होते म्हणून ते दुसऱ्या कोणालाही माझ्या आसपास फिरकू देत नसत.

मी हायस्कूलमध्ये शिकत असताना मला कोणतेच मैदानी खेळ - फूटबॉल, बेसबॉल वगैरे पाहण्यास जाण्याची परवानगी नव्हती. शाळेमध्ये मी दुसऱ्यांच्या ओळखी करून घेण्याचे प्रयत्न केले. पण या ओळखी जास्त वाढवल्या नाहीत. कारण मग या मित्रमैत्रिणींच्या घरी जावे लागले असते. त्यांना घरी बोलवावे लागले असते. माझ्या घरी माझ्याशी संपर्क साधण्यास मी कोणालाच कधी उत्तेजन दिले नाही. घरातला फोन वाजला आणि तो माझ्यासाठी असला तर माझी अगदी गाळण उडे. शाळेतील कोणी मित्र मैत्रीण तर फोनवर नसेल ना?

मित्र असण्याचे भय आणि एकाकीपणाचे भय या दोन्ही भयांनी माझा पिच्छा पुरवला होता. माझ्या घरी कोणाला बोलावणे आणि त्यांना छळाच्या आगीत ढकलणे हे मला नको होते, तसेच यातून मला अधिक अवघड झाले असते, लाजशरमेने मान खाली घालावी लागली असती हेही भय होतेच.

## भय! भय! भय!

माझे वडील दर आठवडी शेवटच्या दिवशी दारू पिऊन अगदी तर्र होत. प्यायला जाताना अनेकदा ते मलाही बरोबर नेत आणि तेथे ते त्यांच्या मनास येईल तसे माझ्याशी वाटेल ते चाळे करीत. अनेकदा ते रागाने लाल होऊन घरी येत आणि माझ्या आईला झोडपून

काढीत. एकदा तर तुझे नाकच खूप मोठे आहे असे म्हणून त्यांनी तिला चोप दिला. ते काही नेहमी मला मारहाण करीत नसत. पण रागाने बेभान होऊन माझ्या आईला ते मारहाण करीत ते पाहून माझ्यावर व्हायचा तो विपरीत परिणाम झालाच. तेव्हा ते जणू मलाच मारीत आहेत असे मला वाटे.

घरातल्या प्रत्येक गोष्टीवर, माझ्या वडिलांचेच नियंत्रण असे. आम्ही केव्हा उठायचे, केव्हा झोपायचे, काय जेवायचे, कोणते कपडे घालायचे, कसा खर्च करायचा हे सर्व तेच ठरवीत. आम्ही कोठे जातो, काय करतो, कोणाशी बोलतो, टीव्हीवर काय पाहतो यांवर त्यांचे अगदी बारीक लक्ष असे. थोडक्यात आमच्या जीवनाची सर्व सूत्रे त्यांच्याच हाती होती. माझी आई, मी आणि पुढे मी नऊ वर्षांची असताना जन्मलेला माझा भाऊ अशा सर्वांशी ते नेहमी शिव्याशाप देऊन बोलायचे. घरात येणारे नवे बाळ मुलगीच असावे अशी माझी तीव्र इच्छा होती. याचे कारण एवढेच की तिच्यामुळे माझी जरा तरी सुटका झाली असती.

माझ्या वडिलांच्या तोंडात सतत शिव्या असत, त्यांच्या तोंडच्या शिव्या अतिशय घाणेरड्या, ज्यांचा उच्चारही करू नये अशा असत. त्यांनी कधी कोणत्या गोष्टीला अगर व्यक्तीला चांगले म्हटले नाही. आमच्या हातून कधीच काही चांगले होणार नाही, आयुष्यात आम्ही अगदी वाया जाणार हे त्यांचे ठाम मत होते. ''फुकट जन्म तुमचा!'' हे शब्द तर रोज वारंवार आम्हांला ऐकावे लागत.

केव्हा केव्हा माझे वडील अगदी चांगले वागत. ते आम्हांला पैसे देऊन सांगत, ''जा बाजारात जा, हवे ते घेऊन या!'' केव्हा ते आमच्यासाठी काही वस्तू आणीत, बक्षिसे देत. त्यांना हवे ते मिळावे म्हणून जे आवश्यक तेवढे ते करीत. त्यांच्या दृष्टीने दुसऱ्या लोकांचे मोलमहत्त्व त्यांचा स्वत:चा स्वार्थ साधण्यापुरतेच होते.

आमच्या घरात नावालाही शांतता नव्हती. शांती म्हणजे काय हेच मला मुळी माहीत नव्हते. पुढे मी मोठी जाली, कित्येक वर्षे देवाच्या वचनामध्ये गढून गेले तेव्हा कुठे मला खरी शांती कशी असते ते समजले.

मी नऊ वर्षांची असताना बाहेरगावी नातेवाइकांना भेटण्यास गेले असताना माझा नवा जन्म झाला. एकदा रात्री मी त्यांच्याबरोबर चर्चमध्ये उपासनेसाठी गेले. तारण मिळावे अशी उत्कट इच्छा धरून तिकडे गेले. माझे तारण झालेच पाहिजे असे मला का व कसे वाटले ते काही सांगता येत नाही. पण देवानेच माझ्या हृदयात ती इच्छा ठेवली असणार. त्या रात्री माझा तारणारा म्हणून मी येशू ख्रिस्ताला स्वीकारले. अंतरंगात शुद्ध झाल्याचा दिव्य अनुभव मला आला. त्या क्षणापूर्वी मला आतून अगदी गलिच्छ, घाणेरडे असे वाटत होते. कारण वडिलांकडून होणारे लैंगिक शोषण. आता प्रथमच मला आतून शुद्ध, स्वच्छ झाल्याचे जाणवले. जणू काही कोणी मला आतून आंघोळ घातली होती, परंतु माझी मूळ समस्या सुटली नव्हती. मग घर परतलयवर माझ्या पूर्वीच्या जुन्या भावना, भय सर्व पुन्हा उफाळून

आले. मला वाटले की येशूला मी गमावून बसले. आणि मला खरी आंतरिक शांती व आनंद कधीच मिळाला नाही.

## गौप्यस्फोट! विश्वासघात!

माझ्या आईचे काय? या सर्वांमध्ये तिची भूमिका काय होती? तिने मला मदत का केली नाही? मी आठनऊ वर्षांची असताना आमच्यात (माझे वडील आणि मी) काय चालले आहे ते मी तिला स्पष्टपणे सांगितले. तिने माझी तपासणी केली आणि वडिलांना जाब विचारला, तेव्हा ते म्हणाले, ''ही तुझी मुलगी खोटारडी आहे. ती नेहमीच कोटे बोलते.'' आणि तिने माझ्यावर नव्हे तर त्यांच्यावर विश्वास ठेवला. त्यांचेच खरे मानले. अशा परिस्थितीत कोणत्याही स्त्रीने आपल्या नवऱ्यावरच विश्वास ठेवला असता, नाही का? मला वाटते खरे काय ते माझ्या आईने ओळखले होते. ''अंतरंगात खोल कुठेतरी तिची खातरी पटली होती. पण हे सर्व खोटेच असणार अशी वेडी आशा तिने मनात धरली होती.

मी चौदा वर्षांची असताना एक दिवस ती अचानक बाजारातून लवकर घरी आली. माझे वडीलच माझा लैंगिक छळ करीत आहे हे तिने प्रत्यक्षच पाहिले. तिने ते पाहिले आणि ती सरळ घराबाहेर गेली व दोन तासांनी परत आली. जणू काही तिने काहीच बघितले नव्हते ती अगोदर घरी आलीच नव्हती असे तिने दाखवले.

*माझ्या आईनेच माझा घात केला*

पुढे कितीतरी वर्षांनी (खरे तर तीस वर्षांनी) तिने मला कबुली दिली की तिने तो प्रसंग पाहिला होता, पण त्यातून होणारी बेअब्रू, नाचक्की यांना घाबरून ती स्वस्थ राहिली. तोंड उघडून बोलली नाही. आणि तीस वर्षांपर्यंत ती तशीच गप्प राहिली! याच काळात तिला मोठा मानसिक धक्का बसला. ती उदास झाली. तिचे परिचित लोक आप्त म्हणू लागले आता चाळिशी उलटल्यावव असे व्हायचेच! ढळलेले मानसिक संतुलन पूर्ववत व्हावे यासाठी तिला विजेचे झटके दिले. त्यामुळे काही काळ तिच्या आठवणींचा, स्मरणशक्तीचा काही भाग तात्पुरता पुसला गेला. तिने कोणती तरी गोष्ट विसरणए जरुरीचे आहे यावर सर्वच डॉक्टरांचे एकमत होते, पण काय विसरायचे ते त्यांना माहीतच नव्हता. तिच्या मनावर कसले तरी दडपण होते, त्यामुळे तिचे मानसिक आरोग्य पोखरले जात होते हे स्पष्टच दिसून आले.

माझी आई म्हणे की मनाचा आजार शारीरिक कारणांनी झाला आहे. अगदी आरंभीच्या वयातच तिला स्त्रियांच्या काही समस्यांना तोंड द्यावे लागले होते. त्या दुखण्याने ती हैराण झाली होती. वयाच्या छत्तीसाव्या वर्षी तिचा गर्भाशय काढून टाकावा लागला त्यामुळे नेमलेल्या वेळेपूर्वीच तिची मासिक पाळी थांबली. आज अशा स्थितीत डॉक्टर हार्मोनचे उपचार करतात. पण तेव्हा पूर्वी असे उपचार करीत नव्हते, त्यामुळे तिला खूपच वेदना सोसाव्या लागल्या. मला वाटते की तिच्या जीवनातील कोणत्याच गोष्टीला तिने कधी ठामपणे तोंड दिले नाही. तिच्यामध्ये ती कुवतच नव्हती.

व्यक्तिश: मला नेहमीच वाटते की माझ्या आईचे मानसिक, भावनिक संतुलन ढळण्यात तिने वर्षानुवर्षे सोसलेला छळ कारण होता. तसेच ती कधीच सत्याला सामोरी गेली नाही. सर्व गोष्टी तिने मनातल्या मनात दाबून दडपून ठेवल्या म्हणून तिची अशी अवस्था झाली होती. लक्षात ठेवा, योहान.८:३२ मध्ये आमच्या प्रभूने आम्हांला सांगितले आहे : ''तुम्हांला सत्य समजेल व सत्य तुम्हांला बंधमुक्त करील.''

देवाचे वचन सत्य आहे. त्यामध्ये बंधनात पडलेल्याला मुक्त करण्याचे सामर्थ्य आहे. मात्र त्याचा योग्य उपयोग केला पाहिजे. देवाचे वचन आम्हांला धीर, धैर्य व शक्ती देते. त्यामुळे आम्हांला जीवनाती समस्यांना, प्रश्नांना नीटपणे तोंड देता येते. स्थिर उभे राहा आणि सामना करा असे प्रभू सांगत असताना आम्ही पाठ फिरवली, पळ काढला तर आमची बंधने कधीच तुटणार नाहीत, आम्ही बंधनातच राहू.

## घर सोडून जाणे

वयाच्या अठराव्या वर्षी माझे वडील कामावर गेले असताना मी घर सोडून दुसरीकडे गेले. त्यानंतर लगेच मला भेटलेल्या पहिल्याच तरुणाशी मी लग्न केले.

माझ्या नवऱ्यालाही माझ्यासारख्याच अनेक समस्या, अडचणी होत्या. तो चोर, भामटा, गोड बोलून फसवणारा, दुसऱ्यांना टोप्या घालण्यात पटाईत होता. बहुते वेळ तो काहीच काम करीत नसे. आम्ही पुष्कळ फिरलो, येथून तेथे अशी गावे आणि घरे बदलली. एकदा तर त्याने मला कॅलिफोर्नियात टाकून दिले. तेव्हा माझ्याकडे फक्त एक रुपया आणि शीतपेयांच्या बाटल्याचे एक खोके याशिवाय दुसरे काहीच नव्हते. मी घाबरले, पण असे प्रसंग मला काही नवे नव्हते. बालपणापासून भयभीती आणि छळणूक यांच्या सहवासात मी वाढले होते. एखादी 'नवशिकी' अनुभव नसलेली व्यक्ती गर्भगळित झाली असती. पण माझी तशी स्थिती झाली नाही.

माझ्या नवऱ्याने मला एकदाच नव्हे, तर अनेकदा टाकून दिले. मी कामावर गेले की तो सरळ कुठेतरी निघून जायचा आणि मग केव्हाही दोनचार दिवसांनी, आठवड्यांनी अगर महिन्यांनी पुन्हा परत यायचा. तो असा अचानक आला की, गोडगोड बोलायचा, माझी माफी मागायचा आणि मी त्याला परत घरात घ्यायची. मग काही दिवस चांगले जायचे. पण लवकरच पुन्हा ये रे माझ्या मागल्या असे व्हायचे. तो माझ्याकडे असताना सतत पीत राहायचा आणि दुसऱ्या बायांशी संबंध ठेवायचा.

अशा प्रकारे पाच वर्ष आम्ही हा लग्नाचा खेळ खेळलो. आम्ही दोघेही अगदी तरुण, अठरा वर्षांचे होतो. संसाराचा, मुलांना वाढवण्याचा अनुभव काहीच नव्हता. वयाच्या एकवीसाव्या वर्षी एकदा गर्भपात झाला आणि बावीसाव्या वर्षी माझ्या मोठ्या मुलाचा जन्म झाला. यामुळे माझ्या अडचणी अधिकच वाढल्या. हा मुलगा जन्मला तेच आमच्या विवाहाचे शेवटचे वर्ष ठरले. तेव्हा माझा नवरा मला सोडून दुसऱ्या बाईच्या घरात जाऊन राहिला.

त्याचा हा नवा घरोबा माझ्या घराजवळच होता. मला झालेले मूल आपले नव्हे, दुसऱ्याच कोणाचे आहे असे तो ज्याला त्याला सांगत असे.

१९६५ च्या उन्हाळ्यात माझी मनस्थिती फार बिघडली. अगदी वेड लागण्याचा प्रसंग आला होता. गरोदरपणात मला जेवण जाईना म्हणून माझे वजन घटले. कोणी मित्र नाहीत, पैसा नाही, विमा नाही अशा स्थितीत मी एका मोठ्या हॉस्पिटलमध्ये जाऊ लागले. तेथे दरवेळी कोणी नवाच डॉक्टर मला तपासत असे. खरे तर ते सर्वच डॉक्टर शिकाऊ उमेदवार होते. झोप येत नसे म्हणून मी दुकानात सहज मिळणाऱ्या झोपेच्या गोळ्या घेऊ लागले. पण त्यामुळे मला अगर पोटातल्या बाळाला काही झाले नाही ही देवाचीच कृपा.

तो उन्हाळा फारच कडक होता. तपमान ४७° - ४८° च्या पुढे गेले. मी तिसऱ्या मजल्यावर अगदी बुटक्या फ्लॅटमध्ये राहत होते. तेथे पंखा नव्हता अगर वातानुकूलन नव्हते. माझ्याकडे फक्त एक जुनी मोटारगाडी होती. दुसरे काहीच नव्हते. पण ही गाडी तापली बंद पडत असे. ''एक दिवस तू नाक घाशीत माझ्या पायाशी येशील हे माझे शबद् लक्षात ठेव,'' असे माझे वडील म्हणाले होते. काही झाले तरी त्यांच्याकडे जायचे नाही, मी काहीही करीन, पण परत जाणार नाही हा माझा निर्धार होता. पण ''काहीही'' म्हणजे नेमके काय ते मला उमगत नव्हते.

मला आठवते, मनावर एवढे दडपण येई की मी तासन्तास नुसती भिंतीकडे अगर खिडकीतून बाहेर पाहत बसून राहत असे. मला काय होते, मी काय करते याचीही मला अजिबात जाणीव नव्हती. माझं बाळ जन्माला येईपर्यं मी काम करीत होते. पण दिवस भरले तेव्हा मी नोकरी सोडली. माझी केशभूषा करणारी मुलगी आणि तिची आई ह्यांनी मला त्यांच्या घरात आसरा दिला.

माझं बाळ साडेचार आठवडे उशीरा जन्मले. पुढे काय होणार, जन्मलेल्या बाळाची काळजी कशी घ्यायची, काय करायचे याची मला जराही कल्पना नव्हती. बाळ जन्मले तेव्हा माझा नवरा हॉस्पिटलमध्ये आला. बाळ अगदी त्याच्याचसारखे होते; त्यामुळे हे मूल माझे नाही असे म्हणण्यास त्याला तोंडच नव्हते. पुन्हा एकदा त्याने माझी क्षमा मागितली. म्हणाला, ''आता मी बदलणार, चांगला जबाबदारीने वागणार.''

हॉस्पिटलमधून घरी जाण्याची वेळ आली तेव्हा कुठे जायचे हा बिकट प्रश्न तसाच होता. मग माझ्या नवऱ्याने त्याच्या भावाच्या घटस्फोटित पत्नीशी संपर्क साधला. ही बाई चांगली ख्रिस्ती होती. तिने आम्हांला तिच्या घरी काही काळ राहू दिले. मी कामावर जाण्यासारखी होईपर्यंत आम्ही तिच्या घरी राहिलो.

हे थोडेस तपशील दिले आहेत, त्यावरून माझे जीवन एकंदरित कसे होते ते तुमच्या लक्षात आलेच असेल. खरे तर तुटलेल्या पतंगाला दोराचा थोडा तरी आधार असतो, पण मला तोही नव्हता. माझे जीवन हास्यास्पद होते. माझ्या संपूर्ण अस्तित्वात काहीच स्थिर नव्हते, स्थावर नव्हते. मला स्थिरता हवी होती. स्थैर्यासाठी मी अगदी आसुसले होते.

अखेरीस १९६६ च्या उन्हाळ्यात मी सर्वच आशानिराशा सोडली. माझे काय होईल, कसे होईल हा विचारच मी सोडून दिला. माझ्या नवऱ्याबरोबर राहायचे हा विचारही मला सहन होईना. आता माझ्या लेखी त्याची किंमत कस्पटाएवढीही उरली नव्हती. आणि आता तर अगदी कहरच झाला होता. तो कायद्याच्या कचाट्यात सापडला होता. मी माझ्या मुलाला उचलले आणि घेता येईल एवढे सामान घेऊन घर सोडून बाहेर पडले. मी जवळच्या फोन बूथवरून वडिलांना फोन केला आणि घरी परत येऊ का असे विचारले. त्यांनी आनंदाने होकार भरला.

मी घरी आले. दोन महिन्यांनी मला घटस्फोट मिळाल्याचे समजले. ही गोष्ट सप्टेंबर १९६६ मधली. या सुमारास माझ्या आईची मनस्थिती अगदी बिघडली होती. तिला जोरदार फिट्स येऊ लागल्या, बेशुद्ध अवस्थेत ती बडबड करी. तिच्याबरोबर काम करणारय लोकांवर खोटेनाटे आरोप करी. ती कायम आपल्या पर्समध्ये सुरी ठेवू लागली. ती नेहमी प्रत्येक गोष्टीविषयी वाटेल तशी उलटसुलट बडबड करू लागली. एका रात्री तिने मला झाडू घेऊन बडवले, कारण मी बाथरू पुसली नव्हती. ही घटना मला आजही चांगली आठवते. हे सर्व घडत असताना माझ्या वडिलांपासून लांब राहण्यासाठी मला सतत जागृत राहावे लागत होते. शक्य तो त्यांच्याबरोबर एकटे राहण्याचा प्रसंग येऊ नये म्हणून मी जपत होते.

*थोडक्यात मी जिवंतपणी नरकयातना भोगत होते*

जिवाची करमणूक व्हावी म्हणून मी दर शनिवारी दारू पिण्यासाठी जात असे. माझ्यावर प्रेम करणारा कोणी भेटेल का ते मी पाहत होते. मी थोडीशी पीत असे. मी पिऊन कधी धुंद झाले नाही. खरे तर मला दारू पिणे मुळीच आवडत नव्हते. मला तिकडे खूप पुरुष भेटले. त्यांना फक्त रात्रीची सोबत हवी होती. पण मी त्या सगळ्यांना नकार देई. माझे जीवन उजाड झाले होते, तरीपण शुद्ध, चांगले असावे ही मनात दृढ इच्छा होती.

मी गोंधळले होते, घाबरले होते. मी अगदी एकाकी, उदास, निराश झाले होते. मी वारंवार देवाला विनंती करीत होते, ‘‘प्रिय देवा, मला सुखी समाधानी असू दे... एक दिवस माझ्यावर प्रेम करील, माझी काळजी घेईल असा कोणीतरी मला मिळू दे. आणि त्याने मला चर्चमध्ये घेऊन जावे असे होऊ दे.’’

## माझा उमदा उमराव सरदार

माझ्या आईवडिलांचे स्वत:चे घर होते. ते एकदोन भाडेकरू ठेवण्याएवढे व स्वत: राहण्याएवढे मोठे होते. त्यांचा एक भाडेकरू डेव्ह मायर नावाच्या माणसाबरोबर काम करीत असे. एक दिवस हा डेव्ह आपल्या या मित्राला भेटण्यासाठी आला. ते दोघे खेळायला जाणार होते. मी माझ्या आईची मोटार धूत होते. त्याने मला पाहिले, माझ्याशी गोड गोड बोलण्याचा प्रयत्न केला, पण मी माझ्या सवयीप्रमाणे त्याला तिरकस उत्तरे दिली. त्याने मला विचारले, ‘‘तुझी मोटार धुऊन झाली की माझी मोटार धुशील का?’’ त्यावर मी म्हटले, ‘‘तुमची मोटार

ना? हवी तर तुमची तुम्ही धुवा!'' आता पुरुषांवर माझा अजिबात विश्वास नव्हता, कारण माझा पूर्वीचा नवरा आणि वडील यांचा चांगलाच (?) अनुभव होता, पण माझे हे मत मी अगदी थोडक्यात सांगितले आहे.

परंतु डेव्हला देवाचा आत्मा चालवीत होता. तो नव्याने जन्मला होता. पवित्र आत्म्याने त्याचा बाप्तिस्मा झाला होता. देवावर त्याचे मनापासून प्रेम होते. तो सवीस वर्षांचा असून आपल्याला चांगली, सुयोग्य पत्नी मिळावी म्हणून सहा महिन्यांपासून देवााल विनंती करीत होता. आणि त्याच्यासाठी नेमलेली पत्नी जिला मदतीची गरज आहे अशी असावी हीही त्याची मागणी होती.

डेव्हला प्रभू प्रेरणा देत होता. माझे उपरोधिक बोलणे ऐकून त्याचा अपमान झाला नाही, तर त्याला उत्तेजनच मिळाले. पुढे त्याने आपल्या मित्राच्या मध्यस्थीने मला भेटण्याची इच्छा बोलून दाखवली. प्रथम मी नकार दिला. पण नंतर मी बदलले. मी त्याला पाच वेळा भेटले. त्याच्याशी बोलले. मग डेव्हने मला लग्नासाठी मागणी घातली. तो मला म्हणाला, ''आपण अगदी पहिल्यांदा भेटलो तेव्हाच तुझ्याशी लग्न करायचे ठरवले, पण उगाच तुझा गैरसमज होऊ नये म्हणून एवढे दिवस - ४-५ आठवडे थांबलो.''

माझ्या दृष्टीने बोलायचे तर प्रेम काय असते ते मला माहीत नव्हते आणि परत एखाद्या पुरुषाशी संबंध जोडावा अशी ओढही मला नव्हती. पण घरची परिस्थिती अधिकच बिघडत होती. सदासर्वकाळ मला जागरुक आणि भीतीच्या सावटात राहावे लागत होते. तेव्हा घरात सध्या जे सोसावे लागते त्यापेक्षा बाहेर थोडे तरी चांगले असणार असे समजून मी डेव्हला होकार दिला.

डेव्हने मला त्याच्याबरोबर उपासनेसाठी जाण्याबद्दल विचारले. मला ते हवेच होते. आणि याचसाठी मी प्रार्थनेतून विनंती केल्याचे तुम्हांला आठवत असेलच. प्रभूने माझ्यावर प्रीती करणारा असा पती दिल्यावर त्याने मला चर्चला घेऊन जावे हीही माझी मागणी होती. ख्रिस्ती जीवन जगावे ही माझी उत्कट इच्छा होती, पण यात मार्गदर्शन करणारा कोणीतरी खंबीर व्यक्तीची गरज होती. डेव्हने माझ्या लहानग्या मुलाची जबाबदारीही आनंदाने घेतली. आम्ही एकमेकांना भेटलो तेव्हा तो केवळ दहा महिन्यांचा होता. मी त्याचे नाव डेव्हिड ठेवले होते. माझ्या भावाचे नाव तेच होते. शिवाय मुलाचे नाव डेव्हिड ठेवावे ही माझी पूर्वीपासूनची इच्छा होती. घोर निराशेच्या काळोखात गुरफटून गेले असतानाही त्या अंधारातूनच प्रकाश मिळावा अशी योजना देव, माझा प्रभू करीत होता. त्याने ती योजना पूर्ण केली याचे मला आजही आश्चर्य वाटते.

७ जानेवारी १९६७ रोजी डेव्हचे आणि माझे लग्न झाले. पण नंतर ''शेवटपर्यंत सुखाने राहिलो'' असे मात्र घडले नाही. लग्न झाले, मी उपासनेसाठी मंडळीत जाऊ लागले, तरी त्यामुळे माझे प्रश्न संपले नाहीत, समस्या सुटल्या नाहीत. खरे तर माझ्या अडचणी समस्या माझ्या घरसंसारात, विवाहात नव्हत्या, तर माझ्यामध्ये, माझ्या तुटलेल्या, घायाळ, खुरटलेल्या भावनांमध्ये होत्या.

छळणूक झालेली व्यक्ती भावनात्मक दृष्टीने अपंग, उद्ध्वस्त झालेली असते. तिला कोणाच्या, कशाच्या तरी मध्यस्थीशिवाय, आधाराशिवाय निकोप, टिकाऊ, दृढ नातेसंबंध जोडता येत नाहीत. प्रेम द्यावे व प्रेम घ्यावे ही माझी इच्छा पण ते कसे करावे हेच समजत नव्हते. माझ्या वडिलांप्रमाणेच मीही वर्चस्व गाजवणारी, कपटी, रागीट, टीकाखोर, दोष काढणारी, नाकारणारी, दुसऱ्यांना सतत बोलणारी, शिरजोर, पाणउतारा करणारी झाले होते. लहानपणापासूनच मला याच अवगुणांचे बाळकडू मिळाले होते. सतत स्वत:ची कीव करीत राहिल्याने माझ्या तोंडातून अपशब्दांचा भडिमार चाले; उदासीनता आणि कटुता हा तर माझा स्थायी भाव झाला होता. माझ्या व्यक्तित्वाचे वर्णन आणखीही करता येईल. पण केले एवढे पुरेसे आहे. मी कशी होते ते एवढ्यावरून तुम्हांला समजेलच.

मी समाजात वावरत होते. नोकरीवर जात होते. डेव्हही काम करीत होता. आम्ही बरोबरच जोडीने उपासनेला जात असू. डेव्ह अगदी सुस्वभावी, मनमिळाऊ होता म्हणून आमचे विशेष वाद झाले नाहीत. साधारणपणे तो मला माझ्या मनाप्रमाणे वागू देत असे. पण त्याने कधी नकार दिला तर माझे माथे भडकत असे माझ्या दृष्टीने मी नेहमीच योग्य तेच करीत होते. मला प्रश्न नव्हते, समस्या नव्हत्या. पण इतर सर्वांना प्रश्न होते!

मी नव्याने जन्मले होते, हे लक्षात घ्या. येशूवर माझे प्रेम होते. माझ्या पापांची क्षमा झाली आहे आणि मेल्यावर मी स्वर्गात जाणार हा माझा विश्वास होता. पण माझ्या रोजच्या जीवनात मला विजयाचा अनुभव नव्हता. शांती, आनंद म्हणजे काय हे माहीतही नव्हते. ख्रिस्ती लोक सुखी समाधानी असताना हे मी ऐकून होते. ख्रिस्ती लोक सुखी समाधानी असतात हे मी ऐकून होते, तरी मी मात्र नक्कीच सुखी नव्हते. येशू ख्रिस्ताच्या रक्ताच्या द्वारे आमच्याकडे मोजलेले, गणलेले नीतिमत्त्व म्हणजे तेही मला माहीत नव्हते. सदासर्वदा मी दोषी, अपराधी आहे असेच मला वाटत होते. माझे माझ्यावर नियंत्रण नव्हते. काहीतरी वैयक्तिक लक्ष्य साध्य करण्यास झटत असताना माझे मन स्थिर असे. कारण यामुळे मला आत्मसन्मान मिळेल असे वाटत होते. एरवी मी सतत स्वत:ला दोष देत असे, स्वत:चा द्वेष करीत असे.

मला वाटे एकंदर परिस्थिती बदलली. सर्व गोष्टी बदलल्या, दुसरे *लोक* बदलले तर माझे सारे ठीकठाक होईल. हा विचार सतत माझ्या मनात घोळत होता. माझा नवरा, माझी मुले, माझी आर्थिक सिअथती, माझे आरोग्य, वेगळे असते; मला सुटीला जाता येते, तर नवी मोटार, नवे कपडे घेता येते तर मला घराबाहेर जाऊन नोकरी करून पुष्कळ पैसे मिळवता येते तर मी अगदी सुखी होईन, कृतकृत्य होईन. यिर्मया २:१३ - ज्यात पाण्याचा थेंबही नाही अशा विहीरी खोदत होते.

देवाचे राज्य म्हणजे नीतिमत्त्व, शांती व आनंद (रोम.१४:१७) तेच राज्य मी वस्तूंमध्ये आणि दुसऱ्या लोकांच्या मध्ये शोधण्याचा, मिळवण्याचा फोल, दु:खदायक खटाटोप करीत होते. देवाचे राज्य आपल्यामध्येच आहे हे मला कधी उमगलेच नव्हते. पौलाने हेच स्पष्टपणे सांगितले आहे : ‘‘...गौरवाची आशा असा जो ख्रिस्त तुम्हांमध्ये आहे तोच ते रहस्य [ते

राज्य] आहे'' (कलस्सै.१:२७). येशूने म्हटले आहे ''...कारण पाहा *देवाचे राज्य* तुमच्यात [तुमच्या *अंत:करणात*] आणि तुमच्यामध्ये [तुमच्या भोवताली] आहे'' (लूक.१७:२१ तिरपा टाईप माझा). माझा आनंद मला ख्रिस्तामध्येच मिळवायचा होता आणि मिळणार होता. पण हे समजण्यासाठी मला वर्षानुवर्षे शोध करावा लागला.

चांगले वागून, देहस्वभावानुसार सत्कर्मे करून मी नीतिमत्त्व मिळवण्याचा प्रयत्न केला. मी मंडळीचे कारभारमंडळावर आणि सुवाताप्रसार समितीवर होते. माझे पती मंडळीने चालवलेल्या शाळेत जात होती. मी सर्व योग्य तेच करण्याचा प्रयत्न चालवला होता. मी कितीही प्रयत्न केले तरी हातून चुका होण्याचे काही चुकले नाही. मी अगदी दीन, दु:खीकष्टी, लाचार झाले होते. माझी कुवत संपून पदरी विफलताच आली होती.

## खरोखरी मला समस्येची जाणीवच नव्हती

आजवर कित्येक वर्षे मी छळ आणि उपेक्षा सोसली होती. आता त्याच्याच परिणामांमुळे मला कष्ट होत होते हे कधी लक्षातच आले नाही. आता प्रत्यक्षात उपेक्षा, छळणूक होत नसली तरी पूर्वीचे ते सर्व कटु अनुभव माझ्या मनावर आणि भावनांवर ठसलेले होते. मला वाटले ते सर्व जीवघेणे लाजिरवाणे अनुभव इतिहासजमा झाले आहेत. पण तसे नव्हते. त्याचे परिणाम अजून मला जाणवत होते आणि ते माझ्या रोजच्या वागण्यातून दिसून येत होते.

*मला भावनिक आरोग्य मिळणे अगत्याचे होते*

नियमानुसार पाहिले तर मी ख्रिस्तामध्ये नवी उत्पत्ती होती. देवाचे वचन सांगते : ''म्हणून जर कोणी ख्रिस्ताचे ठायी [मशीहामध्ये] जडलेला आहे तर तो नवी उत्पत्ती [सर्वस्वी नवा जीव] आहे; जुने ते होऊन गेले, पाहा ते नवे झाले आहे'' (२ करिंथ.५:१७).

तथापि, मला हा अनुभव अद्याप आला नव्हता. मी नवी उत्पत्ती आहे ही सत्यता मी स्वीकारली नव्हती. मी अद्याप माझ्याच मनाने, इच्छेने, भावनांनी वागत होते, आणि हे सर्व तर विकृत, विस्कटलेले, विफल झालेले होते. माझी संपूर्ण सुटका होण्यासाठी येशूने किंमत भरली होती. माझ्या उद्धाराची खंडणी भरली होती, पण त्याची ही महान देणगी कशी स्वीकारावी तेच मला कळत नव्हते.

# 4

# छळणुकीमुळे बिघडलेले वर्तन

आमच्या जीवनातील फळ (आमचे वर्तन) कोठून तरी येते ही गोष्ट सर्वप्रथम लक्षात घेतली पाहिजे. एखादा माणूस संतापी, रागीट मारका असतो तो काही कारणाने तसा झाला आहे. वाईट वर्तन हे वाईट कडू मुळाच्या झाडाला आलेल्या कडू वाईट फळासारखे आहे. *कुजक्या कटु मुळांपासून कुजके नासके फळ मिळते, चांगल्या मुळांपासून चांगले फळ मिळते.*

आपली पाळेमुळे नीट तपासून पारखून पाहणे महत्त्वाचे आहे. ती मुळे दु:खद, बोचरी, शिव्या देणारी असतील तर त्यासाठी उपाय आहे. आनंदाची वार्ता आहे ती हीच की वाईट जमिनीतून तुम्हांला मुळासकट उपटून ख्रिस्त येशूच्या उत्तम जमिनीत पुन्हा लावता येईल. तुम्ही त्याच्यामध्ये व त्याच्या प्रीतीमध्ये रोपलेले व मुळावलेले असे व्हाल. ‘‘ख्रिस्ताने तुमच्या अंत:करणा-मध्ये तुमच्या विश्वासाच्या द्वारे (कायमची) वस्ती करावी, ह्यासाठी की लांबी, उंची व खोली किती हे तुम्ही सर्व पवित्र जनांसह समजून घ्यावयास व बुद्धीस अगम्य अशी ख्रिस्ताची प्रीती ओळखून घ्यावयास शक्तिमान व्हावे असे की तुम्ही देवाच्या सर्व पूर्णतेइतके परिपूण व्हावे’’ (इफिस.३:१७-१९).

पवित्र शास्त्र शिकविते की, ‘‘त्याच्यामध्ये मुळावलेले, रचले जात असलेले, तुम्हांस शिकविल्याप्रमाणे विश्वासात दृढ होत असलेले आणि निरंतर उपकारस्तुती करणारे व्हा’’ (कलस्सै.२:७).

येशू तुम्हांला आपणा स्वत:मध्ये जोडून जडवून घेईल. तो द्राक्षवेल आहे (पाहा योहान.१५:५). तुम्ही त्याचे फाटे आहात. त्याच्यामध्ये जडलेले आहात. म्हणून त्याच्यापासून येणारा सर्व ‘जीवनरस’ (त्याच्या प्रीतीची व कृपेची संपत्ती) तुम्हांला मिळत


व्यसनांपासून काही काळ 'चांगले' वाटणे
नियंत्रण, वर्चस्व ठेवणे
संताप वैरत्व
दोष काढणे, टीका करणे
आत्मविश्वास नसणे
स्वत:विषयी हीनत्वाची भावना
आपल्यावर अन्याय झाला आहे अशी भावना
गोंधळ आंतरिक खळबळ
द्वेष
नकारात्मक वृत्ती
स्वत:ची कीव
उदासीनता
बहाणा करू या
लैंगिकता, अन्न, पैसा, सत्ता, अमली पदार्थ, मद्य, विविध कृती
"मी आहे तसा चांगला घेण्याजोगा नाही."
भावभावना कोंबल्या, कोंडल्या जातात कारण त्यांना तोंड दिले तर दु:खच वाढते
*माझ्या मनातून मला काही चांगले वाटले नाही तर ते मी बाहेरून मिळवण्याचा यत्न करणार*
मुळे
नाकारले जाणे
मुळे
छळणूक
लज्जा खंत
दोषापराध
"माझ्यात काही तरी बिघडले आहे"
आईवडिलांच्या कडून अयोग्य वागणूक व आदर्श ठेवणे चुकीचा कित्ता घालून देणे


दयाळूपणा
चांगुलपणा
धीर
शांती
विश्वासूपणा
आनंद
सौम्यता
गलती.५:२२
अंतरंगात कार्य करणाऱ्या
पवित्र आत्म्याचे फळ
असे मिळते
प्रीती
इंद्रियदमन
आत्मसंयमन
आत्म्याने चालवले
जाण्यास शिकून
घेणे
“माझे सर्व काही
ठीकठाक आहे. मी
पुढे जातो आहे
आत्मसंयमनाचे जीवन
जगल्याने चांगल्या
भावना मनात येतात
“त्या प्रियकराच्या
ठायी माझा
स्वीकार व्हावा
असे मला केले
आहे.”
इफिस.१:६
निवांत
कारण स्वीकार होणे हे
कृतीकार्यावर अवलंबून नाही
भावना मोकळ्या आहेत,
कोंबलेल्या, कोंडलेल्या
नाहीत
ख्रिस्ताच्या प्रीतीमध्ये मुळावलेले व रोपलेले
मौल्यवान
स्वीकार
प्रेमास पात्र
अनन्य
दोषापराध नाही
खास

राहणार. म्हणजेच तुम्ही लहानाचे मोठे होत असताना निकोप, निरोगी होण्यासाठी आवश्यक ते तुम्हांला मिळाले नसेल ते सर्व येशू आनंदाने आता तुम्हांला देईल.

माझ्या स्वत:च्या जीवनात पुष्कळ वाईट फळ होते. ते काढून टाकण्यासाठी मी खूप कष्ट केले. नीट चांगले वागण्याचा मी आटोकाट प्रयत्न केला. तथापि एखादी चुकीची वर्तणूक काढून टाकण्याचा, सोडण्याचा प्रयत्न करताना कोठून तरी दुसऱ्याच प्रकारचे गैरवर्तन उफाळून येई. हे म्हणजे हरळी मुळासकट उपटून टाकण्यासारखे होते. वर दिसणारी मुळे उपटली तरी आतील खोलवरचे मूळ तसेच राहत असे. माझ्या समस्येच्या मुळाशी जाणे मला कधीच जमले नाही. ते मूळ जिवंत राहून नवनव्या समस्यांची फळे येत.

पुढे दिलेली चित्रे, आकृती पाहा. कुजक्या कटु मुळांपासून कुजकी कटु फळे येतात आणि चांगल्या मुळांपासून चांगली फळे मिळतात हे या चित्रांवरून नीटपणे समजेल.

हे नीट समजावे म्हणून प्रभूने मला हे उदाहरण दिले. तुमच्या रेफ्रिजरेटरचे दार उघडल्यावर घाण वास, दुर्गंध येतो हे तुमच्या लक्षात आले आहे का? मग आत काहीतरी नासले, कुजले आहे असे तुम्हांला समजते, पण काय नासके आहे ते नेमके समजण्यासाठी प्रथम तुम्हांला आतील सर्वच पदार्थ बाहेर काढावे लागतात.

आता तुमच्या वैयक्तिक जीवनालाही हेच तत्त्व लागू पडते. तुमची समस्या भावनिक असेल तर तुमच्या अंतरंगात आत कोठे तरी काहीतरी बिघडलेले असणार. ही समस्या सोडवण्यासाठी बिघडलेली गोष्ट काढून पुन्हा सर्व काही ताजेतवाने करण्यासाठी प्रथम अंतरंगात कसून शोध केला पाहिजे. काही गोष्टी फेकणे जरुर असेल, काही विश्लेषण करावे लागेल.

लक्षात ठेवा मुळापासून उपटून काढणे वेदनाकारक आणि धक्का देणारे, आघात करणारे असेल. उपटून दुसरीकडे लावणे पुन्हा मूळ धरणे, भूमीत रोवले जाणे या सर्व गोष्टी होण्यास वेळ लागतो. धीर आणि विश्वास धरल्यानेच आम्हांला देवाची अभिवचने वारशाने मिळतात (पाहा इब्री.६:१२). म्हणून धीर धरा, उतावळे होऊ नका.

देवच उत्पादक व पूर्ण करणारा आहे (पाहा इब्री.१२:२). त्याने तुम्हांमध्ये जे आरंभिले आहे ते तो पूर्ण करीलच करील. ''ज्याने तुमच्याठायी चांगले काम आरंभिले तो ते येशू ख्रिस्ताच्या दिवसापर्यंत [त्याच्या परत येण्याच्या वेळेपर्यंत] सिद्धीस नेईल [ते चांगले काम विकसित करून वाढवून परिपूर्णतेस नेईल] हा मला भरंवसा आहे'' (फिलिप्पै.१:६).

## वाईट फळे

माझ्या जीवनात एवढी वाईट कुजकी फळे होती की मला नेहमीच काही ना काही मानसिक त्रास होत असे. उदासीनता, काहीच मनास न येणे, आत्म-दया, शीघ्रकोप, अन्याय झाल्याची भावना हे सर्व अवगुण मनात सतत खदखदत असत. माझा स्वभावच दुसऱ्यावर वर्चस्व गाजवण्याचा होता. सर्वांना आपल्या ताब्यात ठेवावे ही माझी भावना होती. मी कठोर,

कडक, जहाल, नियमावर बोट ठेवणारी, दुसऱ्यांचे दोष काढणारी होते. दुसऱ्यांबद्दल माझ्या मनात नेहमीच अढी असे आणि दुसऱ्यांकडून झिडकारले जाण्याचे भय तर नित्य मला भेडसावत होते.

*माझे व्यक्तित्व दुहेरी - आत एक आणि बाहेर दुसरे होते.* मी धीर, धैर्यवान आहे असा बहाणा करीत होते. काही बाबतीत मी तशी होते, परंतु तरीही आपण कस्पटासमान आहोत ही भावना मनात घट्ट रुतून बसली होती. माझे तथाकथित धैर्य, धीटपणा हे सर्व मी ख्रिस्तामध्ये कोण आहे यावर अवलंबून नव्हते, तर बाह्य देखावा, गुणवत्ता, कार्यकृती, अशा आनुषंगिक गोष्टींवर अवलंबून होते. आपण धैर्यवान, धीट आहोत असे अनेकजण समजतात. पण त्यांचा हा मुखवटा ओढून काढा आणि पाहा ते कसे भयाने थरथर कापत असतात! मीही अशीच गोंधळले होते, अंतरंगात खळबळ उडाली होती.

मी केव्हाच मद्याच्या आणि अमली पदार्थांच्या आहारी गेले नाही ही खरोखरी देवाचीच कृपा होती. मी सिग्रेटी ओढीत असे, पण इतर काही नशा केली नाही. मद्य तर मला मुळीच आवडत नव्हते. केव्हा तरी मी पीत होते, पण चक्कर येते असे वाटले की मी पिणे थांबवत असे.

तसे मी पुष्कळ आत्मसंयमन करीत होता. आपल्यावर कशाचे नियंत्रण असावे हेच मला मान्य नव्हते. म्हणूनच मी अमली पदार्थांपासून दूरच राहिले. मला वाटते माझ्या वडिलांनी माझे जीवन दीर्घकाळ आपल्य कह्यात ठेवले होते, म्हणूनच आणखी कोणाचे वर्चस्व चालवून घ्यायचे नाही असा माझा दृढनिश्चय असावा. माझ्या आंतरिक समस्यांवर माझे नियंत्रण नव्हते, तरीपण ज्यांच्यावर अवलंबून राहणे भाग पडेल अशा गोष्टींपासून दूर राहावे एवढी अक्कल व शहाणपणा माझ्या ठायी होते असे वाटते.

माझे वजन सुमारे बारा किलो जास्त होते म्हणून एकदा मी काही गोळ्या घेतल्या. एका डॉक्टरनेच त्या मला दिल्या होत्या. पण गोळ्या घेतल्यानंतर मला धुंदी चढली, त्या गोळ्या हानीकारक आहेत हे मला माहीत नव्हते. संपूर्ण दिवस मी त्या धुंदीच्या तारेवर तरंगत होते. त्या गोळ्या घेत होते तेव्हा मी दिवसभर एखाद्या यंत्रासारखे सतत काम करीत राही. घर स्वच्छ करणे, लोकांशी चांगले वागणे, काही चांगले करणे हे मला सहज जमत असे. पण गोळ्यांचा प्रभाव संपला की मीही खचून जात असे.

माझे वजन कमी झाले नाही तरीपण त्या गोळ्या मला भुकेची जाणीव होऊ देत नसत. गोळ्यांचा प्रभाव संपला की कडकडून भूक लागे. दिवसभर मी काहीच खात नसे, पण त्याची भरपाई रात्रीच्या जेवणात होत असे. मला एवढे खचल्यासारखे वाटे की, मी भरपूर जेवीत असे. त्या गोळ्या पुन्हा घ्याव्या की नाही यावर मी मनात पुष्कळ खल केला आणि ठरवले की गोळ्या आता बस्. कारण गोळ्या घेत राहिले तर मला त्यांचे व्यसनच लागेल अशी माझी भावना झाली होती.

माझी हानी करणाऱ्या गोष्टींपासून दूर राहण्याची शक्ती मला येशूकडूनच मिळाली होती हे आता मला समजते, मी नऊ वर्षांची

असताना येशूला स्वीकारले होते, तोच मला सावरत होता. प्रभूबरोबर खरेखुरे नाते कसे जोडावे हेच मला माहीत नव्हते. तरीही तो सतत माझ्याबरोबर राहून मला अनेक प्रकारे सहाय्य देत होता. पण ज्ञान नसल्याने ते सर्व मला तेव्हा समजले नाही. पुढे कित्येक वर्षांनी या आशीर्वादांचा अर्थ मला समजला.

मला ठाऊक आहे की, माझ्यावर देवाची कृपा आणि दया होती म्हणूनच मी गुन्हेगारी, अमली पदार्थ, मद्यपान, वेश्यावृत्ती अशा घातक गोष्टींपासून दूर राहिले. त्याने माझे रक्षण केले म्हणून मी सतत प्रभूची ऋणी आह. त्याच्याविषयीचा भययुक्त आदर दिवसेंदिवस वाढतच आहे. अर्थात अशा समस्या माझ्यापुढे आल्या नाहीत तरी दुसरे प्रश्न व अडचणी भरपूर होत्या. वाईट मुळांमुळे माझी फळे वाईट होत होती.

## बहाणा, ढोंग करणे

मी अतिशय दु:खीकष्टी होते, सुखाचे नावही नव्हते. तथापि इतर अनेक लोकांच्या प्रमाणे मीही सर्व काही चांगले असल्याचा बहाणा करीत होते. आम्ही माणसे दुसऱ्यांना बरे वाटावे म्हणून बहाणा करीत असतो. आमचे दु:ख, कष्ट त्यांना कळू नये हाच आमचा इरादा असतो आणि आम्ही स्वत:साठीही बहाणा करतो कारण अडचणीच्या कठीण गोष्टींचा सामना करून त्यांचा निकाल लावण्याचे धैर्य वा इच्छा आम्हांला नसते.

मी काही काळ देवाचे वचन वाचले, चिंतन, मनन केले आणि तुटलेल्या भावभावना थोड्याफार पूर्ववत होऊ लागल्या, तेव्हा कोठे मी खरोखर किती दु:खी कष्टी होते ते मला जाणवले. एखाद्याला खरे सुख काय तेच माहीत नसेल तर आपल्यात काय उणे आहे, काय मिळाले नाही ते त्याला समजणार कसे? लहानपणीही मी केव्हा खरोखर सुखी, निवांत असल्याचे मला आठवतच नाही. सतत भयाच्या छायेत वावरत असताना कोणाला जीवनाचा आनंद घेणे शक्य आहे हे मला तरी पटत नाही.

आमचे लग्न झाले. नंतर काही दिवसांनी एका सायंकाळी डेव्ह मला त्याच्या बालपणाविषयी सांगू लागला. त्याला सात भावंडे होती. त्यांच्यातच तो लहानाचा मोठा झाला. लहानपणी ही भावंडे प्रेमात वाढली त्यांनी खूप मजा केली. त्यांच्या घरात प्रीती ओतप्रोत भरलेली होती. उन्हाळ्याच्या दिवसांत ते शहरापासून दूर लहान गावात सुट्टीसाठी जात. तिकडे पिकनिक, सहली, खेळ यांची रेलचेल होती. मित्रही खूप होते. त्यांची ख्रिस्ती माता त्यांच्याबरोबर खेळत असे. तिनेच त्यांना येशूविषयी शिकवले. त्यांच्याकडे भरपूर पैसे नव्हते. डेव्हचे वडील अतिदारू प्याने यकृताच्या विकाराने मरण पावले होते. तरीपण घरचे चांगले वळण, प्रार्थना व आईचा ख्रिस्ती आदर्श यांमुळे ही भावंडे कधीच वाकड्या वाटेला गेली नाहीत. *त्यांना भरपूर प्रेम मिळाले, आणि आम्हा सर्वांना प्रेमाचीच गरज आहे; प्रेमासाठीच आम्हांला उत्पन्न केले आहे.*

डेव्हने त्या दिवशी मला त्याच्या बाळपणीच्या आठवणी सांगितल्या. लहानाचे मोठे होतानाची ती वर्षे आनंदाची, हिताची व प्रेमाची होती. तो सर्व काळ आपुलकी, जिव्हाळा, ममता यांनी भरला होता हे ऐकून मला एकीकडे आनंद झाला, तर दुसरीकडे मी अतिशय कष्टी झाले. लहानपणी मी सुखी आनंदी होते असे मला आठवतच नव्हते. माझ्याकडून काहीतरी हिसकून हिरावून घेतले होते, चोरून नेले होते. ते मला कधीच परत मिळणार नव्हते. माझी घोर फसवणूक झाली होती. कदाचित तुम्हांलाही तसेच वाटत असेल. तसे असेल तर देवाने माझ्यासाठी केले आहे ते तो तुमच्यासाठीही करील. तो तुमची भरपाई करील. तो स्वत:च तुमचे प्रतिफळ असेल आणि तुमचे जे गेले, हरवले आहे ते भरून देईल.

आता बहाणे, ढोंग करणे थांबवून सत्याला सामोरे गेले पाहिजे हे माझ्या ध्यानी आले. गतकाळातील काही वागणुकीच्या सवयी मला जळवेसारख्या चिकटून राहिल्या होत्या. माझ्या त्या भूतकाळाला डेव्ह जबाबदार नव्हता आणि माझी मुलेही जबाबदार नव्हती. ज्यात त्यांची काहीच चूक नाही त्याबद्दल त्यांना दोष लावणे, दु:ख देणे निरर्थक व अन्यायाचे होते.

## विपरीत वागणुकीचे जडलेले नमुने

छळणुकीमुळे विपरीत वर्तन करण्याची प्रवृत्ती होते. या वर्तनक्रमाचे नमुने अक्षरश: असंख्य आहेत. पण त्यातील काही पुढे दिले आहेत :

- ❖ अंमली पदार्थांमुळे होणारे वर्तन
  - मद्यपान
  - नशा आणणारे पदार्थ व गोळ्या, औषधे (बेकायदेशीर व डॉक्टरांनी दिलेली)
- ❖ पैशाची हाव
  - उधळपट्टी करणे
  - पैसा साठवणे
- ❖ खाण्यापिण्याच्या विकृती
  - बुलिमिया (भरमसाट खाणे व ओकून टाकणे)
  - भूकमारी (मुद्दाम जेवण न घेणे)
  - अतिखाण्याने आलेला लठ्ठपणा

टीप : काही स्वैराचारी व्यक्ती पुन्हा त्या मोहात पडू नये म्हणून अति खाऊन लठ्ठ होतात. शरीर बेढब झाले की कोणी आपल्याला भुलवणार नाही अशी त्यांची समजूत असते. ज्यांना प्रेम, आपुलकी मिळालेली नसते तेही ही उणीव भरून काढण्यासाठी खात राहतात.

- ❖ विपरीत भावभावना

- संताप-क्रोध
- उदासपण, दु:ख
- भय
- अतिउत्साही वृत्ती
- धार्मिक कट्टरपण
- सदा आनंदी वृत्ती (मुखावर सतत गोठलेले हास्य ठेवणे, राग आला तरी तो कधी न दाखवणे, कुठेही केव्हाही खिदळणे, हसणे, फक्त सौख्याच्या गप्पा करणे)

❖ विपरीत विचार

- उगाचच तपशीलात जाणे
- चिंता
- सतत अथकपणे बडबड करणे
- विषयवासनामय विचार
- चंचल मनोवृत्ती (कधीही शांत, स्वस्थ न राहणे, सतत काय बोलावे, कसे करावे, काय प्रतिक्रिया द्यावी असे विचार करणे).

❖ कृती करण्याचे वेड

- काम
- खेळ
- वाचन
- जुगार
- व्यायाम
- टीव्ही पाहणे
- पुष्कळसे पाळीव प्राणी - कुत्री मांजरे वगैरे आणून त्यांची देखभाल करीत बसणे

❖ विपरीत इच्छा

- नियंत्रण-वर्चस्व — अशा लोकांना वाटते की प्रत्येक प्रसंगी आपले तेच खरे झाले पाहिजे. ते एवढे भावनावश होतात की त्यांना सरळ, तर्कसंगत गोष्टी पटतच नाहीत. सर्व त्यांच्या हातात असले की त्यांना सुखी, सुरक्षित वाटते.
- अधीन असलेले — जे अधीन आहेत ते अगदी निष्क्रिय होतात, त्यांनी आपले मन व इच्छा दुसऱ्यांच्या हवाली केलेली असते. दुसरे सांगतील ते व तसे हे करतात. मागचा पुढचा विचार करीत नाहीत. असे लोक आपली इच्छा सैतानाच्या

हवाली करतात आणि त्याच्या प्रभावाखाली राहतात. सैतान त्यांचा ताबा घेतो किंवा त्यांच्यावर जुलूम करतो. लाज, शरम, खंत या भावना त्यांच्या अंतरंगात एवढ्या दृढ असतात की, आपण अगदी नालायक आहो, सुधारणा शक्य नाही असे ते समजतात.

- पुन्हा पुन्हा तेच ते करण्याचे व्यसन — हे लोक त्यांना सोसाव्या लागलेल्या छळाची पुनरावृत्ती त्यांच्या मुलांवर करतात. लहानपणी ज्या कारणाने छळ झाला तेच कारण हे काही करून पुन्हा उकरून काढतात आणि मुलांना छळतात. अशा प्रसंगी त्यांना मागच्या घटना आठवतात. त्या वेदनाकारक आठवणी टाळाव्या म्हणून ते छळणाऱ्याची भूमिका स्वत: करतात. उदाहरणार्थ, लहानपणी ज्याला बापाकडून मारझोड झाली आहे असा माणूस स्वत:च्या मुलांचा शारीरिक छळ करतो. पूर्वी आपण बापाकडून मार खाल्ल्याचे प्रसंग आठवून तो स्वत: मुलांचा छळ करतो, कारण आता तेव्हाच्या भूमिका बदललेल्या असतात. एखाद्या स्त्रीचा तिच्याच वडिलांनी शारीरिक, लैंगिक आणि शाब्दिक छळ केला असेल तर जो तिचा छळ करील अशा माणसाशी ती लग्न करते. कदाचित ती एकामागून एक अशा अनेक पुरुषांशी विवाह करील. यात पूर्वी वडिलांनी केला तसाच छळ नवऱ्याने करावा हेच तिला हवे असते. तिला वाटते आपण सर्वस्वी नालायक आहोत अगर असा छळ करून घेणे हीच आपली लायकी आहे. प्रसंगी अशी वाईट वागणूक नक्की मिळेल हे ती पाहते, कोणी तिच्याशी सरळ वागले तर त्या माणसाला ती चिथावून छळ करण्यास भाग पाडते.
- काळजी घेणारे — काही लोकांना सतत दुसऱ्यांची काळजी घेणे आवडते. त्यांना स्वत:च्या कुवतीबद्दल दाट शंका असते, म्हणून ते दुसऱ्यांना मदत करणे, संतोष देणे, त्यांची देखभाल करणे, यातच धन्यता मानतात. असे केल्याने त्यांना मोठे मानसिक समाधान मिळते.

## अंतरंगात निवांत, आनंदी होण्यासाठीच उत्पन्न केलेले

सुखी, आनंदी आणि स्वत:विषयी चांगले वाटण्यासाठी देवाने आम्हा मानवांना निर्माण केले आहे. खरे तर आम्हांला आपणा स्वत:विषयी आतून चांगले वाटलेच पाहिजे. तसे न झाले तर आमच्या कडून काही प्रकारचे विपरीत होऊ शकेल. वर्तनावर निर्बंध राहणार नाही. असे वर्तन, अगदी अल्पकाळासाठी का असेना पण आम्हांला चांगले वाटायला कारण होते.

यावर विचार करा : अमली पदार्थाची नशा करणारी एखादी व्यक्ती प्रथम आपले असह्य दु:ख नशेत बुडवून टाकण्यासाठी असे पदार्थ सेवन करते. काही काळापुरती नशा चढल्याने

तो आपले दु:ख, वेदना विसरतो. मग पुढे ते व्यसनच लागते. मद्यपानाच्या व्यसनाचेही तसेच आहे.

काही लोक जेवण्याखाण्यात आराम शोधू पाहतात. जेवताना त्यांना आतल्या आत बरे वाटते. ज्यांना खाण्यापिण्याच्या विपरीत सवयी आहेत ते बहुतेक सर्वजण प्रेमाचे भुकेले असतात. स्वत:विषयी चांगले, बरे वाटावे हीच त्यांची इच्छा असते. असा चांगलेपणा आतून मिळाला नाही तर मग ते तो बाहेरून कोठून तरी मिळवण्याचा प्रयत्न करतात.

अशा वर्तनाच्या काही विपरीत सवयी तुम्हांला जडल्या असतील तर तुमच्या समस्येचे मूळ तुम्हांला या प्रकरणातून शोधता येईल. आपले बाह्यवर्तन (वाईट फळ) दाबून दडपून टाकण्यासाठी तुम्ही आपले संपूर्ण आयुष्य खर्ची घातले तरी ते फोल ठरणार, कारण जोपर्यंत वाईट मुळाचा निकाल लावला नाही तोपर्यंत वाईट फळ कोठून तरी डोके वर काढणार यात शंका नाही.

# 5

# प्रीतीने सोडवणूक

तुमचा छळ झाला असेल, गैरफायदा घेतला असेल तर बहुधा आतापर्यंत तुमच्या जीवनातील समस्येचे मूळ कोठे आहे ते तुमच्या लक्षात आले असेल. पण समस्या काय आहेत ते दाखवणे पुरेसे नाही. त्याचे निराकरण करण्याचा मार्ग दाखवला नाही तर परिणाम भयंकर, विपरीत होणार आणि मीही काही मार्गदर्शन केले नाही, तर तुमची अवस्था, हे पुस्तक वाचण्यापूर्वी होती त्याहून अधिक बिकट, भयानक होईल.

माझ्या जीवनामध्ये आरोग्य देणारी, जीवनाला योग्य दिशा देणारी महत्त्वाची मोलवान सत्ये कोणती ते मी आता सांगणार आहे आणि हे करीत असताना देव पक्षपाती नाही (पाहा प्रे.कृ.१०:३४) हा मुद्दा तुम्ही लक्षात ठेवावा हेच माझे सांगणे आहे. तो एकासाठी जे करतो तेच दुसऱ्यासाठीही करतो. त्याची अभिवचने सर्वांसाठी आहेत.

## बरे होण्याची प्रक्रिया

प्रेम कसे करावे हे माझ्या पहिल्या नवऱ्याला माहीतच नव्हते. तेव्हा आमच्या त्या संबंधातून मला मुळीच प्रेम मिळाले नाही. आता माझा दुसरा नवरा डेव्ह फार चांगला आहे. त्याचे माझ्यावर खरे प्रेम आहे, तरीपण प्रेम कसे करावे हेच मुळात मला माहीत नव्हते, त्यामुळे नेमके काय करावे हे मला समजलेच नाही. त्याच्याबरोबर माझी दोलायमान स्थिती होती. (१) केव्हा मी त्याचे प्रेम झिडकारून माझ्या भोवती भिंती उभारल्या, त्याला माझ्या जीवनात डोकावू दिले नाही. मल ापरत दुःख होऊ नये, काळजावर घाव बसू नयेत (असे मला वाटले) म्हणून ही योजना होती. (२) त्याने माझ्यावर अगदी संपूर्णपणे परिपूर्ण प्रेम करावे ही माझी अपेक्षा होती, पण ते साध्य करणे त्यालाच काय पण कोणाही माणसाला शक्य नाही.

‘‘पूर्ण प्रीती भीती घालवून देते’’ असे १ योहान.४:१८ मध्ये म्हटले आहे. परिपूर्ण निर्दोष प्रीती केवळ देवालाच शक्य आहे. एखाद्याने दुसऱ्या व्यक्तीवर कितीही नितांत प्रेम केले तरी तो माणूसच असतो, त्याच्याठायी प्रीती कोठून? आमच्या प्रभूने म्हटलेच आहे, ‘‘आत्मा उत्सुक आहे खरा पण देह अशक्त आहे’’ (मत्तय.२६:४१). लोक नेहमीच दुसऱ्या लोकांना निराश करतात, त्यांचे प्रेम नेहमीच थोडेतरी उणे, अपुरे असते, कराण तो आमच्या स्वभावाचा एक भागच आहे.

जे केवळ देवच देऊ शकत होता ते डेव्हने मला द्यावे हे त्याला सांगण्याचा माझा प्रयत्न होता. माझी पात्रता, माझे मूल्य यांची जाणीव त्याच्याकडून मला मिळावी हीच माझी इच्छा होती.

माझ्या नवऱ्याने माझ्यावर सर्वस्वी प्रेम करावे, मला अतिउत्तम परिपूर्ण वागणूक द्यावी म्हणजे मला स्वत:विषयी अगदी चांगले वाटले असते हीच माझी त्याच्याकडून इच्छा व अपेक्षा होती. पण जेव्हा केव्हा तो माझी निराशा करी, चुकत असे अगर मला दुखवीत असे तेव्हा तेव्हा मी त्याच्या माझ्यामध्ये भिंती उभ्या करून त्याला दिवसचे दिवस, आठवडेच्या आठवडे माझ्याजवळ फिरकू देत नसे.

छळणुकीची विपरीत, आशाहीन पार्श्वभूमी असलेल्या अनेक लोकांना निकोप, टिकाऊ नातेसंबध जोडताच येत नाहीत. एक तर त्यांना प्रेम कसे घ्यावे हे माहीत नसते किंवा ते आपल्या पती/पत्नीकडून अवास्तव मागणी करतात, पण त्यांची मागणी पुरवणे केवळ देवालाच शक्य असते. यातून येणाऱ्या वैफल्यामुळे अनेकदा विवाहाचे नातेच उद्ध्वस्त होते.

मैत्रीलाही हेच तत्त्व लागू करता येईल. एकदा एका स्त्रीने मला म्हटले, ‘‘जॉईस, मला मदत कर, मी अगदी एकटी, एकाकी आहे.’’ मला मैत्रीण मिळते तेव्हा मी तिला त्रासून सोडते, सतावते.’’ ही स्त्री प्रेमासाठी एवढी हपापलेली, भुकेली होती की तिचे ऐकून घेणारी, तिच्याकडे लक्ष देणारी कोणी तिच्या सहवासात आली की आजवरचे सर्व भावनिक ऋण, कर्ज ती तिच्याकडून वसूल करण्याचा प्रयत्न करीत असे. वास्तविक ही स्त्री तिचे काहीच देणे लागत नव्हती. परिणामी तिची नवी मैत्रीण घाबरून तिच्यापासून दूर जात असे.

## देवाची असीम, अपार, निरपेक्ष, परिपूर्ण प्रीती

एक दिवस पवित्र शास्त्र वाचीत असताना २ करिंथ.५:७ या पवित्र वचनाने माझे लक्ष वेधून घेतले. ‘‘आम्ही विश्वासाने चालतो, डोळ्यांनी दिसते त्याप्रमाणे चालत नाही.’’ म्हणजे देव व दिव्य वस्तू यांच्याशी मानवाचा जो संबंध आहे त्याविषयी आम्ही आमच्या विश्वासाची खातरी धरून आमचा जीवनक्रम चालवतो, मनात पवित्र उत्साह व भरंवसा धरून आम्ही वागतो.

पवित्र आत्म्याने मला येथेच थांबवून विचारले, ‘‘जाईस देवाबरोबर तुझे नाते आहे त्याविषयी तुला काय वाटते? तो तुझ्यावर प्रीती करतो असा तुझा विश्वास आहे? खातरी

आहे?'' मी अगदी प्राजंलपणे या विषयाचा देवाच्या वचनातून अभ्यास केला, माझ्या अंत:करणात शोध केला आणि मला असे आढळले की देव माझ्यावर प्रीती करतो पण त्याच्या काही अटी आहेत, त्याची प्रीती सापेक्ष आहे, बिनशर्त आहे.

पवित्र शास्त्र आम्हांला शिकवते की देव आमच्यावर परिपूर्ण बिनाअट, निरपेक्ष प्रीती करतो. त्याची परिपूर्ण प्रीती आमच्या परिपूर्णतेवर आधारलेली नाही. त्याच्या प्रीतीला त्याच्या स्वत:चाच आधार आहे अन्य कशाचा नाही. देव प्रीती आहे (पाहा १ योहान.४:८). प्रीती हे काही त्याचे लक्षण नाही, कृती नाही, तो स्वत:च प्रीती आहे, देव नेहमीच आमच्यावर प्रीती करतो. पण अनेकदा आम्हाला त्याची प्रीती मिळत नाही, त्यात अंतराय येतो. विशेषत: आमचे वर्तन चांगले नसेल तर त्याची प्रीती मिळत नाही.

आता हे विवेचन येथेच थांबवते आणि मला अतिशय महत्त्वाचे वाटणारे अनुभवलेले शास्त्रभाग सादर करते. कृपा करून ते सर्व नीट वाचा, त्यावर मनन करा आणि ते आत्मसात करून आचरणात आणा :

> देवाची आपल्यावर जी प्रीती आहे ती आपल्याला कळून आली आहे व आपण तिच्यावर विश्वास ठेवला आहे. देव प्रीती आहे; जो प्रीतीमध्ये राहतो तो देवामध्ये राहतो व देव त्याच्यामध्ये राहतो.
>
> न्यायाच्या दिवसासंबंधाने आपल्या ठायी धैर्य असावे म्हणून त्याची प्रीती आपल्यामध्ये अशा प्रकारे पूर्णत्व पावली आहे. कारण जसा तो आहे तसे ह्या जगात आपणही आहो. प्रीतीच्या ठायी भीती नसते, इतकेच नव्हे तर पूर्ण प्रीती भीतीला घालवून देते. भीतीमध्ये शासन आहे आणि भीती बाळगणारा प्रीतीमध्ये पूर्ण झालेला नाही.
>
> पहिल्याने त्याने आपणांवर प्रीती केली म्हणून आपण [त्याच्यावर] प्रीती करतो (१ योहान.४:१६-१९).

> देवाने आपल्या एकुलत्या एक पुत्राला जगात पाठविले आहे, ह्यासाठी की त्याच्याद्वारे आपणांस जीवन प्रगट व्हावे. ह्यावरून देवाची आपल्यावरील प्रीती प्रगट झाली आहे. प्रीती म्हणावी तर हीच, आपण देवावर प्रीती केली असे नाही, तर त्याने तुम्हांआम्हांवर प्रीती केली आणि तुमच्या आमच्या पापाचे प्रायश्चित्त व्हावे म्हणून स्वपुत्राला पाठविले. प्रियजनहो, आमच्या पापाचे प्रायश्चित्त व्हावे म्हणून स्वपुत्राला पाठविले. प्रियजनहो, देवाने जर आपल्यावर अशा प्रकारे प्रीती केली तर आपणही एकमेकांवर प्रीती केली पाहिजे (१ योहान.४:९-११)

> ख्रिस्ताच्या प्रीतीपासून आपल्याला कोण विभक्त करील? क्लेश, आपत्ती, छळणूक, उपासमार, नग्नता, संकट किंवा तरवार ही विभक्त करील काय? (रोम.८:३५)

कारण माझी खात्री आहे की, मरण जीवन, देवदूत, अधिपती, वर्तमानकाळच्या गोष्टी, भविष्यकाळच्या गोष्टी, बले, उंची, खोली, किंवा दुसरी कोणतीही सृष्ट वस्तू ख्रिस्त येशू आपला प्रभू ह्याच्यामध्ये देवाची आपल्यावरील जी प्रीती आहे तिच्यापासून आपल्याला विभक्त करावयाला समर्थ होणार नाही (रोम.८:३८,३९).

ख्रिस्ताने तुमच्या अंत:करणामध्ये तुमच्या विश्वासाच्या द्वारे वस्ती करावी. ह्यासाठी की, तुम्ही प्रीतीत मुळावलेले व पाया घातलेले असे असून तिची रुंदी, लांबी, उंची व खोली किती...

हे तुम्ही सर्व पवित्र जनांसह समजून घ्यावयास व बुद्धीस अगम्य अशी ख्रिस्ताची प्रीती ओळखून घ्यावयास शक्तिमान व्हावे; असे की तुम्ही देवाच्या सर्व परिपूर्णतेइतके परिपूर्ण व्हावे (इफिस.३:१७-१९).

आणि आशा लाजवीत नाही, कारण आपणाला दिलेल्या पवित्र आत्म्याच्या द्वारे आपल्या अंत:करणात देवाच्या प्रीतीचा वर्षाव झाला आहे (रोम.५:५).

पाहा, मी तुला आपल्या तळहातावर कोरून ठेवले आहे... (यशया ४९:१६).

माझ्यासाठी १ योहान.४:१६ हे वचन अतिमहत्त्वाचे आहे. कारण आपण *देवाची* प्रीती *जाणून घ्यावी* व तीवर विश्वास ठेवावा असे तेथे सांगितले आहे. मला देवाच्या प्रीतीची जाणीव नव्हती. त्या बाबतीत मी अजाण होते. म्हणूनच माझ्यावर असलेल्या त्याच्या प्रीतीवर मी विश्वास ठेवीत नव्हते.

सैतानाने मला दोष दिला तेव्हा "होय, मी चुकले, माझी चूक झाली" असे म्हणून देवाकडे जाऊन त्याची क्षमा मागावी, त्याची प्रीती घ्यावी आणि पुढे जावे हे मला सुचले नाही, समजले नाही. उलटपक्षी माझ्या बारीकसारीक चुकीचा राईचा पर्वत करून मी तासन्तास, दिवसचे दिवस स्वत:शीच कुढत, खंत करीत बसत असे. मी अक्षरश: त्रासून गेले, भीतीने गळाठून गेले. भीतीमध्ये शासन-दहशत आहे, पण देवाची पूर्ण प्रीती भीती घालवून देते असे योहान आम्हांला सांगतो (पाहा १ योहान.४:१८). देवाची माझ्यावरची प्रीती परिपूर्ण होती, कारण ती माझ्यावर नव्हे, त्याच्या स्वत:वर आधारलेली होती. म्हणूनच मी चुकले, घसरले तरी तो माझ्यावर सतत प्रीती करीत होता.

तुमच्यावरील देवाची प्रीती परिपूर्ण, बिनशर्त व निरपेक्ष आहे. तुमचे चुकले तरी तो तुमच्यावर प्रीती करीत राहतो. कारण तुमच्यावरील त्याची प्रीती तुमच्यावर नव्हे, तर त्याच्या स्वत:वर आधारलेली आहे.

तुमचे चुकते तेव्हा तुम्ही देवाची प्रीती घेण्याचे थांबवून अपराधीपणाच्या भावनेने स्वत:ला दोष लावून शिक्षा करून घेता का? माझ्या आयुष्याच्या पहिल्या चाळीस वर्षांच्या काळात मलाही स्वत:विषयी दोषी, अपराधी वाटत होते, मी वाईट आहे अशी भावना झाली होती.

आणि मी जाईन तिकडे अगदी प्रामाणिकपणे हे दोषापराधाचे अवजड ओझे पाठीवर वागवीत होते. हे ओझे फारच अवजड व मोठे होते. आणि ते नेहमी माझ्याबरोबर असे. माझ्याकडून नेहमीच चुका होत आणि प्रत्येक चुकीबद्दल मी स्वत:ला दोषी समजत असे.

रोम.८:३३-३५ या वचनांतून प्रेषित पौल सांगतो :

> देवाच्या निवडलेल्या लोकांवर दोषारोप कोण ठेवील? देव नीतिमान ठरवणारा आहे. [देवाने ज्यांना निवडले आहे त्यांच्यावर पुढे येऊन दोषारोप करणारा, दंड शिक्षा करणारा कोण आहे? आम्हांला मुक्त करणारा, निर्दोष ठरवणारा देव असे करील?]
>
> तर दंडाज्ञा करणारा कोण? जो मेला इतकेच नाही तर मेलेल्यांतून उठला आहे, जो देवाच्या उजवीकडे बसला आहे आणि जो आपल्यासाठी मध्यस्थीही करीत आहे तो ख्रिस्त येशू आहे.
>
> ख्रिस्ताच्या प्रीतीपासून आपल्याला कोण विभक्त करील?

देवाच्या प्रीतीपासून आम्हांला वेगळे, विभक्त करणे हाच सैतानाचा उद्देश आहे. कारण भावनिक आरोग्य मिळण्यामध्ये देवाची प्रीतीच हाच मुख्य महत्त्वाचा घटक आहे.

प्रीती करण्यासाठी व घेण्यासाठी आम्हांला निर्माण केले आहे. इफिस.२:४-६ या वचनांमधून पौल सांगतो : देव परमदयाळू आहे, त्याची दया एवढी अपार आहे की त्याने आमचे तारण केले आणि आमच्यावरील त्याच्या उत्कट प्रीतीची मागणी पूर्ण करण्यासाठी आमची लायकी नसताना आम्हांला भरभरून विपुल आशीर्वाद दिले. जरा विचार करा. आमच्यावर प्रीती करणे हाच देवाचा हेतू आहे. त्याला आमच्यावर प्रीती करणे भाग आहे, कारण तो प्रीती आहे.

तुम्हांला आणि मला प्रीतीसाठी उत्पन्न केले आहे. पापाने आम्हांला देवापासून विभक्त केले. पण देवाने आमच्यावर एवढी प्रीती केली की त्याने आपल्या एकुलत्या एका पुत्राला, येशूला आमच्यासाठी मरण सोसण्यासाठी, आमचा उद्धार करण्यासाठी आणि आम्हांला परत विकत घेण्यासाठी पाठवले.

आमच्यावर महान प्रीतीचा वर्षाव करण्यासाठीच त्याने हे सर्व केले. पवित्र शास्त्रामध्ये देवाच्या व आमच्या नात्यासंबंधी जे सांगितले आहे त्यावर आम्ही विश्वास ठेवावा हेच आम्हांला अगत्याचे आहे. आम्ही हे केले की मग निकोप, बरे होण्याची प्रक्रिया सुरू होते.

मी आणि माझे पती डेव्ह दोघांनी ''लाईफ इन द वर्ड'' हा सुवार्तासेवा कार्यक्रम सुरू केला तेव्हा पहिल्याच वर्षी पवित्र आत्म्याने मला प्रेरणा देऊन देवाच्या प्रीतीविषयी शिकवले. याच काळात मी एका स्मरणवहीत प्रभूने माझ्यासाठी केलेल्या विशेष गोष्टीचे टिपण लिहून ठेवले. या गोष्टी बहुतेक व्यक्तिगत होत्या. फार मोठ्या नसल्या तरी देवाला काळजी आहे, आस्था आहे हे त्यातून स्पष्ट समजले. आणि या प्रकारे देवाच्या निरपेक्षा प्रीतीची मला अधिकाधिक जाणीव होऊ लागली, आणि माझ्यावर देव प्रीती करतो हे सत्य सतत माझ्या स्मरणात राहिले.

*सर्वस्वी परिपूर्ण असलेला देव तुमच्यावर प्रीती करतो यावर तुम्हांला विश्वास ठेवता आला तर आपण प्रीतीस पात्र आहो यावरही तुमचा विश्वास बसेल.*

देव आपल्यावर प्रीती करतो, त्याने आमचा स्वीकार केला आहे या सत्यावर तुमचा विश्वास असला की, तुम्ही स्वत:ला स्वीकारून स्वत:वर प्रेम करू लागाल. आणि मग तुम्ही देवावर प्रीती कराल एवढेच नव्हे, तर दुसऱ्यांवरही प्रीती करू लागाल.

## जे तुमच्याजवळ नाही ते कसे देऊन टाकणार?

कित्येक लोक येशूला स्वीकारतात आणि लगेचच प्रत्येकावर प्रीती करू पाहतात आणि अनेकदा हा प्रयत्न विफल झाल्याने त्यांना आपण अपराधी आहोत असे वाटू लागते, कारण प्रीती करणे त्यांना जमतच नाही. प्रथम देवाची प्रीती मिळाल्याशिवाय दुसऱ्यांवर प्रीती करणे अशक्य आहे कारण आपल्यामध्ये देण्यासाठी मुळात प्रीतीच नसते.

करिंथकरांस पौलाने लिहिलेल्या पहिल्या पत्रातील तेरावा अध्याय ''प्रीतीचा अध्याय'' या नावाने प्रसिद्ध आहे. येथे पौलाने हेच सत्य अगदी जोरदारपणे मांडले आहे. पहिल्याच वचनात प्रीतीविषयी तो सांगतो. प्रीती म्हणजे हेतूपूर्ण, बुद्धिगम्य, आध्यात्मिक भक्ती, निष्ठा. तिला आमच्यावरील आणि आमच्यामधील देवाच्या प्रीतीची प्रेरणा आहे. पण ती प्रीती प्रथम आमच्यामध्ये असली पाहिजे हे येथे स्पष्टपणे सांगितले आहे.

आपली पात्रता, लायकी आहे असे वाटते तेव्हाच देव आपल्यावर प्रीती करतो असे बहुतेक लोक समजतात, पण आपण देवाच्या प्रीतीला लायक नाही तरी त्या प्रीतीची उत्कटतेने गरज आहे असे होते तेव्हा अनेक समस्या पुढे येतात.

पुढे दिलेल्या तक्त्यांमधून देवाची प्रीती स्वीकारल्याने अथवा न स्वीकारल्याने सतत होणारे परिणाम दाखवले आहेत. उलटपक्षी देव आमच्यावर विनाअट, निरपेक्ष प्रीती करतो यावर विश्वास ठेवल्याने आम्हांला मोठा आनंद व धन्य आशीर्वाद यांचा लाभ होतो.

## देवाच्या प्रीतीचा स्वीकार करणे

आपण देवाच्या प्रीतीचा स्वीकार करायचाच असा अंत:करणात निश्चय करा. हा निश्चय करण्यासाठी काही उपयुक्त मार्गदर्शन पुढे दिले आहे. प्रभूनेच मला प्रेरणा देऊन या गोष्टी करण्यास सांगितले असे मला खात्रीने वाटते. या सूचना तुम्हांलाही उपयोगी पडतील असे मला वाटते. तथापि, आपण सर्वच खास, विशेष व अनन्य आहोत हे विसरू नका. देवाने प्रत्येकासाठी व्यक्तिगत योजना तयार केली आहे हेही लक्षात घ्या. *व्यवस्था, पद्धती, रीती अशा जंजाळात गुंतून राहू नका.*

**निरपेक्ष, विनाअट प्रीतीचा पाझर असा प्रवाहित होतो**

येशू माझ्यावर प्रीती करतो, हे मला माहीत आहे.
माझ्यावर तो निरपेक्ष विनाअट प्रीती करतो.
म्हणून : त्याची माझ्यावरची प्रीती *तो जो आहे* त्यावर आधारलेली आहे.
म्हणून : मी त्याला संतोष देते तेव्हा मला त्याची प्रीती मिळते. आणि मी त्याला संतोष देत नाही तेव्हा मला नाकारले आहे असे वाटते.
म्हणून : मी त्याची प्रीती मिळवलेली नाही, अगर त्याची प्रीती मला मिळवणे शक्य नाही.
म्हणून : त्याच्या प्रीतीपासून मला विभक्त करणे शक्य नाही.
मी त्याचे आज्ञापालन केले की तो मला आशीर्वाद देईल.
मी त्याच्या आज्ञा मोडल्या, तर माझ्या वर्तनाचे परिणाम मला भोगावे लागतील.
त्याला माझी वागणूक आवडली नाही तरी तो नेहमीच माझ्यावर प्रीती करतो.
म्हणूनच : मी देवाची प्रीती अनुभवली आहे त्यावरून मी प्रीतीस पात्र-लायक आहे हे मला समजते.

म्हणून, देव माझ्यावर प्रीती करतो हे मला माहीत आहे. त्यावरून माझ्यावर प्रीती करणारे दुसरे लोक आहेत हे मला पटते.
म्हणून,माझ्यावर खरोखरी प्रीती करणाऱ्या लोकांवर मला भरंवसा ठेवता येतो.
म्हणून, ते लोक देतात त्या प्रीतीचा मला स्वीकार करता येतो.

म्हणून, प्रीती व आत्ममूल्याची जाणीव ही माझी अतिशय मूलभूत गरज देवाने पुरवली आहे. तेव्हा मला इतर लोकांनी ठीकठाक करण्याची गरज नाही.
म्हणून, सोबत, मैत्री, करमणूक अशासारख्या काही गरजा भागवण्यासाठी मला दुसऱ्यांकडे पाहावे लागते तरी पण या गरजा समतोल, यथार्थ आणि देवाने दिलेल्या आहेत असे मी समजते. या गरजांची पारख, मूल्यमापन मी प्रामाणिकपणे करतो आणि माझ्या गरजा पुरवल्या जाव्या यासाठी विनंती करतो.
म्हणून : दुसऱ्या लोकांनीही माझ्याशी प्रामाणिकपणे वागावे ही माझी अपेक्षा आहे. टीका ऐकून घेणे, समोरासमोर बोलणे हे जर प्रीतीने होत असेल तर ते मी नीटपणे हाताळीन.

म्हणून : मी देवाची खास, अनन्य निर्मिती आहे हे मी जाणते तेव्हा मला इतरांना द्यावयाची प्रीती बहुमोल आहे हेही मी जाणते.
म्हणून : मला दुसऱ्या लोकांच्या पुढे अगर लोकांसाठी अभिनय करण्याची, काही करून दाखवण्याची गरज आहे असे मला वाटत नाही. ते एकतर मी जशी आहे त्यासाठी माझ्यावर प्रीती करतील अगर करणार नाहीत. मी जी, जशी आहे त्यासाठी माझ्यावर प्रीती केली जावी हेच मला महत्त्वाचे आहे.
म्हणून, दुसरे लोक *माझ्याविषयी* काय म्हणतात, कोणता विचार करतात त्याकडे दुर्लक्ष करून दुसरे लोक व त्यांच्या गरजा यांवर लक्ष केंद्रित करणे मला शक्य झाले आहे.

म्हणून मला निकोप, प्रेमळ, टिकाऊ नातेसंबंध जोडणे व ते राखणे शक्य झाले आहे.

**सापेक्ष, अटी असलेल्या प्रीतीचा पाझर असा प्रवाहित होतो**

येशू माझ्यावर प्रीती करतो, पण... तो माझ्यावर काही अटीवर सापेक्ष प्रीती करतो.

म्हणून : त्याची प्रीती माझ्या कार्यकृतीवर आधारलेली आहे.

म्हणून : त्याला संतोष देऊनच मला त्याची प्रीती मिळवली पाहिजे.

म्हणून : मी त्याला संतोष देते तेव्हा मला त्याची प्रीती मिळते. आणि मी त्याला संतोष देत नाही तेव्हा मला नाकारले आहे असे वाटते.

म्हणून : जर सर्वस्वी प्रीतीयुक्त देवच माझ्यावर नेहमी प्रीती करीत नाही, मला स्वीकारीत नाही, त्याला मी मोलवान वाटत नाही तर मी मोलवान व प्रीतीस पात्र आहे यावर विश्वास ठेवण्याची अपेक्षा का केली जावी?

म्हणून : मी मुळातच प्रीतीस पात्र, मोलवान व्यक्ती आहे हे मला मान्य नाही.

म्हणून तुझ्यावर प्रीती आहे असे मला सांगणाऱ्या दुसऱ्या लोकांवर भरंवसा ठेवणे मला शक्य नाही. मला त्यांच्या हेतूंविषयी शंका आहे. कदाचित मी 'खरी' कशी आहे हेही त्यांनी अजून ओळखले नसावे.

म्हणून मला दुसऱ्या लोकांपासून प्रीती स्वीकारता येत नाही. मी ती नाकारते. मी प्रीतीस पात्र नाही हे माझे म्हणणे बरोबर आहे असे मला सिद्ध करायचे आहे. मग पुढे काही काळाने ते मला नाकारतील, म्हणून ते सामान्यपणे असेच करतील.

म्हणूनच मी मोलवान पात्र आहे हे मला स्वत:ला व दुसऱ्यांना प्रमाणाने पटवून देण्यासाठी मी पैसा, प्रतिष्ठा, कपडे वगैरे जगाच्या मानदंडांचा आधार घेते. मी प्रीतीस पात्र आहे हे मला व इतर लोकांना सप्रमाण दाखवण्यासाठी मला इतरांकडून पाठिंब्याची आणि प्रतिप्रोत्साहनाची गरज आहे.

म्हणूनच मला दररोज अशा नव्यानव्या शाबासकीची गरज आहे. ही शाबासकी, हे उत्तेजन मिळाले तरच मला मनातून चांगले वाटेल आणि रोजची कामे नीटपणे करता येतील.

म्हणून : माझ्या स्वत:च्या आत्म-मूल्याची जाणीव फक्त देवच मला देऊ शकतो. पण ही जाणीव मिळावी म्हणून मी दुसऱ्यांकडे पाहत असते.

म्हणून : माझ्यावर प्रीती करणाऱ्या लोकांकडून मी अवास्तव अपेक्षा धरून अशक्य कोटीतल्या मागण्या करते. मी त्यांना निराश करते. ते मला देतात त्याने माझे कधीच समाधान होत नाही. मी त्यांना माझ्याशी खरेपणाने वागू देत नाही, अगर मला जाब विचारू देत नाही. माझे लक्ष माझ्या स्वत:वरच आहे आणि त्यांनीही सर्वस्वी माझ्यावर लक्ष केंद्रित करावे हीच माझी अपेक्षा आहे.

म्हणून मी स्वत:च जो/जी आहे त्यावर प्रीती करू शकत नाही, तर दुसरे माझ्यावर प्रीती करतील ही माझी अपेक्षा नाहीच. ज्याला खरोखरी काहीच मोल नाही असे काहीतरी कोणाला आवडेल?

म्हणून मी जे करते त्याच्या आधारे त्यांची प्रीती मिळवायचा प्रयत्न करते. मी जे देते ते प्रीती करण्याच्या नव्हे तर *माझ्यावर प्रीती केली जावी* या उद्देशाने देतो. मी जे काही करते ते ''स्वत:शीच'' बांधलेले असते म्हणून ज्यांच्यावर माझी प्रीती आहे असे म्हणजे ज्यांना खरोखरी या प्रीतीचा अनुभव येत नाही, आपला गैरफायदा घेतला, आपल्याला ''वापरून घेतले'' असे त्यांना वाटते. प्रीतीचे प्रेमळ नाते जोडण्याचा प्रयत्न न करता दुसऱ्यांनी मला नाकारू नये यासाठी माझी सर्व धडपड असते.

म्हणूनच निकोप, प्रेमळ, टिकाऊ नातेसंबंध राखणे मला शक्य नाही.

तुमच्यावरील देवाच्या प्रीतीचे प्रकटीकरण मिळण्यास तुम्हांला सहाय्य व्हावे यासाठी पुढील गोष्टी कराव्या ही माझी सूचना आहे.

- ''देव माझ्यावर प्रीती करतो,'' हे स्वत:च्या मनाला बजावून सांगा. हे शब्द मोठ्याने बोला. हे पुन्हा पुन्हा म्हणा, ते मनात, अंत:करणात ठसवा. सकाळी उठल्यावर, रात्री झोपताना, दिवसभर काम करताना सतत हे शब्द मनात घोळत ठेवा. आरशात पाहा, स्वत:कडे बोट दाखवा, स्वत:ला नावाने हाक मारून म्हणा, ''____________ देव तुझ्यावर प्रीती करतो.''
- रोजनिशी ठेवा, स्मरणवहीत रोज टिपणे लिहून ठेवा. देवाने खास तुमच्यासाठी केलेल्या विशेष गोष्टींची नोंद ठेवा. त्यात लहानमोठ्या आशा सर्वच गोष्टींचा समावेश करावा. तुमचे हे टिपण आठवड्यात एकदा तरी वाचावे, तुम्हांला उत्तेजन मिळेल. पवित्र आत्मा प्रकल्प या नावाने हे करावे. यातून तुम्हांला प्रोत्साहन मिळेल आणि विश्वासात वाढ होईल.
- देवाची तुमच्यावरील प्रीती या विषयासंबंधीची अनेक शास्त्रवचने तोंडपाठ करा.
- ''देवाची प्रीती'' या विषयावरची चांगली पुस्तके, लेख वाचा. *''टेल देम आय लव्ह देम''* आणि *''रिड्यूस मी टू लव्ह''* (मला शून्य कर त्या प्रीतीस्तव या नावाने हे पुस्तक मराठीत उपलब्ध आहे) ही माझे दोन पुस्तक शक्य तर वाचावी.
- पवित्र आत्म्याला प्रार्थना करा. तोच तुमचा शिक्षक आहे. देवाच्या प्रीतीचे प्रकटीकरण मिळावे, साक्षात्कार व्हावा यासाठी त्याला विनंती करा.

# 6

# पवित्र आत्म्याला अनुसरणे

तुम्हांला भावनिक आरोग्य मिळण्याची गरज आहे. तुमच्यासमोर असलेल्या कित्येक समस्या आणि प्रश्न गतकाळातील वाईट मुळांचा परिपाक आहे हे तुम्हांला पटले असेल, समजले असेल, तर आपण चांगले बरे व्हावे यासाठी समस्येची पाळेमुळेच उपटून टाकण्यासाठी तुम्ही निश्चितच आतुर झाला असणार. तुमची ही उत्सुकता ही तळमळ समजण्याजोगी आहे. पण बरे होण्याच्या या प्रक्रियेत तुम्हांला पवित्र आत्म्याचे सहाय्य घेतले पाहिजे. तोच तुम्हांला वाट दाखवील. मार्गदर्शन करून पुढे नेईल.

तुमच्यासाठी संपूर्ण आरोग्य विकत घ्यावे यासाठी देवाने अगोदरच येशू ख्रिस्ताला या पृथ्वीवर पाठवले आहे. ते कार्य पूर्ण झाल्यानंतर येशूने आपल्या रक्ताने जे विकत घेतले ते तुम्हांला देण्यासाठी त्याने आपला पवित्र आत्मा पाठविला.

येशूने आपल्या शिष्यांना सांगितले की, त्याने पित्याकडे परत जावे हे त्यांच्यासाठी चांगले आहे, कारण तो गेला नाही, तर कैवारी, सांत्वनकर्ता येऊ शकणार नाही (पाहा योहान.१६:७). कैवारी पवित्र आत्मा आहे. पवित्र शास्त्राच्या विस्तारीत इंग्रजी अनुवादात येशूने पवित्र आत्मा आमचा सल्लागार, सहाय्यक, वकील, मध्यस्थ, शक्ती देणारा व पाठीराखा असल्याचे म्हटले आहे (योहान.१६:७). तुम्ही पुन्हा पूर्ववत होत असताना पवित्र आत्म्याच्या कार्याच्या या प्रत्येक पैलूचा अनुभव घेणे अगत्याचे आहे.

## सात्विक सुभक्तीपूर्ण मार्गदर्शन घ्या

उगाचच याच्या त्याच्याकडून मार्गदर्शन मागत इकडेतिकडे फिरू नका. प्रथम प्रार्थना

करा. दुसऱ्या कोणा माणसाकडून मार्गदर्शन घअयायचे का देव स्वतःच तुम्हांला मार्गदर्शन करणार या संबंधात त्याची इच्छा जाणून घ्या.

माझ्या स्वतःच्या जीवनात खूप खूप प्रश्न होते, समस्या होत्या, तरी एक अपवाद वगळता मी दुसऱ्या कोणाकडेही सल्ला, मार्गदर्शन मागण्यासाठी कधी गेले नाही. त्या एका वेळी मी प्रभुसेवेत असणाऱ्या एका स्त्रीकडे मार्गदर्शनासाठी गेले होते. या स्त्रीचाही छळ झाला होता. मला तिच्याविषयी काहीच वावगे सांगायचे नाही तरी पण मला सहाय्य करणे काही तिला शक्य झाले नाही. त्यात तिचा काहीच दोष नव्हता, पण या कार्यासाठी प्रभूने तिला अभिषेक केला नव्हता.

*देव ज्याचा आरंभ करीत नाही त्यावर अभिषेक करण्यास, आशीर्वाद देण्यास तो बांधलेला नाही.* अनेकदा पवित्र आत्म्याचे मार्गदर्शन आणि नेतृत्व न घेता लोक धावतपळत दुसऱ्यांच्याकडे जातात आणि या खटाटोपातून कधीच चांगले टिकणारे फळ पदरी पडत नाही. *तेव्हा अडचण असेल, संकट येईल तेव्हा फोनकडे जाण्यापूर्वी दयासनाकडे जा.*

मार्गदर्शन, सल्ला घेणे, शोधणे चुकीचे आहे असे मला मुळीच सुचवायचे नाही. प्रथम प्रार्थना करा, पवित्र आत्म्याद्वारे प्रभूने तुम्हांला सहाय्य करावे म्हणून विनंती करा, एवढेच मला सांगायचे आहे. तुमच्यासाठी योग्य मार्गदर्शकाची निवड त्यालाच करू द्या. तुमच्यावर जे प्रसंग आले तसेच प्रसंग एखाद्यावर आले असतील, किंवा एखादा तुमचा खास जिवलग मित्र असेल, पण म्हणून तो तुमच्यासाठी योग्य मार्गदर्शक असेलच असे होत नाही. म्हणून पुन्हा सांगते, प्रार्थना करा.

आता मी कधी मार्गदर्शन घेतले नाही, म्हणून तुम्हीही ते घेऊ नये असे माझे मुळीच म्हणणे नाही. आम्हा प्रत्येकाचे व्यक्तित्व वेगवेगळे आहे. माझे व्यक्तित्व दृढनिश्चयी, स्वयंशिस्तीचे, ध्येयावर लक्ष ठेवणारे आहे. माझ्यातील या लक्षणांमुळे मला माझ्या इष्ट ध्येयाकडे जाता आले. भावनिक आरोग्य मिळावे हेच माझे ध्येय होते. कदाचित इतरांना या वाटचालीत थोडेफार मार्गदर्शन आवश्यक असेल, निश्चित ध्येये ठरवण्यासाठी व ती साध्य करण्यासाठी त्यांना मदतीची गरज असेल.

पवित्र आत्म्याच्या मार्गदर्शनाने चालणे अतिशय अगत्याचे आहे, तो उत्कृष्ट सर्वश्रेष्ठ मार्गदर्शक आहे. तो एक तर तुम्हांला थेट मार्गदर्शन करील, अगर दुसऱ्या कोणाकडे जाण्यास सुचवील आणि त्या व्यक्तीच्या द्वारे तुम्हांला सहाय्य करील. हे कसेही असले, तरी अखेर सहाय्यासाठी तुम्ही त्याचाच आश्रय केला पाहिजे आणि दुसऱ्यांनी तुम्हांला केलेले मार्गदर्शन पवित्र आत्म्याच्या सहाय्याशिवाय तुमच्यासाठी *ऱ्हेमा* म्हणजे देवाकडून आलेला वैयक्तिक साक्षात्कार असे होणार नाही.

देवाला आमच्या जीवनांकडून वेगवेगळ्या अपेक्षा आहेत, प्रत्येकाचे पाचारण वेगळे आहे हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे. त्याने मला शिक्षण देण्यासाठी पाचारण केले आहे तेव्हा मला आवश्यक असलेले सत्य थेट त्याच्याकडूनच मिळणे अधिक इष्ट व रास्त होते. तथापि हा नियम प्रत्येकालाच लागू आहे असे नाही.

# पवित्र आत्म्याचे सेवाकार्य

पवित्र आत्म्याचे सेवाकार्य अतिशय महत्त्वाचे आहे याचे आणखी एक कारण योहान.१६:८ या वचनामध्ये आढळते. पवित्र आत्मा पापाविषयी आणि नीतिमत्त्वाविषयी *खातरी* पटवील असे येशूने सांगितले आहे.

ज्यांचा छळ झाला आहे, शोषण झाले आहे असे बहुतेक लोक लाजशरमेत मुळावलेल्या व्यक्ती असतात. (लाज शरम या मुद्द्याची सविस्तर चर्चा पुढे एका प्रकरणात केली आहे.) त्यांना स्वत:विषयी काहीच चांगले वाटत नाही. त्यांना आपल्या स्वत:चाच कंटाळा आला आहे. ते अगदी निराश आहेत. आपणच सर्वस्वी दोषी व अपराधी आहोत अशी त्यांची भावना झाली आहे.

सैतानच दोष लावतो, अपराधी ठरवतो. तर पवित्र आत्मा खातरजमा करतो. खातरी पटवतो. (यात थोडा फरक आहे. खातरी पटवणे मला आवडते, पण दोषापराध मी फेटाळून लावते.) केवळ पवित्र आत्माच देवाचे वचन व त्याचे पालट करण्याचे सामर्थ्य यांच्याद्वारे लाजेने व्याकुळ झालेल्या व्यक्तीची खातरजमा करून देतो की, येशू ख्रिस्ताच्या सांडलेल्या रक्ताच्या द्वारे तिला (त्या व्यक्तीला) नीतिमान गणलेले आहे : ''ज्याला पाप ठाऊक नव्हते त्याला त्याने तुमच्याआमच्याकरिता पाप असे केले; ह्यासाठी की, आपण त्याच्या ठायी देवाचे नीतिमत्त्व असे व्हावे'' (२ करिंथ.५:२१).

येशूने पवित्र आत्मा ''सत्याचा आत्मा'' आहे असे सांगून तो आम्हांला मार्ग दाखवून संपूर्ण सत्यात नेईल हे आश्वासन दिले आहे (पहा योहान.१६:१३) पवित्र आत्मा आम्हांला स्मरण करून देईल हेही येशूने सांगितले आहे : ''तरी ज्याला पिता माझ्या नावाने (माझ्या जागी, माझा प्रतिनिधी म्हणून, माझ्या वतीने कार्य करण्यासाठी) तो तुम्हांला सर्व काही शिकवील आणि ज्या गोष्टी मी तुम्हांला सांगितल्या त्या सर्वांची तुम्हांस आठवण करून देईल'' (योहान.१४:२६).

छळणुकीच्या प्रभावाने दडपून गेलेल्या लोकांना निकोप बरे होण्यासाठी पवित्र आत्म्याच्या कार्याचे हे दोन्ही मुख्य पैलू अतिशय लाभदायक आहेत. अशा लोकांनी नाकारण्याची वृत्ती सोडून सत्याला सामोरे गेले पाहिजे. काही वेदनाकारी, क्लेशमय गोष्टी ते मुद्दाम विसरले असतील. तथापि विपरीत प्रभावापासून सुटून बरे पूर्वीचे सर्व आठवून त्याचा निकाल करणे अगत्याचे आहे.

संबंधित व्यक्तीवर उपचार करण्याची, मार्गदर्शन देण्याची जबाबदारी ज्याच्यावर आहे, त्याला आत्म्याचे मार्गदर्शन नसेल तर तो छळ झालेल्या व्यक्तीला या पूर्वस्मरणातून झपाट्यात पुढे नेईल आणि मग रोगापेक्षा उपचार भयंकर असे होईल.

मला एका मुलीची आठवण आहे. एक दिवस ती प्रार्थनेसाठी माझ्याकडे आली. ती अतिशय उद्विग्न व भावनावश झाली होती. ती जणू अगदी घाबरून गर्भगळित झाली होती.

तिने मला सांगितले, ''दर आठवड्याला मी माझ्या मार्गदर्शकाकडे गेले की, मला अगदी असह्य होते. माझ्या मनाला असह्य यातना होतात.'' ती अगदी व्याकुळ होऊन बोलत होती, ''ते मला अगदी सोसवत नाही, काळजाला एवढी घरे पडतात, वाटतं माझा शेवट होईल.''

ती या प्रकारे बोलत असताना मी प्रार्थना करून प्रभूकडे सहाय्य मागत होते, मला सहाय्य मिळाले की तिला सहाय्य करणे सोपे झाले असते. उपासनामंदिरात वेदीजवळच ती अनावर होऊन काहीतरी बरळू लागेल का ही मला धास्ती होती. पण अचानक मला प्रभूकडून उत्तर मिळाले. बहुतेक तिची मार्गदर्शिका आत्म्याविषयी संवेदनशील नाही, आणि ती या मुलीला मागील सर्व गोष्टींना एकदम तोंड देण्याचा आग्रह करते आहे. म्हणूनच तिच्या मनाला ते सर्व एकदम सोसणे अशक्य झाले आहे.

मी त्या मुलीला सांगितले, ''माझं ऐक. तुझी अडचण माझ्या लक्षात आली आहे.'' मग ती थोडी शांत झाली. मी तिला देवाचा संदेश सांगितला तो तिने शांतपणे ऐकून घेतला आणि तिचे मन हळूहळू ताळ्यावर येऊ लागले. तिला बरे वाटले. ती म्हणाली तुम्ही आता सांगितलंत तसंच माझ्या बाबतीत घडत आहे.

मी स्वत: बरी होत असताना पवित्र आत्म्याने मला विविध प्रकारे मार्गदर्शन घेण्यास सुचवले होते हे मी तिला सांगितले. प्रथम माझ्या पतीने मला एक पुस्तक वाचण्यासाठी दिले होते. त्यात लहानपणीच लैंगिक छळ सोसलेल्या एका स्त्रीची कहाणी होती. माझ्या समस्यांचे मूळ माझ्या भूतकाळातील घटनांमध्ये ओह याची मला ते पुस्तक वाचीपर्यंत जाणीवच नव्हती.

ते पुस्तक माझ्याने अजिबात वाचवेना. फारच कठीण होते ते. त्या स्त्रीच्या सावत्र बापाने तिचा लैंगिक छळ कसा केला ते तपशीलवार सांगितले होते. ते वर्णन वाचताना माझ्या भूतकाळातील सर्व आठवणी, वेदना, संताप आणि चीड माझ्या अंतरंगात अचानक कोठूनतरी उफाळून आली. मी ते पुस्तक फेकून दिले, आणि ओरडले, ''नाही, मी हे वाचणार नाही.''

तेवढ्यात पवित्र आत्म्याचे शब्द मी ऐकले, ''वेळ आली आहे.''

ही घटना घडली त्यापूर्वी काही वर्षे मी देवाबरोबर चालण्याचा, राहण्याचा प्रयत्न करीत होते. त्याने मला यापूर्वीच मार्गदर्शन का केले नाही? एवढा विलंब का लावला?'' वेळ झाली नव्हती'' हेच या प्रश्नांचे उत्तर आहे. आमच्या जीवनातील कोणती वेळ, कोणता काळ उचित, योग्य आहे ते पवित्र आत्मा जाणतो. मीही नेहमी म्हणते, ''एखाद्या'' गोष्टीसाठी तुमची तयारी आहे का नाही ते फक्त पवित्र आत्म्याला बरोबर माहीत असते. म्हणजेच तुम्हांला उपयुक्त, सहाय्यक गोष्ट कोणती आणि ते सहाय्य घेण्यास तुमच्यासाठी योग्य वेळ कोणती ते फक्त प्रभूच्या आत्म्यालाच माहीत असते.

ही मदत, हे मार्गदर्शन अनेक प्रकारे मिळते. ते एखादे पुस्तक असेल, एखादा वक्ता, उपदेशक असेल, अगर एखादा मित्र असेल. तुम्हांला त्या क्षणाला जे वाचायला, ऐकायला

आवश्यक तेच तेव्हा मिळते. केव्हा एखाद्याच्या वैयक्तिक साक्षीतून अगर थेट प्रभूकडून आलेला संदेश किंवा प्रेरणा यातूनही हे मार्गदर्शन मिळते आणि आता या क्षणाला आज हे पुस्तक वाचीत असताना हाच प्रभूने तुमच्यासाठी नेमलेला समय असेल. तसे असेल तर तुम्हांला आता ज्या बाबतीत दु:ख होते आहे त्याच बाबतीत देव सहाय्य करील. कदाचित येथूनच तुम्ही बरे होण्याची सुरुवात होईल. कदाचित त्या प्रक्रियेतील हा पुढचा टप्पा असेल किंवा निकोप, निरोगी होण्यासाठी दीर्घकाळ चाललेल्या प्रयत्नांवर हा पूर्णतेचा स्पर्शही असू शकेल.

भावनिक आरोग्य मिळावे यासाठी प्रार्थनाविनंती करण्यास अनेक लोक माझ्याकडे येतात. पण त्यांना त्यांच्या बाळपणीचे काही काही प्रसंग, घटना आठवतच नाहीत, म्हणून ते विमनस्क होतात. मी म्हणते तसे ते ''उत्खनन'' करीत असतात. गतकाळातील विसरलेल्या आठवणी उकरून काढाव्या, त्यांचा निकाल लावावा, ते सर्व मनातून काढून टाकावे हाच त्यांचा प्रयत्न असतो. अशा लोकांना मी सांगते की, माझ्याही बालपणीचे काही भाग, घटना मला आठवत नाहीत. खरे तर माझे बहुतेक लहानपण अगदी कोऱ्या करकरीत पानांनी भरलेले आहे.

मी या लोकांना आवर्जून सांगते की, पवित्र आत्मा आम्हांला सर्व सत्यामध्ये नेतो आणि अनेक गोष्टींची आम्हांला आठवण करून देण्यास तो समर्थ आहे, परंतु या अतिसंवेदनशील गोष्टींच्या संबंधातील मार्गदर्शन करणे हे त्याच्यावरच सोपवून द्यावे. माझ्या आठवणी, स्मरणशक्ती वगैरे सर्व त्याच्या हाती दिले आहे. गतकाळातील एखादी आठवण आल्याने माझे काही हित होणार असेल तर ती घटना, तो प्रसंग मला नक्की आठवेल हा माझा विश्वास आहे आणि त्या आठवणीने माझा काही फायदा होणार नसेल, ती अनावश्यक असेल अगर ती आठवल्याने माझे अहित होणार असेल, तर ती न आठवल्याने माझे काहीच बिघडत नाही. उलट त्याबद्दल मी देवाला धन्यवाद देते. केव्हा केव्हा आपणाला जे आठवत नाही, त्यामुळे आमचे काही वाकडे होत नाही असे मला वाटते.

अर्थात नेहमीच असे होत नाही. एखादी दु:खद घटना नुसती आठवल्यानेही लोकांना मोठा आराम मिळतो, कारण त्या घटनेचा विचार करून तिचा कायमचा निकाल करता येतो. कधी कधी असेही होते की, जर जुन्या आठवणी मुद्दाम विसरून दाबून अंत:करणात कोठेतरी कोपऱ्यात दडवून ठेवल्या असतील तर त्यांचा विखार आतील संपूर्ण यंत्रणेला पोखरून टाकील. असे झाले तर पूर्ण आरोग्य मिळण्यासाठी प्रथम आठवणींची ती पोतडी मोकळी करणे अगत्याचे आहे. पण ही गोष्ट देखील पवित्र आत्म्याच्या नेतृत्वाने व मार्गदर्शनाने केली पाहिजे. नाहीतर त्यातून उपायाऐवजी अपाय होऊन अगोदरच दुखावलेल्या भावना आणखी दुखावल्या जातील, मोठे नुकसान होईल.

पवित्र आत्मा सौम्य, ममताळू, विचारी, दयाळू, आस्थेवाईक व सहनशील आहे. तथापि, तो समर्थ व शक्तिमान आहेत, तसेच लोकांना स्वत: होऊन जे कधीच करता येत नाही ते करण्यास सक्षम आहे. स्तोत्रकर्ता म्हणते, ''परमेश्वर जर घर बांधीत नाही तर ते बांधणाऱ्याचे श्रम व्यर्थ आहेत. परमेश्वर जर नगर रक्षीत नाही तर पहारेकऱ्याचे जागणे व्यर्थ आहे'' (स्तोत्र.१२७:१). माझ्या आयुष्याची कितीतरी वर्षे मी जागी राहून व्यर्थ श्रम करण्यात खर्चली आहेत. सर्व काही आपले आपण करण्यात आपल्या जीवनाची बहुमोल वर्षे वाया दवडू नका हेच माझे तुम्हांला सांगणे आहे, तुम्हांला पूर्ववत आरोग्य मिळावे यासाठी देवाचे सहाय्य घ्या, त्याची योजना जाणून घ्या. तो तुम्हांला एक एक पाऊल पुढे नेईल आणि तुमचे गौरवातून गौरवात रूपांतर होईल (२ करिंथ.३:१८).

# 7

# दोन प्रकारच्या वेदना

आपण पवित्र आत्म्याच्या मार्गदर्शनाने चालत राहिलो तरी भावनिक आरोग्य मिळण्याची ही प्रक्रिया तरीही वेदनामय असते. मला वाटते दु:ख, वेदना दोन प्रकारच्या असतात : एक बदलामुळे होणाऱ्या वेदना आणि दोन कधीच न बदलता, जैसे थे राहण्याच्या वेदना. तुमच्या बरे होण्याच्या योजनेत प्रभूच्या आत्म्याचा सहभाग असेल, तुम्ही त्याला मार्गदर्शन करू द्याल तर तो सतत तुमच्या जवळ राहून प्रत्येक टप्प्यावर तुम्हांला आवश्यक ती शक्ती तोच पुरवील. त्यामुळे तुम्हांला जे काही सोसावे लागेल, जी संकटे परीक्षा होईल त्यांना तोंड देता येईल.

प्रभू आम्हांला कधीही सोडणार नाही, टाकणार नाही. त्याने तसे अभिवचन आम्हांला दिले आहे. इब्री.१३:५ मधील हे अभिवचन अतिशय, स्पष्ट आणि समर्थ आहे. "तुमची वागणूक द्रव्यलोभावाचून असावी [यात हाव, लोभ, वासना, पृथ्वीवरील गोष्टींची इच्छा यांचाही समावेश आहे]. जवळ आहे तेवढ्यात [तुमच्या परिस्थितीत] तुम्ही तृप्त असावे; कारण त्याने स्वत: म्हटले आहे, मी तुला सोडून जाणार नाही व तुला टाकणार नाही [त्रिवार नाही, तुला असहाय्य सोडणार नाही. अवसानघात करणार नाही, तुझ्यावरील माझा हात काढून घेणार नाही. मुळीच नाही!]"

झटपट बरे व्हावे या अपेक्षेने देवापुढे चार पावले जाण्याचा मोह आपणाला कधी झाला तर आपण हे अभिवचन आठवावे. आम्ही सर्व सूत्रे आमच्या हाती घेतली तर आपण धोक्याच्या प्रदेशात आलो आहोत असे समजावे. त्याने आमच्यासाठी केलेल्या योजनेमध्ये त्याच्या इच्छेनुसार काही अडचणी वगैरे असतील तर तो आपले सहाय्य करील, पण आपल्यामुळे काही अडचणी अचानक आल्या, तर त्या दूर करण्यास आम्हांला सावरून

धरण्यास, आमचा स्वर्गीय पिता बांधलेला नाही. अर्थात आपण यातून निभावूनही जाऊ पण त्यासाठी उगाचच, गरज नसताना अधिक कष्ट करावे लागतील, शिवाय विलंब होईल तो भाग वेगळाच.

भावनिक घाव, जखमा आणि ते बरे होणे यातील दु:ख वेदना शारीरिक वेदनाहून अधिक तीव्र आणि घातक असतात. देवाने दाखवलेल्या योजनेप्रमाणे तुम्ही चालत असाल आणि त्यात तुम्हांला वेदनामय काळ घालवावा लागला तर लक्षात ठेवा. पवित्र आत्माच शक्तीसामर्थ्य देणारा आहे. केव्हा केव्हा असे वाटेल की आता सर्व संपले, एक क्षणही तग धरता येणार नाही. अशा वेळी तुम्हांला शक्ती मिळावी यासाठी प्रभूला विनंती करा.

अशा कठीण काळातून निभावून जाण्यासाठी १ करिंथ.१०:१३ हे वचन अतिशय उपयुक्त आहे. हे वचन तोंडपाठ करा. येथे पौलाने आम्हांला सांगितले आहे :

> मनुष्याला सहन करता येत नाही अशी परीक्षा तुम्हांवर गुदरली नाही; आणि देव विश्वसनीय आहे, तो तुमची परीक्षा तुमच्या शक्तीपलीकडे होऊ देणार नाही, तर परीक्षेबरोबर तिच्यातून निभावण्याचा उपायहि करील, ह्यांसाठी की तुम्ही ती सहन करण्यास समर्थ व्हावे.

पाप करण्यास प्रवृत्त करणारा कोणताही मोह असला तरी तो माणसाला टाळता येण्याजोगा असेल, माणसाला सोसवेल असाच तो केला असेल. देव आमच्या शक्तीपलीकडे आमची परीक्षा होऊ देत नाही. प्रत्येक परीक्षेबरोबर सुटकेचा, स्थिर राहण्याचा मार्गही त्याने ठेवलेला असतो. आपण धीराने सोसले पाहिजे.

विशेषत: अशा कठीण काळात अनेक मोह पडतात, पुढे येतात. यात सर्व सोडून जुन्याच वाटेने जुन्या विचारांनी चालण्याचा मोह तीव्रतेने होतो. तुम्ही पुन्हा नकारात्मक विचार करता, उदास होता, देवावर रागावता. कारण आतापर्यंत जीवनात सोसाव्या लागलेल्या वेदनांमधून सुटण्याचा मार्ग त्याने का दाखवला नाही ते तुम्हांला समजत नसते. परंतु तसे नसते. देव आमच्या वतीने हस्तक्षेप करील. तो वेळेवर सहाय्य देईल असे या वचनात खात्रीने सांगितले आहे. हे वचन दृढ धरण्याचा निश्चय करा आणि तो कधी मोडू नका.

२ करिंथ.१२:७-९ हा आणखी एक उपयुक्त शास्त्रभाग पाहा. येथे पौलाने त्याच्या शरीरातील काट्याचा (व.७), त्यामुळे होणाऱ्या वेदनांचा उल्लेख केला आहे (व.७). हा काटा म्हणजे नेमके काय ते जाणून घेणे महत्त्वाचे नाही. काटा होता, त्यामुळे त्याला दु:ख होई आणि तो काढून टाकला जावा ही त्याची इच्छा होती. एवढे येथे स्पष्ट आहे. देवाने हा काटा काढून टाकावा यासाठी पौलाने तीनदा कळकळून प्रार्थना केली. पण प्रभूने त्याला स्पष्टपणे सांगितले ''माझी कृपा तुला पुरे आहे. कारण माझी शक्ती व सामर्थ्य परिपूर्ण आहे आणि (तुझ्या) अशक्तपणात ते अधिक प्रभावी असल्याचे दिसून येते (व.९).

आम्ही प्रभूचे नाव घेऊन धावा केला की लगेच त्याच क्षणाला आमच्या अडचणीतून, दु:खातून सुटतो असे नेहमीच घडत नाही. केव्हा केव्हा आम्हांला काही काळ धीराने सोसावे

लागते. विश्वासाने सहन करीत प्रतीक्षा करावी लागते. आम्हांला ताबडतोब न सोडवण्याची कारणे काहीही इसतो, परंतु या काळात देव आम्हांला आवश्यक ती कृपा व शक्ती पुरवतो, त्यामुळे आम्हांला निर्धाराने पुढे जाऊन विजयी होता येते. यासाठी त्याला आपण धन्यवाद द्यावे तेवढे थोडेच आहेत.

आमचे बंधन आणि समस्या यांतून देव आमची नेहमीच ताबडतोब सुटका का करीत नाही असा प्रश्न तुम्हांला कधी पडला आहे? याचे कारण हेच की आपल्या मुलांच्या जीवनात जे करणे आवश्यक आहे ते आणि ते करण्यास योग्य समय कोणता ते फक्त प्रभूच जाणतो.

माझ्या स्वत:च्या अनुभवातून मी प्रश्न विचारणे, शंका घेणे हे न करता विश्वास ठेवण्यास शिकले आहे. देवाला असे का, कारण काय हे विचारण्यात चूक काहीच नाही. पण अशा प्रश्नातून गोंधळ वाढता कामा नये. त्यापेक्षा सरळ प्रभूवर भरंवसा ठेवणे अधिक इष्ट आहे. त्याचे कधीही चुकत नाही, तो कधीही विलंब लावीत नाही हे लक्षात ठेवणे अगत्याचे आहे. एखादा प्रसंग अगर घटना का घडली, त्यामागे कोणते कारण होते हे सर्व संपल्यावर, त्या प्रसंगातून निभावून गेल्यावरच मागे वळून पाहिल्यावर आपल्याला समजते. माझ्या जीवनात अनेक अनुभव असे आले आहेत की त्या त्या प्रसंगी ते काय आणि का घडते आहे ते मला मुळीच समजत नव्हते. परंतु आता मात्र त्याचां अर्थ व उद्देश काय ते थोडेफार समजते.

संकट परीक्षांतून जाताना दु:ख, वेदना होतातच, माझ्या सेवाकार्यात मी अनेकदा लोकांना सांगते की आम्ही आमच्या साक्षीचे वचन आणि कोकऱ्याचे रक्त यांच्याद्वारे सैतानावर विजय मिळवतो (पाहा प्रगटी.१२:११). जीवनाच्या कोणत्याही क्षेत्रात मिळवलेल्या विजयाची आठवण जपून ठेवणे महत्त्वाचे आहे. तथापि, आपली साक्ष विधायक असावी यासाठी काही अडचणी, संकटे अगर विरोध यांवर यशस्वीपणे विजय मिळवलेला असणे जरुरीचे आहे. आमची मोहपरीक्षा होत असता जे सोसावे लागते ते एक वेदनामय दु:खद भाग आहे. आणि हे सर्व सोसून यातून निभावून बाहेर पडल्यावर महाविजय आणि देवाचे चांगुलपण याविषयी आनंदाने साक्ष देता येते. *पारख, परीक्षा झाल्याशिवाय साक्ष देत येत नाही.*

## दुःखवेदनेची कवाडे

मी स्वत: बरेच भावनिक दु:ख सोसले आहे. कदाचित तुम्हीही सोसले असेल. एवढे सोसल्यावर मला वेदना सोसण्याचाच कंटाळा आला. सोसून सोसून मी थकून गेले. पवित्र आत्म्याच्या नेतृत्वाला अनुसरून मी वेदनामुक्त होण्याचा प्रयत्न करीत होते. तरी पण बरे होण्याचीही प्रक्रिया एवढी वेदनामय का हे मला काही समजेना. या वेदना अशाच सहन करीत राहायचे असेल तर प्रभूने प्रथम मला काही उत्तरे देणे आवश्यक आहे असे मला वाटले. खरे पाहता माझ्यामध्ये सुधारणा होत होती, बरे वाटू लागले, येथे तेथे मला थोडेफार यश मिळत होते. पण माझी थोडीशी प्रगती झाली की प्रत्येक वेळी प्रभू मला बरे होण्याच्या एक नव्या टप्प्यावर नेत असे आणि तेथे पुन्हा भावनिक स्वास्थ्य बिघडून अधिक वेदना वाट्याला येत.



## वेदनेची कवाडे

या परिस्थितीसंबंधी मी प्रार्थना केली. तेव्हा देवाने मला एक दृष्टान्त दिला. मला दिसले की माझ्या अंत:करणात एक दारांची, दरवाजांची एक मोठी मालिकाच आहे. एकापुढे दुसरे अशी अनेक दारे आहेत. प्रत्येक दार माझ्या जीवनातील एक एक कटु, धक्कादायक घटना असे होते. ती घटना घडली तेव्हा मला असह्य वेदना झाल्या होत्या. मी जेव्हा जेव्हा माझ्या जीवनातील त्या दु:खद घटना प्रसंगातून गेले (उदाहरणार्थ : घरात वडिलांकडून लैंगिक अत्याचार, माझ्या लठ्ठपणामुळे शाळेत होणारी कुचेष्टा, कोणी जवळच्या मैत्रिणी नसणे, सतत भीतीच्या सावटात राहणे, माझ्या पहिल्या नवऱ्याने मला सोडणे, चर्चमधील काही मित्रमैत्रिणींनी विश्वासघात करणे, वगैरे वगैरे) तेव्हा तेव्हा मला वेदनेच्या एका नव्या दारातून जाणे भाग पडे असे प्रभूने मला दाखवून दिले.

भीती नाकारले जाणे, टाकले जाणे, विश्वासघात यांमुळे होणाऱ्या तीव्र वेदना मला अगदी स्पष्टपणे चित्रासारख्या दिसतात, आठवतात आणि लोकांना अशा कचाट्यात पकडणाऱ्या छळणुकीचा अनुभव आला आसेल तर ते अपार दु:ख, वेदना तुम्हांलाही आठवतील.

मी अखेर प्रभूला माझ्या जीवनामध्ये कार्य करू दिले तेव्हा त्याने मला दाखवले की मी अशा अनेक ''वेदनांच्या दारांच्या आड'' लपून राहत होते. मी गुलामगिरीत अगदी खोल रुतले होते. खोटी व्यक्तित्वे, बहाणे, ढोंग, आणि बाह्य देखावा यांच्या आड आसरा शोधीत होते. यातून स्वत:ला कसे सोडवावे ते मला मुळीच कळत नव्हते. आणि प्रभू मला या बंधनांतून सोडवू लागला तेव्हा साहजितच मला असह्य वेदना झाल्या.

गुलामगिरीतून सुटून मुक्त होण्यासाठी आम्हांला वेदनांच्या त्याच दरवाजातून पुन्हा मागे मागे जावे लागते हे आता मला समजले. वेदनांचे हे दरवाजे पूर्वीचेच अगर त्यासारखे असतील. आपणाला या दरवाजांच्या पलीकडे जायचे आहे. वेदनांच्या दारातून आतो नेऊन आम्हांला बंधनात अडकवलेले असते तेव्हा ती बंधने तोडण्यासाठी सुटकेसाठी आम्हांला त्याच दरवाजातून परत यावे लागते. या दारातून जाताना व येताना दोन्ही वेळेस वेदना, यातना

होतात. प्रथम प्रत्यक्ष छळ झाल्याने वेदना होतात आणि त्या छळाच्या आठवणीने पुन्हा दुसऱ्यांदा वेदना होतात.

आमची सुटका करून पुन्हा पूर्ववत बरे करण्यासाठी आम्हांला अवघड कठीण वाटणारे मुद्दे, लोक, आणि सत्ये यांना आम्ही सामोरे गेले पाहिजे हीच प्रभूची इच्छा आहे. या सर्वांना तोंड देणे अशक्य नसले तरी आम्हांला एकट्याने स्वबळावर ते करणे शक्य नसते. या संबंधात पुढे काही उदाहरणे दिली आहेत ती नीट लक्षपूर्वक वाचा.

## *उदाहरण पहिले*

मला माझ्या वडिलांची नेहमीच खूप भीती, दहशत वाटत असे. मी मोठी प्रौढ, चाळिशीची स्त्री झाले, मला चार मुले झाली तरीपण त्यांची भीती मनातून कधी गेली नाही. अनेक दु:खद घटनांमुळे मी त्यांची धास्ती घेतली होती.

मी सत्तेचाळीस वर्षांची झाले तेव्हा अखेर प्रभूने मला वडिलांना जाब विचारण्यास सुचवले. या प्रसंगाविषयी अधिक विस्ताराने मी याच पुस्तकात पुढे सांगणार आहे. पण या वेळी मी वडिलांच्या नजरेला नजर भिडवून ठामपणे म्हटले, ‘‘मला आता तुमची अजिबात भीती वाटत नाही.’’

माझ्या वडिलांनी माझा छळ केला, माझ्यावर अत्याचार केले त्याविषयी मी त्यांच्याशी बोलले तेव्हा मी ते विश्वासाने, आज्ञापालन म्हणून केले पण तेव्हाही मी ‘‘भीत भीत व कापत कापत’’ बोलले (पाहा फिलिप्पै. २:१२). येथे मी माझ्या वेदनेच्या एका दारासमोर आले होते. एकरत या दरवाजातून परत मागे बाहेर पडायचे आणि मुक्त व्हायचे अगर त्या दाराच्या आड तसेच लपून बंधनात जखडून सतत माझ्या पित्याला घाबरून भीत राहायचे हे दोनच पर्याय माझ्यापुढे असल्याचे मी जाणून होते.

माझे वडीलच माझ्या वेदना, दु:खाचे मुख्य कारणे होते. मी त्यांच्याशी समोरासमोर सडेतोड बोलले ते केवळ पवित्र आत्म्याने तसे करण्यास सांगितले म्हणून हे *लक्षात ठेवणे अतिशय महत्त्वाचे आहे.* तुमची सुटका होण्यासाठी आवश्यक ती पावले केव्हा कशी उचलावीत ते प्रथम देवाकडून प्रार्थनेद्वारे जाणून घ्या. मी जाब विचारला म्हणून तुम्हीही तुमचा छळ करणाऱ्याला लगेच जाब विचारू नका.

## *उदाहरण दुसरे*

काही काही वेळा लोक मंडळीमध्ये दुसऱ्या ख्रिस्ती लोकांकडून दुखावले जातात. विश्वासणाऱ्यांनी दुसऱ्या विश्वासणाऱ्यांना दुखवू नये असे केव्हा केव्हा आम्हांला वाटते आणि ते रास्तही आहे. पण परिस्थिती नेहमीच आदर्श, यथार्थ असते असे ाही. अगदी देवाच्या लोकांच्या जीवनामध्येही विपरीत घडते. आम्ही मंडळीमधील लोक परस्परांना दुखावतो, आणि त्यामुळे वेदना, क्लेश होतात हे सांगणे नकोच.

असे घडते तेव्हा अनेकदा अशी दुखावलेली व्यक्ती ज्यांनी दुखावले त्यांचा सहवास सोडते, त्यांच्याशी कसलेच संबंध ठेवीत नाहीत. वेदनेच्या दाराआड लपून राहून ही दुखावलेली व्यक्ती म्हणले, ''मी मंडळीमध्ये दुखावला गेलो, तेव्हा आता मी ङ्जमले तर) उपासनांसाठी जाईन. पण त्या लोकांशी इत:पर कसलाही संबंध ठेवणार नाही.'' ही देखील एका प्रकारची गुलामगिरीची आहे, कारण ही व्यक्ती भूतकाळाला स्वत:वर नियंत्रण ठेवू देते.

देव आम्हांला अशा ठिकाणी आणील की तेथे आम्ही लपलेल्या जागेवरून बाहेर पुढे आले पाहिजे. मग परत दुखावले गेलो तरी त्याची पर्वा करता कामा नये. आपण पुढे पाऊल टाकून बाहेर पडतो म्हणजेच आम्हांला बंधनात टाकणाऱ्या वेदनेच्या त्याच दरवाजातून पुन्हा मागे येणे.

## *उदाहरण तिसरे*

अधिकाराच्या - अधिकाऱ्यांच्या अधीन होणे, त्यांचे ऐकणे हे काही लोकांना फार अवघड जाते. मला तर ते फारच कठीण आणि यातनामय झाले. कारण माझ्या परिचयाच्या प्रत्येक अधिकारी-वडीलधाऱ्या व्यक्तीने मला छळले होते. माजा गैरफायदा घेतला होता. ''मी दुसऱ्यांचे का ऐकावे? मी काय करावे ते सांगणारे हे कोण मोठे आले आहेत?'' हीच माझी वृत्ती-प्रवृत्ती होती. आणि माझा कोणावरच विशेषत: पुरुषांवर अजिबात भरंवसा नव्हता.

पवित्र आत्म्याने मला बरे होण्याच्या पुढील टप्प्यावर नेले, तेव्हा मी माझ्या पतीचे ऐकणे, त्याच्या अधीन होणे आवश्यक झाले. आणि येथेच युद्धाला तोंड फुटले. माझ्या देहातील प्रत्येक कण न् कण बंड करून उठला आहे असा भयानक अनुभव मला आला. मला त्याच्या अधीन व्हायचे होते. ते शास्त्रलेखांना अनुसरून आहे हेही मी जाणून होते, पण अधीन होण्यातील यातना आणि वेदना एवढ्या तीव्र होत्या की त्यांचे काय करावे तेच मला उमजेना.

मला काय झाले आहे तेच मला समजले नाही. पण कोणाच्या तरी अधीन व्हायचे आणि ती व्यक्ती सांगेल तसे वागायचे माझे निर्णय त्यानेच घ्यायचे हे लक्षात आल्यावर पूर्वीची सर्व भयभीती आणि कटु आठवणी मनात उफाळून आल्या. दुसऱ्यांनी मला फसवले, माझा गैरफायदा घेतला ते सर्व आठवले. माझे वडीलच (अधिकारी व्यक्ती) मला सांगत असत की, त्यांनी माझ्यासंबंधी घेतलेले क्लेशकारक निर्णय, ती विपरीत कृत्ये माझ्या भल्यासाठीच आहेत. आणि ती कृत्ये करताना, मला छळताना स्वत:च स्वत:चा द्वेष करीत हे मी पाहिले होते आणि त्याच्या जोडीला मला सहन करण्यापलीकडे दुसरे काहीच करता येत नाही ही वैफल्याची भावना माझ्यामध्ये दृढ झाली होती. या सर्व गोष्टींमुळे अधीन होण्यात मला उत्सुकता नव्हती व इच्छा तर मुळीच नव्हती.

देवाच्या योजनेप्रमाणे संपूर्ण व्यक्ती आणि मुक्त होण्यासाठी मला माझ्या पतीच्या अधीन होणे आवश्यक होते. इतर अनेक ख्रिस्ती लोकांप्रमाणे मलाही वाटत होते की, पत्नी आणि मुले यांनी पतीच्या/पित्याच्या अधीन होणे आवश्यक असल्याचे शास्त्रलेख शिकवतात. पती/

पिता हाच कुटुंबप्रमुख आहे. कुटुंबासाठी देवाने केलेली योजना अशीच आहे. देवाच्या वचनामध्ये हे तत्त्व सांगितलेले आहे आणि म्हणून मी ते मान्य करून अधीन होणे अगर अमान्य करून प्रभूविरुद्ध बंडखोरी करणे याहून अन्य पर्याय माझ्यापुढे नाही ही माझी खातरी पटली होती. पण प्रत्यक्षात हे करणे अतिशय कठीण वेदनाकारक होते. पण आता मी मुक्त आहे आणि सात्विकपणे अधीन होणे यथार्थ, सुखकर, निर्धोक व सुरक्षित आहे हे मला समजते.

अधीनतेविषयी अनेक लोक गोंधळून जातात. अधीन होणे म्हणजे अधिकारी, वरिष्ठ सांगेल ते सर्व करणे. मग ते काहीही असो, निमूटपणे वागायचे. पण पवित्र शास्त्र सांगते, ''प्रभूमध्ये उचित आहे त्याप्रमाणेच अधीन असावे'' (कलस्सै.३:१८).

''वेदनेचे दरवाजे'' म्हणजे काय व त्यांना तोंड कसे द्यायचे हे या उदाहरणांच्या माध्यमातून तुम्हांला समजले असेल ही माझी खात्री आहे. दु:खवेदनेमध्ये प्रवेश या दृष्टीने यांच्याकडे पाहू नका. खरे तर ती बरे होण्याकडे नेणारी दारे आहेत. पूर्ण आरोग्य मिळण्याकडे तुम्ही या दरवाजातून जात असताना येशू नेहमी तुमच्याबरोबर असणार. तो तुम्हांला मार्गदर्शन करील आणि आवश्यक ती शक्तीही पुरवील.

लक्षात ठेवा. *खरेतर वेदना, दु:ख हाही बरे होण्याच्या प्रक्रियेचा* एक भाग आहे. एखादा माणूस पाय घसरून पडला, त्याच्या गुडघ्याला लागले, खरचटले तर नक्कीच त्याला वेदना होणार. दुसऱ्या दिवशी कदाचित वेदना अधिक वाढतील. लागले तेव्हापेक्षा दु:ख अधिक होईल, पण या वेळी त्या जखमेवर खपली धरलेली असेल. जखम बरी करण्याच्या प्रक्रियेत त्याच्या शरीराचा सहभाग आहे हेच त्या खपलीवरून स्पष्ट होते. पण आता त्या जखमेवर खपलीचे संरक्षक आवरण असले तरी वेदना, जळजळ होत राहते. तो दुखावलेला भाग बरा व्हावा म्हणून रक्तपुरवठा वाढलेला असतो हेच वेदना जळजळ यांचे कारण असते.

प्रथम जखम झाली तेव्हा वेदना झाल्याच, पण जखम बरी होताना केव्हा केव्हा अधिक तीव्र वेदना होतात. पण या दोन वेदना समान, सारख्या नाहीत. वेगवेगळ्या प्रकारच्या आहेत आणि त्याचा परिणामही वेगवेगळा होतो. काही लोकांच्या भावनिक जखमा बराच काळ दुर्लक्ष केल्याने चिघळललेल्या, दुषित झालेल्या असतात. या वेदना आणि बरे होतानाची वेदना यात फरक आहे. यातील एका वेदनेचे स्वागत करावे तर दुसरी टाळावी.

## वेदना नाही तर लाभही नाही

माझ्या वैयक्तिक अनुभवातून मी एक चांगला शहाणपणा शिकले : वेदनेला घाबरू नका! हे विधान चमत्कारिक वाटले तरी लक्षात ठेवा. बरे होण्याच्या वेदनेला तुम्ही जेवढा प्रतिकार कराल आणि भिऊन जाल तेवढा तुम्ही त्या वेदनेचा तुमच्यावरील प्रभाव वाढवता.

या सत्याचे एक उदाहरण कित्येक वर्षापूर्वी माझ्याच बाबतीत घडले. तेव्हा मी माझ्या आयुष्यात प्रथमच उपास केला. मी अठ्ठावीस दिवस केवळ फळांचा रस घ्यावा, इतर काही खाऊ नये असे देवाने मला सांगितले. आरंभी आरंभी हे फार फार कठीण गेले. मी भुकेने

व्याकूळ झाले. माझी उपासमार होऊन पोटात भुकेचा आगडोंब उसळला. असह्य वेदना होऊ लागल्या. मी जिवाच्या आकांताने देवाला सांगितले आता मला सहन होत नाही, माझी सहनशक्ती संपली. तेव्हा देवाने मला उत्तर दिले. माझ्या अंत:करणात अगदी खोलवरून ''शांत, मंद वाणी'' ऐकू आली (पहा १ राजे १९:१२). प्रभू माझ्याशी बोलला, ''वेदनांशी झगडू नको. वेदनेला तिचे काम करू दे.'' तेव्हापासून उपास करणे सोपे, सुलभ व आनंदमय झाले. कारण मला अस्वस्थ वाटले तेव्हा तेव्हा ते प्रगतीचे चिन्ह आहे हे माझ्या लक्षात आले होते.

वेदनेला जेवढा प्रतिकार कराल तेवढी ती अधिक वाढते, तीव्र होते हा नियमच आहे. गरोदर स्त्रीला वेणा येऊ लागतात, तिची प्रसूतीची वेळ येते तेव्हा परिचारिका, डॉक्टर तिला सांगतात ''अंग सैल सोड, वेणा येऊ देत,'' कारण तिने वेदना अडवण्याच प्रयत्न केला तर त्या दुपटीने वाढतील, शिवाय प्रसूतीही अधिक काळ लांबेल हे त्यांना माहीत असते.

तुम्ही अडचणीच्या कठीण काळातून जात असता तेव्हा वेदना दु:ख एवढे भयंकर तीव्र होते की, हे सोसणे आपल्या शक्तीपलीकडचे आहे असे वाटेल तेव्हा इब्री.१२:२ हे वचन पाहा, त्यावर मनन करा. ''आपण आपल्या विश्वासाचा उत्पादक व पूर्ण करणारा येशू ह्याच्याकडे पाहत असावे; जो आनंद त्याच्यापुढे होता त्याकरिता त्याने लज्जा तुच्छ मानून वधस्तंभ सहन केला, आणि तो देवाच्या राजासनाच्या उजवीकडे बसला आहे.'' येशू स्वत:च आम्हांला प्रथम विश्वास ठेवण्यास प्रोत्साहन देतो आणि तोच आमचा विश्वास परिपक्व आणि परिपूर्ण करतो. म्हणून आपण इतर सर्व व्यर्थ गोष्टींकडे नजर न वळवता केवळ येशूकडे पाहावे.

## सोसल्याने आनंद मिळतो

तुम्हांला दु:ख, वेदना, यातना होतील तेव्हा प्रतिकार करू नका. वेदनेला तिचा उद्देश पूर्ण करू द्या. हे अभिवचन लक्षात ठेवा : ''जे अश्रुपूर्ण नेत्रांनी पेरणी करितात ते हर्षाने कापणी करितील'' (स्तोत्र.११६:५). *जे सोसणे अगत्याचे आहे ते सहन करण्यास शिका, पलीकडील दुसऱ्या बाजूस आनंदीआनंद आहे हे लक्षात ठेवा.*

निकोप होण्यास वेदना सोसाव्या लागल्या तरी चिंता नको, त्यात तुमचे काहीच नुकसान नाही. आता तुम्हांला दु:ख, यातना होतच आहेत. तुम्ही तुमच्या दु:ख सोसण्याचे पूर्ण प्रतिफळ मिळवालच. गतकाळात तुमचा छळ झाला हे खरे, पण त्या छळाच्या बंधनात अडकून राहाल तर तुम्हांला कायमच दु:खात राहावे लागेल. बरे होण्याच्या प्रक्रियेत सोसाव्या लागणाऱ्या वेदनेचा सुपरिणाम होतो. दु:ख क्लेशातून आनंद निर्माण होतो.

तुमच्या वेदनांना तुम्हांला अधिक दु:खात नव्हे तर बंधनातून मुक्ततेकडे घेऊन जाऊ द्या. कठीण, अवघड असले तरी नेहमी योग्य व इष्ट तेच करा. देवाच्या आज्ञा पाळा. पवित्र आत्म्याच्या मार्गदर्शनाने चाला. ''रात्री विलापाने बिऱ्हाड केले तरी प्रात:काळी हर्षध्वनी होतो'' (स्तोत्र.३०:५) हे लक्षात ठेवा.

# 8

# ओलांडून पुढे जाणे हाच एकमेव सुटकेचा मार्ग

आमच्या एका सभेमध्ये एक स्त्री पुढे आली. तिच्या जीवनामध्ये काहीएक बंधन होते ते मोडावे, त्यातून सुटावे यासाठी प्रार्थना करा असे तिने सांगितले. मी तिच्यासाठी प्रार्थना करू लागले आणि ती लगेच रडू लागली. आणि लागलीच मला दृष्टान्तात दिसले की ती जणू धावण्याच्या शर्यतीत भाग घेऊन धावण्याच्या तयारीत उभी आहे. मी पाहत होते तो मला असे दिसले : शर्यत सुरू झाली की दर खेपेस ही स्त्री अखेरच्या टप्प्याकडे धावू लागे, पण अर्धेअधिक अंतर गेल्यावर ती मागे वळून पुन्हा आरंभ रेषेवर येऊन थांबत असे.

पुन्हा थोड्या वेळाने ती असेच करीत होती. थोडा वेळ धावायचे, मध्येच थांबून पुन्हा माघारी यायचे. पुन्हा पुन्हा असेच घडत होते. मी जे पाहिले ते तिला सांगितले आणि म्हटले, ‘‘मला वाटते देव तुला सांगतो आहे की, या खेपेस तू थांबू नको, मागे वळू नको, तर थेट शेवटपर्यंत पुढे जा.’’ माझे हे सांगणे तिला पटले. देव आपल्याशी बोलतो आहे हे तिने मान्य केले. भावनिक आरोग्य मिळण्याच्या दिशेने तिने थोडीशी प्रगती केली की काही तरी दडपणाखाली ती तो प्रयत्न सोडून देई आणि असे अनेकदा होत असे. हीच तिची समस्या होती. आता तिने ही प्रक्रिया शेवटी विजय मिळेपर्यंत चालू ठेवायची असा निश्चय केला.

*आरंभ करणे तुलनेने सोप असते, पण ते शेवटास नेणे कठीण असते* हा नेहमीचा अनुभव आहे. भावनिक आरोग्य मिळण्याचे कोणतेच ‘‘झटपट उपाय’’ नाहीत. २ करिंथ.३:१८ मध्ये प्रेषित पौलाने ‘‘ख्रिस्ती लोकांचे तेजस्वितेच्या परंपरेने रूपांतर होते’’ असे सांगितले आहे. भावनिक आरोग्य मिळवण्याच्या अवघड प्रक्रियेतून तुम्ही जात असाल तर सध्या तुम्हांला मिळणारे ‘‘तेजस्वितेचे’’ प्रमाण शांतपणे घेऊन पुढील टप्प्याकडे जात राहा हेच माझे तुम्हांला सांगणे आहे.

भावनिक आरोग्य मिळवणे, अगर छळणुकीतून सावरणे या साध्या सरळ प्रक्रियेचा अनेक लोक एवढा बाऊ करतात, हे काम एवढे भयंकर अवघड करतात की, ते स्वत:ला जराही स्वास्थ्य मिळू देत नाहीत. आता आपण किती पुढे आलो, अजून किती पुढे जायचे या गोष्टीवर लक्ष लावण्याचा मोह टाळावा हेच बरे. गतकाळापासून किती दूर पुढे आलो ते पाहा.

*आरोग्य प्राप्त होत असताना तुम्हांला नित्याचा जीवनक्रम चालवायचा आहे हे विसरू नका.* पुढील शब्दांनी व्यक्त केलेला दृष्टीकोन अंगी बाणवण्याचा प्रयत्न करा : ''मला जेथे असणे गरजेचे आहे तेथे मी नाही तरी पण मी जेथे होते तेथे आता नाही म्हणून मी देवाचे आभार मानते. माझे सर्व ठीक आहे! मी पुढे जात आहे!''

## पुढे जाणे - पूर्ण अनुभव घेणे

काही अंशी आध्यात्मिक वाढ शारीरिक वाढीसारखीच आहे. प्रौढ परिपक्व होण्यासाठी आपणाला काही अवस्थांतून पुढे जावे लागते. अनेक लोकांना त्यांची मुले लहानाची मोठी होत असताना कंटाळा येतो, ते आपली मुले वाढवतात पण त्यात आनंदाचा, उत्साहाचा भाग फारच कमी असतो असे म्हटले तर वावगे होणार नाही. मुलाच्या वाढीच्या प्रत्येक टप्प्यावर आईवडिलांना वाटते हे मूल वाढीच्या पुढच्या टप्प्यावर जाते तर फार बरे झाले असते. रांगते मूल चालते असते तर बरे असे त्यांना वाटते. मुलाने झटपट वाढावे, शाळा कॉलेजात जावे, शिकून मोठे व्हावे, उद्योग करून पैसे मिळवावे, लग्न करावे, आम्हांला नातवंडे द्यावी असे सतत त्यांना वाटते. थोडक्यात ''हे नको ते हवे'' ही माणसाची वृत्तीच याला कारण आहे.

जीवनात येणारा प्रत्येक टप्पा, प्रत्येक अवस्था आपण आनंदाने स्वीकारावी. कारण प्रत्येक टप्प्यावर त्याचे स्वत:चे असे ''हसू व आसू'' दोन्ही असतात. आजचा अनुभव वेगळा आणि उद्याचा वेगळा. ख्रिस्ती या नात्याने आपण आयुष्यभर सतत वाढत असतो. आपली प्रगती कधीच थांबलेली, खुंटलेली नसते. विजयाचा प्रत्येक नवा टप्पा गाठताना त्यासाठी परिश्रम करताना आनंद करायचा असे आताच ठामपणे ठरवा.

परमेश्वर तुमच्या शत्रूंना तुमच्यापुढून □हळूहळू□ घालवून देईल असे मोशेने इस्त्राएल लोकांना सांगितले (पहा अनुवाद ७:२२). जीवनात मिळणाऱ्या प्रत्येक विजयापूर्वी व नंतर प्रतीक्षेचा काळ असतो. या वेळात पवित्र आत्मा आमच्यामध्ये कार्य करतो, आम्हांला नवी प्रकटीकरणे दाखवतो, अधिक महान सत्ये स्वीकारण्यास व त्यांना सामोरे जाण्यास सहाय्य करतो. ही प्रतीक्षा आमच्यापैकी बहुतेकांना सामान्यपणे अवघड वाटते. कारण आमच्यामध्ये उतावळेपणा कायम ठाण मांडून बसलेला आहे. तो नेहमीच असंतोष उफाळून आणण्याची संधी साधतो. आम्हांला सर्व काही आताच्या आता हवे असते.

## धीर धरल्याने अभिवचनांचे फळ मिळते

आशीर्वाद सर्वांनाच हवे असतात, पण त्यासाठी पूर्वतयारी करण्याची त्यांची इच्छा नसते. बाप्तिस्मा करणारा योहान अरण्यात घोषणा करीत आला, ''परमेश्वराचा मार्ग सिद्ध करा, त्याच्या वाटा नीट करा'' (मत्तय.३:३). लोकांच्या जीवनामध्ये कार्य करण्यासाठी येशू येतो आहे हे लोकांना समजावे व त्यासाठी त्यांनी स्वत:ची तयारी करावी हेच त्याने या घोषणेतून जाहीर केले.

पवित्र शास्त्र सांगते : ''डोळ्याने जे पाहिले नाही, कानाने जे ऐकले नाही व माणसाच्या मनात जे आले नाही ते आपणांवर प्रीती करणाऱ्यांसाठी देवाने सिद्ध केले आहे'' (१ करिंथ.१२:९).

देवाने आमच्यासाठी काहीतरी चांगलेच नेमून ठेवले आहे अशा विश्वासाने अडचणींचे डोंगर पार करून जाण्यासाठी आध्यात्मिक परिपक्वतेची गरज आहे. पण पार जाणे, ओलांडून पलीकडे जाणे हाच सामान्यपणे सुटकेचा एकमेव मार्ग आहे हे आपण समजून घेतले पाहिजे. आमच्यासाठी देवाने जे अभिवचनाने नेमून ठेवले आहे त्या सर्वांचे अंतिम फळ मिळण्यासाठी, स्वीकारण्यासाठी आम्हांला विश्वासाने धीर धरून सहन करण्याचे अगत्य आहे. इब्री लोकांस पत्रामधील ही वचने नीट पाहा :

> म्हणून आपले धैर्य सोडू नका, त्याचे प्रतिफळ मोठे आहे. तुम्ही देवाच्या इच्छेप्रमाणे वागून वचनानुसार फलप्राप्ती करून घ्यावी, म्हणून तुम्हांला सहनशक्तीचे अगत्य आहे. कारण अगदी थोडा वेळ राहिला आहे; जो येणार आहे तो येईल उशीर करणार नाही (इब्री.१०:३५-३७).

इब्री.६:११ मध्ये आपण पाहतो : ''आमची अशी इच्छा आहे की, तुम्हांपैकी प्रत्येकाने आशेविषयीची पूर्ण खातरी करून घेण्याच्या हेतूने तशीच आस्था शेवटपर्यंत व्यक्त करावी.''

यशया ४३:१-२ या वचनांतून प्रभू परमेश्वराने आपल्या लोकांना बोध केला आहे :

> तरी आता हे याकोबा, तुझा उत्पन्नकर्ता आणि हे इस्राएला तुझा निर्माणकर्ता परमेश्वर असे म्हणतो, भिऊ नको; कारण मी तुला सोडविले आहे; मी तुला तुझ्या नावाने हाक मारिली आहे; तू माझा आहेस. तू जलातून चालशील तेव्हा मी तुजबरोबर असेन; *नद्यांतून* जाशील तेव्हा त्या तुला बुडविणार नाहीत; *अग्नीतून* चालशील तेव्हा तू भाजणार नाहीस; ज्वाला तुला पोळणार नाहीत (तिरपा टाईप माझा).

दावीद परमेश्वराला म्हणाला, ''मृत्युच्छायेच्या दरीतूनही मी जात असलो तरी कसल्याही अरिष्टाला भिणार नाही. कारण तू माझ्याबरोबर आहेस, तुझी आकडी व तुझी काठी मला धीर देतात'' (स्तोत्र.२३:४).

अनेकदा छळाला बळी पडलेली व्यक्ती त्या प्रभावाने एवढी हैराण झालेली असते की, तिने आपल्या मनात आणि देहात काही भक्कम अडथळे उभारलेले असतात. हे अडथळे उलथून जमीनदोस्त, नामशेष करायचे तर त्यांना मृत्यच्छायेच्या दरीतून नेणे आवश्यक आहे.

पौलाने स्पष्टपणे म्हटले आहे : शत्रूबरोबर लढत असताना ख्रिस्ताच्या सांगण्याला अनुरूप नसतील असे आमचे विचार आम्ही पकडून ते देवाच्या वचनाच्या स्वाधीन करतो आणि वचनानुसार वागतो, चालतो.

> कारण आम्ही देहात चालणारे असूनही आम्ही देहस्वभावाप्रमाणे युद्ध करीत नसतो, कारण आमच्या युद्धाची शस्त्रे दैहिक नाहीत, तर तटबंदी जमीनदोस्त करण्याक ती देवाच्या दृष्टीने समर्थ आहेत. तर्कवितर्क व देवविषयक ज्ञानाविरुद्ध उंच उभारलेले असे सर्व काही पाडून आम्ही प्रत्येक कल्पना अंकित करून तिला ख्रिस्तापुढे मान वाकविण्यास लावतो.
>
> (२ करिंथ.१०:३-५)

माझेच उदाहरण पाहा. पुष्कळ काळ मी छळ सोसला होता. सततच्या छळणुकीने माझे व्यक्तित्व स्वतंत्र वृत्तीचे झाले होते. माझा कोणावरही विश्वास उरला नव्हता. माझ्या जीवनात आरंभीच मी समजून चुकले की मी स्वत:च स्वत:ची काळजी घेतली आणि कधीच कोणाकाही काहीही मागितले नाही तर माझे विशेष नुकसान होणार नाही. माझी स्वतंत्र वृत्तीप्रवृत्ती शास्त्रलेखांना धरून नाही, हे प्रभूने मला दाखवले, तेव्हा मला मृत्युच्छायेच्या दरीतून जावे लागले. म्हणजेच माझा तो जुना स्वभाव (जुन्या जॉइसचा भाग) वधस्तंभावर खिळून मारणे अगत्याचे होते.

आमच्या समस्यांपासून तोंड फिरवून निघून पळून जाणे असा जबर मोह होतो, पण आम्ही त्यातून पार पुढे गेले पाहिजे असे प्रभू सांगतो. पण आम्हांला यातून एकट्याने जावे लागणार नाही असे त्याचे अभिवचन आहे. हीच चांगली बातमी आहे. आमचे सर्व प्रकारे सहाय्य करण्यासाठी तो नेहमी आमच्याबरोबर तेथे असेलच. त्याने आम्हांला सांगितले आहे, ''भिऊ नको, कारण मी तुझ्याबरोबर आहे.''

एकंदर सर्व गोष्टींत प्रभूबरोबर पुढे जात राहिले की त्याच्यावरील आमचा विश्वास दृढ होतो. दानीएल अध्याय ३ मधील शद्रख, मेशख व अबेदनगो यांचा वृत्तान्त मला फार प्रिय आहे. राजाने त्यांना निक्षून सांगितले होते की डोकी लववून त्याला नमन करावे; तसे न केल्यास तो त्यांना तापलेल्या अग्नीच्या भट्टीत टाकणार होता.

ते म्हणाले, ''देवाला आमची सुटका करण्याचे सामर्थ्य आहे. तो सुटका करीलच, पण त्याने आमची सुटका केली नाही तरीही आम्ही तुमच्यापुढे दंडवत घालणार नाही, तुम्हांला नमन करणार नाही.'' देव आपली सुटका करण्यास समर्थ आहे हे त्यांना पक्के माहीत होते, पण तशी त्याची योजना नसली तरीही ते परमेश्वरासमोर आपले खरेपण, सचोटी सोडणार

नव्हते. त्याची सेवा करीत राहणार होते. आपण सर्वांनी याच निर्धाराने देवाच्या सेवेसाठी स्वत:ला बांधून घेतले पाहिजे.

मग त्या तिघा तरुणांना धगधगत्या अग्नीच्या भट्टीत टाकले. राजाने ती भट्टी नेहमीपेक्षा सात पटीने अधिक तापवण्याची आज्ञा दिली. येथे आपण योग्य निर्णय घेतो तरी पण आमच्या अडचणी अधिक वाढतात अशा प्रसंगांची मला आठवण येते.

हा वृत्तान्त मला आवडतो कारण येथे असे सांगितले आहे : शद्रख, मेशख व अबेद्नगो ह्यांना बांधून अग्नीमध्ये टाकण्यात आले. पण मग राजाने भट्टीत डोकावून पाहिले ते मोकळे होते, बंधनात नव्हते. केव्हा केव्हा आम्हीही समस्या येतात तेव्हा असेच बंधनात असतो, पण त्याच समस्येमध्ये एकंदरीत सर्व गोष्टींना तोंड देताना आमची बंधने तुटतात आणि सुटका होते. त्यांच्याबरोबर अग्नीमध्ये आणखी एक चौथा पुरुष आहे असे राजाने पाहिले. येशूने सांगितले ते विसरू नका, ‘‘भिऊ नको, कारण मी तुमच्याबरोबर आहे.’’

शद्रख, मेशख, व अबेदनगो ह्यांना भट्टीतून बाहेर आणले तेव्हा ते पूर्ववत होते, त्यांच्या कपड्यांना, अंगाला जळल्याचा, धुराचा वासही येत नव्हता. या तिघांशी माझेही नाते आहे. कारण सैतानाने माझाही नाश करण्याचा घाट घातला आहे. माझ्या जीवनात छळ झाला त्यामुळे मला अपार असह्य यातना झाल्या. पण मी त्यातून सुटण्याचा प्रयत्न केला तेव्हा माझ्या वेदना अधिकच वाढल्या. त्याचे कारण मला काही केल्या समजेना. मग आम्हांला बंधनात टाकणाऱ्या गोष्टीतून घटनाप्रसंगांतून आम्ही कसे जातो आणि त्यातून सुटण्यासाठी माघारी पूर्वपदावर येण्यासाठी त्याच गोष्टींतून कसे यावे लागते ते देवाने मला दाखवले.

आम्ही निकोप निरोगी होण्याच्या दिशेने प्रभूसमवेत आपली वाटचाल सुरू करतो तेव्हा सामान्यपणे आम्ही आतल्या आत भीतीने गारठून, गळाठून गेलेले असतो. भय हा भरंवशाचा शत्रू आहे. लोकांना अनेक गोष्टींचे भय वाटते. मोटार चालवणे, पोहणे, एकटे राहणे आणि उगाचच सतावणारे अनेक प्रकारचे तीव्र भय वगैरे.

भय म्हणजे खरा वाटणारा खोटा प्रमाणपुरावा असे मला वाटते. सैतान आम्हांला भीती घालीत असेल, आणि आम्ही त्याला घाबरत असू तर आपण देव काय सांगतो त्यापेक्षा सैतान सांगतो त्यावर अधिक विश्वास ठेवतो हाच त्याचा अर्थ आहे. भय वाटणे साहजिक आहे, पण लक्षात ठेवा, आपण स्थिर उभे राहिलो नाही, आमच्या भयभीतीचा सामना केला नाही तर भय आमच्या मानगुटीवर बसणारच यात संशय नाही.

एक स्त्री आपल्या मैत्रिणीला सांगत होती : ‘‘मला काही गोष्टी अगत्याने करायच्या आहेत, पण त्या करण्याचे मला भय वाटते.’’ त्यावर तिची मैत्रीण म्हणाली, ‘‘त्यात काय मोठंसं! जे करायचं आहे ते भीत भीत करून मोकळी हो!’’ हा बोध माझं जीवन पालटणारा ठरला. कधी कधी आपल्यालाही आमच्या भयांना तोंड द्यावे लागते आणि करायचे ते भीत भीत करावे लागते.’’

देवाला आम्ही वाव देतो, कार्य करण्यास मोकळीक देतो तेव्हा एखा वेळी एक याप्रमाणे भीतीच्या गाठी सोडवून आमची जीवने नीट सरळ करतो. कठीण गोष्टींतून पार पडण्यासाठी तो आम्हांला सहाय्य करतो. त्याची अभिवचने खरी आहेत हे आम्हांला प्रत्यक्ष अनुभवाने समजते. जे दिसते, ज्याीच भीती वाटते त्यापासून सतत पळत राहण्याने आमच्या जीवनाला काहीच अर्थ उरणार नाही.

काही लोकांना लिफ्टची एवढी भीती वाटते की, ते वरच्या मजल्यावर असलेले काम करण्याचे नाकारतात. तशी एखादी नोकरी आली तर ते साफ नाही म्हणतात. पण अशा लोकांना अशी नोकरी करायची असेल तर त्यांनी लिफ्टजवळ जावे, प्रार्थना करावी आणि लिफ्टमधून काही मजले वर जावे, बाहेर येऊन श्वास घ्यावा आणि आपले भय नाहीसे होईपर्यंत पुन्हापुन्हा हेच करावे. आपण आपल्या भयावर मात केलीच पाहिजे. आमच्या जीवनासाठी असलेली देवाची परिपूर्ण इच्छा पूर्ण करायची तर भीती बाळगून चालणार नाही.

पवित्र शास्त्रामध्ये ''भिऊ नको'' असे ठिकठिकाणी पुन्हा पुन्हा सांगितले आहे. कारण सैतान देवाच्या लोकांना भीती दाखवून देवाच्या इच्छेनुसार त्यांना चालू देणार नाही हे देवाला माहीत होते.

येशूने आपल्या काही पहिल्या शिष्यांना म्हटले, ''मी मार्ग आहे, माझ्यामागे या.'' येशूच्या मागे चालारे असा निश्चय कराल तेव्हा तुम्हांला समजेल की, तो भयाने कधीही मागे फिरत नाही. त्याचा मार्ग अखेरपर्यंत अगदी सरळ असतो. माझ्याकडे प्रार्थनेसाठी आलेल्या त्या स्त्रीसारखे होऊ नका. ती नेहमीच सर्वत्र अर्ध्यावर सोडून माघारी फिरत असे. कितीही कठीण असले तरी शर्यतीत अखेरपर्यंत टिकून राहा.

# 9

# गतकाळाचे ओझे फेकून द्या

तुमचा भूतकाळ विसरा. त्याचे अवजड ओझे फेकून द्या असे मी लोकांना आवर्जून सांगते. पण भूतकाळापासून पळा, दूर जा असे काहीही सांगत नाही. आमच्या गतकाळातील व्यथा आणि वेदना यांवर विजय मिळवण्याचा एकच एक मार्ग आहे. यातनावेदनांच्या दारातून देवाच्या साहाय्याने मागे जाणे व विजयी होणे हाच तो मार्ग आहे. त्यासाठी सर्व सूत्रे देवाकडे सोपवली पाहिजेत. आमच्यासाठी दुसरा कोणी विजय मिळवणार नाही. आमचे तारण आम्हांलाच साधून घेतले पाहिजे. पौलाने फिलिप्पै येथील मंडळीला लिहिलेल्या पत्रात हे उलगडून स्पष्ट केले आहे. तो सांगतो :

> म्हणून माझ्या प्रियजनहो, जे तुम्ही सर्वदा आज्ञापालन करीत आला आहा, ते तुम्ही मी जवळ असता केवळ नव्हे तर विशेषेकरून आता मी जवळ नसतानाही भीत व कापत आपले तारण साधून घ्या. [तुमचे हे ध्येय साधण्यास अथकपणे झटा. स्वत:वर भरंवसा ठेवू नका. पूर्ण सावध राहून शुद्ध विवेकभावाने, मोहापासून जागृत राहून, देवाला न आवडणाऱ्या आणि ख्रिस्ताच्या नावाला काळिमा लावणाऱ्या प्रत्येक गोष्टीपासून स्वत:ला जपा.]
>
> [हे तुमच्या स्वत:च्या ताकदीने होणार नाही.] कारण इच्छा करणे व कृती करणे ही तुमच्याठायी आपल्या संकल्पासाठी साधून देणारा तो देव आहे (फिलिप्पै.२:१२,१३, विस्तारीत).

आपण स्वत:ला सर्व परिस्थितीतून नेण्यास देवाला वाव दिला पाहिजे. त्याला आमच्यामध्ये कार्य करण्यास पूर्ण मोकळीक देणे जरुरीचे आहे. आमच्यामधील गोंधळ

नाहीसा व्हावा, आमची साक्ष स्पष्ट, प्रभावी व्हावी यासाठी हे आवश्यक आहे. गतकाळात आम्ही सोसलेला छळ, अडचणी वगैरे सर्व आमच्या भविष्यकाळात देवाचे आशीर्वाद लाभावेत यासाठी आम्हांला तयार करतात.

येशूला देखील त्याच्या भावी काळाविषयी काही वेळ प्रशिक्षण घ्यावे लागले. इब्री.५:८-९ मध्ये सांगितले आहे : ''तो पुत्र असूनही त्याने जे दु:ख सोसले तेणेकरून तो आज्ञाधारकपणा शिकला; आणि परिपूर्ण केला जाऊन तो आपल्या आज्ञेत राहणाऱ्या सर्वांचा युगानुयुगीच्या तारणाचा कर्ता झाला.

येशूच्या जीवनातील एका कालखंडाविषयी आपणाला काहीही सांगितलेले नाही. या काळात त्याची स्थिती काय कशी होती, काय घडत होते ते नोंदलेले नाही. या काळात तो लहानाचा मोठा झाला, त्याची वाढ होत होती हे आम्हांला माहीत आहे. आमच्याही जीवनात असा वाढीचा काळ येतो. पण त्या संबंधात दुसऱ्या कोणाला काही सांगणेसवरणे आम्हांला शक्य नसते. हा वाढीचा पूर्णपणे वैयक्तिक, खासगी काळ असतो. त्यातला बरेवाईटपणा आमचा आम्हांला सहन करावा लागतो. आमच्या शरीरात, अंतरंगात काही गोष्टी घडत असतात. त्या आम्हांला समजत नाहीत. पण अखेर देवाच्या इच्छेनुसार त्याने नेमून दिलेल्या ठिकाणी आम्ही येतो, पोचतो तेव्हा आमच्या लक्षात येते की, देव याचसाठी दीर्घकाळापासून आम्हांला तयार करीत होता.

मला एका जोडप्याचा अनुभव आठवतो. तो खूप रोचक आहे. एके दिवशी ही दोघेजणे एका पुरातन वस्तूभांडारात गेली. तेथे त्यांना एका कपाटात एक सुंदर चहाचा कप दिसला. त्यांनी तो हातात घेऊन निरखून पाहिला व म्हटले, 'वा, किती छान कप! आपण हा विकत घेऊ या!''

एवढ्यात अचानक तो कप बोलू लागला, ''मी काही नेहमी पूर्वीपासून एवढा सुंदर नव्हतो. एका काळी मी एक कठीण, बेढब, रंगहीन असा मातीचा गोळा होतो. एक दिवस माझ्या धन्याने मला पाहिले, उचलले आणि म्हटले, ''या मातीच्या गोळ्यातून काहीतरी तयार करता येईल. मग तने मला चेपचले, लाटून सपाट केले, माझा आकारच बदलून टाकला.

''मी म्हटले, 'अहो, हे काय चालवलंय? मला फार यातना होतायत. मला असा विचित्र आकार नका देऊ. मला तो नाही आवडत. हे बस् करा, थांबवा! मला सोडवा!' तरी पण तो म्हणाला, 'अजून नाही.'

त्याने मला कपाचा आकार दिला आणि तापवलेल्या भट्टीत ठेवले. मी पुन्हा जिवाच्या आकांताने ओरडलो, 'मला जाऊ द्या, इथं भयंकर गरम आहे. गुदमरून माझा जीव चाललायं.' पण त्याने भट्टीच्या काचेतून माझ्याकडे नुसते पाहिले व हसून म्हटले, 'नाही, अजून नाही.'

मग त्याने मला बाहेर काढले तेव्हा मला वाटले, झाले, संपले. आता हा आणखी काही करणार नाही. मी सुटलो. पण सुटलो कुठचा? त्याने मला पुन्हा उचलले आणि तो मला रंगवू

लागला आणि रंगवल्यावर त्याने मला पुन्हा त्या भट्टीत ठेवले. त्याने असे का केले ते मला मुळीच कळले नाही. मी पुन्हा बोललो, 'पुरे झाले. आता मला बाहेर काढा.' तरीही तो म्हणाला, 'नाही, अजून नाही.'

शेवटी त्याने मला बाहेर काढून येथे या कपाटात ठेवले. मला वाटले तो मला विसरला. पण एक दिवस तो आला. त्याने मला आरशासमोर धरले. पाहिले तर मी एक सुंदर चहाचा कप झालो होतो. माझा माझ्या डोळ्यांवर विश्वास बसेना. मला पाहणारा प्रत्येकजण मला विकत घेण्याची इच्छा करतो.''

## कुंभाराच्या हाती स्वतःला सोपवा

देवाने आमच्या जीवनासाठी अद्भुत योजना केली आहे. केव्हा केव्हा तो एकंदर परिस्थिती एवढ्या झपाट्याने बदलतो की आम्ही चक्रावून जातो. दिशाहीन झाल्यासारखे वाटते. आम्ही जणू काही कुंभाराच्या चाकावरील मातीच्या गोळ्यासारखे आहोत असे वाटते. काही समजत नाही, उमजत नाही. परंतु तो जे काही करतो ते आमच्या हितासाठीच आहे, हा विश्वास आम्ही सोडता कामा नये (पहा रोम.८:२८). आपण त्याच्या प्रवाहाबरोबर जात राहावे आणि त्याला आमच्यामधून काही सुंदर आकारास आणू द्यावे ही प्रक्रिया लक्षात घेऊनच यशयाने लिहिले आहे : ''तू आपले मुख आम्हांपासून लपविले आहे... तर आता हे परमेश्वरा, तू आमचा पिता आहेस, आम्ही माती आहो, तू आमचा कुंभार आहेस; आम्ही सर्व तुझ्या हातची कृती आहो'' (यशया ६४:७-८).

विजयी ख्रिस्ती जीवन जगण्यासाठी आम्ही भूतकाळ सोडून देण्यास तयार असावे, 'स्व'त्वाला, 'अहं'पणाला मरावे, आमचा छळ करणाऱ्यांना क्षमा करावी आणि स्वत:ला देवाकडे सोपवावे. त्याने आमच्यासाठी तयार केलेल्या ठिकाणी तो आम्हांनला नेईल, आम्हांला आशीर्वाद देईल, हे त्याचे अभिवचन आहे. आमच्या जीवनात आम्हांला हवे ते बदल आमच्या मनाप्रमाणे घडून येतील असे वचन कोणीच कोणाला देऊ शकत नाही. काही गोष्टी आमच्या मनाप्रमाणे कधीच बदलणार नाहीत, पण देव आमचा पालट अशा प्रकारे करील की, आम्ही कसलीही चिंता करणार नाही.

आमचे सांत्वन, समाधान सर्व ख्रिस्तामध्येच असले पाहिजे. दुसरे लोक आमच्याविषयी काय बोलतात, कसला विचार करतात अगर लोकांनी पूर्वी आम्हांला काय केले, कसा त्रास दिला ते सर्व आपण विसरणे जरुरीचे आहे. देव आमच्यामध्ये, आमच्यासह आणि आमच्यासाठी आता काय करणार हेच महत्त्वाचे आहे. पौलाने लिहिले आहे : ''कारण आपण त्याच्याठायी जगतो, वागतो आणि आहो'' (प्रे.कृ.१७:२८).

भूतकाळ मागे टाकणे, विसरणे म्हणजे एका नव्या प्रकारे भविष्यकाळाकडे पाहणे, ज्यांना भूतकाळ विसरायचा, सोडून द्यायचा आहे, त्यांना म्हणजेच आम्हांला पौलाने हा बोध केला आहे : ''मी ख्रिस्ताबरोबर (ख्रिस्तामध्ये) मी त्याच्या वधस्तंभामध्ये सहभागी आहे)

वधस्तंभावर खिळलेला आहे आणि ह्यापुढे मी जगतो असे नाही, तर ख्रिस्त (मशीहा) माझ्याठायी जगतो; आणि आता देहामध्ये जे माझे जीवित आहे ते देवाच्या पुत्रावरील विश्वासाच्या योगाने आहे, त्याने माझ्यावर प्रीती केली व स्वत:ला माझ्याकरिता दिले'' (गलती. २:२०).

आम्ही देवाच्या इच्छेमध्ये आहोत यातच संतुष्ट, समाधानी राहण्यास शिकले पाहिजे. आम्ही ख्रिस्तामध्ये आता कोण आहोत यावरच अधिक लक्ष लावले की मग आम्ही पूर्वीप्रमाणेकोण होतो, तेव्हा आम्हांला काय झाले वगैरे गोष्टी कवडीमोल ठरतात. पौलाने म्हटले आहे, ''इतकेच नाही तर ख्रिस्त येशू माझा प्रभू ह्याच्याविषयीच्या ज्ञानाच्या श्रेष्ठत्वामुळे मी सर्व काही हानी असे समजतो; त्याच्यामुळे मी सर्व गोष्टींना मुकलो, आणि त्या केरकचरा अशा लेखतो. ह्यासाठी की मला ख्रिस्त हा लाभ प्राप्त व्हावा'' (फिलिप्पै. ३:८).

पुढे त्याने म्हटले आहे : ''माझा पक्का निर्धार आहे की, मी त्याला अधिक चांगल्या प्रकारे ओळखावे, दिवसेंदिवस माझा त्याचा परिचय अधिक निकटचा जिव्हाळ्याचा व्हावा, त्याचे अद्‌भुत व्यक्तित्व त्याचे गुण मला अधिक स्पष्टपणे समजावे आणि तो व त्याच्या पुनरुत्थानाचे सामर्थ्य व त्याच्या दु:खाची सहभागिता ह्यांची, त्याच्या मरणाला अनुरूप होऊन मी ओळख करून घ्यावी, म्हणजे कसेही करून मी मृतांमधून पुनरुत्थान मिळवावे'' (फिलिप्पै. ३:१०-१२).

देवामध्ये काही गूढ रहस्ये आहेत त्यांचा आपण शोध घेतला पाहिजे, आणि आमच्यामध्येही काही खोल रिकाम्या जागा आहेत त्या केवळ देवालाच भरता येतात. देवाचे पुनरुत्थानाचे सामर्थ्य आम्ही समजून घेतले पाहिजे. हे सामर्थ्य आम्ही देहामध्ये जगत असताना आम्हांला मृतांमधून वर उंचावण्यास पुरेसे आहे. आकाशात भरारी मारणारा गरुड पक्षी वातावरणातील हवेच्या प्रवाहावर आले पंख विसावतो आणि आपोआप ढगांच्याही वर उचलला जातो, तसे ख्रिस्त आम्हांला आमच्या जीवनातील वादळवाऱ्यांच्या वर उचलील.

परिपूर्णतेप्रत जाण्याचे आमचे ध्येय असेल. परंतु येशू पुन्हा परत येईपर्यंत आम्ही त्या स्थितीप्रत पोचणार नाही. दरम्यानच्या काळात आपण स्वत:चा स्वीकार करावा, स्वत:वर प्रेम करावे, आणि आनंदाने ही वाटचाल करावी, कारण सदासर्वकाळ देव आमच्या भवितव्याला आकार देत आहो हे आम्हांला माहीत आहे.

## जे पुढे आहे त्याकडे नेटाने चाला

पौलाने पुढे लिहिले आहे :

''एवढ्यातच मी मिळविले, किंवा एवढ्यातच मी पूर्ण झालो आहे असे नाही, तर ज्यासाठी ख्रिस्त येशूने मला आपल्या कह्यात घेतले ते मी आपल्या कह्यात घ्यावे म्हणून मी त्याच्या

> मागे लागतो आहे. बंधूंनो, मी अद्यापि ते आपल्या कह्यात घेतले असे मानीत नाही; *तर मागील गोष्टींकडे दुर्लक्ष करून व पुढील गोष्टींकडे लक्ष लावून,* ख्रिस्त येशूच्या ठायी देवाचे जे वरील पाचारण त्यासंबंधीचे बक्षिस मिळवण्यासाठी मर्यादेवरील खुणेकडे मी *धावतो,* हेच एक माझे काम'' (फिलिप्पै.३:१२-१४).

तुमच्या गतआयुष्यात, भूतकाळात घडलेल्या गोष्टींमुळे तुम्ही कष्टी, खिन्न झाला असाल तर मी केले तेच तुम्ही करा आणि आपला मोहरा एका नव्या दिशेकडे वळवा हेच माझे आग्रहाचे सांगणे आहे. देवाची इच्छा काय आहे, तो तुम्हांला काय होण्यास सांगतो आहे ते पाहा तसे होण्याचा निश्चय करा. तुम्हांला जे मिळावे असे देवाला वाटते ते मिळवण्याचा आणि तुम्हांला जे देण्यासाठी येशू मरण पावला. ते स्वीकारण्याचा निर्धार करा.

या प्रकारे बदल करून घेण्यास तुमची तयारी, निश्चय झाला की असे म्हणा : ''आता येथून पुढे मी गुलामगिरीत राहणार नाही. मी एखाद्या पेटाऱ्यात राहावे तसा राहणार नाही. माझी तुलना दुसऱ्यांबरोबर करून ते सांगतील तसा वागणार नाही, होणार नाही. गतकाळात माझ्या हातून जे घडले ते घडले त्याबद्दल मला आता काही करणे शक्य नाही, पण माझ्या भावी काळाच्या संबंधात मला काही करणे शक्य आहे. आता मी माझे जीवन आनंदाने जगणार, मला जे मिळावे म्हणून येशू मरण पावला ते मी स्वीकारणार, मी भूतकाळ टाकणार, सोडणार आणि आजपासून पुढे सतत देवाच्या मागे चालत राहणार.''

भूतकाळाचा त्याग करण्यासाठी परिपक्वतेची गरज आहे, पण परिपक्व, प्रौढ ख्रिस्ती माणसालाच देवाचे आशीर्वाद पूर्णपणे मिळतात. पूर्वीचे अपयश, जुन्या निराशा, खेद, खंत, दररोज नव्या दयेचे नवे आशीर्वाद देऊ करतो, त्यांचा मागोव घ्या. कारण तुम्ही देवाचा पुत्र येशू ख्रिस्त याच्यावर तारणासाठी विश्वास ठेवला तेव्हा त्याने तुमच्याशी तसा करार केला आहे.

दावीद राजाने शौलाचा मुलगा योनाथान याच्याशी आणभाक करून कराराचे नाते जोडले होते, म्हणूनच पुढे गादीवर बसल्यावर त्याने शौल राजाच्या नातेवाइकांचा, वंशजांचा शोध केला. २ शमुवेल अ.९ मध्ये हा वृत्तान्त आहे. दाविदाला योनाथानचा अपंग मुलगा मफीबोशेथ सापडला. मग दाविदाने त्याला राजवाड्यात आणून स्वत:ज्वळ ठेवले; त्याच्या सर्व गरजा पुरवल्या. या प्रकारे राजाश्रय मिळण्यास मफीबोशेथ जराही पात्र नव्हता, त्याने असा काही पराक्रमही केला नव्हता. परंतु दाविदाबरोबर ज्याने करार केला होता, त्याच्याशी त्याचे नाते होते.

देव आमची काळजी का घेतो याचे हे एक रूपकचित्र आहे. तो आम्हांला आशीर्वाद देतो, कारण विश्वासणारे या नात्याने आमचे त्याच्या पुत्राबरोबर नाते जुळलेले आहे. आशीर्वाद मिळण्याची आमची पात्रता नाही, लायकी नाही. त्याचे आशीर्वाद आम्हांला संपादन करता येत नाहीत. आमच्या भूतकाळातील काही घटनांमुळे आम्ही भावनिक दृष्टीने अपंग, अधू

झालेले असू. परंतु देव आम्हांला उचलून घेतो आणि त्याच्या शांतीच्या राज्यामध्ये आमच्या हक्काच्या योग्य ठिकाणी आम्हांला बसवतो.

आम्ही सर्व योग्य त्या गोष्टी कराव्या आणि मग आम्हांला आशीर्वाद द्यावे असे देव कधीच करीत नाही. खरे तर ''मला सहाय्य कर'' एवढी प्रार्थना पुरेशी दिव्य, अद्‌भुत आहे. अशी दुसरी विनंती नाही. देवापासून वेगळे राहून आम्ही कधीच परिपूर्णतेप्रत पोचणार नाही. त्याने आपली अभिवचने आमच्या जीवनात सफल, संपूर्ण करावी यासाठी आम्ही सर्वस्वी त्याच्यावर अवलंबून, विसंबून राहणे अगत्याचे आहे. आम्हांला ''विश्वासणारे'' होण्यास पाचारण केले आहे. नपेक्षा आम्ही ''मिळवणारे, साध्य करणारे'' झालो असतो.

शिष्यांनी येशूला विचारले, ''...देवाची कामे आमच्या हातून व्हावी म्हणून आम्ही काय करावे?'' [देवाची इच्छा अपेक्षा पूर्ण होण्यासाठी आम्ही काय केले पाहिजे?''] (योहान.६:२९).

येशूने त्यांना उत्तर दिले, ''देवाचे काम हेच आहे की, *ज्याला त्याने पाठविले त्याच्यावर तुम्ही विश्वास ठेवावा''* (योहान.६:२९).

स्तोत्र.५१:१-१२ या वचनांतील ही प्रभावी प्रार्थना आपणही करावी :

हे देवा, तू आपल्या वात्सल्याला अनुसरून माझ्यावर कृपा कर; तू आपल्या विपुल करुणेला अनुसरून माझे अपराध काढून (पुसून) टाक.

मला धुऊन माझा दोष पूर्णपणे काढून टाक. माझे पाप दूर करून मला निर्मळ कर.

कारण मी आपले अपराध जाणून आहे, माझे पाप माझ्यापुढे नित्य आहे.

तुझ्याविरुद्ध, तुझ्याविरुद्धच मी पाप केले आहे, तुझ्या दृष्टीने जे वाईट ते मी केले आहे. म्हणून तू बोलशील तेव्हा न्यायी ठरशील व निवाडा करशील तेव्हा नि:स्पृह ठरशील.

पाहा, मी जन्माचा पापी आहे; माझ्या आईने गर्भधारण केले तेव्हाचाच मी पातकी आहे (आणि तीही पातकी आहे.)

पाहा, अंतर्यामीची सत्यता तुला आवडते; तू माझ्या अंतर्यामाला ज्ञानाची ओळख करून दे.

एजोबाने माझा पापमल काढ, म्हणजे मी निर्मल होईन. मला धू म्हणजे मी बर्फाहून शुभ्र होईन.

आनंदाचे व हर्षाचे शब्द माझ्या कानी पडू दे, म्हणजे तू मोडिलेली माझी हाडे उल्लासतील.

माझ्या पापापासून तू आपले तोंड फिरीव, माझे सर्व अपराध काढून टाक.

हे देवा, माझ्या ठायी शुद्ध हृदय उत्पन्न कर; माझ्याठायी स्थिर असा आत्मा पुन्हा घाल.

तू मला आपल्यापुढून घालवून देऊ नको, आणि आपला पवित्र आत्मा माझ्यामधून काढून घेऊ नको.

तू केलेल्या उद्धाराचा आनंद मला पुन्हा होऊ दे आणि उत्सुकतेच्या आत्म्याने मला सावरून धर.

आपण देवाला सरळ विनंती केली तर तो आमच्या पूर्वीच्या चुकांच्या यातनांपासून आमची सुटका करील आणि आमच्यामध्ये सुस्थिर आत्मा पुन्हा घालील. देवाकडून सुटका करून घेण्यासाठी आम्हांला काहीही करावे लागत नाही, तरी पण आम्ही आमच्या समस्यांपासून पळ काढला, आम्हांला त्यातून बाहेर काढण्यासाठी वाव दिला नाह तर आम्ही त्याच्या आशीर्वादांना मुकणार यात शंकाच नाही.

देवाने नेमलेली वेळ मोशेने चुकवली. आपले प्रश्न सोडवण्यासाठी सोपा मार्ग धरावा म्हणून त्याने एका मिसरी माणसाला ठार मारले. हा प्रकार पाहणारा एक साक्षीदार होता, म्हणून लपून राहण्यासाठी त्याला रानावनात आसरा घ्यावा लागला. देवाने मोशेला पाचारण केले, वचनदत्त भूमीकडे पुढे जाण्यास सांगितले त्यापूर्वी त्याने मोशेला पुन्हा मिसर येथे जाण्यास सांगितले (पहा निर्गम ३:१-१०). देवाने म्हटले, ''मिसर देशातल्या माझ्या लोकांची विपत्ती मी खरोखर ऐकली आहे आणि त्यांना सोडवून घेण्यासाठी मी उतरलो आहे, तर आता चल, मी तुला मिसर देशाला पाठवतो'' (प्रे.कृ.७:३४).

ज्यांनी मोशेला नाकारले व झिडकारले होते त्याच लोकांकडे देव त्याला पाठवीत होता (प्रे.कृ.७:३५). ''तुला आमच्यावर अधिकारी आणि न्यायाधीश कोणी नेमिले?'' असे म्हणून त्याच्याच लोकांनी त्याची निंदा, टवाळी केली होती (पहा निर्गम २:१४). मिसर देशात जाण्यास मोशे बहुधा राजी नव्हताच. कारण तेथे गेल्यावर पूर्वीच्या प्रश्नांना तोंड द्यावे लागेल अशी त्याला भीती होती.

आपण पूर्वी जेथे होतो तेथे प्रत्यक्ष जाण्यास देव आम्हांला नेहमीच सांगतो असे नाही.

परंतु उदाहरणार्थ, एखाद्या विशिष्ट व्यक्तित्वाच्या अधिकाऱ्याशी जुळवून घेण्यात अडचणी आल्या असतील तर कदाचित देव आम्हांला तशाच व्यक्तित्वाच्या माणसाच्या हाताखाली काम करण्यास सांगेल. आपण या परिस्थितीशी सरळ, सात्विक प्रकारे जुळवून घेईपर्यंत हे करणे जरुरीचे असेल. आम्ही पाठ फिरवून पळ काढावा, तोंड चुकवीत राहावे अशी देवाची इच्छा नाही, त्याच्यामध्ये शांती, विसावा मिळावा यासाठी आम्ही आमची भयभीती, वैफल्य या सर्वांना तोंड देऊन त्यांचा निकाल करावा हीच त्याची इच्छा आहे.

१ राजे १९ पाहा. एलीया पळून चालला होता. पण जे करण्यास सांगितले होते ते त्याने माघारी जाऊन पूर्ण करावे असे देवाने स्पष्टपणे त्याला सांगितले. योनाही आपल्या समस्यांपासून पळून चालला होता, पण अखेरीस त्याला त्या मोठ्या माशाच्या पोटात जावे लागले. देवाने माशाच्या पोटातून त्याची सुटका केली व त्याला निनवे येथे जाऊन तेथील लोकांना देवाचा संदेश सांगण्यासाठी पाठवले (पाहा योना १-३).

देवाचे मार्गदर्शन न घेता, त्याची वाट न पाहता आपणच आपल्या समस्या सोडवण्याचा प्रयत्न केला तर अधिकच गोंधळ उडतो. साराने असेच केले. देवाने दिलेले अभिवचन पूर्ण होण्याची वाट न पाहता, स्वत:च्या पोटी मूल जन्मेल अशी खात्री न बाळगता तिने आपली दासी हागार अब्राहामाला दिली व तिच्याकडून मूल मिळवण्यास त्याला प्रवृत्त केले (पाहा उत्पत्ती १६). पुढे साराने हागारचा छळ केला. हागार घरातून पळून गेली तेव्हा परमेश्वराच्या दूताने तिला सांगितले, ''तू आपल्या धनीणीकडे परत जा व तिच्या हाताखाली तिचो सोशीत राहा (१६:९). तिची संतती वाढवण्याचे अभिवचन तिला देण्यात आले (व.१०).

देव कदाचित तुम्हांलाही सांगत असेल, जेथे तुमचा छळ झाला, वैफल्य आले तेथे परत जा. त्याचे ऐका. तुम्हांला त्या दरवाजातून बाहेर विजयी जीवनात आणण्यासाठी त्याला मोकळीक द्या. भावनिक आरोग्यप्राप्तीसाठी त्याचे हे निमंत्रण नाकारू नका.

## लोक त्यांच्या समस्यांपासून पळ का काढतात?

सामान्यपणे लोक त्यांच्या समस्यांकडे पाठ फिरवून पळून जातात, कारण त्यांना त्यांच्याच कृत्यांची जबाबदारी घ्यायची नसते. बहुतेक लोक नेहमी सोपी पळवाट शोधतात. योग्य पर्याय निवडून घेत नाहीत. काही लोक आपल्या समस्यांपासून प्रत्यक्षात पळ काढतात. उदा. एक लग्न मोडून दुसरे, तिसरे लग्न करणे, एकामागोमाग नोकरी बदलणे. काही लोक मद्य, अमली पदार्थ घेऊन मनाने आपल्या समस्या विसरण्याचा खटाटोप करतात. पण समस्या टाळल्याने त्या सुटत नाहीत, तर तशाच राहतात.

आपण निवडलेल्या प्रत्येक पर्यायाचे परिणाम होतात. आपण म्हटले घर कधीच झाडायचे, स्वच्छ करायचे नाही, तर कालांतराने घरात सर्वत्र घाण होईल. वस्तू कुजून सडून जातील. आपण कधीच बाजारात, वाण्याच्या दुकानात गेलो नाही तर लवकरच आपल्याकडे खायला काहीच असणार नाही. चुकीची निवड करायची आणि परिणाम मात्र चांगला झाला पाहिजे असे म्हणायचे हीच आमची समस्या आहे; आपले हे म्हणणे कधी खरे होत नाही. आपण जे पेरतो तेच कापावे, गोळा करावे लागते (पहा गलती.६:७-८).

नेहमी योग्य तेच निवडायचे, चांगले तेच करायचे असे ठरवले तर परिणामी आम्हांला समस्या भेडसावणार नाहीत, आमच्या विरुद्ध उभ्या राहणाऱ्या प्रश्नांचे दुष्ट चक्र मोडून पडेल.

काही लोक ही ना ती सबब पुढे करून समस्यांपासून पळ काढतात. देव त्यांना तातडीने काही करण्यास सांगतो तेव्हा ते काहीतरी सबब काढून म्हणतात, ''जमणार नाही, मी फार थकलो आहे म्हणून असा वागतो आहे.'' अगर ''आयुष्यभर मला वाईट वागणूक मिळाली म्हणून मी असा वागतो आहे.'' सबब म्हणजे खोटे कारण, क्षुल्लक निमित्त आणि या सबबी

आम्ही घट्ट धरून ठेवतो, त्यांचा आधार घेतो तोपर्यंत कोणताच बदल होणार नाही, आम्ही आहोत तसेच राहू.

येशूने एक दाखला सांगितला. एका माणसाने मोठा भोजनसमारंभ केला. त्याने भोजनासाठी अनेक लोकांना बोलावले (लूक.१४:१६-२४). पण लोकांनी नाना प्रकारच्या सबबी सांगितल्या, आणि कोणीच जेवायला आले नाही. एकजण म्हणाला मी नुकतीच जमीन विकत घेतली आहे. तिकडे मला ताबडतोब गेले पाहिजे. दुसरा म्हणायला मी बैलजोड्या घेतल्या आहे, त्या तपासून पाहायच्या आहेत. आणखी एक जण म्हणाला, ‘‘माझं नुकतंच लग्न झालंय, मी कसा येणार?’’ मग त्या माणसाने सर्व गोरगरीब लोकांना बोलावले. अंध, अपंग, लुळेपांगळे, रस्त्यात भटकणारे अशा लोकांनी त्याने आपले घर भरले. हे लोक आनंदाने भोजनासाठी आले आणि ज्यांनी सबबी सांगितल्या त्यांना त्या उत्तम मेजवानीची चवही कधीच चाखता आली नाही.

प्रत्येक गोष्टीबद्दल दुसऱ्यांना दोष देऊन काही लोक आपल्या समस्यांकडे पाठ फिरवतात. खाऊ नको म्हटलेले फळ खाल्ले म्हणून आदामाने हव्वेला दोष दिला. ती स्त्री दिल्याबद्दल त्याने देवालाही दोष दिला. आणि या सापाने मला फसवले, भुलवले म्हणून हव्वेने सापाला दोष दिला (पाहा उत्पत्ती ३). रानावनातून जाताना त्रास, क्लेश झाले त्याबद्दल इस्राएल लोकांनी मोशेला दोषी धरले. आम्हांला परत जाऊन दे. मिसर देशात गुलाम होतो तेच चांगले होते असे ते म्हणाले (पाहा निर्गम १४:१०-१२).

मला आठवते, मीही माझ्या समस्यांबद्दल दुसऱ्यांना, प्रत्येकाला दोष देत होते. प्रत्येक गोष्टीचे कारण डेव्हची चूक आहे अगर मला चांगले वळण कोणी लावलेच नाही म्हणून असे झाले, वगैरे. मी स्वत:च माझी खरी समस्या होते हे मला समजून घ्यावेच लागले.

येशूने म्हटले, ‘‘तू आपल्या डोळ्यांतले मुसळ ध्यानात न आणता आपल्या भावाच्या डोळ्यातले कुसळ का पाहतोस?’’ (मत्तय.७:३).

आता मला पुष्कळच मोकळीक, स्वतंत्रता आहे. पण हे सर्व माझ्या स्वत:विषयीच्या सत्याला सामोरे गेल्याने लाभले आहे. माझी वृत्ती, प्रवृत्ती वाईट आहे आणि मी बदलणे आवश्यक आहे. बदल झाला नाही तर माझ्या समस्या सुटणार नाहीत, हे देवाने मला दाखवून दिले. बदल घडताना दु:ख, वेदना होतात, तरीपण देवाने मला सांगितले, दाखवले त्याप्रमाणे वागणे, करणे भाग होते.

सत्य ऐकून घ्यायचे आणि देव आम्हांला सांगतो ते निमूटपणे करायचे. असे केल्यानेच आमची सुटका होते, उदाहरणार्थ मत्सर, हेवा ही तुमची समस्या आहे असे देवाने सांगितले तर ती समस्या सोडवल्याशिवाय तुम्ही देवाच्या आशीर्वादांना मुकणारच. लोकांचे चांगले होते तेव्हा तेव्हा तुम्ही आनंद केला पाहिजे. तुम्हांला बंधनात ठेवणाऱ्या प्रत्येक गोष्टीला तोंड देऊन तिचा निकाल केला पाहिजे. सत्याला सामोरे गेले तरच तुम्हांला पुढे जाता येईल.

आपल्या समस्यांचा विसर पाडण्यासाठी काही लोक स्वत:ला सतत कामात गुंतवून ठेवतात. आण स्वत:ला मंडळीच्या कामात एवढे गुंतवून ठेवू की देवाचे ऐकायला आम्हांला वेळच मिळत नाही. मी पूर्ण वेळ सेवाकार्यात गुंतले होते. लोकांना त्यांच्या समस्या सोडवण्यास मदत करीत होते, तेव्हा देव मला म्हणाला, ''जॉईस, माझ्यासाठी कार्य करण्यास तू एवढी गढून गेली आहेस की माझ्याबरोबर संवाद साधण्यासाठी तुझ्याकडे वेळच नाही.'' मग मी माझा एकंदर कार्यक्रम नीट पाहिला आणि ज्यातून काही फळ मिळत नव्हते अशी कामे मी थांबवली. वास्तविक माझ्या स्वत:च्या समस्या सोडवण्याचे टाळण्यासाठी मी सतत कामात गुंतून राहत होते.

आम्ही म्हणजे ख्रिस्ती मंडळीने आवश्यक, महत्त्वाचे काय ते जाणण्यास, ओळखण्यास शिकले पाहिजे अशी पौलाने प्रार्थना केली आहे :

> माझी ही प्रार्थना आहे की, तुमची प्रीती उत्तरोत्तर वाढत राहावी. ज्ञानात आणि सुस्पष्ट मार्मिक विवेकाने तिचा विस्तार व्हावा [सर्व प्रकारचे सखोल ज्ञान आणि गाढ तारतम्य यांतून तुमची प्रीती व्यक्त व्हावी].
>
> ते यासाठी जे अगत्याचे, उत्कट जिव्हाळ्याचे ते ओळखावे आणि जे उत्तम व खरखर मोलवान ते निवडून पसंत करावे [जे सर्वश्रेष्ठ, सर्वोत्तम ते ओळखणे व त्यातील नैतिक भेद समजून घेणे] जे श्रेष्ठ ते तुम्ही पसंत करावे; तुम्ही ख्रिस्ताच्या दिवसासाठी निर्मळ व निर्दोष, शुद्ध, आणि न चुकणारे असावे [त्या दिवसासाठी तुमची अंत:करणे आस्थापूर्ण व निष्कलंक असावी, तुम्ही स्वत: अडखळू नये आणि इतरांना अडखळवण्यास कारण होऊ नये] (फिलिप्पै.२:९,१० विस्तारीत अनुवाद)

काय घ्यायचे, काय घ्यायचे नाही, होकार कशाला, नकार कशाला द्यायचा ते आपण जाणून घेतले पाहिजे. नकार कसा द्यायचा, नाही केव्हा म्हणायचे ते मला शिकावे लागले. कारण या आयुष्यात उरलेला प्रत्येक दिवस कारणी लावावा हीच माझी इच्छा आहे. अनेकदा जे चांगले दिसते ते पुढे येऊ घातलेल्या अधिक चांगल्या गोष्टीचे शत्रू असते.

उदाहरणार्थ, देवाने माझ्या परिचयाच्या एका महिलेला सांगितले, ''तू दुसऱ्या लोकांना मदत करण्यात जास्त वेळ घालवू नको, तुझ्या स्वत:च्या मुलासाठी थोडा वेळ दे.'' आमच्या वेळेचा सदुपयोग कसा करावा हे देवाकडून जाणून घेतले पाहिजे आणि त्याच्याबरोबर प्रार्थनेत वेळ दिला की त्याची इच्छा काय आहे ते आपणाला समजते. देवाचे ऐकून घेणे, त्याच्याशी संवाद साधणे तुम्हांला अवघड जात असेल तर *''हाऊ टू हिअर फ्रॉम गॉड''* हे माझे पुस्तक वाचा. देव आमच्याशी कसा व किती प्रकारांनी बोलतो, ते सर्व त्याच्या वचनाशी जुळणारे असते आणि त्यातून आम्हांला शांती लाभते हे सर्व मी त्या पुस्तकात अनेक प्रकारे स्पष्ट केले आहे.

वेळकाढूपणा हा समस्यांपासून पळून जाण्याचा आणखी एक सर्वसामान्य प्रकार आहे. आम्ही सबबी सांगतो, दुसऱ्यांना दोष देतो, आम्ही फार कामात आहोत असे म्हणतो आणि देवाने करायला सांगितले आहे ते उद्या परवा करू, नंतर करू असे म्हणतो. आम्हांला वाटते आपण ते नंतर करू. पण नंतर कधीच येत नाही. यशया संदेष्ट्याने इशारा दिल्याप्रमाणे ''आम्ही एकतर विलंब लावतो अगर ते कानाआड टाकतो.''

देवाने सांगितलेले न करणाऱ्या, उशीर लावणाऱ्या लोकांचे काय होते ते हाग्गय १:२-७ मध्ये दाखवले आहे :

> सेनाधीश परमेश्वर म्हणतो, हे लोक म्हणतात की वेळ अजून आली नाही, परमेश्वराचे मंदिर बांधण्याची वेळ अजून आली नाही. तेव्हा परमेश्वराचे वचन हाग्गय संदेष्ट्याच्या द्वारे प्राप्त झाले ते असे :
>
> इकडे मंदिर ओसाड पडले असून तुम्ही स्वत: आपल्या तक्तपोशीच्या घरात राहावे असा समय आहे काय?
>
> आता सेनाधीश परमेश्वर म्हणतो, तुम्ही आपल्या मार्गाकडे लक्ष पुरवा.तुम्ही पुष्कळ पेरणी करिता पण हाती थोडे लागते. तुम्ही खाता पण तृप्त होत नाही, तुम्ही पिता पण तुमची तहान भागत नाही, तुम्ही कपडे घालता पण त्यांनी तुम्हांस उब येत नाही; मजूर मजुरीने पैसा मिळवून जसे काय भोक पडलेल्या पिशवीत टाकतो.
>
> सेनाधीश परमेश्वर असे म्हणतो की, तुम्ही आपल्या मार्गांकडे लक्ष लावा.

देव आम्हांला एखादी गोष्ट करायला सांगतो तेव्हा ते करण्यास आम्ही स्वत:ला तयार केले पाहिजे. शलमोनाने लिहिले आहे : ''जो वारा पाहत राहतो तो पेरणी करणार नाही; जो मेघाचा रंग पाहत बसतो तो कापणी करणार नाही'' (उपदेशक ११:४).

तुम्ही तुमच्या परिस्थितीकडे पाहात राहिलात तर देव करायला सांगतो ते लांबणीवर टाकाल, करणार नाही. देव सांगतो ते करण्याचा योग्य समय आलेला नाही असेही वाटेल, पण देव तुम्हांला काही कृती करायला सांगत असेल, तर ''आता'' हा समय आशीर्वादित आहे हे लक्षात ठेवा.

आमच्या समस्यांपासून तोंड फिरवून पळ काढणे हे काही चांगले नाही. आपण जरा थांबून काय महत्त्वाचे ते ओळखले पाहिजे, आमच्या कृत्यांची जबाबदारी स्वीकारली पाहिजे आणि जरुर तर सरळ म्हटले पाहिजे, ''माझे चुकले, आणि मला वाईट वाटते.'' आपण वेळकाढूपणा करून देवाच्या आशीर्वादांना मुकू नये.

देवाने आमच्यासाठी नेमलेले उत्तम त्याचा लाभ घ्यायचा असेल तर आपण सबबी सांगण्याचे थांबवावे. दुसऱ्यांना दोष देऊ नये. देव सांगतो ते करण्यास सवड काढावी, कामात गुंगून राहू नये. देव तुम्हांला देण्यास, सहाय्य करण्यास, प्रार्थना करण्यास, क्षमा

करण्यास माफी मागण्यास किंवा दुसरे काही करण्यास मागत असेल. ते काहीही असले तरी आपण देवाचे ऐकणारे, तो आमच्याशी बोलतो तेव्हा लगेच कार्य करणारे असे ‘आताच कार्य करणारे’ लोक होण्यास तत्पर असावे.

# 10

# उद्धारलेले आणि नीतिमान ठरलेले

आम्हांला नीतिमत्त्व मिळावे, देवासमोर नीट उभे राहता यावे यासाठी येशू ख्रिस्ताने आपले जीवन-प्राण अर्पण केले. ''हे देवाचे नीतिमत्त्व तर येशू ख्रिस्तावरील विश्वासाच्या द्वारे विश्वास ठेवणाऱ्या सर्वांसाठी आहे. त्यात भेदभाव नाही'' (रोम.३:२२).

येशूविषयी पेत्राने लिहिले आहे : ''त्याने स्वत: तुमची आमची पापे स्वदेही वाहून खांबावर नेली, ह्यासाठी की, आपण पापाला मेलेले होऊन सदाचरणासाठी जगावे, त्याला बसलेल्या माराने तुम्ही निरोगी झाला आहा'' (१ पेत्र.२:२४).

आपणा स्वत:विषयी चांगले आणि यथार्थ, योग्य वाटावे याचसाठी देवाने आम्हांला उत्पन्न केले आहे. पण आम्हा सर्वांना स्वत:विषयी वाईट वाटावे ही सैतानाची इच्छा आहे. आम्हांला लाज, शरम वाटावी, आम्ही अपराधी, दोषी, दंडास पात्र असे वाटावे हाच त्याचा मानस आहे. जगामध्ये पापाचे अस्तित्व आहे आणि मनुष्यजातीच्या पतनामुळे आम्हांला मिळालेला पापस्वभाव यांमुळे आम्हांला कोणतीच गोष्ट सरळ, यथार्थपणे करता येत नाही.

आम्ही सतत विजयी जीवन जगण्याऐवजी सतत खंत करीत खेदमय आयुष्य कंठावे या सैतानी मोहाला वश व्हायचे नसेल तर आम्ही देवाच्या वचनाचे सत्य समजून उमजून घेतले पाहिजे. आपण आमचा तारणारा म्हणून येशूला स्वीकारले की तो आम्हांला नीतिमत्त्व ही देणगी देतो आणि आम्हांला विश्वासाने देवासमोर योग्य, रास्त असे केले जाते. आमची सत्कृत्ये अगर आमची स्वत:ची परिपूर्णता, लायकी या कारणाने आम्हांला देवासमोर योग्य, लायक केले जात नाही. येशू ख्रिस्तावरील आमच्या विश्वासाच्या योगे आम्हांला नीतिमान गणले जाते.

देवाने आमच्यासाठी काय केले ते प्रेषित पौलाने आम्हांला सांगितले आहे : ''ज्याला पाप ठाऊक नव्हते त्याला (ख्रिस्ताला) त्याने तुमच्या आमच्याकरिता पाप असे केले, ह्यासाठी की, आपण त्याच्याठायी देवाचे नीतिमत्त्व असे व्हावे'' (२ करिंथ.५:२१).

आम्हांला सोडवण्यासाठी, आमचा उद्धार करण्यासाठी देवाने येशूला पाठविले (आम्ही स्वत:ला पापांचे गुलाम म्हणून सैतानाला विकले गेलो होतो). आम्हांला पूर्ववत करावे, आरंभी असायला हवे होते तसे करण्यासाठी येशू आला. लाज, शरम, दोषापराध, दंड यासाठी नव्हे तर नीतिमत्त्वासाठी देवाने आम्हांला निर्माण केले होते व त्याचसाठी आम्हांला खंडणी भरून सोडवले आहे.

## ख्रिस्तामध्ये दंडाज्ञा नाही

आपण देवाचे वचन नीट वाचले आणि समजून घेतले तर आपण स्वत:विषयी कधी चुकीचे विचार करणार नाही. पौलाने रोमकरांस पत्रामध्ये लिहिले आहे : *''म्हणून ख्रिस्त येशूमध्ये असलेल्यांना दंडाज्ञा नाहीच. ते देहस्वभावाप्रमाणे नव्हे तर आत्म्याने चालतात''* (रोम.८:१,४).

अर्थातच आम्ही पवित्र आत्म्याच्या मार्गदर्शनाने चालतो तर आम्ही कधीच कोणतीच चूक करणार नाही, त्यामुळे दोषापराधाला आमच्यामध्ये मुळावण्यास जागाच मिळणार नाही. तथापि, आम्ही सर्वच मानव आहोत. चूक करीत नाही, करू शकणार नाही असा एकही आमच्यामध्ये नाही. आमच्या प्रभूनेही हेच सांगितले आहे : ''आत्मा उत्सुक आहे खरा, पण देह अशक्त आहे'' (मत्तय.२६:४१).

आम्हांला कितीही वाटले, आवडले तरी आम्हांला परिपूर्णपणे कार्य करणे शक्य नाही. पण आत्म्याने चालल्याने आम्हांला दोषमुक्त जीवन जगता येईल. आपण प्रभूचे ऐकले, त्याचे आज्ञापालन केले तर तो आम्हांला जीवनात मार्गदर्शन करील; सतत बरोबर राहील हे त्याचे अभिवचन आहे. ''तर मी त्यास एवढीच आज्ञा केली की, माझे वचन ऐका, म्हणजे मी तुमचा देव होईन व तुम्ही माझे लोक व्हाल; तुमचे बरे व्हावे म्हणून *जो सरळ मार्ग मी तुम्हांस सांगतो त्याने चाला''* (यिर्मया ७:२३).

पवित्र आत्मा आम्हांला सुचवतो, सांगतो ते केले नाही की आमच्या हातून पाप होते. दोषी ठरणे, अपराधी वाटणे हा त्या पापाचा परिणाम आहे. कारण सैतानाला येथे वाव मिळतो आणि तो लगेच पुढे येऊन देवाच्या कृपेवरचा आमचा भरंवसा डळमळीत करतो. आम्हांला निर्दोषतेने अपराधी न वाटता जगायचे असेल तर पाप करण्याचा मोह आला तर त्याच्या ताबडतोब निकाल केला पाहिजे.

तुम्ही मोहवश झाला, पापात पडलात तर सत्कर्मे करून म्हणजे स्वत:च्या देहस्वभावाने, मानवी स्वभावाने चालून परत पूर्वपदावर येण्याची धडपड करू नका. सरळ देवाकडे क्षमायाचना करा आणि परत पवित्र आत्म्याकडे वळा. पवित्र आत्म्याने चालण्याचे सोडलेत

म्हणूनच तुम्ही पापात पडलात. तुम्ही देहस्वभावाने चालत राहिलात तर तुम्ही संकटांच्या अडचणींच्या चिखलात अधिक आणि अधिक खोल रूतून बसाल. तसे करू नका. ताबडतोब मागे फिरा आणि पवित्र आत्म्याला अनुसरा. त्याचे मार्गदर्शन घ्या. तुमची स्थिती सुधारण्यासाठी तोच तुम्हांला सहाय्य करील.

पवित्र आत्म्याकडे प्रत्येक समस्येचे, प्रश्नाचे अचूक उत्तर आहे. तुम्ही त्याच्याकडे परत वळला तर तो तुम्हांला दोषी धरणार नाही. असे लिहिले आहे की, ''कारण आपल्यावर क्रोध व्हावा (आम्हांला दोषी, दंडास पात्र ठरवावे) म्हणून नव्हे, तर आपला प्रभू येशू ख्रिस्त ह्याच्याद्वारे आपले तारण व्हावे म्हणून देवाने आपल्याला नेमले आहे'' (१ थेस्सल.५:९).

उदाहरणार्थ, आत्मा आपल्याला पश्चात्ताप करण्याकडे वळवतो, त्यातून आपल्याला देवापासून क्षमा प्राप्त होते : ''जर आपण आपली पापे पदरी घेतली, तर तो विश्वसनीय व न्यायी आहे. म्हणून आपल्या पापांची सभा करील व आपल्याला सर्व अनीतीपासून शुद्ध करील'' (१ योहान.१:९).

देहस्वभावाला अनुसरल्याने सत्कृत्ये करून देवाची कृपा मिळवण्याकडे प्रवृत्ती होते. पण देहस्वभाव नेहमीच चुकांची भरपाई करण्याचा प्रयत्न करतो. देव देतो ती क्षमेची देणगी स्वीकारून पूर्वपदावर यावे हा विचारही त्याला सुचत नाही.

## दोषापराधाचा निकाल करणे

प्रभूने मला एकदा दोषापराधाविषयी मोठा दृष्टान्त दिला. मला आठवते तसे मला कायम दोषी, अपराधी वाटत होते. दोषापराध कायमच माझ्या सोबतीला असे. आम्ही सर्वत्र एकत्रच जात असू. माझ्या लहानपणीच माझा लैंगिक छळ चालू होता, तेव्हापासूनच पापाची जाणीव माझ्यामध्ये ठाण मांडून बसली होती. आपण करीत आहोत ते चूक नाही, चांगले आहे असे माझ्या वडिलांनी मला सांगितले तरी त्यामुळे मला अधिकच अशुद्ध आणि दोषी वाटू लागले. अर्थात मी मोठी झाले तेव्हा ते करतात ते चूक आहे हे मला समजले, पण ते थांबवण्याचा काहीच उपाय माझ्याकडे नव्हता, परिणामी दोषीपणाची भावना सतत वाढत गेली.

दोषीपणाची भावना असह्य ओझे आहे. मनाला, आत्म्याला हैराण करणारे दडपण आहे हे मी स्वत:च्या अनुभवावरून शिकले आहे. दोषीपणामुळे सर्वत्र काळोख दिसतो, डोळ्यापुढे अंधारी येते. आपण अगदी दमून थकून गळून गेलो आहोत असे वाटते. खर तर त्यामुळे आम्ही गलितगात्र होऊन सारा उत्साह व ताकद संपते. पापाला आणि सैतानाला विरोध करण्याचे त्राणच उरत नाही. परिणामी दोषी वाटणे आणि अपराधी ठरणे यांमुळे पापच वाढते.

मला वाटते मला दोषीपणाचे व्यसनच लागले होते. देवाच्या कृपेविषयी मला समजले तोवर अपराधी वाटले नाही असा एकही दिवस माझ्या आयुष्यात उगवला नव्हता. मी जरी काही वाईट अगर पाप करीत नव्हते, तरी माझ्या मनात अपराधीपणाची भावना येतच असे.

सैतान सतत आम्हांला दाबून दडपावे म्हणून संधी शोधत असतो. तो ख्रिस्तावर विश्वास ठेवतात त्यांच्यावर दोषारोप ठेवणारा आहे. तो सतत देवापुढे आमच्यावर परोपरीचे आरोप करीत असतो (पहा प्रकटी.१२:१०). पण स्तोत्रकर्ता दावीद म्हणतो, ''तरी हे परमेश्वरा, तू माझ्याभोवती कवच आहेस. तू माझे गौरव आहेस, तू माझे डोके वर करणारा आहेस'' (स्तोत्र.३:३).

उदाहरणार्थ, एक दिवस मी काही खरेदी करण्यासाठी बाजारात गेले होते. माझा सततचा दोषापराध माझ्याबरोबर होताच. त्या वेळी माझे काय चुकले ते आता आठवत नाही. आणि ते एवढे महत्त्वाचेही नाही, कारण नेहमीच काही ना काही चूक होतच असे. मी मोटारीतून उतरून एका दुकानात जाणार होते तेवढ्यात पवित्र आत्मा मला म्हणाला, ''जॉईस, ह्या पापाबद्दल तू क्षमा कशी मिळवणार आहेस?''

यावरचे रास्त उत्तर मला माहीतच होते. मी म्हटले, ''येशू काल्वरीलवर मरण पावला तेव्हा त्याने माझ्यासाठी केल्या यज्ञार्पणाचा मी स्वीकार करीन, म्हणजे मला क्षमा मिळेल.'' आम्हांला योग्य, अचूक उत्तर माहीत असले (बुद्धी, ज्ञान असले), तरी ते आपण आपल्या स्वत:ला लागू करूच असे नाही.

त्यावर पवित्र आत्मा पुढे बोलला, ''ठीक आहे, पण जॉईस, तू येशूचे ते यज्ञार्पण केव्हा स्वीकारणार? तुझा काय इरादा आहे?''

ताबडतोब माझ्या डोक्यात लख्ख प्रकाश पडू लागला. त्या क्षणाला मला जाणवले की दोनतीन दिवस थांबावे, अपराधीपणाची भरपूर जाणीव घ्यावी आणि मग देवाकडून क्षमा स्वीकारावी अगर मला आताच्या आता, तेथल्या तेथे ही क्षमा मिळेल.

माझ्या पापांसाठी मी ताबडतोब क्षमा मागत असे, पण पुरेसे दु:ख सोसले आहे आता हिशेब चुकता झाला आहे असे वाटले की मग मी ती क्षमा स्वीकारीत असे. मी काय करीत होते ते देवाने मला उलगडून दाखवले. मी स्वत:च स्वत:ला किती दु:ख देत होते, माझ्या दु:खाचे कारण होते हे देवाने मला दाखवले. मी जे करीत होते ते येशूचा अपमान करणारे होते हेही त्याने मला दाखवले. मी अप्रत्यक्षपणे म्हणत होते, ''प्रभू तुझ्या जीवनाचे, प्राणांचे, रक्ताचे प्रायश्चित्त अर्पण चांगले असले तरी पुरेसे चांगले नव्हते. माझ्या अपराधीपणाच्या भावनेची त्यात भर घातली पाहिजे, मगच मला क्षमा होऊ शकेल.''

त्याच दिवशी मी दोषापराध व दंडाज्ञा यांपासून मुक्त होऊ लागले आणि तुम्हीही तसेच करावे हे माझे सांगणे आहे. लक्षात ठेवा. दोषीपणाच्या भावनेने कोणाचेच भले होत नाही. दोषीपणाची भावना जपल्याने होणारे विपरीत परिणाम पुढीलप्रमाणे आहेत :

- अपराधीपणाच्या भावनेने तुमची शक्ती, उत्साह कमी होतो. त्यामुळे तुम्हांला मानसिक आणि/अगर शारीरिक आजार होऊ शकतो.
- दोषापराधामुळे देवाबरोबरच्या सहभागितेत अडथळा येतो. इब्री. ४:१५-१६ मध्ये

म्हटले आहे : ''कारण आपल्या सर्वांच्या दुर्बलते-विषयी सहानुभूती वाटत नाही, असा आपला प्रमुख याजक नाही, तर तो सर्व प्रकारे पारखलेला होता; तरी निष्पाप राहिला. तर मग आपल्यावर दया व्हावी आणि ऐनवेळी सहाय्यासाठी कृपा मिळावी म्हणून आपण धैर्याने कृपेच्या राजासनाजवळ जाऊ.''

- दोषीपणा देहस्वभावाचे कार्य आहे ते आपल्या पापाची भरपाई आपण करावी असा आग्रह धरते.
- दोषीपणामुळे तुमची आध्यात्मिक शक्ती ओसरते. तुम्ही दुर्बल होता. शत्रूकडून होणाऱ्या नव्या नव्या हल्ल्यांना थोपवण्यास ताकद उरत नाही. आध्यात्मिक लढाईत विजयी होण्यासाठी ''नीतिमत्त्वाचे उरस्त्राण'' (इफिस.६:१४) धारण केले पाहिजे. दोषीपणा तुम्हांला अधिक पाप करण्यास लावतो.
- दोषीपणामुळे तुमच्यावर प्रचंड दडपण येते. दुसऱ्यांशी नीटपणे वागता येणार नाही असे वाटू लागते. दोषीपणाच्या ओझ्याखाली राहून पवित्र आत्म्याचे फळ देणे हे सर्वस्वी अशक्य आहे (गलती.५:२२,२३).

वरील मुद्दे पाहिल्यावर दोषीपणाची भावना काढून टाकणे चांगले आहे हे तुमच्या लक्षात आलेच असेल. ही भावना सोडून द्या. तिला मुकावे आणि प्रभूबरोबरच्या नात्यात अंतराय यावा हाच तिचा उद्देश आहे.

दोषीपणाच्या संबंधात तुमची काही गंभीर समस्या असेल तर तुमच्यासाठी कोणी तरी प्रार्थना करण्याचे अगत्य आहे. तुमचा विश्वास दृढ, भक्कम असेल तर तुम्हीच प्रार्थना करा. तथापि, दोषीपणा विश्वासाला सुरुंग लावतो. तुम्ही दोषापराधाचे ते अवजड ओझे दीर्घकाळ वागवले असे. दंडाज्ञेच्या धास्तीने तुम्ही जीव मुठीत धरून राहात असाल तर तुमचा विश्वास दृढ, भक्कम करण्याचे अगत्य आहेत, आवश्यक ती मदत घ्यावी. दोषीपणा आणि शिक्षा यांच्या ओझ्याखाली दडपून जाऊ नका. हे ओझे फेकून द्या.

## लाज आणि शरम

आता आपणाला दोषीपणाविषयी बरेच काही समजले आहे तेव्हा आता लाज, शरम या विषयाकडे वळू या.

एक प्रकारची लाज आहे. ती सर्वसाधारणपणे निकोप आहे. माझ्या हातून दुसऱ्याचे काही नुकसान झाले, दुसऱ्याच्या वस्तूची तोडमोड झाली तर माझ्या चुकीबद्दल मला लाज वाटते. मला वाटते मी अधिक काळजी घेणे जरुर होते. उगाचच त्या वस्तूला हात लावला वगैरे. मी निष्काळजीपणे वागले. संबंधित व्यक्तीकडे चूक करून मला क्षमा याचना करता येते. त्याने क्षमा केली की झाले गेले विसरून पुढे जाता येते. निकोप लाजेतून अगर शरमेतून आम्ही मानव दुर्बल आहोत, आम्हांला मर्यादा आहेत याचाच प्रत्यय येतो.

एदेन बागेत आदाम आणि हव्वा दोघेही नग्न होती, तरी त्यांना लाज वाटत नसे (पहा उत्पत्ती २:२५). त्यांच्या अंगावर वस्त्रे नव्हती, एवढेच नव्हे, तर ती दोघे परस्परांशी सरळपणे, खरेपणाने वागत. त्यांनी मुखवटे घातले नव्हते. एकमेकांपासून काही गुप्त ठेवले नव्हते असा या वचनाचा अर्थ आहे असे मला वाटते. त्यांना लाजेची, शरमेची भावना, जाणीव नव्हती. त्यामुळे ते एकमेकांशी अगदी मोकळेपणे वागत होते. पण त्यांनी पाप केले आणि लगेचच ते जाऊन लपून बसले (उत्पत्ती ३:६-८).

खरे तर लोकांनी एकमेकांबरोबर आणि देवाबरोबर अगदी मोकळेपणाने वागले पाहिजे. पण असे करणे क्वचितच कोणाला जमते. बहुतेक लोक बहाणे, ढोंग करतात. ते खोट्या व्यक्तित्वाचे मुखवटे घालून त्यांच्याआड स्वत:ला दडवतात. जरी काही झाले, दुखावले गेले तरी काहीच झाले नाही असे ते दाखवतात. खरोखरी दुसऱ्या कोणाच्या सहाय्याची गरज असली तरी कसलीच कोणाचीच गरज नाही असा बहाणा करतात.

विषारी लाज शरमही असते. ती एखाद्या व्यक्तीच्या जीवनाला अगदी पोखरून त्याच्या व्यक्तित्वाचा धुव्वा उडवते. एखाद्या व्यक्तीचा छळ झाला असेल, तिला गैरवागणूक मिळाली असेल आणि त्यामुळे वाटणारी लाजशरम त्या व्यक्तीने मनाला लावून घेतली, अंतरंगात साठवून ठेवली की, तिचे जीवन व्यर्थ होते. अशी व्यक्ती तिला जे केले जाते त्यामुळे लाजेने चूर झालेली असते. एवढेच नव्हे, तर तिला जे सोसावे लागते त्यामुळे तिला स्वत:चीच लाज वाटू लागते.

अशी व्यक्ती सर्व लाज शरम आपल्या स्वत:मध्ये साठवते आणि ती लाजच त्याच्या जीवनाचे केंद्र होते. त्याच्या जीवनाच्या प्रत्येक अंगात, पैलूत भावनांचा विखार फैलावतो आणि मग लाजलज्जा, शरम हाच त्याचा स्थायी भाव होऊन राहतो.

एका काळी माझ्या व्यक्तित्वामध्येही अशीच लाजशरम भरून राहिली होती. पण मला स्वत:चीच लाज वाटत होती हे माझ्या ध्यानातच आले नाही. माझ्या जीवनात माझ्या लज्जेचे परिणाम मला दिसत होते. मी लज्जेचे मूळच काढून टाकण्याऐवजी तिची फळे खुडून फेकून देण्याचा अयशस्वी प्रयत्न करीत होते.उत्पत्ती २:२५ मध्ये ''लाज वाटत नव्हती'' या ऐवजी ''संकोच वाटत नसे'' असे आहे. (पं. रमाबाई : लाज वाटत नव्हती.)

पवित्र शास्त्राच्या काही इंग्रजी भाषांतरांत ''लाज-संकोच'' याऐवजी गोंधळून जाणे, गोंधळ उडणे, दिङ्मूढ होणे'' या अर्थाचे शब्द घेतले आहेत. त्यात ''दोषी ठरणे'' असाही अर्थ आहे. या शब्दांचा व त्यांच्या अर्थाचा नीट अभ्यास केला तर लाज शरम हेच तुमच्या समस्येचे मूळ कारण आहे हे तुम्हांला समजेल.

## ''लाज शरम'' या भावनांचा निकाल करणे

माझे जीवन गोंधळाने भरलेले होते. सर्वच विस्कळीत झाले होते. जे योग्य तेच करण्याचा माझा निकराचा प्रयत्न होता (म्हणजे मग माझ्या अंतरंगात मला ''बरे वाटले'' असते). पण

मी कितीही, काहीही केले तरी मला कधीच यश मिळाले नाही. माझ्या पदरी कायमच अपयश येणार अशी माझी खात्री झाली होती. पण मला प्रत्येक गोष्टित अपयश आले नाही. बाहेरचे व्यावसायिक जग आणि इतर काही क्षेत्रे यात मी यशस्वी होतच होते. पण सात्विक सरळ वागणुकीच्या बाबतीत मी अपयशी ठरले होते. माझ्या जिवाला नेहमीच पराभूत झाल्यासारखे वाटत होते. कारण बाहेर मी कितीही यश मिळवले, पुष्कळ काही साध्य केले तरी अंतरंगात मला स्वत:विषयी नेहमीच वाईट वाटत होते.

*माझी मलाच लाज वाटत होती!*

मी जी व जशी होते ती व तशी मला स्वत:ला आवडत नव्हते. माझे मूळ व्यक्तित्व मला रुचत नव्हते. मी नेहमी सतत माझे खरे व्यक्तित्व नाकारून मी कधीही नव्हते व होऊ शकणार नव्हते असे व्यक्तित्व धारण करण्याचा वायफळ प्रयत्न चालवला होता. (पुढे एका प्रकरणात मी या मुद्द्याची सविस्तर चर्चा करणार आहे.)

लाखो ख्रिस्ती लोक आपली संपूर्ण आयुष्ये असा दयनीय अवस्थेत घालवतात. त्यांच्या हक्काच्या पदापेक्षा कितीतरी खालच्या जागेवर ते राहतात. खरे तर ते देवाचे वारीस आणि ख्रिस्तोच सह-वारस आहेत. हीच त्यांची यथार्थ हक्काची, प्रतिष्ठेची जागा आहे. मला हे चांगले माहीत आहे, कारण मीही त्यांच्यापैकी एक होते.आम्हांला पुढे जो गौरवी वारसा मिळणार आहे त्याच्या तुलनेने सध्या आता आम्ही भोगत आहो ते दु:ख काहीच नाही असे पौलाने सांगितले आहे :

> तो आत्मा स्वत: आपल्या आत्म्याबरोबर साक्ष देतो की, आपण देवाची मुले आहोत, आणि जर मुले तर वारीसही आहो, म्हणजे देवाचे वारीस, ख्रिस्ताबरोबर सोबतीचे वारीस असे आहो. आपल्याला त्याच्या बरोबर गौरव प्राप्त व्हावे म्हणून त्याच्या बरोबर जर दु:ख भोगीत असतो तरच. कारण आपल्यासाठी जे गौरव प्रगट होणार आहे त्याच्यापुढे सांप्रत काळाची दु:खे काही नाहीत असे मी मानतो (रोम.८:१७-१८).

लाज, शरम हेच माझ्या असंख्य समस्यांचे मूळ असल्याचे पवित्र आत्म्याने मला दाखवले. तो माझ्या दृष्टीने मोठा महत्त्वाचा दिवस होता. लाजशरमेच्या जीवघेण्या जाणीवेपासून सुटका होण्याची खात्री देणारी अनेक अभिवचने देवाच्या वचनात आहेत. उदाहरणार्थ, यशया ६१:७ मध्ये म्हटले आहे : ''तुमच्या अप्रतिष्ठेचा (शरमेचा) मोबदला तुम्हांस दुप्पट मिळेल; आपल्या उपमर्दाबद्दल मिळालेल्या वतनभागानेच ते आनंद पावतील; असे ते आपल्या देशात दुप्पट वतन पावतील; त्यांस सार्वकालिक आनंद प्राप्त होईल.''

आपण या वचनाचा थोडा सूक्ष्म विचार करू या. यात दुप्पट मोबदला, भरपाई वतन मिळेल असे आहे. *भरपाई* नेहमीच कोणत्या तरी नुकसानीबद्दल, हानीबद्दल असते. थोडक्यात तुम्ही देवावर भरवंसा ठेवून त्याच्या इच्छेनुसार चाललात तर तुमच्यावर झालेल्या

प्रत्येक अन्यायाची तुम्हांला भरपाई मिळेल याची तो स्वत: काळजी घेईल. तुमचे जे हरवले आहे व गमावले आहे ते तुम्हांला दुपटीने परत मिळेल आणि तुम्हांला सार्वकालिक आनंद प्राप्त होईल. हे मोठे अद्‌भुत वचन आहे आणि त्याच्या सत्यतेविषयी मी स्वत: साक्षी आहे. देवाने माझ्यासाठी नेमके हेच केले आहे, आणि तो तुमच्यासाठीही हेच करील.

यशया ५४:४ मध्ये परमेश्वराचे आणखी एक अभिवचन आहे : ''भिऊ नको, तू लज्जित होणार नाहीस. घाबरू नको, तू फजित होणार नाहीस; तुझ्या तारुण्यातील अप्रतिष्ठेचा तुला विसर पडेल, तुला आपल्या वैधव्याच्या बट्‌ट्याचे स्मरण यापुढे होणार नाही.''

तुमच्या गतकाळातील नुकसानीच्या कटू आठवणी आठवण्याचे कारण नाही. ते कठीण दिवस मनात आणून उदास होण्याचे काही कारण नाही हे समजल्याने पहा केवढा उत्साह वाटतो, किती धैर्य मिळते!

तुमचा काही शाब्दिक अथवा भावनिक अपमान झाला असेल, छळ झाला असेल आणि तो काही काळ सोसावा असे प्रभूने सांगितले असेल तर काय? तुमचा छळ करणाऱ्या व्यक्तीमध्ये प्रभू कार्य करीपर्यंत तुम्हांला स्वस्थ राहायचे असेल तर काय? अशा स्थितीत तुमच्या स्वभावात लज्जेने ठाण मांडून राहू नये यासाठी स्वत:चे रक्षण कसे कराल? त्यासाठी स्तोत्रकर्त्याने केलेली प्रार्थना तुम्हीही करावी.

''माझ्या जिवाचे रक्षण कर; मला मुक्त कर; मी तुझा आश्रय धरिला आहे म्हणून माझी फजिती होऊ देऊ नको'' (स्तोत्र.२५:२०).

देव लाज-शरम, फजिती यांपासून तुमचे रक्षण करील. जेव्हा जेव्हा तुमचा शाब्दिक अगर भावनिक छळ होईल तेव्हा सरळ प्रार्थना करा. तुमच्या अंतरंगात ठाम मांडू पाहणाऱ्या लज्जेला दूर ठेवण्यास देवाला विनंती करा. स्तोत्र.२५:२० मधील ''फजिती'' (लाज) हा शब्द शत्रूच्या विरुद्ध दुधारी शस्त्र म्हणून वापरा, हे माझे सांगणे आहे.

ही विचारदृष्टी तुमच्या हिताची कशी ठरेल याविषयी हे एक उदाहरण पाहा. एका पाळकाची पत्नी माझ्या परिचयाची आहे. तिच्या नातेवाईकांनी वर्षानुवर्षे लहानपणात तिला लैंगिक छळ केला होता, पण तिच्या पतीबरोबरच्या संबंधात तिला कोणतीच समस्या नाही. उलटपक्षी माझाही लहानपणी खूपच लैंगिक छळ झाला, परिणामी माझ्या पतीबरोबरच्या माझ्या संबंधात मला कितीतरी समस्यांना तोंड देऊन त्यांचा निकाल करावा लागला.

असा फरक होण्याचे कारण काय? मी माझ्या या मैत्रिणीला विचारले. तिने मला सांगितले की, लहानपणीच्या सर्व काळात तिचा देवावर दृढ विश्वास कायम होता. वयाच्या चौदाव्या वर्षापासून तिच्या छळणुकीला सुरुवात झाली. त्या वेळपर्यंत तिला ख्रिस्ती सहभागितेचा उत्तम अनुभव मिळाला होता. तिचे प्रार्थना-जीवन सक्रिय, कृतीशील होते. तिला छळणाऱ्यांनी तिला गैरफायदा घेतला तेव्हा तेव्हा ती देवाला कळवळून प्रार्थना करीत असे, ''हे देवा, माझे रक्षण

कर. माझ्यावर तुझ्या दयेचे आवरण घाल. यामुळे माझ्या भावी पतीबरोबरच्या संबंधात काही अंतराय, समस्या येऊ देऊ नको.'' पुढे आपण एका पाळकाशी विवाह करणार हे ती जाणून होती. कारण देवानेच ते तिला प्रगट केले होते. त्या छळणुकीच्या संबंधातील लाज व बंधने यांपासून तिच्या प्रार्थनांनी तिचे रक्षण केले.

माझ्या बाबतीत सांगायचे तर मला देवाविषयी पुरेशी माहिती नव्हती. प्रार्थनेच्या द्वारे विश्वास कृतीशील कसा करावा ते मला समजले नव्हते. म्हणूनच मी लाजेने व शरमेने अगदी त्रासून गेले होते. मग पुढे मला समजले की, लाज शरम माझ्या रोमारोमात भिनली होती. पण माझी सोडवणूक करण्यास देव समर्थ आहे तसे त्याचे अभिवचन आहे.लाजशरमेच्या गंडापासून तुमचीही सुटका होऊ शकेल हे निश्चित. या गंडामुळे पुढील प्रकारच्या गुंतागुंतीच्या आंतरिक समस्या उद्‌भवतात :

- परकेपणा - स्वजनांना पारखे होणे.
- व्यसनाधीनता (मद्य, अमली पदार्थ घेणे, नशाबाजी, खाणेपिणे व्यवस्थित नसणे, पैशाचा लोभ, सतत कामात गढणे, एखादी विपरीत कृती पुन्हा पुन्हा करीत राहणे, लैंगिक विकृती, सर्व सूत्रे आपल्याकडे असावीत हा आग्रह, आत्मसंयमन - अगर स्वयंशिस्त यांचा अभाव, चहाड्या करणे, दोष काढणे वगैरे).
- उदासीनता
- न्यूनपणाची तीव्र जाणीव (माझे काहीतरी चुकले आहे हाच सततचा विचार)
- अपयशाची लक्षणे
- एकलकोंडेपणा - एकांतवासाची हाव
- भरंवसा नसणे
- विक्षिप्त लहरीपणाचे वर्तन (विक्षिप्त व्यक्ती उगाचच सर्व जबाबदारी स्वत:वर घेते आणि संघर्षाचा प्रसंग आला की आपलेच चुकले आहे असे समजणे)
- परिपूर्णतेचा हेका
- भितरेपणा (सर्व प्रकारचे भय)
- उत्तम निकोप नातेसंबंध जोडणे व टिकवणे शक्य नसणे

## उदासीनता

आपण आपल्या अंत:करणात स्वत:विषयी जे मानतो, ठरवतो त्याचा आमच्या कार्यकृतीवर परिणाम होतो. ''माणूस आपल्या अंतर्यामी जसा विचार करतो तसाच तो असतो'' (नीती.२३:७ पं. रमाबाई). आम्ही स्वत:ला कमी, हीन लेखले तर आम्ही उदास, खिन्न होणारच.

कितीतरी लोक उदासीनतेच्या या अवस्थेने हैराण झाले आहेत. या उदासीनतेची कारणे मोठी गुंतागुंतीची आहेत. त्यात लाज, शरम हे एक कारण आहे. तुम्हांला उदास, खिन्न वाटत असेल तर तुमच्या अंतरंगात मूळ धरून असलेली लाज-शरम हेच त्याचे कारण आहे.

जे लाज शरमेला वश झाले आहेत ते स्वत:विषयी नकारात्मक बोलतात, असे चुकीचे विचार केल्याने चुकीचे बोलण्याने आत्म्यावर असह्य ओझे, दडपण येते. ही एक मोठी समस्या आहे. कारण देवाने मानवांना नीतिमत्त्व, प्रीती आणि परस्पर स्वीकार यांसाठी निर्माण केले आहे. देव नेहमीच त्याच्या मुलांवर ह्या सद्‌गुणांचा वर्षाव करीत असतो. परंतु त्याच्या मुलांपैकी अनेकांना हे सद्‌गुण कसे घ्यावेत, स्वीकारावेत तेच समजत नाही.

तुम्ही स्वत:च स्वत:चे वैरी, विरोधक असाल तर तुम्हांला देवापासून प्रीती व मान्यता घेता येणार नाही. या बाबतीत तुमची काही समस्या, अडचण असेल तर नुसते हात जोडून स्वस्थ बसू नका. सैतानाला राव देऊ नका. तुमच्या आत्मिक वैऱ्याशी आत्मिक शास्त्र घेऊन सामना करा; आत्मिक कृती करण्यासाठी आपल्या विचारांचा रोख बदला. बोलण्याचा सूर व शब्द बदला. जाणूनबुजून स्वत:विषयी चांगले तेच बोला आणि विचार करा. तुमच्या अंगच्या उत्तम गुणांची एक यादी करा. देवाचे वचन तुमच्याविषयी काय सांगते ते पाहा, लिहा आणि दिवसातून अनेकदा त्याचा उच्चार करा.

देवाच्या वचनामधील सत्याचे चिंतन-मनन करा. उदाहरणार्थ : ''ज्याला पाप ठाऊक नव्हते त्याला (ख्रिस्ताला) त्याने (देवाने) तुमच्याआमच्याकरिता पाप असे केले आहे. ह्यासाठी की, आपण त्याच्या ठायी देवाचे नीतिमत्त्व असे व्हावे. [त्याच्या चांगुलपणाने, त्याच्याशी योग्य नाते जोडून त्याच्या पसंतीस उतरलेले आणि ग्रहणीय व्हावे] (२ करिंथ.५:२१). आणि मग म्हणा ''मी ख्रिस्तामध्ये देवाचे नीतिमत्त्व आहे.''

''देवाने जगावर एवढी प्रीती केली की त्याने आपला एकुलता एक पुत्र दिला, अशासाठी की जो कोणी त्याजवर विश्वास ठेवतो त्याचा नाश होऊ नये, तर तला सार्वकालिक जीवन प्राप्त व्हावे'' (योहान.३:१६). हे वचन वाचाल तेव्हा तेव्हा मोठ्याने म्हणा, ''देव माझ्यावर प्रीती करतो.''

रोम.१२:६-८ वाचा. ''आपल्याला प्राप्त झालेल्या कृपादानांप्रमाणे आपल्याला निरनिराळी कृपादाने आहेत, म्हणून ईश्वरी संदेश सांगावयाच असल्यास तो आपल्या विश्वासाच्या प्रमाणाने सांगावा. सेवा करताना सेवेत तत्पर असावे, शिकविणाऱ्याने शिक्षण देण्यात, बोध करणाऱ्याने बोध करण्यात तत्पर असावे, दान देणाऱ्याने ते औदार्याने द्यावे, अधिकाऱ्याने आपले काम आस्थेने करावे, दया करणाराने ती संतोषाने करावी.''

हे वाचल्यावर पुढीलप्रमाणे म्हणा : ''मला प्रभूने दिलेली कृपादाने आणि शक्ती आहे.''

प्रभू परमेश्वराचे हे शब्द आपल्या अंत:करणात साठवा, त्यांवर मनन करा, ''तू माझ्या

दृष्टीने अमोल आहेस, तू मोठ्या योग्यतेचा आहेस व मी तुजवर प्रेम करतो म्हणून तुजबद्दल, तुझ्या जिवाबद्दल राष्ट्रे देईन'' (यशया ४३:४). ''मी देवाला मोलवान व अमोल आहे'' असे म्हणून आनंद करा.

तुमच्यासंबंधीची अशीच इतर विधायक, होकारात्मक वचने पवित्र शास्त्रातून शोधा.

आपल्या मानसिक व भावनिक आरोग्यावर दुष्परिणाम करणारी एखादी शारीरिक व्याधी अगर दोष आपल्यामध्ये नाही/आहे याची खात्री मिळावी म्हणून संपूर्ण वैद्यकीय तपासणी करून घ्या. देहाच्या व्याधीमुळे उदासीनता आलेली नसले तर नकारात्मक विचार व उच्चार हेच त्याचे कारण आहे असे नक्की समजा. शारीरिक दोष, हार्मोनचे असंतुलन अगर अंतर्गत व्याधी यामुळे उदासीनता आली असेल तरी सैतान या संधीचा फायदा नक्कीच घेणार, सोडणार नाही. तो तुमच्या मनामध्ये असेच नकारात्मक विघातक विचारांची पेरणी करील. हे विचार तुम्ही आपल्या मनात अंकुरून वाढू दिले, त्यांवर चिंतन केले तर तुमची समस्या मुळात आहे त्यापेक्षा हजारपटीने वाढेल.

मी पुन्हा सांगते : तुम्हांला जेव्हा उदास, खिन्न वाटेल तेव्हा तुमचे विचार तपासून पाहा. तुम्ही उदासपणे खंत करीत बसावे ही देवाची इच्छा नाही. तुमचे विचार देवाच्या वचनांना अनुरूप करा. यशया ६१:३ मध्ये म्हटले आहे : ''प्रभू परमेश्वराने आम्हांला 'खिन्न आत्म्याच्या ऐवजी प्रशंसारूप वस्त्र' दिले आहे.'' नहेम्या सांगतो : ''परमेश्वराविषयीचा जो आनंद तोच तुमचा आश्रयदुर्ग होय'' (८:१०). तुम्ही जे व जसे आहात म्हणून देवाचे वचन सांगते त्यावर विश्वास ठेवा आणि मग खरोखर तुम्ही तसेच व्हाल. निवड तुम्हीच करायची आहे. ''...तू जीवन निवडून घे म्हणजे तू व तुझी संतति जिवंत राहील'' (अनु.३०:१९).

# 11

# स्वत:ला नाकारणे आणि स्वत:ला स्वीकारणे

लाज-शरम हेच स्वत:ला नाकारण्याचे एक कारण आहे. काही बाबतीत यातूनच स्वत:चा द्वेष करण्याची भावना उद्भवते. पराकोटीची लाज शरम वाटू लागली तर त्यातून स्वत:च स्वत:चा शारीरिक छळ करण्याकडे प्रवृत्ती होते. मी अशा अनेक लोकांना मार्गदर्शन केले आहे. त्यांनी मला त्यांच्या शरीरांवरचे वळ, डाग, मुक्या माराच्या खुणा, जखमा दाखवल्या. या लोकांनी स्वत:ला जाळून, पोळून, भाजून घेतले होते. कोणी स्वत:च स्वत:चे केस पुंजक्यापुंजक्यांनी उपटले होते. त्यामुळे त्यांच्या मस्तकावर अनेक ठिकाणी केसच नव्हते. कोणी स्वत:च स्वत:ला बेदम मारझोड करीत. असे स्वयं-छळणुकीचे अनेक प्रकार आहेत.

काही लोक शिक्षेचा एक प्रकार म्हणून स्वत:ची उपासमार करतात : काहीजण अगदी हिडीसपणे किळस येईल असे वर्तन करतात. आपल्याला लोकांनी नाकारावे हाच त्यांचा उद्देश असतो. त्यांनी स्वत:ला नाकारलेले असते म्हणून दुसरेही आपणाला नक्कीच नाकारणार असा त्यांचा ग्ह झालेला असतो. त्यांना स्वत:विषयी जे वाटते तेच ते आपल्या विपरीत कृतीमधून दाखवतात. अशा उद्भवणाऱ्या समस्यांची यादी खूपच मोठी आहे. पण मला येथे काय स ांगायचे आहे ते तुमच्या लक्षात आलेच असेल.

देवाने आपल्या वचनामध्ये तुमच्याविषयी अनेक चांगल्या गोष्टी सांगितल्या असल्या तरी स्वत:विषयीचे खास तुमचे जे मत आहे तेच तुम्ही खरे धरून चालणार, त्यापलीकडे जाणार नाही. विचार करणार नाही. देवाने तुमच्यासाठी कितीही उत्तम, अद्भुत योजना केल्या असल्या तरी त्यात तुमचे सहकार्य नसेल तर त्यातील एकही योजना फलद्रूप होणार नाही.

*देव जे सांगतो त्यावर तुम्ही विश्वास ठेवणे गरजेचे आहे.*

## देवाचे तुमच्याविषयीचे मत स्वीकारा, मान्य करा

छळणुकीच्या विखारातून तुम्हांला पूर्वपदावर यायचे असेल तर तुम्ही तुमच्याविषयी इतरांची जी मते आहेत ती ऐकू नका, त्यांना वाव देऊ नका. कारण गतकाळात तुमचा ज्यांनी छळ केला, ज्यांनी गैरवागणूक दिली त्या लोकांच्या आधारे स्वत:चे मूल्यमापन करू नका. लक्षात ठेवा, स्वत:ला क्षुल्लक, कस्पटासमान समजणारे लोकच तुमच्यात काही दोष, अवगुण काढण्याचा प्रयत्न करतात. आपल्यापेक्षा हा माणूस हीन, खालच्या दर्जाचा आहे असे म्हटल्याने त्यांची पातळी थोडी उंचावते म्हणून ते असे करतात. पण हा मुळात तुमचा नव्हे तर त्यांचा प्रश्न आहे हे कधी विसरू नका.

प्रभू येशूवर विश्वास ठेवणाऱ्या कोणालाही तो स्वत: अगर त्याचा स्वर्गीय पिता कधीही सोडणार नाही, टाकणार नाही असे वचन त्याने दिले आहे (पाहा योहान.३:१८). आपला पुत्र येशू ख्रिस्त याजवरील तुमच्या विश्वासामुळे देव तुमचा स्वीकार करतो म्हणून तुम्हीही स्वत:ला नाकारण्याचे सोडून द्या. निकोप, निरोगी होण्याच्या दिशेने पुढे चाला.

कदाचित तुम्ही स्वत:ला पूर्णपणे नाकारीत नसाल तर तुमच्यामधील तुम्हांला न आवडणारा भागच तुम्ही नाकारीत असाल. माझ्या बाबतीत सांगायचे तर मी माजे व्यक्तिमत्व नाकारले. मी पूर्ण वेळ सेवा करावी ही देवाची इच्छा आहे, माझ्या जीवनावर त्याचा हक्क आहे हे मला समजले नाही. देवाने माझ्यासाठी जे कार्य नेमले होते ते करण्यास उपयुक्त अशीच त्याने माझी मूळ स्वभावरचना केली होती हेही मला कळले नाही.

अर्थात माझे व्यक्तित्व बिघडलेले होते, कारण मी इतकी वर्षे सोसलेला छळ, मला पवित्र आत्म्याच्या सहाय्याची मार्गदर्शनाची गरज होती. तरीपण माझे व्यक्तित्व तेच मुळात देवाने माझ्यासाठी निवडलेले होते. तथापि ही वस्तुस्थिती मला समजली नाही. मला वाटले की, मी सर्वस्वी वेगळे होणे आवश्यक आहे. दुसऱ्या कोणासारखे तरी व्हावे हाच माझा सततचा प्रयत्न होता. पण देवाची माझ्यासाठी तशी इच्छा नव्हती, तसेच तुम्ही दुसऱ्या कोणासारखे व्हावे असे तो मुळीच सांगत नाही.

देव तुम्हांला सहाय्य करील, मुळात तुम्ही जे व जसे व्हावे म्हणून नेमले होते, तसे होणयस तो मदत करील. तुमची सर्व शक्ती तो सेवेसाठी कारणी लावली. परंतु दुसऱ्या कोणासारखे होण्याचे तुमच्या प्रयत्नांना यश मिळू देणार नाही.

## आत्म्याच्या नियंत्रणाखाली असलेला स्वभाव

कदाचित तुम्ही दुसऱ्या एखाद्या व्यक्तीला एखादा मित्र अगर आध्यात्मिक नेता - मार्गदर्शक पाहिले असेल. ''लोकांनी असेच असले, झाले पाहिजे'' अगर ''जी सर्वांना आवडते, प्रत्येकजण जिला मान देतो'' असे तुम्हांला वाटले असेल, आणि नकळतपणे त्या व्यक्तीसारखे व्हावे यासाठी तुम्ही प्रयत्न केले असतील.

दुसरे लोक आमच्यासाठी उत्तम आदर्श, उदाहरणे असू शकतील, होतील यात शंकाच नाही. आपण अगदी लक्षपूर्वक त्यांच्या चांगल्या गुणांचे अनुकरण केले तरीही आमच्यामधील त्या विशिष्ट चांगल्या ‘‘गुणांवर’’ आमच्या व्यक्तित्वाची छाप पडलेली असणारच.

माझे व्यक्तित्व धीट, सरळ, रोखठोक, सर्व सूत्रे स्वत:कडे घेणारे असे आहे. माझ्या जीवनासाठीची देवाची इच्छा पूर्ण व्हावी यासाठी त्याने मला त्या प्रकारचा स्वभाव दिला आहे. त्यामुळेच मला त्याची सेवा करण्यास सहाय्य मिळते आहे. तथापि, कितीतरी वर्षे मी अगदी धडपड, संघर्ष करीत वैफल्यग्रस्त होऊन जगत होते. कारण मी अधिक मवाळपणे, शांत, सौम्यपणे लोकांशी मधुरपणे वागण्याची खटपट करीत होते. आक्रमक भूमिका घेऊन ठामपणे बोलू नये हाच माझा निकराचा प्रयत्न होता.

माझा नवरा, माझ्या पाळकांची पत्नी आणि दुसरे अनेक मित्रमैत्रिणी ह्यांचे अनुकरण करण्याची माझी खटपट होती, कारण या सर्व व्यक्ती माझ्या आदरास व प्रशंसेस पात्र होत्या. तेव्हा माझे हे सर्व प्रयत्न फसले त्यात काहीच आश्‍चर्य नाही. परिणामी माझी खिन्नता, वैफल्याची भावना अधिक वाटली. माझे कोणाशी पटेना, कोणाचे मला पटेना. दुसऱ्यांसारखे होण्याचा नाद सोडून माझ्याच व्यक्तित्वाचा उत्तम विकास करणे जरुरीचे आहे हे मला शिकावे लागले. होय, माझ्यात बदल होणे आवश्यक होते. मला आत्म्याचे फळ अधिक प्रमाणात हवे होते. विशेषत: ममता, सौम्यता, दया, लीनता यांची मला गरज होती. कारण मी अधिक कठोर, परखड बोलणारी उद्धट होते. पण देवाने मला दिलेला मूलभूत स्वभाव स्वीकारण्यास मी शिकले आणि मग पवित्र आत्म्याच्या कार्याला माझ्यामध्ये वाव देणे मला शक्य झाले. त्याने स्वत:च्या इच्छेनुसार माझ्यामध्ये बदल केला.

दुसऱ्यांचे अनुकरण करण्याचा खटाटोप आम्ही एकदा का सोडून दिला की मग पवित्र आत्मा आमच्या क्षमतेचा उपयोग करून आमच्या अशक्तपणावर नियंत्रण ठेवतो. मग आमच्यामध्ये ‘‘आत्म्याने चालवला जाणारा स्वभाव’’ विकसित होतो. या स्वभावाचे वर्णन गलती.५:२२-२५ मध्ये केले आहे.

> आत्म्याच्या द्वारे निष्पन्न होणारे फळ : प्रीती, आनंद, शांती, आनंद, सहनशीलता, ममता, चांगुलपणा, विश्‍वासूपणा, सौम्यता, इंद्रियदमन हे आहे. अशांविरुद्ध नियमशास्त्र नाही.
>
> जे ख्रिस्त येशूचे आहेत त्यांनी विकार व वासना यांच्यासह देहस्वभाव वधस्तंभावर खिळला आहे.
>
> आपण जर आत्म्याच्या सामर्थ्याने जगतो तर आपण आत्म्याच्या प्रेरणेनेच चालावे.

अखेर मी स्वत:ला स्वीकारण्यास, स्वत:वर प्रीती करण्यास शिकले त्याला आता बरीच वेर्ष झाली आहे. मी स्वत:ला नाकारणे, स्वत:चा द्वेष करणे हे केव्हाच सोडून दिले आहे. आत्म्याकडून चालवला जाणारा स्वभाव विकसित करण्याचे रहस्य मला आता समजले आहे. प्रभूच्या सहवासात वेळ खर्च करणे व त्याच्याकडून नियमित सहाय्य घेणे हेच महत्त्वाचे आहे.

## अंतरंगातील मनुष्याला दृढ करणे, शक्ती देणे

माझ्या नैसर्गिक मनुष्यामध्ये अद्याप दुर्बपण, अशक्तपण आहे. परंतु जोपर्यंत मी प्रभूमध्ये राहते, सर्वप्रथम त्याच्याकडे पाहते, तोपर्यंत मला आवश्यक ती शक्ती तो सतत पुरवीत आहे. त्यामुळे मला माझे दुबळेपण बाजूस ठेवून क्षमतेने कार्य करता येते.

प्रेषित पौलाने प्रार्थना केली आहे की, विश्वासणाऱ्यांनी ''अंतर्यामी बलवान'' व्हावे, आणि पवित्र आत्म्याने आमच्या अंतरंगात व व्यक्तित्वामध्ये वसती करावी.

> ह्या कारणास्तव स्वर्गातील व पृथ्वीवरील प्रत्येक वंशास ज्या पित्यावरून नाव देण्यात येते, त्या पित्यासमोर मी गुडघे टेकून अशी विनंती करितो की, त्याने आपल्या ऐश्वर्याच्या समृद्धीप्रमाणे तुम्हांला असे दान द्यावे की, तुम्ही त्याच्या आत्म्याच्या द्वारे अंतर्यामी बलसंपन्न व्हावे. ख्रिस्ताने तुमच्या अंत:करणामध्ये तुमच्या विश्वासाच्या द्वारे वस्ती करावी, ह्यासाठी की, तुम्ही प्रीतीत मुळावलेले व पाया घातलेले असे असून तिची रूंदी, लांबी, उंची व खोली किती हे तुम्ही सर्व पवित्र जनांसह समजून घ्यावयास व बुद्धीस अगम्य अशी ख्रिस्ताची प्रीती ओळखून घ्यावयास शक्तिमान व्हावे; असे की, तुम्ही देवाच्या सर्व पूर्णतेइतके परिपूर्ण व्हावे (इफिस.३:१६-१९).

खुद्द देवाच्या समक्षतेने आमच्या ''अंतर्यामी'' बलसंपन्न व्हावे हीच आमची मोठी गरज आहे. देवाने पौलाला सांगितले आहे : ''माझी कृपा (प्रेमदया, ममता) तुला पुरे आहे [कोणताही धोका पत्करण्यास, धीराने संकटे सोसण्यास पुरेशी आहे], कारण (तुझ्या) अशक्तपणातच माझी शक्ती पूर्णतेस येते'' (२ करिंथ.१२:९).

आमच्या अशक्तपणामध्ये देवाची शक्ती परिपूर्ण होते. म्हणजेच आम्ही एखाद्या बाबतीत अशक्त, दुर्बल असलो तर त्या कारणाने स्वत:चा द्वेष करण्याचे अगर स्वत:ला नाकारण्याचे काहीच कारण नाही. आमचे अशक्तपण, दुबळेपण कबूल करून त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी पवित्र आत्म्याला विनंती करण्याचा विशेष हक्क पौलाप्रमाणे आम्हांलाही आहे.

कठोरपणे टाकून बोलणे, उपहास करणे ही प्रवृत्ती अद्यापही माझ्या देहस्वभावात आहे. तथापि, प्रभूची कृपा, शक्ती आणि सामर्थ्य यांच्या द्वारे मला ''पवित्र आत्म्याचे फळ''देता येते. तसेच मला सहनशील, समंजस, सौम्य व दयाळू, ममताळू होता येते.

माझे कधीच चुकत नाही असा याचा अर्थ नाही. इतर प्रत्येकाप्रमाणे मीही चुकते, चुका करते. पण प्रभूकडून स्वीकार व्हावा, मान्यता, प्रीती व सहाय्य मिळावे यासाठी मला परिर्पूण असण्याची काही गरज नाही हे आता मला समजले आहे आणि तुम्हांलाही असे परिपूर्ण असण्याची गरज नाही.

देव तुमच्यासाठी, तुमच्या पक्षाचा आहे. तुम्ही तुमच्या स्वत:च्या पक्षाचे असावे ही त्याची इच्छा आहे. सैतान तर तुमच्या विरोधात आहे, आणि तुम्ही स्वत: तुमच्या स्वत:च्या विरोधात राहावे ही त्याची इच्छा आहे.

तुम्ही कसे आहात? स्वत:च्या पक्षाचे आहात की स्वत:च्या विरोधात आहात? देवाने तुमच्या जीवनासाठी केलेल्या योजनेत तुमचे सहकार्य आहे का नाही? का तुम्ही सैतानाने तुमच्यासाठी केलेल्या योजनेमध्ये सहभागी आहात?

## त्या प्रियामध्ये स्वीकारलेले

देवाने आम्हांला स्वत:ची प्रिय, दत्तक मुले म्हणून स्वीकारले आहे, त्याने आम्हांला आपले स्वत:चे म्हणून वेगळे केले आहे.

> आपल्या प्रभू येशू ख्रिस्ताचा देव व पिता धन्यवादित असो, त्याने स्वर्गातील सर्व आध्यात्मिक आशीर्वाद देऊन आपल्याला ख्रिस्तामध्ये आशीर्वादित केले आहे.
>
> त्याप्रमाणे आपण त्याच्या समक्षतेत पवित्र व निर्दोष असावे म्हणून त्याने जगाच्या स्थापनेपूर्वी आपल्याला ख्रिस्ताच्या ठायी निवडून घेतले; त्याने आपल्या मनाच्या संकल्पाप्रमाणे आपल्याला येशू ख्रिस्ताच्या द्वारे स्वत:चे दत्तक होण्याकरिता प्रेमाने पूर्वीच नेमिले होते.
>
> त्याच्या कृपेच्या गौरवाची स्तुती व्हावी म्हणून हे झाले. ही कृपा त्याने आपल्यावर त्या प्रियकराच्या ठायी विपुलतेने केली आहे (इफिस.१:३-६).

''तुम्ही सर्व लोकांपेक्षा माझा स्वत:चा खास निधी'' आहात असे परमेश्वराने आपल्या लोकांना सांगितले आहे (निर्गम १९:५). हा शब्द इस्राएलाच्या संतानाला तेव्हा होता तसा आपणाला आज लागू आहे. येशूवर विश्वास ठेवणाऱ्या कोणालाही कधी नाकारले जाणार नाही, दोषी ठरवले जाणार नाही असे येशूने निकदेमाला सांगितले आहे (योहान.३:१८ पहा). कदाचित तुम्हांला वाटेल आपण कोणी खास विशेष नाही. स्वीकारण्याजोगे पण नाही. तथापि, ख्रिस्तावर विश्वास ठेवणाऱ्या आम्हा सर्वांना त्या ''प्रियकराच्या ठायी स्वीकारलेले आहे'' असो पौल सांगतो (पाहा इफिस.१:३-६). यामुळे आपणाला वैयक्तिक मूल्याची व महत्त्वाची जाणीव व्हावी.

मला आठवते, एकदा प्रार्थनेसाठी मी रांगेत उभी होते. माझ्यापुढे असलेली एक स्त्री पाळकांना सांगत होती ते मी ऐकले. ती म्हणाली, ''मी स्वत:चा अतिशय द्वेष आणि तिरस्कार करते, माझा मलाच कंटाळा आला आहे.'' पाळकांनी तिचे ऐकले आणि जोरदार रोखठोक शब्दात तिला सुनावले, तिची चांगली कानउघडणी केली. ते कडक स्वरात तिला बोलले, ''तुम्ही स्वत:ला कोण समजता? आपला स्वत:चा द्वेष, तिरस्कार करण्याचा तुम्हांला अजिबात अधिकार नाही. तुमच्यासाठी आणि तुमच्या स्वातंत्र्यासाठी देवाने फार मोठी किंमत दिली आहे. तुमच्यावर त्याची एवढी प्रीती आहे की, त्याने आपला एकुलता एक पुत्र तुमच्यासाठी मरण सोसावे म्हणून म्हणून पाठवला. तुमच्या ऐवजी, तुमच्यासाठी त्याने दु:ख क्लेश

सोसले. आपला द्वेष करण्याचा अगर स्वत:ला नाकारण्याचा कोणताच हक्क तुम्हांला नाही. तुम्हांल जे द्यावे म्हणून येशू मरण पावला ते तुम्ही स्वीकारावे एवढेच तुमचे काम आहे.''

हे ऐकून ती स्त्री अगदी चकित झाली. मीही चकित झाले. नुसते बोलणे ऐकूनच मला धक्का बसला. परंतु सैतानाने आमच्यासाठी मांडलेल्या सापळ्यात अडकू नये यासाठी केव्हा केव्हा असे रोखठोक बोलण्याची गरज पडतेच पडते.

स्वत:ला नाकारणे आणि स्वत:चा द्वेष करणे हे एका अर्थी अगदी सरळ सात्विक धार्मिकतेचे लक्षण समजले जाते. या प्रकारे आम्ही आमच्या चुका, अपयश, अक्षमता याबद्दल स्वत:ला शासन करून घेतो. आम्हांला परिपूर्ण होणे शक्य नाही म्हणून आम्ही स्वत:ला नाकारतो, स्वत:चा तिरस्कार करतो.

यशया ५३:३ मधील या भविष्यसूचक शब्दांवर मनन करा. हे शब्द प्रभू येशू ख्रिस्ताला उद्देशून आहेत : ''तो धिक्कारलेला व मनुष्यांनी टाकलेला, दु:खचाचा पुरुष व दुखण्याची ओळख असलेला होता. आणि ज्याच्यापासून लोक आपले मुख झाकतात असा तो तुच्छ मानलेला होता; आणि आम्ही त्याला मानले नाही'' (पं. रमाबाई अनुवाद).

तुमचे स्वत:चे मोल आणि महत्त्व तुम्हांला पटत नाही? माहीत नाही? त्याची जाणीवही नाही? लक्षात ठेवा, तुम्ही नक्की मूल्यवान, महत्त्वाचे आहात. म्हणूनच आपल्या स्वर्गीय पित्याने तुमच्या उद्धारासाठी एवढी भरपूर किंमत दिली आहे.

यशया ५३:४-५ मध्ये पुढे सांगितले आहे : ''खरोखर आमचे व्याधि त्याने आपल्यावर घेतले, आमचे क्लेश त्याने वाहिले; तरी त्यास ताडण केलेले, देवाने त्याजवर प्रहार केलेले व त्याला पीडलेले असे आम्ही त्याला लेखले. खरे पाहिले असता तो आमच्या अपराधांमुळे घायाळ झाला. आमच्या दुष्कर्मांमुळे ठेचला गेला, आम्हांस शांती देणारी अशी शिक्षा त्यास झाली; त्यास बसलेल्या फटक्यांनी आम्हांस आरोग्य प्राप्त झाले.''

आरोग्यप्राप्तीची, रोगमुक्तीची ही योजना येशूने आपल्या रक्ताने विकत घेऊन सिद्ध केली आहे. विश्वासाने स्वीकारणाऱ्या सर्वांना ती उपलब्ध आहे. या योजनेमध्ये देहाच्या आरोग्याबरोबर मनाचे आरोग्य राखण्याचीही व्यवस्था आहे. एखाद्याने काही गुन्हा अपराध केला तर त्याला नाकारणे, हेटाळणे व दोषी ठरवून शासन करणे हे न्यायाला अनुसरून आहे. तथापि, येशूने आमची पापे स्वत: वाहिली, त्याप्रमाणे पापांचा दंड आणि शिक्षाही स्वत: भोगली आहे. किती हे दिव्य, तेजस्वी सत्य!

येशूने वधस्तंभावर तुमची आमचे पापे वाहून नेली, सोसली आणि त्याबरोबर पापांचा द्वेष नाकार आणि दोषापराध व शिक्षा हे सर्व सोसले म्हणून आता तुम्हांला स्वत:ला नाकारण्याचे अथवा द्वेष करण्याचे काहीच कारण नाही.

आमच्या सेवाकार्याचा आरंभ केला तेव्हा पहिल्याच दिवशी मी देवाला विचारले, ''आमच्या पहिल्या सभेमध्ये मी काय शिकवू? तुझी काय इच्छा आहे?

देवाने म्हटले, ''तू माझ्या लोकांना सांग की मी त्यांच्यावर प्रीती करतो.''

त्यावर मी म्हटले, ‘‘तसे नाही, पण मला शक्तीसामर्थ्याचा संदेश हवा!’’ होय, मी तेव्हा अगदी हेच शब्द उच्चारले, मला त्या घटकेला देवाची शक्तिशाली स्त्री व्हायचे होते. लोक आश्चर्यचकित होतील असा दिव्य संदेश द्यावा, लोकांना देवाचे प्रकटीकरण दाखवावे हीच माझी तीव्र इच्छा होती. मी पुढे म्हटले, ‘‘तू लोकांवर प्रीती करतोस हे प्रत्येकाला माहीत आहे. मी तिकडे जाऊन योहान.३:१६ या वचनांवर उपदेश करू का?’’

त्याने म्हटले, ‘‘तू म्हणतेस तसे नाही. मी त्यांच्यावर प्रीती करतो हे माझ्या लोकांपैकी अगदी थोड्या लोकांना माहीत आहे. हे त्यांना माहीत असते तर ते आतापेक्षा अगदी वेगळ्या रीतीने वागले असते.’’

पवित्र शास्त्र सांगते, ‘‘प्रीतीच्या ठायी भय नसते. इतकेच नव्हे तर पूर्ण प्रीती भीती घालवून देते, भीतिमध्ये शासन आहे आणि भीति बाळगणारा प्रीतिमध्ये पूर्ण झालेला नाही. पहिल्याने त्याने आपणांवर प्रीती केली म्हणून आपण त्याच्यावर प्रीती करतो’’ (१ योहान.४:१८-१९). देवाचे आपल्यावर किती प्रेम आहे हे त्याच्या लोकांना समजले तर ते भयभीत होणार नाहीत. त्यांना देवाची प्रीती कळली, उमजली तर ते त्याच्यापासून पळ काढणार नाहीत. तर उलट धावतपळत त्याच्याकडे, त्याच्याजवळ जातील.

हे शिक्षण मिळाल्यावर पुढे एक वर्षभर मी देवाच्या प्रीतीचे चिंतन मनन करीत होते. सतत, जातायेता, प्रवासात, मोटार चालवताना नेहमी मनात म्हणत असे : ‘‘देव माझ्यावर प्रीती करतो. देवाचे माझ्यावर प्रेम आहे, विश्वाचा निर्माणकर्ता माझ्यावर प्रीती करतो.’’ याप्रमाणे ‘‘देवाची प्रीती’’ याच विषयावर एक वर्षभर लक्ष लावून मी माझे पहिले पुस्तक ‘‘टेल देम आय लव्ह देम’’ (त्यांना सांगा, मी त्यांच्यावर प्रीती करतो) लिहून प्रसिद्ध केले.

देव आपल्यावर प्रीती करतो हे एकदा तुम्हांला नीटपणे समजले की मग तुम्हांला स्वत:वर समतोल प्रकारे प्रेम करता येईल. आरशात स्वत:कडे पाहा आणि स्वत:ला सांगा : ‘‘देव तुझ्यावर प्रीती करतो.’’ स्वत:ला घ्या, स्वीकार करा. स्वत:च स्वत:चे स्वागत करा आणि वारंवार स्वत:ला बजावून सांगा : ‘‘मी तुझा (स्वत:चा) स्वीकार करतो.’’

‘‘तू आपला देव परमेश्वर ह्याच्यावर संपूर्ण मनाने, संपूर्ण जिवाने, संपूर्ण बुद्धीने व संपूर्ण शक्तीने प्रीती कर,’’ एवढे सांगून येशू पुढे म्हणाला, ‘‘जशी स्वत:वर तशी आपल्या शेजाऱ्यावर प्रीती कर. ह्यापेक्षा मोठी अशी दुसरी कोणतीही आज्ञा नाही’’ (मार्क.१२:३०-३१). तुमचं स्वत:शीच पटत नसेल, तुम्हांला स्वत:वर प्रीती करता येत नसेल तर तुमचे दुसऱ्या कुणाशीही पटणे कठीण आणि दुसऱ्यावर-शेजाऱ्यावर प्रीती करणे तर अशक्यच होईल. देवाच्या आरोग्यदायी कृपेला तुमच्या जीवनामध्ये कार्य करू द्या.

देव तुमच्यावर प्रीती करतो याचे पुन्हा स्मरण व्हावे म्हणून केव्हा तरी स्वत:च स्वत:ला जवळ घ्या, कवटाळा. देवाची तुमच्यावर प्रीती आहे तेव्हा निश्चितच तुम्ही प्रेमास पात्र आहात. आपले हात स्वत:भोवती वेढून असे म्हणा, ‘‘मी आता मला स्वत:ला नाकारीत नाही. उलट मी ख्रिस्तामध्ये स्वत:चा स्वीकार करतो. मी माझ्या स्वत:वर स्वार्थीपणाने नव्हे,

तर समतोल प्रकारे प्रीती करतो. मी परिपूर्ण नाही पण प्रभूच्या सहाय्याने दररोज माझ्यामध्ये सुधारणा होते आहे.''

## दुसऱ्यांनी नाकारले तर काय?

केव्हा ना केव्हा, आता अगर नंतर कोणत्या तरी स्वरूपात नाकारले गेल्याचा अनुभव तुम्हांला येईलच. तुम्ही प्रत्येकालाच आवडाल असे नाही. काही लोक तर हिरीरीने तुमचा तिरस्कार करतील. तेव्हा या संबंधात तुम्ही परिपक्व, विचारी दृष्टीकोन ठेवणे फारच अगत्याचे आणि हिताचे व उपयुक्त आहे.

येशू ज्ञानाने, शरीराने आणि देवाच्या व माणसांच्या कृपेत वाढत गेला (लूक.२:५२). हे आपणाला माहीतच आहे. माझ्या बाबतीत सांगायचे तर देव आणि लोक यांची कृपा मला मिळावी हेच माझे मागणे आहे, आणि देव माझी ही विनंती मान्य करतो. तुम्हीही असेच करावे हे माझे सांगणे आहे, तुमच्या अंगी ग्रहणीय गुण प्रवृत्ती यावी यासाठी पुढीलप्रमाणे प्रार्थना करावी :

***हे प्रभू आज तुझ्या सहाय्याने, तुझ्या गौरवासाठी मी अगदी मनापासून उत्तम तेच करणार आहे. या जगात नाना प्रकारचे लोक आहेत, त्यांची मते, विचार व अपेक्षा वेगवेगळ्या आहेत हे मला माहीत आहे. त्या सर्वांना नेहमी खूष करणे मला शक्य होईल असे वाटत नाही. तेव्हा मी स्वतःला अगर लोकांना खूष करणारा नव्हे, तर देवाला संतोष देणारा होण्याकडे सर्व लक्ष लावणार आहे. बाकी सर्व मी तुझ्या हाती सोपवून देतो. मला तुझी कृपा मिळू दे. लोकांची मर्जी मिळावी असे होऊ दे आणि तुझ्या प्रिय पुत्राच्या प्रतिमेप्रमाणे माझे रूपांतर करण्याचे कार्य सतत सुरू असू दे. हे प्रभू मी तुझे आभार मानतो.***

आपणाला नाकारले म्हणून कोणाला बरे वाटत नाही या कारणाने कोणी कधी आनंद करीत नाही. पण नाकारले जाण्याकडे समतोल दृष्टीने पाहणे व आपला जीवनक्रम चालू ठेवणे हे आपणा सर्वांनाच अशक्य आहे. लोकांनी येशूलाही नाकारले, तिरस्काराने त्याला झिडकारले हे आपण कधी विसरू नये. देवाने त्याच्या जीवनासाठी केलेल्या योजनेप्रमाणे वागूनवर्तून त्याने नाकारले जाण्यावरही विजय मिळवला.

दुसऱ्या लोकांच्याकडून नाकारले गेल्याने आमच्या भावना दुखावल्या जातात. त्याचे दु:ख असह्य होते, पण आपण स्वत:साठी धीर सोडू नये. नेहमी लक्षात ठेवावे की, आपण नव्याने जन्मलेले आहोत, तर सहाय्यक, कैवारी (पवित्र आत्मा) आमच्यामध्ये राहतो. तोच आम्हांला आधार देऊन शक्ती पुरवतो व आमचे समाधान करतो.

लोकांच्याकडून होता होईल तो नाकारले जाऊ नये यासाठी आपण पुष्कळ खटपट करतो, आणि त्यात आपला बहुमोल वेळ व शक्ती वाया घालवतो असे मला वाटते. असे केल्याने आम्ही ''माणसांना खूष करणारे'' होतो (पाहा इफिस.६:६; कलस्सै.३:२२). आपण इतर सर्वांना, प्रत्येकाल खूष ठेवले तर ते आम्हांला नाकारणार नाहीत असे आपण म्हणतो.

त्रास आणि दु:ख टाळण्यासाठी आमच्यापैकी काहीजण स्वत:भोवती भिंती बांधतात. आता काही धोका नाही असे त्यांना वाटते पण हे निरर्थक आहे. दु:ख, त्रास सोसण्याची तयारी नसेल तर या जगात राहणे शक्य नाही हे देवाने मला दाखवले आहे. लोक परिपूर्ण नसतात म्हणूनच ते आम्हांला त्रास देतात व निराश करतात आणि आम्हीही दुसऱ्यांना त्रास देतो व निराश करतो.

माझे पती अगदी चांगले आहेत. पण केव्हा केव्हा त्यांनीही मला त्रास दिला आहे, दुखावले आहे. पण मुळातच मी लहानपणापासून पुष्कळ छळ सोसला आहे तेव्हा नवऱ्याकडून दुखावले जाण्याचा प्रसंग येताक्षणी मी स्वत:चे रक्षण करण्यासाठी स्वत:भोवती तटबंदी उभारीत असे. याता माझा विचार असा होता की, ''मी कोणालाही माझ्याजवळ, निकट येऊ दिले नाही म्हणजे झाले. मग कोणीच मला दुखावणार नाही, त्रास देणार नाही, पण मी दुसऱ्यांना तटाच्या बाहेर ठेवले तर स्वत:ला आत बंदिस्त केलेले असते हे मी शिकले.

प्रभूच माझा रक्षणकर्ता आहे तोच मला सुखरूप ठेवणार हे त्याने मला दाखवले आहे, पण मीच माजे रक्षण करण्यात गुंतून राहिले तर तो माझे रक्षण करीत असे. कशाला करणार? ते शक्य नाही हे प्रभूने मला दाखवले आहे. मला कधीच त्रास, पीडा होणार नाही असे त्याचे अभिवचन नाही. पण सर्व गोष्टींकडे माझे मीच न पाहता त्याच्याकडे सहाय्य मागितले तर माझी काळजी घेण्याचे अभिवचन त्याने दिले आहे.

परंतु भयापोटी तुम्ही आपणा स्वत:भोवती अशा संरक्षक भिंती बांधल्या तर तुम्ही त्या विश्वासाने जमीनदोस्त केल्या पाहिजेत. प्रत्येक जुनी जखम घेऊन येशूकडे जा. त्याच्या रोगमुक्त करण्याच्या कृपेचा स्वीकार करा. तुम्हांली कोणी नव्याने दुखावले, प्रहार केले तर ती नवी जखमही येशूकडे न्या. ती तशीच चिघळू देऊ नका. ती प्रभूकडे न्या. प्रभू सुचवील त्याप्रमाणे उपाय करण्यास तयार असा. तुमच्या मनाने काही करू नका.

प्रभूचे खास तुमच्यासाठी वैयक्तिक अभिवचन म्हणून पुढील शास्त्रवचन स्वीकारा : ''मी तर तुला आरोग्य देईन व तुझ्या जखमा बऱ्या करीन, असे परमेश्वर म्हणतो; कारण त्यांनी

म्हटले आहे की, हिला टाकून दिले आहे, ही सीयोन! हिला कोणी विचारीत नाही!'' (यिर्मया ३०:१७).

स्तोत्रकर्त्याच्या सुरात सूर मिळवून तुम्हीही उत्कटपणे म्हणा : ''माझ्या आईबापांनी मला सोडले तरी परमेश्वर मला जवळ करील'' (स्तोत्र.२०:१०).

प्रभूच्या सहाय्याने लोकांच्या नाकारण्यापासून तुम्ही निभावून जाल आणि त्याच्यामध्ये तुम्हांला परिपूर्णता लाभेल.

# 12

# नाकारले जाण्याने नातेसंबंधात बिघाड

ज्यांच्या जीवनात अंतरंगात नाकारले, धिक्कारले जाण्याचे बीज अंकुरले आहे त्यांना त्यांच्या नातेसंबंधातही अडचणी येतात : निकोप, प्रेमळ, टिकाऊ नातेसंबंध जोडण्यासाठी, राखण्यासाठी कोणीही नाकारले जाण्याची भीती बाळगता कामा नये. जेव्हा हे भय एखाद्याच्या जीवनात सर्वत्र व्यापून राहते तेव्हा असा माणूस निकोप नातेसंबंध जोडण्याऐवजी नाकारले जाणे टाळण्यातच आपली शक्ती आणि वेळ खर्च करील.

जीवनात प्रत्येकालाच केव्हा ना केव्हा नाकारले जाण्याचे क्षण अनुभवावे लागतात. ते अपरिहार्य आहे. प्रत्येकालाच उपेक्षा सोसावी लागते. पण हे नाकारणे, ही उपेक्षा तीव्र, मागे खुणा उरण्याएवढी तीव्र असेल तर अशा व्यक्तीचे इतरांशी असलेले नातेसंबंध तर बिघडतातच, पण देवाबरोबरचे त्याचे नातेही सरळ राहत नाही.

अशा व्यक्तीला वाटेल की लोक आपल्यावर काही अटींवर प्रीती करतात. दुसऱ्यांचे प्रेम आपण संपादन केले आहे असा ग्रह झाल्याने तो दुसऱ्यांना संतोष देण्यातच आपली शक्ती खर्ची घालील. त्यांना संतोष दिला नाही तर ते त्याच्यावर प्रेम करणार नाहीत. त्याला नाकारतील अगर टाकतील असे त्याला भय वाटते.

अशा अनुभवांच्या त्रासदायक आठवणी मनात घर करून राहिल्या तर अनेकदा नातेसंबंधात वैयक्तिक मोकळेपणा उरत नाही. ज्यांना नाकारले जाण्याचे भय वाटते, त्यातून आपण एकाकी पडून अखेर टाकले जाऊ असे वाटते असे लोक अखेरीस दुसऱ्यांच्या तालावर नाचणारे होतात. कार्यकृतीवरूनच स्वीकार होतो अशी समजूत करून घेतल्याने त्यांच्यासमोर होण्याअसण्यापेक्षा करीत राहणे हाच एक पर्याय उरतो. आपण आहोत तसे कोणाला आवडत नाही याचीच धास्ती घेऊन ते ढोंग करीत जगातत. त्यांना ज्यांचा तिटकारा

येतो असे लोक आवडतात असा बहाणा करतात. जिकडे जाणे, जे करणे आवडत नाही तिकडे जाण्यात, ते करण्यात खूप आनंद वाटतो असे ते दांभिकपणे बोलतात. सर्व काही बिघडलेले असताना सर्व काही चांगले आहे असा बहाणा करतात. असे लोक सतत दु:खाक्लेशात जगतात, कारण जीवनातील खऱ्या कळीच्या प्रश्नांना सामोरे जाण्याएवढे धैर्य त्यांच्याठायी नसते. ते सतत भीतीच्या छायेत वावरतात.

## सर्व ढोंगबाजी! केवळ बहाणा आणि बतावणी

नाकारले जाण्याच्या भयाने ग्रासलेले लोक समजतात की, आपण कोणालाच प्रिय होणार नाही, तेव्हा आपले मोल महत्त्व दुसऱ्यांना पटवून देण्यासाठी ते जगाच्या मानदंडांचा म्हणजे पैसा, प्रतिष्ठा, कपडे, डामडौल, बुद्धी, कलाकौशल्य वगैरेंचा आधार घेतात. हे लोकही दु:खीकष्टी असतात. कारण आपले मोल महत्त्व पटवून देण्यासाठी त्यांना सतत धडपड, खटपट करावी लागते.

एखाद्याला बाहेरच्या जगात, लोकांसमोर कितीही यश प्रतिष्ठा मिळाली असली तरीही आपण ख्रिस्तामध्ये आहोत हे ज्याला समजत नाही तोपर्यंत तो खरोखर यशस्वी नसतोच. फिलिप्पै.३:३ पाहा : तेथे असा बोध केला आहे. आपण येशू ख्रिस्ताविषयी अभिमान बाळगावा, त्याच्यामध्ये उत्कट आनंद घ्यावा. आम्ही जे आहोत त्यावर म्हणजे देहावर, देहस्वभावावर आणि बाह्य हक्कांवर, शारीरिक बलावर व बाह्यरूपांवर भरंवसा ठेवू नये (विस्तारित अनुवाद).

नाकारले जाण्याच्या धास्तीने सतत गांजलेला माणूस कोणी मुक्तपणे प्रीती देऊ केली तरी ती स्वीकारू शकत नाही. आपण काही चांगले केले आहे, पात्र ठरलो आहोत अशी खात्री वाटली तरच असा माणूस प्रीतीचा स्वीकार करू शकतो.

एक स्त्री मला आठवते. ती मी व माझे पती यांच्यासाठी काम करीत असे. ‘‘नीट काम केले तर स्वीकार, नाहीतर नाकार’’ अशा वातावरणात ती वाढली होती. शाळेत तिची प्रगती चांगली असली की तिचे वडील तिला प्रेमाने शाबासकी देत, पण त्यांच्या अपेक्षेप्रमाणे प्रगती झाली नाही तर ते तिच्याशी प्रेमाने वागत नसत. आपल्या मुलीशीच नव्हे तर घरातील प्रत्येकाबरोबर ते याच प्रकारे वागत. त्यावरून तिने समजून घेतले की, योग्य, नीट, पूर्ण काम केले तरच प्रेम हे बक्षीस मिळते. कामात चुका केल्या तर प्रेम न मिळणे ही शिक्षा घ्यावी लागते.

बहुतेक लोकांप्रमाणे आपले हे विचार, या भावना चुकीच्या आहेत हे तिलाही उमजले नाही. ती मोठी झाली. सर्व प्रकारचे नातेसंबंध याच सूत्राने चालतात हे तिने गृहीत धरले होते. ती आमच्या सेवाकार्यात सहकारी होती म्हणून अनेकदा मला तिच्याशी बोलावे लागे, तिचे काम कसे चालले आहे, काही मागे पडले नाही ना हे विचारावे लागे. तसेच एखादे काम अवघड वाटते का, आवडते का हेही मी तिला विचारीत असे.

कामाबद्दल चौकशी केली, एखादे काम पूर्ण झाले का असे विचारले की ही स्त्री चमत्कारिकपणे वागत असे. ती माझे तोंड चुकवून निघून जाई. खाली मान घालून वावरे, माझ्याशी बोलत नसे. आणि भराभरा काम करू लागे. हे सर्व पाहून मी अस्वस्थ होई. खरे तर मीच नाकारले गेले आहे, माझी उपेक्षा झाली आहे असे वाटे.

मी तिची वरिष्ठ होते. ती माझ्या हाताखाली काम करीत होती म्हणून तिच्या कामासंबंधी विचारपूस करणे हा माझा वाजवी हक्क आहे हे मी जाणून होते. पण प्रत्येक वेळी तिने घाबरणे, थरथर कापणे का व कशासाठी तेच मला समजत नव्हते. शेवटी मी तिला स्पष्टपणे विचारले, पण त्यातून काहीच निष्पन्न झाले नाही. आमचे नातेसंबंध अधिक ताणले गेले. गोंधळ अधिकच वाढला. या समस्येचे मूळ काय आहे हे तिला आणि मला दोघांनाही उमजले नव्हते.

ही स्त्री प्रभूवर खरोखरी प्रीती करीत होती. प्रभूबरोबरचे तिचे नाते तिला फारच प्रिय होते. ती या नात्याचा गंभीरपणे विचार करीत असे. तेव्हा या परिस्थितीत प्रार्थना करावी आणि आपल्या या विचित्र वागणुकीचा अर्थ देवाला विचारावे असे तिला उत्कटतेने वाटले. अनेकदा आम्ही आपल्या गैरवर्तनाबद्दल इतरांना दोष देतो. समस्येतून सुटका व्हावी, समस्येच्या मुळाशी जाण्यासाठी प्रभूचे सहाय्य, मार्गदर्शन घेत नाही.

या स्त्रीला देवाकडून साक्षात्कार झाला. त्यामुळे तिचे संपूर्ण जीवन पालटले. तिची योग्य प्रगती झाली नाही तेव्हा तिच्या वडिलांनी तिला नाकारले, तेव्हा प्रत्येकजण असाच वागतो हे तिचे म्हणणे, समजणे चुकीचे असल्याचे प्रभूने तिला दाखवून दिले. तिला दिलेले काही काम अपूर्ण असताना मी त्याविषयी विचारपूस केली तर मी तिला नाकारले, आता मी तिच्यावर प्रेम करीत नाही असे खात्रीने वाटून ती माझ्याशी बोलणे थांबवीत असे. वास्तविक पाहता मी तिच्यावर प्रेम करणे थांबवले नव्हते तर माझे प्रेम स्वीकारणे तिनेच थांबवले होते. परिणामी मलाच नाकारले गेले आहे असे मला वाटू लागले.

प्रभूच्या संबंधातही आम्ही अनेकदा असेच वागतो. त्याची आमच्यावर प्रीती आहे आणि आम्ही काय करतो अगर करीत नाही त्यावर ती प्रीती आधारलेली नाही. रोम.५:८ पाहा. प्रेषित पौल आम्हांला सांगतो की, आम्ही पापामध्ये होतो म्हणजे आम्ही देवाला ओळखत नव्हतो, त्याच्याशी आम्हांला काही देणेघेणे नव्हते तेव्हा त्याने आमच्यावर प्रीती केली.

देवाची प्रीती नेहमी प्रवाहित-वाहत असते. तिचा स्वीकार करतात, त्यांना ती नित्य मिळते. पण माझे प्रेम घेऊ न शकणाऱ्या या आमच्या सहकारी स्त्रीप्रमाणे आम्ही अनेकदा देवाची प्रीती नाकारतो. कारण आपणाला वाटते की, आम्ही त्या प्रीतीच्या लायक नाही, आमचे कार्य अपुरे, वेडेवाकडे आहे.

## नाकारले जाण्याच्या भीतीने इतरांना नाकारले जाते

आपण प्रीतीस पात्र, मोलवान व्यक्ती आहोत यावर तुमचा विश्वास नसेल तर तुमच्यावर

प्रेम करतो असे सांगणाऱ्या दुसऱ्यांचा विश्वासही तुम्ही धरणार नाही. प्रेम मिळणे, स्वीकार होणे, यासाठी आपण परिपूर्ण असले पाहिजे असे तुम्हांला वाटत असेल तर तुमचे जीवन दु:खक्लेशमय होणार यात संशय नाही. कारण या पार्थिव देहात तुम्ही आहात तोवर तुम्ही कधीही परिपूर्ण होऊ शकणार नाही.

सर्व गोष्टींत देवाला संतोष द्यावा अशी तुमची दृढ इच्छा असेल, संपूर्ण अंत:करणाने तुम्ही हा निश्चय केला असेल. तरीपण तुमची कार्यकृती तुमच्या अंत:करणाच्या इच्छेला अनुरूप असणार नाही. इच्छा व कृती याचा यथार्थ मेळ तुम्ही स्वर्गात गेल्यानंतरच बसणार हे लक्षात घ्या. तुम्ही सतत सुधारणा कराल, परिपूर्णतेच्या दिशेने प्रगती कराल तरीपण या पृथ्वीवर असेपर्यंत तुम्हांला नेहमीच येशूची गरज भासणार. त्याची क्षमा आणि शुद्ध करणारे त्याचे रक्त यांची गरज पडणार नाही अशी वेळ येथे कधीच येणार नाही.

विश्वासाने, ख्रिस्ताच्या द्वारे तुम्ही स्वत:चे मोल व महत्त्व समजून स्वीकारणार नाही, तर तुम्ही नेहमीच डळमळीत, असुरक्षित राहाल आणि तुमच्यावर प्रीती करू पाहणाऱ्या व्यक्तींचा भरंवसा तुम्हांला धरता येणार नाही. ज्यांना दुसऱ्यांवर भरंवसा, विश्वास ठेवता येत नाही ते नेहमीच दुसऱ्यांच्या हेतूविषयी शंका घेतात; या बाबतीत मलाही मोठा प्रश्न, अडचण होती. आमचे तुझ्यावर प्रेम आहे असे इतर लोक मला सांगत तेव्हा मी आपली आता हे मला कधी, कसे दुखावणार त्याचीच वाट पाहत असे. ते मला आज ना उद्या निराश करणार, टाकणार अगर छळणार असे मला तीव्रतेने वाटत असे. यांना माझ्यातून काहीतरी हवे आहे, नाहीतर हे माझ्याशी एवढे चांगले का वागतात असा माझा ग्रह होत असे. केवळ माझ्यासाठी कोणी माझ्यावर प्रीती करील हे मला अजिबात पटत नव्हते. याचे काहीतरी वेगळेच कारण असणारच, असे मला वाटत असे.

माझा मलाच एवढा वैताग वाटत होता, एवढी लाज वाटत होती की माझ्या अंतरंगात दोषीपणाची जाणीव, आत्मद्वेष, आणि स्वत:ला नाकारणे हे पुरेपूर भरले होते. म्हणूनच जेव्हा कोणी मला प्रीतीने स्वीकारू पाहत असे तेव्हा मी मनात विचार करीत असे : या व्यक्तीला मी आता बरी, चांगली वाटते हे खरे, पण मी खरोखर कशी आहे ते समजले की हाही मला नाकारणार! म्हणूनच मला दुसऱ्या लोकांकडून अगदी देवाकडूनही प्रीती स्वीकारता येत नव्हती. माझ्या वर्तणुकीने मी प्रीतीचा रोख, दिशा झिडकारून टाकीत होते. माझी वागणूक दिवसेंदिवस असह्य, विपरीत, घृणास्पद होऊ लागली, कारण मी प्रीतीस पात्र नाही ही समजूत प्रत्यक्षात आणावी हाच माझा इरादा होता.

तुमच्या अंतरंगात स्वत:विषयी जे तुम्हांला वाटते तेच तुम्ही बाह्यात्कारी प्रगट करणार हे निश्चित. तुम्हांला आतून आपण प्रीतीस अपात्र, कुरूप, विरुप, आहोत असे वाटत असेल तर तुम्ही त्याच प्रकारे वर्तन करणार. माझ्या बाबतीत सांगायचे तर मी प्रीतीस पात्र नाही अशी माझी खात्री होती आणि मी त्याच प्रकारे वागत होते. माझे कोणाशी अजिबात पटत नव्हते.

दुसरे लोक कालांतराने मला नाकारणारच ही माझी खात्री होती. आणि ते तसे करीत. माझ्या कृतीतून माझी वृत्तीप्रवृत्ती दिसत असे, त्यामुळे मला निकोप, प्रेमळ, टिकाऊ नातेसंबंध जोडता आले नाहीत, राखता आले नाहीत.

## ''माझ्यावर तुमचे प्रेम आहे'' हे सिद्ध करा

माझ्यावर प्रेम करण्याचा कोणी प्रयत्न केलाच तर त्याने आपल्या प्रेमाचे प्रमाण मला सतत पटवून द्यावे यासाठी मी त्याच्यावर जबरदस्त दडपण आणीत असे. स्वत:विषयी चांगलेपणाची भावना नित्य मनात ठेवण्यासाठी मला रोज प्रेमाच्या होकारात्मक प्रमाणांची गरज पडत असे. मी केलेल्या प्रत्येक बारीकसारीक गोष्टीसाठी मला प्रशंसापर शब्दांची अपेक्षा असे. अशी स्तुती मिळाली नाही तर मला वाटे, याने मला नाकारले, धिक्कारले. स्तुती ऐकण्याची मला जणू चटक लागली होती. हे एक व्यसनच जडले होते, ही माझी भूक भागली नाही, तर मला वाटे यांनी मला टाकले, नाकारले! मी सर्वस्वी अप्रिय, प्रीतीस अपात्र आहे.

आणि प्रत्येक गोष्टीत माझेच चालले पाहिजे, सर्वांनी माझे ऐकले पाहिजे हा माझा हेका कायमच होता. इतर लोक माझे ऐकत, माझ्याशी सहमत होऊन माझ्या इच्छेप्रमाणे चालत तेव्हा मला स्वत:विषयी खूपच चांगले वाटे. परंतु कोणी माझी विनंती अमान्य केली, माझे म्हणणे धुडकावून लावले, माझ्या म्हणण्यात किंचितसा फरक केला तरी माझ्या भावनांचा क्षोभ होऊन नाकारले गेल्याची, अप्रिय असल्याची भावना अंतरंगात उसळत असे.

माझ्यावर प्रेम करणाऱ्यांकडून मी अशक्य कोटीतील अपेक्षा मनाशी धरल्या. मी त्यांना विफल केले. रंजीस आणले. त्यांच्याकडून मला जे जे मिळे, त्यात मी कधीच समाधानी नव्हते. माझ्याशी प्रांजळपणे वागण्याची अगर मला तोंडावर जाब विचारण्याची संधी अथवा प्रसंग मी त्यांना कधीही देत नसे. माझे सर्व लक्ष माझ्यावरच केंद्रित होते आणि दुसऱ्या प्रत्येकाने माझ्यावरच लक्ष केंद्रित करावे ही माझी अपेक्षा होती. माझ्या आत्म-पात्रतेची जाणीव मला व्हावी यासाठी मी लोकांकडे पाहत होते, पण ही जाणीव फक्त देवच देऊ शकतो हे मला उमजले नव्हते.

माझे मोल आणि महत्त्व व त्यांची जाणीव हे सर्व ख्रिस्तामध्ये आहे, दुसऱ्या लोकांमध्ये अगर वस्तूंमध्ये नाही नाही असे मला आता उमजले आहे. हे सत्य शिकून घेईपर्यंत मी अतिशय दु:खीकष्टी होते. निकोप नातेसंबंध जोडणे, राखणे मला जराही शक्य नव्हते.

भावनिक आरोग्य मिळण्यामध्ये देवाच्या प्रीतीचा स्वीकार करणे हा मुख्य मूलभूत घटक आहे. मागे एका प्रकरणात मी हा उल्लेख केलाच आहे. आपण अपूर्ण असतानाही परिपूर्ण देव आपल्यावर प्रीती करतो असा एखाद्याने खरोखरी विश्वास ठेवला तर इतर लोकही आपल्यावर प्रेम करतील हे त्याला पटते, मान्य होते. विश्वासाची वाढ होते आणि मग त्याला देऊ केलेल्या प्रीतीचा तो स्वीकार करू लागतो.

मी देवाची माझ्यावरील प्रीती विश्वासाने स्वीकारली आहे त्यामुळे प्रीती आणि आत्ममूल्य यांविषयीची माझी मूलभूत गरज भागली आहे. आता स्वत:विषयी सुरक्षित वाटण्यासाठी मला लोकांच्या आधाराची, प्रमाणपुराव्यांची काही गरज नाही. इतर प्रत्येकाप्रमाणे मलाही गरजा आहे, आणि त्या लोकांनी पुरवाव्या अशी माझी अपेक्षा आहे. उत्तेजन, बोध, उपदेश आणि उन्नती व प्रोत्साहन, धीर यांची आम्हा सर्वांनाच गरज असते. तथापि आता माझ्या मूल्याची खात्री पटण्यासाठी मला दुसऱ्या लोकांकडे पाहण्याची काही गरज नाही.

आता मी काही केले आणि माझ्या पतीने त्याबद्दल मला शाबासकी दिली नाही तर मला जरा वाईट वाटते, पण मी आतून सर्वस्वी मोडून पडत नाही. कारण मला माझे अंगभूत मूल्य आहे, आणि ते माझ्या कार्यकृतीवर अवलंबून नाही हे मी जाणून आहे. दुसऱ्यांनी आपले महत्त्व ओळखावे, आपल्या कार्याबद्दल प्रशंसेची पावती द्यावी हे प्रत्येकालाच आवडते. पण ती प्रशंसेची पावती आणि मान्यता मिळाली नाही तरी अजिबात न गडबडता स्थिर राहणे, काही मनावर न घेणे हे खरोखरी विशेष आहे.

माझी किंमत, पात्रता, मूल्य हे काही मी करते त्या कार्यामध्ये नसून ते मी ख्रिस्तामध्ये कोण आहे त्यावर अवलंबून आहे हे सत्य एकदा उमजले की, मग लोकांसाठी, लोकांना दिसावे म्हणून काही केले पाहिजे ही गरजच उरत नाही. मी जी व जशी आहे त्यासाठी एकतर ते माझ्यावर प्रेम करतील किंवा करणार नाहीत असे मी मनोमन ठरवले आहे. आणि ते कसेही असले तरी दोन्ही बाजूंनी मी सुस्थिर, सुरक्षित आहे कारण तरीही देव माझ्यावर प्रीती करतो हे मी खातरीने जाणते.

आम्ही जे व जसे आहोत त्यासाठी लोकांनी आमच्यावर प्रेम करावे हेच महत्त्वाचे आहे. त्यात आम्ही जे करतो त्याचा काही संबंध नाही, आमच्या कृतीमध्ये किंवा वागणुकीमध्ये नव्हे, तर आमच्या ओळखीमध्ये, आम्हा स्वत:मध्ये आमचे मूल्य आहे हे आम्हांला एकदा समजले की मग दुसरे लोक आमच्याविषयी काय बोलतात, म्हणतात त्याचा विचारही कधी आमच्या मनात येणार नाही. त्यांनी सतत आमच्याकडे व आमच्या गरजांकडे लक्ष लावावे हा आग्रह सोडून आम्हांला त्यांच्याकडे आणि त्यांच्या गरजांकडे लक्ष लावता येईल.निकोप, प्रेमळ आणि टिकाऊ नातेसंबंधाचा हाच मूळ आधार आहे.

# 13

# आपण असावे तसे होण्यासाठी भरंवसा

भरंवसा म्हणजे आपण काही तरी केले तर ते पसंतीस उतरेल अशा खातरी. आपण ते करण्यास सक्षम आहो असा विश्वास. भरंवसा म्हणजे आपण धैर्याने, खुल्या मनाने, स्पष्टपणे काम करू शकतो हे मनाला पटणे. या शब्दाचे हे तीन त्रिविध अर्थ लक्षात घ्या, त्यावर विचार करा म्हणजे भरंवसा, खातरी धरणाऱ्या कोणाहीवर सैतान हल्ला का करतो ते तुमच्या लक्षात येईल.

ज्यांचा छळ झाला, जे नाकारलेले, टाकलेले आहेत त्यांच्यामध्ये सामान्यपणे अशा भरंवशाचा अभाव असतो. अशा व्यक्ती लाजशरमेत रुतलेल्या, दोषीपणाच्या भावनेने गांजलेल्या असून त्यांचे स्वत:विषयीचे मत काही चांगले नसते.

सैतानाला जेव्हा जेथे वाव आणि संधी मिळते तेव्हा आणि तेथे तो वैयक्तिक भरंवशावर आघात करतो. विशेषत: बालपणीच्या कोवळ्या वयात त्याला अशी भरपूर संधी मिळते. मूल गर्भाशयात असतानाच अखेरीस त्या व्यक्तीचा पुरता नाश करण्याचे बेत सैतान करीतच असतो. याचे कारण साधे, सरळ आहे. ज्याला स्वत:विषयी भरंवसा, खातरी नाही तो कधीही पुढे सरसावून देवाच्या राज्यात उभारणीसाठी अगर सैतानाचे राज्य उलथून टाकण्यासाठी काहीही करणार नाही आणि म्हणूनच देवाने त्याच्या जीवनासाठी केलेली योजना त्याच्याकडून कधीच पूर्ण होणार नाही.

## अपयशाची अपेक्षा + अपयशाचे भय = अपयश

देवाने तुमच्या जीवनासाठी केलेली योजना तुमच्याकडून पूर्ण होऊ नये हीच सैतानाची इच्छा असते, कारण सैतानाच्या अंतिम पराभवामध्ये तुमचाही वाटा असणार हे तो जाणून

आहे. आपण अशक्त, दुर्बल आहो, हे तुमच्या मनावर ठसवण्यात त्याला यश मिळाले तर तुम्ही कधी काही उपयुक्तक रण्याचा विचारीह मनात आणणार नाही. मग प्रत्यक्ष कार्य करणे दूरच आणि त्यातूनही तुम्ही काही प्रयत्न केलाच, तर तुम्हांला वाटणाऱ्या अपयशाच्या धास्तीने तुमचा पराभव निश्‍चितच होईल आणि स्वत:वर भरंवसा नसल्याने आरंभापासून तुमची तीच अपेक्षा असणार. यालाच अनेकदा ''अपयश समुच्चय'' असे म्हणतात.

देवाने तुमच्यासाठी कितीही उत्तम योजना मनात आखल्या असल्या तरी तुम्ही एक गोष्ट आवर्जून लक्षात ठेवावी. ती हीच की, तुमचा देवावर आणि त्याच्या वचनावर विश्‍वास असला तरच देव त्याची इच्छा तुमच्या जीवनात प्रत्यक्षात आणून पूर्ण करील. तुम्हांला खरोखर यशस्वी आणि सुखी व्हायचे असेल तर प्रथम देवाने तुमच्या जीवनासाठी एक योजना केली आहे यावर विश्‍वास ठेवा आणि तुम्ही त्याच्यावर विश्‍वास ठेवलात की तो तुमच्या संबंधात चांगल्या गोष्टी घडवून आणील असा भरंवसा धरा.

सैतानाची हीच इच्छा आहे की, आपण - तुम्ही व मी - स्वत:विषयी कधीच चांगला विचार करू नये. नेहमी स्वत:ला वाईटच समजावे. मग आमच्यामध्ये स्वत:विषयीचा भरंवसा नावालाही उरणार नाही. पण आता ही उत्तम बातमी ऐका. आम्हांला आपणा स्वत:वर भरंवसा ठेवण्याचे, असण्याचे काहीच कारण नाही. आम्हांला येशूमध्ये भरंवसा असला म्हणजे पुरे.

माझ्या माझ्यावर भरंवसा आहे, कारण ख्रिस्त माझ्यामध्ये आहे हे मला माहीत आहे. मी त्याच्यासाठी करू पाहते त्या प्रत्येक गोष्टीत तो मला सहाय्य करण्यास नेहमी माझ्याजवळ आहे, तयार आहे. भरंवसा नसलेला विश्‍वासणारा धावपट्टीपवर उभ्या केलेल्या जंबोजेटसारखा आहे. या विमानात इंधनच नाही. विमान दिसायला चांगले, सुंदर आहे, पण त्याच्या आत उर्जा नाही, शक्ती नाही. येशू आमच्यामध्ये असला की आम्हांला शक्ती मिळते आणि आम्हांला स्वत:ला कधीही करणे शक्य नसलेल्या गोष्टी सहज करता येतात.

आमचे अशक्तपण, आमचे दुबळेपण यांसाठी येशू मरण पावला आणि आम्ही आमचा विश्‍वास, भरंवसा त्याच्यावर ठेवला तर तो आपली शक्ती, सामर्थ्य, क्षमता आम्हांला देण्यास तयार आहे. योहान.१४:५ मध्ये त्याने आम्हांला हे महत्त्वाचे तत्त्व शिकवले आहे : ''...माझ्यापासून वेगळे असल्यास (माझ्याबरोबर संयुक्त नसल्यास) तुम्हांला काही करता येत नाही.''

एकदा तुम्ही हे सत्य शिकून घेतले, आत्मसात केले की मग तुम्हांला सैतानाला धीटपणे तोंड देता येईल. तो खोटे बोलून म्हणले, ''तुमच्या हातून काहीच सरळ, चांगले होणार नाही.'' तेव्हा तुम्ही त्याला ताड्कन उत्तर द्याल : ''कदाचित नाही होणार, पण माझ्यामधील येशूला ते करता येईल आणि ते तो करीलच. कारण मी माझ्यावर नव्हे तर त्याच्यावर विसंबून आहे. मी जे हाती घेईन त्यात तो मला यश मिळवून देईल, यात शंकाच नाही'' (पहा यहोशवा १:७).

कदाचित हा वैरी तुम्हांला म्हणेल, ‘‘अरे बाबा, तुला हे जमणारच नाही, तर उगाच प्रयत्न तरी कशाला करतोस? कारण पुन्हा तू चुकणार, यश मिळणारच नाही, आजपर्यंत झाले तसेच आताही होणार!’’ त्यावर तुम्ही जबाब द्या : ‘‘येशू वेगळे राहून मला एकही गोष्ट करणे शक्य नाही हे खरेच आहे; पण त्याच्याबरोबर आणि त्याच्यामध्ये मला जे करायचे आहे ते सर्वच्या सर्व मला करता येईल’’ (पाहा फिलिप्पै.४:१३).

सैतान तुम्हांल तुमच्या भूतकाळाचे स्मरण देईल तेव्हा तुम्ही त्याला त्याच्या भविष्यकाळाची, भवितव्याची आठवण करून द्या. तुम्ही पवित्र शास्त्र आरंभापासून अखेरपर्यंत वाचले तर सैतानाचे भवितव्य अगदी काळेकुट्ट, भयाण आहे हे तुम्हांला दिसेल. खरे तर आताही तो पराभूत शत्रू आहे. कलस्सै.२:१५ मध्ये लिहिले आहे : ‘‘त्याने (देवाने) सत्ताधीशांना व अधिकाऱ्यांना नाडून (शस्त्रहीन करून) त्यांचे उघडउघड प्रदर्शन केले (त्यांचे गर्वहरण केले) आणि त्यांच्याविरुद्ध (ख्रिस्तामध्ये) आणि वधस्तंभावर जयोत्सव केला’’ (विस्तारीत अनुवाद).

भयभीत होऊन खिन्नतेचे जीवन जगण्याचे सैतानाचे मोहमय आवाहन तुम्हांला झिडकारून टाकता येते, कारण येशूने त्याच्या योजना धुळीस मिळवून त्यावर विजय मिळवला आणि आत्मिक क्षेत्रात त्याच्या अब्रूचे धिंडवडे काढून त्याची नामुष्की जगजाहीर केली आहे. सैतान आता उसनवारीने घेतलेल्या वेळात कार्य करीत आहे आणि हे वास्तव इतर कोणाहीपेक्षा त्याला स्वत:ला चांगले माहीत आहे (पाहा प्रकटी.१२:१२). त्याच्या लबाड्यांळवर विश्वास ठेवून आम्ही त्याला देतो तीच शक्ती तो आमच्याविरुद्ध वापरतो. याहून अन्य शक्ती त्याला नाही.

‘‘सैतान लबाड, खोटारडा आहे’’ हे नेहमी लक्षात ठेवा. सैतानाविषयी बोलताना येशूने म्हटले आहे : ‘‘तो (सैतान) प्रारंभापासून मनुष्यघातक (खुनी) होता आणि तो सत्यात टिकला नाही; कारण त्याच्यामध्ये सत्य नाही, तो खोटे बोलतो तेव्हा तो स्वत:चे (सहजस्वाभाविकपणे आहे तेच) बोलतो; कारण तो लबाड व लबाडीचा बाप आहे (योहान.८:४४ विस्तारीत अनुवाद).

## आत्मविश्वासासंबंधीची लबाडी

प्रत्येकजण आत्मविश्वासाविषयी बोलतो. ऐहिक-प्रापंचिक जगात आणि ख्रिस्ती मंडळीच्या जगात सर्वत्र ‘‘भरंवसा-विश्वास’’ याविषयी अनेक चर्चासत्रे परिसंवाद होतात. याविषयी भरपूर वाङ्मय दोन्हीकडे उपलब्ध आहे. साधारणपणे ‘‘भरंवसा-विश्वास’’ म्हणजे ‘‘आत्मविश्वास’’ असाच अर्थ केला जातो. कारण जीवनात काही विशेष साध्य करून स्वत:विषयी मनात चांगले वाटून घ्यायचे अगत्य आहे हे आपण सर्वच जाणतो. लोकांनी प्रथम स्वत:वर विश्वास ठेवला पाहिजे, ही आपली मूलभूत गरज आहे हे आपणल्याला शिकवलेच आहे. पण खरे तर ही गैरसमजूत आहे.

खरे तर आम्हांला आपणा स्वत:वर विश्वास ठेवण्याची गरजच नाही. आमच्यामध्ये असलेल्या येशूवर विश्वास ठेवणे हेच आम्हांला अगत्याचे आहे. त्याच्यापासून वेगळे असल्यास आम्हांला स्वत:विषयी अंतरंगात कधीच चांगले वाटणार नाही. ''देहावर भरंवसा ठेवू नका,'' असे प्रेषित पौल आम्हांला शिकवतो (पाहा फिलिप्पै.३:३). तेव्हा आपण त्याचा शब्दश: अर्थ घ्यावा. म्हणजे आपणा स्वत:वर विश्वास ठेवू नका अगर येशूपासून वेगळे राहून काही करता येईल यावर विश्वास ठेवू नका.

*आम्हांला आत्मविश्वासाची नव्हे, तर देवावर विश्वास ठेवण्याची गरज आहे*

किती तरी लोक आपली संपूर्ण हयात यशाची शिडी चढण्यात खर्ची घालतात आणि अगदी वरच्या पायरीवर गेल्यावर त्यांना दिसते की आपली शिडी भलत्याच, चुकीच्या इमारतीवर टेकलेली आहे. दुसरे काही लोक खटपट करतात, झगडतात, आणि स्वत:मध्ये काही प्रमाणात आत्मविश्वास उत्पन्न करण्यासाठी चांगले वागण्याचा आटापिटा करतात. पण त्यांच्या वाट्याला पुन्हा पुन्हा अपयशच येते. या दोन्ही प्रकारातून एकच, समान परिणाम होतो - रितेपणा आणि दु:खक्लेश, दुसरे काही नाही.

लोकांचे एकंदरीत दोन वर्ग करता येतात असे मला आढळले आहे. हे वर्ग असे : (१) त्यांच्या हातून कधीच काही साध्य होत नाही, त्यांनी कितीही प्रयत्न केले तरी काही जमत नाही. शेवटी आपल्या नाकर्तेपणाबद्दल ते स्वत:लाच दोष देत राहतात. (२) मोठमोठ्या गोष्टी साध्य करण्याएवढी स्वाभाविक बुद्धी त्यांच्याकडे असते आणि त्यांच्या कृर्तत्वाचे सर्व श्रेय ते स्वत:कडेच घेतात. त्यामुळे ते गर्वाने फुगतात, पण अखेर देवाच्या दृष्टीने ते सर्वस्वी अपयशी, पराभूत ठरतात.

आपण स्वत:मध्ये कोणीही नाही, तर येशूमध्ये सर्व काही आहोत हे जाणणारी व्यक्तीच देवाच्या दृष्टीने खरोखरी यशस्वी आहे, अन्य कोणी नाही. आमचा अहंकार, गर्व, प्रतिष्ठा सर्व काही फक्त येशूमध्येच असले पाहिजे, आणि आमच्याकडून होणाऱ्या सर्वच कार्याचे संपूर्ण श्रेय नेहमी त्यालाच दिले पाहिजे.

प्रत्यक्षात प्रत्येक व्यक्तीमध्ये भरंवसा, विश्वास असतो. रोम.१२:३ मध्ये या वास्तवाला पुष्टी दिली आहे. आम्हा सर्वांनाच जन्मत:च काही प्रमाणात विश्वास दिलेला आहे. पण आपण या विश्वासाचे काय करतो, तो कोठे कोणावर ठेवतो हाच महत्त्वाचा मुद्दा आहे. काहीजण हा विश्वास स्वत:वर ठेवतात, काही लोक दुसऱ्यांवर, तर काही लोक वस्तूंवर विश्वास ठेवतात. आणि यांच्याशिवाय आणखी इतर आहेत ते खरोखरी आपला विश्वास देवावर ठेवतात.

तुम्ही स्वत:विषयी तुमची बलस्थाने, मर्मस्थाने आणि/अगर दुबळेपणा या कशाहीबद्दल चिंता करू नका. आपली नजर स्वत:करून काढून ती प्रभूकडे लावा. तुम्ही अशक्त असाल तर तो तुम्हांला सशक्त, सक्षम करील. तुमच्या अंगी काही शक्ती असेल तर ती त्यानेच तुम्हांला दिली आहे हे विसरू नका. तेव्हा सर्वच प्रकारे तुमचे नेत्र तुमच्या स्वत:कडे नव्हे, तर त्याच्याकडे लागलेले असावे.

येशूवर खरा भरंवसा, विश्वास ठेवला नाहीत तर तुम्ही स्वत:ला गुंतागुंतीच्या समस्यांत गुंतवून घ्याल. त्यांपैकी काही समस्या पुढीलप्रमाणे आहेत :

- ख्रिस्तामधील तुमची सर्व सुप्त शक्ती तुम्हांला कधीच मिळणार नाही. (याची सविस्तर चर्चा वर केलीच आहे.)
- तुमचे जीवन भयग्रस्त, आणि याता क्लेशांनी भरलेले असेल.
- तुम्हांला खरा आनंद, परिपूर्ती, अगर समाधान कधीच लाभणार नाही.
- तुम्ही पवित्र आत्म्याला खिन्न कराल. तुमच्या जीवनात देवाची योजना पूर्णत्वास नेण्यासाी त्याला पाठवले आहे. पण तुमचे सहकार्य नसेल तर त्याला ती योजना कधीच पूर्ण करता येणार नाही.
- तुम्ही स्वत:साठी अपार दु:खक्लेशांची, वेदनांची असंख्य दारे उघडाल. जसे आत्मद्वेष, दोषीपणा, दंडाज्ञा, नाकारले जाण्याचे भय, अपयशाची भीती, माणसांचे भय, पूर्णतेचा आग्रह, लोकानुरंजन (लोकांना खूष ठेवणे - यामुळे देवाला संतोष देणे शक्य होत नाही). इतरांच्या हातचे बाहुले बनणे, दुसऱ्यांच्या आहारी जाणे वगैरे वगैरे.
- तुम्ही आपला व्यक्ती होण्याचा हक्क, तुमचा 'स्व'विकास होण्याचा हक्क गमावून बसाल.

वरीलपैकी शेवटच्या धोक्याचा मी आता विचार करणार आहे. या पुस्तकाच्या पहिल्या भागात आपण यातील इतर धोक्यांचा काही अंशी विचार केला आहे. पण हा शेवटला धोका अधिक महत्त्वाचा असून त्यावर अधिक विचार करण्याचे अगत्य आहे.

## व्यक्ति-व्यक्तिविशिष्ट होण्यासाठी भरंवसा

आपण सर्व मिळून एक शरीर होतो असे पौलाने १ करिंथ.३:१६,१७ व रोम.१२:४-६ या वचनांमधून शिकवले आहे. तथापि, आपणांपैकी प्रत्येकजण त्या शरीराचा व्यक्तिविशिष्ट घटक, अवयव आहे. हे सत्य नीट समजून आत्मसात करणे आपणाला विशेष महत्त्वाचे आहे. कारण ज्यासाठी आमची रचना, जडणघडण झाली आहे ते न होता आम्ही दुसरेच काही होऊ पाहतो तेव्हा आम्ही स्वत:ला दु:खी, निराश करतो आणि आमच्यामधील देवाचे सामर्थ्य दाबून ठेवतो.

आपण सर्वजण वेगवेगळ्या साच्यांतून आलो आहोत. आमच्यापैकी कोणीच एकदुसऱ्यासारखा नाही असे सांगितल्याचे वारंवार ऐकले आहे. एकापासून दुसरा भिन्न, वेगळा असण्यात काहीही वावगे नाही. आम्हा प्रत्येकाची जडणघडण भिन्न ठेवण्यात देवाचा काही हेतू आहे. आम्ही सर्वांनी एकसारखे असावे असा त्याचा हेतू असता तर त्याने आम्हांला

तसे उत्पन्न केले असते. परंतु आम्ही अनन्य असावे हे त्याच्या दृष्टीने एवढे महत्त्वाचे होते की, आमचे वेगळेपणे स्पष्ट उठून दिसावे यासाठी प्रत्येकाच्या बोटांचे ठसे भिन्न भिन्न केले आहेत.

*वेगळे असण्यात काही वाईट नाही ती तर देवाची योजना आहे*

आपण सर्वजण एकाच योजनेचे - देवाच्या योजनेचे भाग आहोत. तथापि, आम्हा प्रत्येकाचे कार्य वेगवेगळे आहे. कारण आपण प्रत्येकजण व्यक्ति-व्यक्तिविशिष्ट आहो.

व्यक्तिविशिष्ट म्हणजे विशिष्ट गुणलक्षणे, भिन्न वृत्ती, प्रवृत्ती, वेगळी ओळख असणारी व्यक्ती - स्त्री अथवा/आणि पुरुष.

कित्येक वर्षे मला वाटत होते की, मी अजब, विलक्षण जगावेगळी आहे. पण मी अनन्य आहे हे आता मला समजते. यात खूप मोठा फरक आहे. मी विलक्षण, जगावेगळी असते तर माझ्यात काही तरी बिघडले आहे. असावे तसे आकारास आले नाही असे झाले असते. पण मी अनन्य आहे, त्यामुळे माझ्यासारखी दुसरी कोणी नाही म्हणून मला माझे असे विशेष मूल्य आहे हेच स्पष्ट होते. आपण अनन्य, विशेष, खास व बहुमूल्य आहोत यावर तुम्ही विश्वास ठेवावा.

## दुसरे कोणी तरी होण्याची खटपट करू नका

मी मीच आहे हे ओळखण्याचे एक अनन्य लक्षण म्हणजे माझा आवाज, माझा स्वर. बहुतेक स्त्रियांचे आवाज मऊ, मुलायम, मधुर असतात, पण माझा आवाज गाढ व स्थिर, दृढ, कठोर आहे. अनेकदा मला न ओळखणारे कोणीतरी घरी फोनवरून संपर्क साधतात तेव्हा फोनवर घरचा कुटुंबप्रमुखच बोलतो आहे असे त्यांना वाटते. माझ्यातील या विशेष अगदी अनन्य गुणाविषयी मी नेहमीच मनातून नाराज होते. खरे तर यामुळे मला असुरक्षित वाटत असे. मला वाटे की माझा आवाज अगदी विलक्षण, चमत्कारिकच आहे.

देवाने मला त्याच्या वचनाचे शिक्षण देण्यासाठी पाचारण केले तेव्हा माझ्या लक्षात येऊ लागले की, एक दिवस मला सार्वजनिक सभापरिषदांत ध्वनिवर्धकावरून (लाऊडस्पीकर्स) बोलावे लागेल. कदाचित रेडिओ टेलिव्हिजन या माध्यमातूनही मला शिक्षण द्यावे लागेल. मी तर अगदी घाबरून गेले. इतर सर्वसाधारण स्त्रियांच्यापेक्षा माझा आवाज अगदी वेगळा असल्याने मला नाकारले जाईल अशी धास्ती मला वाटत होती. मला जे सर्वसामान्य वाटत होते त्याच्याशी मी माझी स्वत:ची तुलना करीत होते.

*तुम्ही कधी दुसऱ्याबरोबर स्वत:ची तुलना केली आहे? ही तुलना करताना तुम्हांला काय वाटले?*

आपण आपली स्वत:ची तुलना कधी दुसऱ्या कोणाबरोबर करू नये. तर येशू हाच आमचा आदर्श असावा, आणि आमच्या अंतरंगी वसती करणाऱ्या देवाची समक्षता आणि व्यक्तित्व परावर्तित करण्यास आम्ही शिकावे.

हिऱ्याला अनेक पैलू असतात. देव निर्दोष शुद्ध हिऱ्यासारखा आहे. आपल्यापैकी प्रत्येकजण त्याचा एक एक पैलू आहे. त्याने आम्हा प्रत्येकामध्ये त्याचा स्वत:चा एकएक भाग ठेवला आहे आणि आम्ही सामूहिकरित्या त्याचे शरीर आहो. समजा आमची शरीरे फक्त डोळ्यांची, तोंडांची, हातापायांची, कानांची-नाकांची असती तर काय झाले असते? मग आम्हांला बोलणे, चालणे, ऐकणे, ओझी नेणे ही कामे सहज करता आली असती, पण इतर कार्यांचे काय? देवाने आम्हा सर्वांना अगदी एकासारखे, समान केले असते, तर सर्वत्र गोंधळात गोंधळ अशी स्थिती झाली असती.

मग आम्ही दुसऱ्या कोणासारखे होण्यासाठी एवढे का आतुर होतो? का खटपट करतो? आपण आहोत तसे असण्यात आनंद का मानीत नाही? कारण एकच - आम्ही सैतानाच्या लबाड्यांवर विश्वास ठेवतो. त्याचे खोटे बोलणे खरे मानतो. देवाच्या वचनाचे सत्य कामी पडेपर्यंत आम्ही त्याच्यावर विश्वास ठेवतो. मग आम्ही सत्यावर विश्वास ठेवला की सत्य आम्हांला स्वतंत्र, मुक्त करते.

दुसरी कोणी व्यक्ती होण्यासाठी देवाची कृपा तुम्हांला कधीही मिळणार नाही. तुम्ही ''तुम्हीच'' असावे, व्हावे यासाठी त्याने तुम्हांला उत्पन्न केले आहे. तो तुम्हांला उत्तम ''तुम्ही'' करील. दुसरे कोणीतरी होण्याचा खटाटोप सोडा, विसरा. असे करणे चूकच आहे. कारण सर्वसाधारणपणे तुम्हांला जी व्यक्ती व्हायचे आहे, जी ''सर्वगुणसंपन्न'' आहे असे तुम्हांला वाटते ती वास्तविक पाहता तशी असत नाही. तुम्हांला जे भासते ते तसे नसते. याची काही उदाहरणे मी पुढे दिली आहेत :

### *उदाहरण पहिले*

माझ्या जीवनात एकदा एका टप्प्यावर मी ठरवले की, माझ्या पाळकांची पत्नी हीच ''आदर्श स्त्री'' आहे. आणि खरेच ती सुशील, सद्‌गुणी होती. तिचे वागणे मधुर होते, ती मध्यम बांध्याची, नाजूक, सोनेरी केसांची असून तिचे बोलणे मृदू, सौम्य व शांत असे. विशेष म्हणजे तिला दयेचे कृपादान होते. उलटपक्षी माझा आवाज भरदार होता, बोलणे सरळ, परखड असे. व्यक्तित्व साधे सरधोपट होते. त्यामुळे मी मधुर, सौम्य, शांत, ममताळू वगैरे असण्याचा प्रश्नच नव्हता. पण हे गुण अंगी आणण्याचा माझा अयशस्वी प्रयत्न चालूच होता. मी माझ्या आवाजात शक्य तेवढा गोडवा आणण्यासाठी हलक्या स्वरात बोलून पाहिले. माझा आवाज ''बायकी'' व्हावा अशी माझी धडपड होती, पण त्यातून माझे बोलणे लोकांना ''नाटकी'' वाटू लागले, एवढीच फलप्राप्ती झाली.

या बाईसाहेबांचे आणि माझे कधीच जमले नाही. आम्हा दोघींनाही मैत्री हवी होती पण मैत्री काही जुळलीच नाही. अखेरी आम्ही एकमेकांशी स्पष्टपणे बोललो तेव्हा खरे काय ते समजले. मला तिचा सहवास तेवढासा आवडत नव्हता, कारण ती समोर असे तेव्हा तेव्हा माझ्यावर तिच्यासारखे व्हायचे या इच्छेचे दडपण येत असे. यातील अगदी मजेची लक्षणीय

गोष्ट अशी की मी सैतानाकडून ज्या लबाड्यांची पुरंचुडी घेतली होती त्याच लबाड्यांची पुरचुंडी सैतानाने तिलाही दिली होती. हे आम्हा दोघींना एकदमच समजले. मी तिच्यासारखी होण्यीच धडपड करीत होते, तर ती माझ्यासारखी होण्याची धडपड करीत होती! नाजूकपणा सोडून अधिक कडक, कठोर व्हावे, लोकांबरोबर अगदी सरळ धीटपणे बोलावे हा तिचा प्रयत्न होता. मग आम्हा दोघींचे सूर जुळावे तसे जुळले नाहीत यात नवल काहीच नाही. आम्ही दोघीही एकमेकींच्या दडपणाखाली चेपल्या जात होतो!

हे लक्षात ठेवा : आम्ही *''लोभ धरू नये''* (निर्गम २०:१७) असे देवाने सांगितले आहे आणि *''कोणतीही वस्तू'' यात दुसऱ्याचे व्यक्तित्वही समाविष्ट आहे.*

## *उदाहरण दुसरे*

माझ्या अगदी शेजारी एक गोड तरुण मुलगी राहत असे. तिला नाना गोष्टी अवगत होत्या. कपडे शिवणे, बागकाम करणे, फळेभाज्या डबाबंद करणे, गिटार वाजवणे, गाणी म्हणणे यांत ती चांगली प्रवीण होती. शिवाय विविध कलाकौशल्ये, चित्रे काढणे, भिंतींना कागद लावणे, रंग देणे, गीते लिहिणे यातही ती तरबेज होती. थोडक्यात ती सकलकलागुणसंपन्न होती. आणि मी - मला यातील एकाही कलेचा गंध नव्हता. अर्थात मी स्वत:ला ''विलक्षण'' जगावेगळी समजत असल्याने माझ्या अंगी असलेल्या गुणांची मला जाणीव नव्हती आणि मोलही नव्हते. माझ्या अंगी नसलेले गुण आणि मला न जमणाऱ्या गोष्टी यांचा विचार माझ्या मनात सतत घोळत होता.

शिक्षणे देणे व उपदेश करणे यासाठी देवाने मला पाचारण केले होते म्हणून माझ्या इच्छा, आकांक्षा ओळखीच्या इतर अनेक स्त्रियांच्या इच्छांपेक्षा वेगळ्या होत्या. माझ्या परिचयाच्या या स्त्रिया घरसजावटीचे कार्यक्रम करीत, करमणूक करून घेत तेव्हा मी घरी बसून प्रार्थना करीत असे. मी प्रत्येक गोष्टीकडे गंभीरपणे पाहत असे. माझ्या अंतरंगात कसले तरी अवजड दडपण, ओझे आहे असे मला वाटत होते. दुसऱ्या बायका आराम करीत, विसावा घेत, मौजमजा करीत तेव्हा तेव्हा मी सतत त्यांची माझी तुलना करीत असे. माझ्यामध्ये काहीतरी कमी आहे, माझे काही चुकले आहे असे मला राहून राहून वाटत असे. जेव्हा लोक लाजशरमेमध्ये रुतलेले, मुळावलेले असतात, आपण ख्रिस्तामध्ये कोण आहोत याची त्यांना खात्री नसते, मनात असुरक्षितपणाची भावना असते तेव्हा तेव्हा मनात असलेच विचार येतात, अशीच भावना होते.

सर्व काही विसरून बाजूस ठेवून जरा हलकेफुलके वागणे हे शिकून घेणे, थोडी मौज करणे हे मला गरजेचे होते. पण देव माझ्या अंतरंगात काहीतरी करीत होता, आणि ते करणे आवश्यकच होते. काही लोकांची जीवने उद्ध्वस्त झाली होती. त्यांच्या या दयनीय अवस्थेत त्यांना मदत करावी, देवाच्या वचनातून त्यांना मार्गदर्शन करावे, नीट वळणावर आणावे यासाठी तो मला प्रेरणा देत होता. इतर लोकांच्या समस्या त्यांच्या व्यथा व दु:खे यांचे ओझे माझ्यावर घेण्याची, त्यांच्यासाठी व्याकुळ होण्याची मला गरज होती.

हा माझा प्रतीक्षेचा काळ होता. या काळात देव माझा उपयोग करून घेत नव्हता. हा पूर्वतयारीचा, आळस झटकण्याचा, वाढण्याचा काळ होता. साधारण एक वर्ष अशीच प्रतीक्षा करावी लागली आणि याच वर्षी मी ''चारचौघींसारखी'' स्त्री होण्याचे ठरवले. मी शिवणयंत्र विकत घेतले. थोडेफार शिवणकाम शिकले. मला शिवण जराही आवडत नव्हते. तरी पण मी नेटाने, जबाबदारीने शिकत राहिले. शिवणकामातही मला काही प्रावीण्य दाखवता आलेच नाही. एखाद्याला एखाद्या कलेत काही गती नसेल तर ते त्याला कधीही जमणार नाही. त्याने तो नाद सोडावा हेच इष्ट.

शिवणकाम शिकणे मला फारच त्रासाचे व कष्टाचे झाले. त्यात माझे मन लागेना. शिवण करताना वारंवार चुका होत त्यामुळे माझे माझ्याविषयीचे मत अधिकच वाईट होऊ लागले. अखेर कसेबसे शिवणाचे काही धडे मी पूर्ण केले. माझ्या घरच्या लोकांसाठी काही कपडे शिवण्याएवढे ज्ञान मला मिळाले आणि घरातले लोक मी शिवलेले कपडे केवळ कर्तव्यभावनेने वापरीत!

आणखी एक मी ठरवले. टोमॅटो लावायचे. टोमॅटो आलो की ते हवाबंद डब्यात भरून ठेवायचे. झाले. बी पेरले. झाडे उगवली. ती मोठी झाली. चांगले रसरशीत टोमॅटो आले. आता एकदोन दिवसांत ते काढण्याजोगे होणार होते. तेवढ्यात एका रात्री टोमॅटोवर कीटकांनी हल्ला केला. सर्वच्या सर्व फळे काळी पडली! पण टोमॅटो हवाबंद करण्याचा माझा निश्चय कामय होता. कारण फळे वगैरे डबाबंद करण्यासाठी आवश्यक ती सर्व साधने वगैरे मी अगोदरच विकत घेतली होती. अखेर मी शेतमालाच्या बाजारात जाऊन पोतेभर टोमॅटो विकत आणले. मग अगदी कंबर मोडून जाईपर्यंत घामाघूम होऊन काम करण्याचा सपाटाच लावला आणि अखेर सर्वच्या सर्व टोमॅटो डबाबंद केले. पुन्हा या संपूर्ण काळात, दर क्षणाला मी स्वत:चा तिरस्कार करीत होते. परंतु मी चारचौघींसारखी गृहिणी असल्याचे प्रमाण मिळते आहे यातच मी समाधान मानले.

या अगदी कठीण, क्लेशकारक अनुभवातून मी दु:खीकष्टी आहे, कारण देव मला मदत करीत नाही, मला ज्यासाठी उत्पन्न केले ते सोडून मी भलतेच काही करू लागले म्हणून तो मदत करीत नाही हे सर्व शिकले. मी दुसरे कोणीतरी होऊ नये. मी आहे तशी मीच राहावे, तुम्ही आहात तसे तुम्हीच व्हावे, राहावे हे नेहमी लक्षात ठेवा.

## तुम्ही स्वतः स्वतःच - तुम्हीच राहा, असा

*तुम्ही तुम्हीच स्वत: व्हावे, असावे हा तुमचा हक्क आहे. हा हक्क सैतानाला तुमच्याकडून हिरावून घेऊ देऊ नका.*

तुमच्या परिचयाची कोणी चांगली ख्रिस्ती व्यक्ती असेल, प्रभूचा स्वभाव तिच्यामधून प्रगट होत असेल, आणि/अगर पवित्र आत्म्याचे फळ तिच्याठायी दिसत असेल तर त्याचे अनुकरण करावे असे नक्कीच तुम्हांला वाटेल. प्रेषित पौलाने सांगितले आहे, ''जसा मी ख्रिस्ताचे

अनुकरण करणारा आहे, तसे तुम्हीही माजे अनुकरण करणारे व्हा'' (१ करिंथ.११:१). एखाद्या व्यक्तीच्या आदर्शाचे अनुकरण करणे वेगळे आणि त्याच्या व्यक्तित्वाचे, त्याच्या अंगच्या गुणांचे अनुकरण करणे, त्या व्यक्तीसारखे होण्याचा प्रयत्न करणे या दोन्ही अगदी वेगवेगळ्या गोष्टी आहेत.

यावर तुम्ही नीट विचार करावा हे माझे सांगणे आहे. तुम्ही अनन्य, व्यक्ती, व्यक्तीविशिष्ट आहात, देवाने तुम्हांला दुसऱ्या प्रत्येकासारखे निर्माण केलेले नाही ही वस्तुस्थिती तुम्हांला मान्य आहे ना? तुमच्या अनन्यपणात तुम्ही आनंदी, समाधानी आहात का/ का माझ्याप्रमाणे तुम्ही स्वत:च स्वत:शी टक्कर देत झुंजत आहात?

कितीतरी लोकांनी आपल्या अंतरंगाचे रणक्षेत्र करून तेथे आपली स्वत:ची लढाई चालवलेली असते. ते आपली स्वत:ची तुलना दुसऱ्या कोणाशीही करतात. त्यांच्याजवळ येणारी प्रत्येक व्यक्ती त्यांच्यासाठी तुलनेचा विषयच असते. परिणामी ते सतत आपला स्वत:चा आणि दुसऱ्या व्यक्तीचा न्याय करून उणीदुणी काढीत असतात. शेवटी ते म्हणतात, आपण दुसऱ्यांसारखे झाले पाहिजे अगर दुसऱ्यांनी त्यांच्यासारखे झाले पाहिजे.

*सर्वच लबाडी, खोटेपणा!*

आमच्यापैकी कोणीही दुसऱ्या कोणासारखे होऊ नये, असता कामा नये. आपण प्रत्येकाने प्रभूने नेमल्याप्रमाणे त्याचा पैलू असावे, व्हावे. अनन्य व्यक्तीविशेष असावे. यामुळेच आपणा सर्वांना सामूहिक रीतीने देवाची योजना त्याच्या गौरवासाठी पूर्ण करणे शक्य होईल.

# 14

# क्षमा तुम्हांला पुन्हा जगण्यास मुक्त करते

गतकाळातील चुका, अपराध आणि पापे यांच्याबद्दल क्षमा मिळवणे, स्वीकारणे आणि दुसऱ्यांच्या चुका, अपराध व पापे यांच्याबद्दल त्यांना क्षमा करणे हे भावनिक आजारातून बरे होण्यामधील दोन महत्त्वाचे घटक आहेत.

क्षमा ही देणगी आहे. क्षमा होण्यास लायक पात्र नाहीत, त्यांना ही देणगी दिली जाते.

देव प्रथम आम्हांला क्षमेची देणगी देतो आणि आम्हांला छळणाऱ्या, दुखावणाऱ्या लोकांना आम्ही क्षमा करावी, क्षमेची ही प्रक्रिया सुरू करावी हेच देव आम्हांला सांगतो. आम्ही आपली पापे देवापुढे कबूल केली, पदरी घेतली की तो आम्हांला आमच्या पापांची क्षमा करतो, आमची पापे तो पूर्वेपासून पश्चिम जेवढी दूर आहे तेवढ्या अंतरावर दूर फेकून देतो आणि पुन्हा कधीही त्यांची आठवण करीत नाही.

कधी काळी मागे वळून पाहावे असा मोह तुम्हांला झाला तर शास्त्रलेखांतील या अभिवचनांचे स्मरण करा :

> जर आपण आपली पापे (मोकळेपणे) पदरी घेतली तर तो विश्वसनीय व न्यायी आहे म्हणून आपल्या पापांची क्षमा करील, व आपल्याला सर्व अनीतीपासून शुद्ध करील (१ योहान.१:९).

> पश्चिमेपासून पूर्व जितकी दूर आहे तितके त्याने आमचे अपराध आमच्यापासून दूर केले आहेत.
>
> जसा बाप आपल्या मुलांवर ममता करतो, तसा परमेश्वर आपले भय धरणाऱ्यांवर ममता करतो.

कारण तो आमची प्रकृती जाणतो आम्ही केवळ माती आहो हे तो आठवतो. (स्तोत्र.१०३:१२-१४)

परंतु पापाबद्दल सार्वकालिक असा एकच यज्ञ अर्पून हा (येशू ख्रिस्त) देवाच्या उजवीकडे बसला आहे. आणि तेव्हापासून आपले वैरी आपले पदासन होईपर्यंत वाट पाहत आहे.

कारण पवित्र होणाऱ्यांना त्याने एकाच अर्पणाने सर्वकाळचे पूर्ण केले आहे.

पवित्र आत्माही आपल्याला साक्ष देतो, कारण हे म्हटल्यावर परमेश्वर म्हणतो, त्या दिवसानंतर जो करार मी त्यांच्याबरोबर करीन तो हा : मी आपले नियम त्यांच्या मनात घालीन आणि ते त्यांच्या हृदयपटांवर लिहीन.

''आणि त्यांची पापे व त्यांचे स्वैराचार मी ह्यापुढे आठवणारच नाही'' (इब्री.१०:१२-१७).

देवाने दिलेल्या क्षमेच्या अभिवचनाचा लाभ घेण्यासाठी आम्ही ती क्षमा विश्वासाने स्वीकारणे अगत्याचे आहे.

कित्येक वर्षांपूर्वी जेव्हा मी प्रभूबरोबर माझे नाते जोडत होते, तेव्हा दररोज रात्री माझ्या पूर्वीच्या पापांबद्दल मी त्याच्याकडे क्षमा मागत असे. एकदा रात्री मी बिछान्याजवळ गुडघे टेकून प्रार्थना करीत असताना प्रभू माझ्याशी बोलत आहे असे मी ऐकले. ''हे पाहा, जॉयस तू प्रथम क्षमा मागितलीस तेव्हाच मी तुला क्षमा केली आहे. पण तू माझी क्षमेची देणगी स्वीकारली नाहीस, कारण तू स्वत:ला क्षमा केली नाही.''

देवाने दिलेली क्षमेची देणगी तुम्ही स्वीकारली आहे का? स्वीकारली नसेल आणि ती स्वीकारण्यास तुम्ही तयार असाल तर तुमच्या सर्व पापांची क्षमा मिळावी म्हणून प्रभूला आताच या क्षणी विनंती करा, ही विनंती मोठ्याने उच्चारा :

> *हे प्रभू, मी ________________ या पापासाठी (पापाचे नाव लिहा/ बोला)* तुझ्या क्षमेचा स्वीकार करतो.

गतकाळातील तुमच्या चुका, अपराध आणि पापे यांचा स्पष्ट शब्दोच्चार करणे कदाचित अवघड वाटेल. पण ती सर्व उच्चारल्याने तुम्हांला अपेक्षित सुटका, दिलासा मिळण्यास सहाय्य होते.

एकदा प्रार्थना करीत असताना मी देवाला विनंती केली, ''मला क्षमा कर, कारण मी त्यात चूक केली.''

त्याने विचारले, ''कसली चूक?''

मी उत्तरले, ''प्रभू तुला ते माहीतच आहे, मी काय केले ते तू जाणतोसच.''

अर्थात ते त्याला माहीत होतेच. पण माझ्यासाठी त्याने हे स्पष्ट करून सांगितले की, मी

माझ्या मुखाने त्या पापाचा उच्चार करणे अगत्याचे आहे. आपली जीभ जणू दोरीसारखी आहे. ती अंतरंगात खोल खोल जाऊन तेथे असेल ते ओढून वर आणते.

तुम्ही क्षमेची ही देणगी स्पष्टपणे मागून घ्या. तिचा स्वत:साठी स्वीकार करा आणि मग मोठ्याने असे म्हणा :

> *हे प्रभू मी ____________ या पापासाठी (पापाचे नाव बोला) ख्रिस्त येशूमध्ये क्षमेचा स्वीकार करतो. मी मला स्वत:ला क्षमा करून क्षमेची ही तुझी देणगी माझी स्वत:ची म्हणून स्वीकारतो. माझा विश्वास आहे की, तू माझ्यापासून हे पाप पूर्णपणे काढून टाकले आहे. ते पुन्हा कधी दिसणार, सापडणार नाही अशा ठिकाणी दूर फेकले आहे - पूर्वेपासून पश्चिम जेवढी दूर आहे तेवढे दूर टाकून दिले आहे. आणि हे प्रभू माझी खात्री आहे की, तू पुन्हा कधी त्याची आठवण करणार नाहीस.*

मोठ्याने बोलण्याने अनेकदा तुमचाच फायदा होतो, कारण देवाच्या वचनाचा आधार घेतल्याचे तुम्ही स्पष्टपणे जाहीर करीत असता. तुमच्या मनात काय आहे ते सैतानाला समजत नाही, जाणून घेता येत नाही. पण तुमचे बोलणे त्याला समजते. ख्रिस्ताने मला मुक्त केले आहे आणि आता मी या स्वतंत्रतेमध्ये राहणार, चालणार असे सर्व सत्ताधीश, अधिकारी, बले, आणि अंधाराचे अधिपती यांना जाहीरपणे ठासून बजावून सांगा (पाहा इफिस.६:१२).

*तुमचे बोलणे ठाम, दृढ, मन:पूर्वक असावे, त्यात जर-तर असे काहीच नसावे.*

दोषापराध, दंडाज्ञा, न्यायदंड या स्वरूपात सैतानाने त्या पापाचे तुम्हांला स्मरण देण्याचा प्रयत्न केलाच, तर तुमचे ते निवेदन पुन्हा उच्चारा, त्याला ठामपणे सांगा : ''त्या पापाची मला केव्हाच क्षमा झाली आहे. त्याचा केव्हाच निकाल झाला आहे. तेव्हा मला त्याची चिंता करण्याचे काहीच कारण नाही.'' सैतान अगदी काटेकोर नियमावर बोट ठेवणारा आहे, तेव्हा तुम्ही क्षमा केव्हा मागितलीत, देवाने केव्हा क्षमा केली व ती तुम्ही स्वीकारली तो दिवस, तारीखवार सर्व त्याला सांगा. त्याचे तोंड बंद होईल.

*सैतानाची लबाडी, आणि दोषारोप ऐकून घेऊ नका. त्याला सडेतोड जबाब द्या.*

## आपले दोष, अपराध एकमेकांना सांगा, कबुली द्या

रोगमुक्त होण्याचा व पुन्हा पूर्ववत निकोप होण्याचा उपाय याकोब.५ मध्ये स्पष्टपणे सांगितला आहे :

> तुम्हांपैकी कोणी दु:ख भोगीत आहे काय? त्याने प्रार्थना करावी, कोणी आनंदित आहे काय? त्याने स्तोत्रे गावी. तुम्हांपैकी कोणी दुखणाईत आहे काय? त्याने मंडळीच्या

वडिलांना बोलवावे आणि त्यांनी प्रभूच्या नावाने त्याला तेल लावावे व त्याच्यावर ओणवून प्रार्थना करावी. विश्वासाची प्रार्थना दुखणाईतास वाचवील आणि प्रभू त्याला उठवील, आणि त्याने पापे केली असली तर त्याला क्षमा होईल.

तेव्हा तुम्ही निरोगी व्हावे म्हणून आपली पातके एकमेकांजवळ कबूल करून एकमेकांसाठी प्रार्थना करा, नीतिमानाची प्रार्थना कार्य करण्यात फार प्रबळ असते.'' (याकोब.५:१३-१६)

आपण आपले अपराध, दोष, चुका एकमेकांजवळ कबूल कराव्या, पण आमच्या हातून पाप झाले तर प्रत्येक वेळी ते दुसऱ्याला ताबडतोब सांगावे असा याचा अर्थ नाही. येशू आमचा प्रमुख याजक आहे हे आम्हांला माहीत आहे. देवाकडून क्षमा मिळवण्यासाठी, स्वीकारण्यासाठी आम्हांला दुसऱ्या लोकांकडे जाण्याची काही गरज नाही. जुन्या करारामध्ये तशी व्यवस्था व तरतूद होती पण नव्या करारामध्ये तसे नाही.

याकोब.५:१६ हे वचन प्रत्यक्षात कसे लागू पडते? मला ठामपणे वाटते की, आपल्याला देवाचे वचन समजण्याची गरज आहे तसेच ते आपल्या रोजच्या जीवनाला कसे लागू करावे हे समजण्याचेही अगत्य आहे. एखाद्याला मोठी जखम झाली, जखमेतून रक्त भळभळा वाहत आहे. या माणसाकडे बांधण्यासाठी पट्टी, बँडेज सर्व आहे, पण पट्टी लावायची कशी, बँडेज कसे बांधायचे ते त्याला माहीत नसेल तर रक्तस्त्राव होऊन तो मरून जाईल. पुष्कळ लोकांना देवाचे वचन माहीत आहे, तरीपण ते रक्तस्त्रावाने मरणाच्या पंथास लागले आहेत. (यातना, वेदना सोशीत आहेत), कारण रोजच्या दैनंदिन जीवनातील प्रसंगांना परिस्थितीला देवाचे वचन कसे लागू करावे हेच त्यांना माहीत नसते.

याकोब.५:१६ हे वचन पुढीलप्रमाणे लागू करावे असे मला वाटते : मनुष्याला पापक्षमा करणे शक्य नाही हे सर्वप्रथम नीट समजून घ्या. पापक्षमा करणे हे देवाचे कार्य आहे. तथापि, देवाने तुम्हांला क्षमा केली आहे हे उच्चारून जाहीरपणे तुम्हांला सांगणे माणसाला शक्य आहे. तुम्हांला क्षमा झाली आहे याविषयी माणसाला तुमच्याशी सहमत होता येते. तुम्हांला क्षमा मिळावी यासाठी दुसऱ्या कोणीतरी प्रार्थना करणे हेही शक्य आहे (पाहा १ योहान.५:१६). येशूने तसेच केले. वधस्तंभावर असल्याने त्यानेही त्याचा छळ करणाऱ्यांना क्षमा मिळावी म्हणून प्रार्थना केली.

हे वचन लागू करण्यास योग्य प्रसंग, समय कोणता? मला वाटते तुमच्या मागील पापांची आठवण तुम्हांला छळीत असेल, त्या आठवणींनी तुम्ही हैराण झाला असाल त्या वेळी याकोब.५:१६ हे वचन लागू करणे हितावह होईल. अंतरंगात पापाचा विखार भिनल्याने तुम्ही देहाने, मनाने, आत्म्याने, भावनांनी निरोगी होऊ शकत नाही.

अंधारात दडवलेल्या, लपून बसलेल्या गोष्टी उजेडात आणल्या की त्यांचा जोर संपतो. लोक भयापोटी अनेक गोष्टी दडवून ठेवतात. सैतान पुढील सारख्या विचारांनी मनावर सतत

आघात करीत असतो : *''माझा छळ झाला, गैरफायदा घेतला गेला हे लोकांना समजले तर त्यांना काय वाटेल? मी अगदी भयंकर, वाईट, घृणास्पद आहे असे लोकांना वाटेल, ते मला नाकारतील. मला विचारणार नाहीत वगैरे वगैरे.''*

मी सुवार्तासभा घेते, तेव्हा प्रार्थनेसाठी अनेक लोक माझ्याकडे येतात. ते अगदी मला म्हणून खासगीत सांगतात : ''मी मी अजून कोणाला सांगितलेले नाही, पण केव्हा तरी मनातले हे शल्य साफ काढून टाकायचे आहे. माझा छळ झाला, गैरफायदा घेतला गेला.'' हे लोक कित्येकदा ढसढसा रडतात, परंतु असा शोक केल्याने अनेकदा त्यांचे मन अगदी मोकळे होते, त्यांना अतिआवश्यक अशी सुटका मिळते. दुखावलेल्या, मानसिक आघातांनी बेजार झालेल्या लोकांना माझ्याशी बोलणे अगदी सुरक्षित वाटते, कारण त्यांच्यासारखाच माझाही छळ प्रारंभी झाला होता.

निरोगी होण्यासाठी प्रार्थना करावी असे सांगताना प्रत्येकानेच आपला छळ झाल्याची कबुली दिली पाहिजे असे माझे मुळीच सांगणे नाही हे कृपया लक्षात घ्यावे. मागे झालेल्या छळाच्या परिणामांनी तुम्ही हैराण झाला असाल, तर पवित्र आत्म्याचे मार्गदर्शन घ्या. आपले दु:ख कोणाला तरी सांगणे आवश्यक आहे, आणि ते कोणाला सांगावे याविषयी त्याला विचारा. अशा व्यक्तीची निवड मोठ्या कसोशीने केली पाहिजे. मला वाटते तुमच्या परिचयाच्या, विश्वासातल्या एखाद्या प्रौढ अनुभवी ख्रिस्ती व्यक्तीला तुम्ही आपले दु:ख सांगावे. तुमचा विवाह झाला असेल आणि तुमचा पती/पत्नी या निकषाला उतरत असतील तर प्रथम त्याला/तिला सांगण्याचा विचार करावा.

एखाद्या पतीला/पत्नीला सर्व परिस्थिती समजली की तो/ती छळ करणाऱ्यावर खूप संतापेल हे लक्षात घ्या. म्हणून मागच्या सर्व गोष्टी सांगण्यापूर्वी आपला पती/पत्नी आत्म्याने चालणारा/चालणारी आहे आणि वैयक्तिक रागलोभाने नव्हे तर देवाच्या सांगण्याने चालण्यास तयार असल्याची खातरी करून घ्या.

तुमचा पती/पत्नी काही अवघड प्रश्न विचारील आणि ते ऐकण्याची तयारी नसेल तर तुमच्या गैरसमजात अधिकच भर पडेल. उदाहरणार्थ, माझ्या वडिलांनी माझा लैंगिक छळ केला आणि हे कित्येक वर्षे चालू होते हे माझ्या पतीला सांगितले तेव्हा त्याने मला विचारले, ''मग तू त्यांना थांबवण्यास, हे नको असे सांगितले नाहीस?'' ''तू हे दुसऱ्या कोणाला का सांगितलं नाहीस?'' लक्षात ठेवा, तुमच्या पतीला/पत्नीला तुमच्या परिस्थितीची पूर्ण कल्पना येणार नाही, त्याला उत्तरे हवी असतात. माझ्या बाबतीत म्हणाल तर मी भयाने घाबरून गेले होते. मला दहशत वाटत होती हे माझ्या पतीला सांगितले तेव्हा त्याने सर्व समजून घेतले.

आमच्या चुका, दोष एकमेकांना सांगणे आणि एकमेकांसाठी प्रार्थना करणे हे बंधने तोडण्याचे उत्तम साधन आहे. काही काळ मला एका विशिष्ट गोष्टीबद्दल मत्सर वाटत होता, त्यामुळे मी अस्वस्थ झाले होते. अर्थात ही गोष्ट कोणाला समजावी हे मला नकोच होते. म्हणून मी माझ्यासाठी प्रार्थना करा असे कोणाला सांगितले नाही. या प्रसंगाची माझी मीच तड

लावायची असे ठरवले, आणि त्यातून सुटका झालीच नाही; देवाने मला याकोब.५:१६ मधून प्रेरणा दिली : ''आपली पातके एकमेकांजवळ कबूल करा.'' माझ्या जीवनात काही गोष्टी होत्या आणि माझ्यावर त्यांचे दडपण होते. कारण एकच मी त्या लपवून ठेवल्या होत्या, आणि माझ्या अहंकारापोटी त्या उघड करीत नव्हते.

आम्ही भीतीमुळेच नव्हे, तर अंधकारामुळे देखील काही गोष्टी लपवून ठेवतो. मी माझा गर्व सोडला, स्वत:ला लीन केले, आणि माझ्या पतीला माझी अडचण, समस्या सांगितली, त्याने माझ्यासाठी प्रार्थना केली. त्यानंतर मला या गोष्टींच्या संबंधातही मोकळीक मिळाली.

## एक सावधगिरीचा इशारा

काही वेळा लोक आपली अडचण, समस्या दुसऱ्याला सांगून मोकळे होतात आणि ती समस्या त्याच्याकडे सोपवतात. सत्याचे महत्त्व समजावून सांगताना मनात काही लपवून ठेवल्याने समस्या येतात हे स्पष्ट केले. माझे हे बोलणे ऐकून एक स्त्री माझ्याकडे आली. ती नेहमी आमच्या सभांना येत असे. ती मला म्हणाली, ''मला एक कबुली द्यायची आहे. मला तुम्ही अजिबात आवडत नाही. नेहमी मी दुसऱ्यांना तुमच्याबद्दल काहीबाही सांगते. हे माझे चुकले, मला क्षमा करा.'' अर्थात मी तिला क्षमा केली. आपली समस्या सुटली, चुकीची माफी मिळाली म्हणून ती मोठ्या आनंदाने निघून गेली. पण माझ्या मनात तिच्याविषयीचे विचार पिंगा घालीत होते. मला काही सुचेना. ती माझ्याविषयी दुसऱ्यांना काय सांगत असेल? तिने हे कोणाला सांगितले असेल? त्यांनी तिचे म्हणणे खरे मानले असेल काय? आणि हा प्रकार किती दिवसांपासून चालू होता?

समतोलपणा, सुज्ञता आणि प्रीती हे पवित्र शास्त्रामधील महत्त्वाचे, अर्थपूर्ण शब्द आहेत. हे गुण अंगी बाणवले तर तुमची वेगाने प्रगती होईल. सुज्ञता व प्रीती या गुणांनी युक्त असलेला कोणीही विवेकाने पूर्ण विचार करून प्रभूकडून मार्गदर्शन मिळवून कोणत्याही परिस्थितीतून समतोल दृष्टीने मार्ग काढील.

## भा ग  दो न

# पण आता मी मुक्त, स्वतंत्र आहे

*“म्हणून जर पुत्र तुम्हांला बंधमुक्त करील तर तुम्ही खरेखुरे बंधमुक्त व्हाल.”*

योहान.८:३६

# 15

# तुम्हांला छळणाऱ्यांना क्षमा करणे

आपल्याला छळणाऱ्या व्यक्तीला क्षमा करणे हे अनेक लोकांना मोठे अवघड वाटते. भावनिक आरोग्य मिळण्यामध्ये हीच अडचण येते. केव्हा केव्हा याच अडखळणावर रोगमुक्तीची प्रगती खुंटते, अडते. ज्यांना दुसऱ्यांनी भरपूर पीडा दिलेली असते, लोकांनी केलेल्या छळामुळे जे मनातून मोडलेले असतात त्यांना ''क्षमा'' हा शब्द उच्चारणे सोपे वाटले तरी प्रत्यक्षात क्षमा कवणे अतिशय कठीण असते.

या समस्येचा अभ्यास करण्यात, यासाठी प्रार्थना करण्यात मी पुष्कळ वेळ खर्च केला आहे. प्रभूकडून या समस्येची सरळ ग्राह्य उत्तरे मिळावीत म्हणून मी त्याला विनंती करीत होते. या विषयावर मी जे सांगणार आहे ते या अवघड समस्येकडे नव्या दृष्टीने पाहण्यास उपयुक्त ठरेल असे मला वाटते.

आपल्या अंत:करणात कटुता, वैषम्य, मत्सर, क्षमा न करण्याची भावना या गोष्टी साठवून ठेवल्या असतील तर चांगले निकोप भावनिक आरोग्य मिळवणे व टिकवणे शक्य नाही हे मला प्रथम सांगू द्या. *क्षमा न करण्याची वृत्ती ठेवणे हे आपण विष प्यायचे* आणि आता शत्रू मरेल अशी आशा केल्यासारखे आहे! क्षमा न करण्याची वृत्ती ज्याच्या अंगी असेल त्याचे मन कटुतेने भरलेले असते. आणि *एकाच वेळी कडू आणि गोड असणे* सर्वस्वी अशक्य आहे.

तुम्ही छळणुकीला बळी पडला असाल तर तुम्हांला निवडीचा पर्याय उपलब्ध आहे. छळणुकीच्या अगर समस्येच्या प्रत्येक प्रकारातून आपण अधिक कडू व्हायचे की अधिक गोड व्हायचे ते तुमचे तुम्ही ठरवायचे. निर्णय तुम्हीच घ्यायचा आहे.

पण एखादा छळाचा प्रकार, एखादी समस्या तुम्हांला अधिक गोड, अधिक चांगले कसे करणार? छळ, आघात, जखमा हे काही देव तुमच्यावर आणीत नाही. पण तुमचा छळ झाला, समस्या तुमच्यावर लादल्या तर तो ते सर्व तुम्हांला हिताचे, लाभाचे करण्यास समर्थ आहे. पण त्यासाठी तुम्ही त्याच्यावर विश्वास ठेवला पाहिजे.

*देव चुकांतून चमत्कार घडवून आणू शकतो*

तुमचा नाश करावा हाच सैतानाचा हेतू आहे. परंतु सैतान जे जे तुमच्या विरोधात सोडील ते ते सर्व घेऊन देव त्यातून तुमचे हित साधून देईल, यावर तुम्ही विश्वास ठेवला पाहिजे. नाहीतर तुमच्या वाट्याला निराशाच येईल. स्तोत्रकर्त्याने फार पूर्वी लिहिलेच आहे ''ह्या जिवंतांच्या भूमीवर परमेश्वर खात्रीने माझे कल्याण करील, असा माझा विश्वास नसता, तर माझी काय स्थिती झाली असती!'' (स्तोत्र.२७:१३ विस्तारीत भाषांतर).

अलीकडेच एका स्त्रीने मला पत्र लिहून कळवले : ''तुमचा छळ देवाकडून नव्हता, तो तुमच्या छळणुकीचे कारण नव्हता हे मला माहीत आहे. परंतु तुमचा छळ झाला नसता तर मला सहाय्य करणे तुम्हांला शक्य झाले नसते.'' पुढे तिने लिहिले होते, ''याविषयी वाईट वाटून घेऊ नका; कारण देव दुसऱ्यांची सुटका करण्यासाठी तुमच्या वेदना दुःखांचा उपयोग करून घेतो आहे.''

बऱ्याच वर्षांपूर्वी माझ्याकडे पर्याय होते. मी होते तशीच कटुतेने, द्वेषाने भरून स्वत:ची कीव करीत राहिले असते. मला छळणाऱ्यांचा तसेच ज्यांचा कधी छळ झाला नाही, जे सुखाने जगत आहेत अशा सर्वांचा द्वेष, हेवा आणि मत्सर करीत मी आपल्या आत संतापाने जळफळत राहिले असते. किंवा देवाच्या मार्गाने चालण्याचा पर्याय निवडून घेणे, त्याचे सहाय्य घेऊन मागील सर्व कटु गोष्टी विसरून जाणे व मला नवी अधिक चांगली व्यक्ती करण्यासाठी त्याला मोकळीक देणे. सैतानाची वाट धरण्याऐवजी देवाचा मार्ग धरण्यासाठी त्याने मला कृपा पुरवली म्हणून मी त्याला धन्यवाद देते.

क्षमा हा देवाचा मार्ग आहे

मी प्रथम देवाबरोबर चालण्याचा आरंभ केला ते मला आजही आठवते. एका सायंकाळी माझ्या लक्षात आले की, एकाच वेळी अंतरंगात पूर्ण प्रीती व पूर्ण द्वेष असणे शक्य नाही. तेव्हा मी प्रभूला विनंती केली की, माझ्यामध्ये ठाम मांडून बसलेला द्वेष काढून टाक. मला वाटले देवाने सरळ माझ्या अंत:करणात हात घातला आणि सर्व द्वेष गोळा केला व बाहेर टाकला. त्या अनुभवानंतर मी माझ्या वडिलांचा पुन्हा कधीही द्वेष केला नाही. पण तरीही मला त्यांची चीड येई, ते मला आवडत नव्हते. ते जवळपास असले की, मी अगदी अस्वस्थ, अशांत होत असे. माझ्या अंतरंगातील सर्व कटु भावना आणि वाईट वृत्ती या सर्वांपासून मला माझी सुटका करून घ्यायची होती. पण हे सर्व ''करायचे कसे'' हा मोठाच प्रश्न माझ्यापुढे होता.

मी देवाच्या वचनाचा अभ्यास, चिंतन करीत होते. पवित्र आत्म्याच्या सहभागितेचा अनुभव घेत होते. तेव्हा प्रभूने मला अनेक गोष्टी शिकवल्या. संपूर्ण आरोग्यप्राप्तीच्या, व्याधीमुक्तीच्या दिशेने प्रगती करण्याच्या काळामध्ये - वर्षामध्ये मी जे काही शिकले तेच आता तुम्हांलाही सांगावे म्हणून हे लिहीत आहे.

## भावनिक आरोग्यप्राप्तीचे टप्पे

सर्वप्रथम तुम्ही क्षमा कवण्याचा देवाचा मार्ग निवडून घ्यावा. तो काही आपले म्हणणे तुमच्यावर लादणार नाही. तुम्हांला विजयी जीवन जगायचे असेल, संपूर्ण भावनिक आरोग्य हवे असेल तर देवाचा मार्गच सर्वोत्तम आहे हा विश्वास तुम्ही धरला पाहिजे. तुम्हांला ते समजले नाही तरीही त्याच मार्गाने चालण्याचा निश्चय करा. अंती ते तुमच्याच हिताचे आहे.

नंतर देवाच्या कृपेविषयी शिकून घ्या. कृपा हे पवित्र आत्म्याचे सामर्थ्य आहे. देवाची इच्छा पूर्ण करण्यास आम्हांला या कृपेचे सहाय्य मिळते. देवाविषयी याकोबाने सांगितले आहे : ‘‘तो आम्हांला अधिक कृपा [पवित्र आत्म्याचे सामर्थ्य] देतो. [त्यामुळे आम्हांला या आणि इतर सर्व दुष्ट प्रवृत्तींचा यशस्वीपणे सामना करता येतो.] म्हणूनच तो म्हणतो, देव स्वतः गर्विष्ठ आणि अहंकारी माणसांना विरोध करतो पण जे लीन आहेत, दीन आहेत [कृपा स्वीकारण्याएरढे विनम्र आहेत] त्यांना तो सतत कृपा पुरवतो (याकोब.४:६ विस्तारीत अनुवाद).

समजा, तुम्ही क्षमा करावी असे ठरवले तरीही तुमच्या पदरी नैराश्य येते कारण तुम्ही आपल्या स्वतःच्या शक्तीने क्षमा करू पाहता. वास्तविक या कामी तुम्हांला प्रभूच्या सामर्थ्याची गरज आहे. म्हणूनच जखऱ्या संदेष्ट्याने आम्हांला सांगितले आहे : ‘‘बलाने नव्हे, पराक्रमाने नव्हे तर माझ्या आत्म्याने कार्यसिद्धी होईल, असे सेनाधीश परमेश्वर म्हणतो’’ (जखऱ्या ४:६).

तुमचा छळ करणाऱ्यांना आपल्या अंतःकरणात मनोमन क्षमा करण्यासाठी ते तुमच्यासमोर असण्याची काहीच गरज नाही. खरे पाहता तुमचा छळ करणारे आज हयात नसले तरी तुमच्या विरुद्ध त्यांनी केलेल्या पापांपासून तुम्ही त्यांना सोडवणूक दिलीत तर तुम्हांलाही अधिक मोकळीक मिळेल, सुटकेचा अनुभव येईल.

क्षमा करण्याचे ठरवले आणि देवाच्या सहाय्याशिवाय तुम्हांला क्षमा करता येणार नाही हे लक्षात घेतल्यावर मग प्रार्थना करा आणि तुम्हांला छळणाऱ्या प्रत्येक व्यक्तीची सोडवण करा. पुढील प्रार्थना मोठ्याने म्हणा :

*मी ________________ यांना* (नाव) *________________ यासाठी (तुमचा काय छळ झाला ते) क्षमा करीत आहे. हे प्रभू मी तुझ्या मार्गाने, मार्गदर्शनाने चालण्याचे ठरवले आहे. मी तुझ्यावर प्रीती करतो आणि ही सर्व परिस्थिती तुझ्या हाती*

*सोपवून देतो/देते. माझी सर्व चिंता, काळजी मी तुझ्यावर टाकली आहे. माझा तुझ्यावर पूर्ण विश्वास आहे. तू मला पुन्हा पूर्वपदावर आणशील याची मला खात्री आहे. हे प्रभू माझ्यावर केलेल्या सर्व आघातापासून, जखमापासून मला पूर्णपणे बरे कर.*

देव आमचा कैवार घेतो, समर्थन करतो हे अनेक शास्त्रलेखांतून सांगितले आहे (पाहा यशया ५४:१७). आमची भरपाई करून देणारा, आमचे प्रतिफळ स्वत: देवच आहे (पाहा यशया ३५:४). तो न्यायनीतीचा देव आहे, खरा न्याय तोच देऊ शकतो. तुमची झालेली हानी भरून देणारा तोच एकटा आहे, आणि तुमच्या मानवी शत्रूंचा समाचार घेण्यास तोच समर्थ आहे.

विश्वासणाऱ्यांनी प्रत्येकाबरोबर शांतीने राहावे, देव सर्वांची काळजी घेईल, संभाळ करील असा भरंवसा धरावा हे पवित्र शास्त्रात आवर्जून सांगितले आहे.

> ''प्रियजनहो, सूड उगवू नका, तर देवाच्या क्रोधाला वाट द्या, कारण असा शास्त्रलेख आहे की, सूड घेणे माझ्याकडे आहे; मी फेड करीन असे प्रभू म्हणतो'' (रोम.१२:१९).

> ''कारण सूड घेणे मजकडे आहे, मी फेड करीन [परतफेड करणे आणि तुम्हांला संपूर्ण न्याय देणे माझ्याकडे आहे] (मी भरपाई करीन) असे परमेश्वर म्हणतो आणि पुन्हा, परमेश्वर त्याच्या लोकांची प्रकरणे व म्हणणे, तक्रारी तपासून सोडवील न्याय करून निवाडा देईल.
>
> जिवंत देवाच्या हाती सापडणे, दिव्य न्यायदंड सोसावा लागणे अतिशय भयंकर आहे'' (इब्री.१०:३०-३१ विस्तारित अनुवाद).

क्षमा करण्याच्या मुद्द्यावर मी विचार करीत असताना प्रभूने मला एक महत्त्वाचे सत्य सांगितले. ते असे : *''दुखावलेले लोक दुसऱ्यांना दुखावतात.''*

छळ करणाऱ्यांपैकी बहुसंख्य लोकांचा या ना त्या प्रकारे छळ झाला होता. विपरीत, कलुषित वातावरणात वाढलेली मुले आपआपल्या घरातही तसेच विपरीत, विकृत वातावरण निर्माण करतात.

मी माझ्या स्वत:च्या जीवनाकडे पाहिले तर मीही अशाच विपरीत, विकृत वातावरणात वाढले. आणि म्हणूनच माझ्या स्वत:च्या घरामध्ये मीही तसेच विपरीत विकृत वातावरण निर्माण करीत होते. याहून काही वेगळे वागायचे असते हे मला माहीतच नव्हते. हे सर्व मला उमगले तेव्हा त्यातून मला खूपच मोठे सहाय्य मिळाले.

## दुखावले गेलेले लोक दुसऱ्या लोकांना दुखावतात

माझे वडील माझ्या भावनांचा कसा चोळामोळा करून टाकीत होते, ते मला जे करीत त्याचे

परिणाम काय होतील ते सर्व त्यांना माहीत होते असे मला वाटत नव्हते. तसेच या त्यांच्या करण्यातून माझ्यामध्ये काही प्रश्न, समस्या निर्माण होऊन त्या मला पुढे कायम छळतील हेही त्यांना उमगले होते असेही मला वाटत नाही. माझ्या वडिलांनी मला जे केले त्याबद्दल मी त्यांना सरळ तोंडावर विचारले तेव्हा त्यांनी आपले काहीच चुकले नाही असाच आव आणला. लहान असताना त्यांनाही असेच छळले होते, आणि कुटुंबातील, घरातील इतर लोक एकमेकाला ते करतात ते त्यांनी पाहिले होते आणि आपणही तसेच केले पाहिजे हे सूत्र त्यांनी धरले होते. तीच त्यांची प्रवृत्ती झाली होती.

मी सोसलेल्या छळाविषयी माझ्या आईवडिलांशी स्पष्टपणे बोलावे असे देवाने मला सांगितले तेव्हा मी पन्नाशीला आले होते. खरे तर त्यांच्याशी या विषयावर बोलण्याची माझी इच्छाच नव्हती. पण आता ती वेळ आली आहे असे देवाने सांगितले. मी पहिल्याने स्पष्टीकरण माागितले तेव्हा माझ्या वडिलांनी जराही खेद व खंत दर्शवली नाही. आणि ज्यांचा  नवा जन्म झालेला नाही असे लोक जे करतात, स्वार्थ साधतात, स्वत:च्या विकृत, विपरीत आणि सैतानी वासना तृप्त करतात, परिणामांची पर्वा करीत नाहीत अशा लोकांसारख ते होते हे मला स्पष्टपणे जाणवले. माझ्या वडिलांचा एकच निश्चय होता - जेव्हा जे हवे ते कोठूनही कसेही मिळवायचे, ओरबाडून जबरीने घ्यायचे आणि त्यामुळे दुसऱ्यावर, अगर प्रत्यक्ष त्यांच्या मुलीवर काय परिणाम होतील त्याची फिकीर न करणे हेच त्यांच्या जीवनाचे सूत्र होते.

मी माझ्या आईवडिलांबरोबर बोलले तेव्हा एक गोष्ट मला जाणवली ती ही की, माझ्या वडिलांना त्यांच्या कृतकर्मांचा खेद पश्चात्ताप झाला नसला तरी मी त्यांना क्षमा केली आहे हे त्यांना सांगणे माझ्या दृष्टीने महत्त्वाचे होते. त्यांना क्षमा केल्यामुळे पुढे जाण्यास मी मोकळी झाले.

येशू वधस्तंभावर खिळलेला असताना तो जे म्हणाला ते आम्ही नेहमी लक्षात ठेवावे. त्याने कोणतीही चूक केली नव्हती. त्याचा कोणताही दोष, अपराध नसताना तो आमच्या दोषांसाठी, अपराधांसाठी यातना, क्लेश भोगत होताच त्याला वधस्तंभावर खिळणाऱ्यांच्या अपराधांसाठीही तो वेदना सहन करीत होता. तेव्हा त्याने म्हटले, ''हे बापा, त्यांना क्षमा कर; कारण ते काय करतात हे त्यांना समजत नाही'' (लूक.२३:३४).

दुसऱ्याचा न्याय करणे सोपे आहे पण पवित्र शास्त्र आम्हांला सांगते : ''दया न्यायावर विजय मिळवते'' (याकोब.२:१३). छळ करणाऱ्यांवर त्यांच्या पापांची, अपकृत्यांची जबाबदारी नाही, त्याचा त्यांना जाब द्यावा लागणार नाही असे माझे सांगणे नाही. आमच्या चुकांची, अपराधांची जबाबदारी आपली आपणच घेतली पाहिजे. दया ''काय''च्या मागील ''कारणाचा'' शोध घेते हे मला प्रभूने दाखवले आहे. दया आणि करुणा फक्त चुकांचा,

दोषांचा विचार करीत नाही. बालपणा चुरगाळून टाकणाऱ्या व्यक्तीचा त्यात विचार केला जातो. त्या व्यक्तीचा स्वभाव जडणघडण आणि संपूर्ण जीवन यांकडेही पाहिले जाते. देवाला पापाचा वीट आहे, पण पापी व्यक्तीवर त्याची प्रीती आहे हे आपण विसरून चालणार नाही.

माझ्या व्यक्तित्वात एवढ्या प्रचंड समस्या आणि गुंतागुंत होती की त्यामुळे कित्येक लोक माझा न्यायनिवाडा करून मला नाकारीत, झिडकारून टाकीत असत. माझ्या पापाचा त्याच्या अवगुणामुळे न्यायनिवाडा झाला तरी देवाला माझे अंत:करण माहीत होते. पाप हे पापच आहे, आणि कोणत्याही कारणाने झालेली माझी कृत्ये चुकीचीच होती. पण देवाला माहीत होते की, या स्त्रीने लहानपणी पंधरा वर्षे अत्याचार, छळ सोसला आहे. त्या काळात तिच्यावर झालेले आघात आता तिच्या कृतीतून व्यक्त होत आहेत - आणि त्याने माझ्यावर दया केली.

येणाऱ्या मशीहाविषयी यशया संदेष्ट्याने भाकित केले आहे :"...तो डोळ्यांनी पाहील तेवढ्यावरून न्याय करणार नाही, कानांनी ऐकेल तेवढ्यावरून निर्णय करणार नाही"



दगडाची बाहेरील खडबडीत बाजू



दगडाच्या आतील सुंदर स्फटिक रेषा

(यशया ११:३).

लोकांना शिक्षण देत असताना मी त्यांना अनेकदा एका विशिष्ट दगडाचे चित्र दाखवते. हा दगड बाहेरून अतिशय खडबडीत, विरूप व ओबडधोबड दिसतो, पण त्याच्या अंतरंगात याकूत या मौल्यवान रत्नाच्या सुंदर निळ्या स्फटिक रेषा दिसतात.

फक्त बाह्य रूपच पाहिले असते तर आतील बाजूस आश्चर्यकार सौंदर्य दडले आहे असे कोणाला तरी वाटले असते का? लोकांचेही असेच आहे. देव आमच्या अंतरंगात पाहतो. तेथे असणाऱ्या शक्यता, सुप्तगुण तो पाहतो. तो आत्मा पाहतो. बाकी प्रत्येकजण बाह्य मनुष्य पाहतो. आपल्या नैसर्गिक नेत्रांनी जे दिसते त्या पलीकडे असलेले पाहण्यास देवाने आम्हांला शिकवून तयार केले असेल तर ठीक, नाहीतर आम्ही आमच्या अंत:करणात लोकांकडे सतत दोषदृष्टीने, न्याय करण्याच्या वृत्तीनेच पाहत राहू.

लक्षात ठेवा, दुखावले गेलेले लोकच लोकांना दुखावतात.

# 16

# तुमच्या शत्रूंना आशीर्वाद देणे

आम्हांला दुखवतात, छळतात त्यांचे काय करावे हे येशूने अगदी स्पष्टपणे सांगितले आहे :

> ''मी तर तुम्हांस सांगतो, तुम्ही आपल्या वैऱ्यांवर प्रीती करा आणि जे तुमचा छळ करतात त्यांच्यासाठी प्रार्थना करा'' (मत्तय.५:४४).

> ''जे तुम्हांस शाप देतात त्यांना आशीर्वाद द्या आणि त्यांना सुख मिळावे म्हणून प्रार्थना करा. तुमचा छळ करतात त्यांच्यासाठी देवाकडे कृपा मागून घ्या [तुमची निंदानालस्ती करतात, बेअब्रू करतात आणि मन मानेल तसा तुमचा गैरफायदा घेतात त्यांच्यासाठी प्रार्थना करा.] तुमच्या एका गालावर कोणी थोबाडीत मारली तर दुसरा गालही त्याच्यापुढे करा, तुमच्या अंगावर पांघरलेली शाल कोणी हिसकून घेतली तर त्याला तुमची बंडीही द्या'' (लूक.६:२८-२९ विस्तारीत अनुवाद).

पौलानेही विश्वासणाऱ्यांना दुसऱ्यांना क्षमा करण्यास शिकवले आहे. तो सांगतो, ''तुमचा छळ करणाऱ्यांना आशीर्वाद द्या, आशीर्वादच द्या, शाप देऊ नका'' (रोम.१२:१४).

मी लोकांना शिक्षण, मार्गदर्शन देऊ लागले तेव्हा मला असे आढळून आले की अनेकदा ते आपल्या शत्रूंना क्षमा करण्याची खरी इच्छा बोलून दाखवीत, पण लगेच प्रांजलपणे कबूल करीत की, आम्हांला तसे करता येत नाही. मग मी त्यांना या पेचातून सोडवण्यासाठी प्रार्थना केली, देवाकडे मार्गदर्शन मागितले. देवाने मला हा संदेश दिला, ''माझ्या लोकांना क्षमा करण्याची इच्छा आहे. पण क्षमा करण्याविषयी जे शास्त्रलेख आहेत त्यांचे ते पालन करीत

नाहीत.'' मग आपल्या शत्रूंसाठी प्रार्थना करणे व त्यांना आशीर्वाद देणे याविषयी कित्येक शास्त्रवचने प्रभूने मला दाखवली.

आम्ही आमच्या शत्रूंना क्षमा करतो, अगर केली आहे असे कित्येक लोक ठामपणे सांगतात. पण ज्यांनी त्यांची हानी केली, छळ केला त्यांच्यासाठी ते प्रार्थना करीत नाहीत, प्रार्थना करण्यास तयार नसतात. आमचा छळ करणाऱ्यांसाठी प्रार्थना केल्याने ते पश्चात्ताप करण्यास प्रवृत्त होतील, आणि आपल्या वागण्याने दुसऱ्यांना किती व कसा त्रास होतो ते खरोखरी त्यांना उमजेल अशी प्रार्थना त्यांच्यासाठी केली गेली नाही, तर ते तसेच खोटेपणात राहतील.

तुमचे शत्रू, तुमचा छळ करणारे, गैरफायदा घेऊन वर तुमचीच निंदा करणारे अशा सर्वांना आशीर्वाद मिळावा म्हणून देवाला विनंती करा. तुम्ही त्यांच्या कामांवर आशीर्वाद द्यावा असे मागत नाही, तर व्यक्ती म्हणून आशीर्वाद मिळावा अशी तुमची प्रार्थना असावी.

पण येशूला ओळखल्याशिवाय कोणालाही खरोखरी आशीर्वाद मिळणे अशक्य आहे. तुमचा छळ झाला असेल, छळाला बळी पडलेली व्यक्ती म्हणून तुमचा छळ करणाऱ्यांसाठी प्रार्थना करण्यास तुम्ही तयार असाल तर तुम्ही रोम.१२:२१ हे वचन कारणी लावाल : ''वाइटाने जिंकला जाऊ नको, तर बऱ्याने वाइटाला जिंक.''

तुमचा छळ करणाऱ्यांचा न्यायनिवाडा करू नये, तर त्यांना दया दाखवावी असे देवाला मागून घ्या. तुम्ही दयेची पेरणी केलीत तर दयेची कापणी कराल (पाहा गलती.६:७). आपल्या शत्रूंना शाप नव्हे तर आशीर्वाद देणे हा क्षमा करण्यातील अतिशय महत्त्वाचा भाग आहे. ''आशीर्वाद देणे'' म्हणजे ''...च्याविषयी चांगले बोलणे'' आणि शाप देणे म्हणजे ''..च्याविषयी वाईट बोलणे'' अशी या शब्दांची आम्ही केलेली व्याख्या लक्षात ठेवावी.

## भाषा, बोलणे आणि क्षमा करणे

तुम्हांला कोणी वाईट वागणूक दिली तर त्याविषयी दुसऱ्यांना सांगण्याचा मोह सहजच होतो. देवाने नेमलेल्या मार्गदर्शनाप्रमाणे या प्रकारे आपली व्यथा दुसऱ्यांना सांगणे आवश्यकच आहे. आरोग्यदायी सांत्वनपर प्रार्थना इतरांकडून तुमच्यासाठी व्हावी म्हणून दुसऱ्या लोकांच्या हातून तुमचा कसा छळ झाला, तुम्हांला काय काय सोसावे लागले ते उघड करणेही आवश्यक आहे. पण केवळ वाईटच बोलत राहणे आणि बेअब्रू करणे हे देवाच्या वचनाविरुद्ध आहे. आम्ही चहाडीचुगली, निंदा करू नये, याचे त्याला त्याचे तिसऱ्याला तिखटमीठ लावून सांगू नये असे पवित्र शास्त्र शिकवते. नीती.१७:९ मध्ये सांगितले आहे : ''जो इतरांच्या अपराधांवर झाकण घालतो तो प्रेमाची वृद्धी करतो, पण जो गतगोष्टी घोकीत बसतो त्याला मित्र अंतरतात.''

आमच्या दु:खवेदना बऱ्या व्हाव्या यासाठी आम्ही अनेकदा विश्वासाचा आधार घेतो, पण त्याच वेळी प्रीतीचा शाही नियम पाळण्यास आम्ही चुकतो. गलती.५:६ मध्ये पौलाने म्हटले

आहे, ''विश्वास प्रीतीच्या द्वारे कार्य करणारा आहे.'' ''कारण प्रीती पापांची रास झाकून टाकते'' (१ पेत्र.४:८).

आम्हांला दुसऱ्यांनी जे काही केले त्याविषयी आपण प्रभूशी बोलावे, त्याला सागांवे आणि ज्यांना काही कारणाने सांगणे आवश्यक, अगत्याचे आहे त्यांनाही ते सांगण्यास हरकत नाही. परंतु खरोखर क्षमा करावी आणि आम्हांला बसलेल्या घावातून, जखमांतून बरे व्हावे अशी इच्छा असेल तर आम्ही ती समस्या आणि तिला कारण झालेली व्यक्ती यांविषयी कोणाशी अघळपघळपणे बोलू नये. व्यर्थ, निरर्थक बोलण्याविषयी पवित्र शास्त्रातून आम्हांला सावधगिरीचा इशारा दिलाच आहे (पाहा मत्तय.११:३६). आमची समस्या उघड करण्यामागे काही सरळ सात्विक उद्देश नसेल तर आम्ही ती निमूटपणे सहन करावी, त्याविषयी काही न बोलण्याची शिस्त स्वत:ला लावून घ्यावी आणि त्याच्या वचनाचा बहुमान केल्याबद्दल देव आम्हांला उघडपणे प्रतिफळ देईल असा भरंवसा धरावा.

मला एका स्त्रीची हकीगत आठवते. तिचे लग्न होऊन तीस वर्षे झाली होती आणि आता तिचा नवरा तिच्याच जिवलग मैत्रिणीच्या मोहात पडला होता. घरातले सर्व पैसे घेऊन तो त्या स्त्रीबरोबर पळून गेला. हे कुटुंब, सात्विक ख्रिस्ती होते आणि तेथेच व्यभिचार, विश्वासघात होईल अशी कोणालाही कल्पना नव्हती. या घटनेने प्रत्येकालाच मोठा धक्का बसला.

सर्वस्वी उद्ध्वस्त झालेली ही पत्नी मग तिच्या नवऱ्याने व मैत्रिणीने काय केले ते सर्वांना सांगू लागली. आरंभी आपली व्यथा दुसऱ्यांना सांगण्यात काही वावगे नव्हते. पण पुढे तीन वर्षांनी नवऱ्याकडून तिला घटस्फोट मिळाला. नंतर त्याने तिच्या त्या मैत्रिणीशी लग्न केले तरीही ही स्त्री आपली जुनी वेदना उगाळीतच होती. तिनेही दुसऱ्या एका चांगल्या माणसाशी लग्न केले. तिचा हा पती तिला अगदी उत्तम वागणूक देत होता. ती म्हणाली, ''मला आता मागचं सर्व विसरून पुढे जगायचे आहे,'' परंतु क्षमा करून पुढची वाटचाल करणे तिला शक्य नव्हते.

''बोलणे, भाषा आणि शब्दांची शक्ती'' याविषयीचे शिक्षण देणारी माझी काही ध्वनिमुद्रित भाषणे (टेप) तिने ऐकली. आपल्या बाबतीत काय घडले ते ती सतत जो भेटेल, ऐकून घेईल त्याला सांगत होती म्हणूनच तिला स्वास्थ्य मिळत नव्हते हे तिच्या लक्षात आले. पुन:पुन्हा तेच अप्रिय तपशील सांगत राहिल्याने पूर्वीच्या अप्रिय आठवणी सतत ताज्या होत होत्या.

देवाने मला दाखवले आहे की, काही लोक बरे होण्यासाठी प्रार्थना करतात आणि असेही म्हणतात, ''मला छळणाऱ्यांना मी क्षमा करतो.'' त्याप्रमाणे देव बरे करण्याची प्रक्रिया सुरू करतो, पण हे लोक पुन्हा पुन्हा ती जखम उघडी करतात आणि देवाला त्याचे कार्य पुरे करू देत नाहीत.

शरीराला झालेली जखम बरी होऊ लागते तेव्हा त्या जखमेवर खपली धरते, पण ही खपली सतत उखडून काढली तर जखम कधीही बरी होणार नाही. ती चिघळेल, जंतूसंसर्ग होईल आणि जखमेचे रूपांतर व्रणात होईल. भावनिक जखमांचेही असेच आहे. आपली

व्यथा, व व्यथेचे कारण असलेली व्यक्ती यांच्याविषयी सतत बोलणे हे जखमेवरची खपली काढण्यासारखे आहे. यामुळे जखम पुन्हापुन्हा उघडली जाते व त्यातून पुन्हा रक्त वाहू लागते.

क्षमा करण्यासाठी जिभेवर, बोलण्यावर नियंत्रण, ताबा ठेवणे अगत्याचे आहे. ही एक महत्त्वाची, उपयुक्त गोष्ट देवाने मला प्रगट केली आहे. एखादी गोष्ट पुन्हा पुन्हा सांगणे, दु:ख व्यथा उगाळीत राहणे हे देहस्वभावाला नेहमीच प्रिय, आनंदाचे वाटते. पण अपराधावर झाकण घातले तर त्यातून चांगले परिणाम होतात.

मार्गदर्शन, प्रार्थना या अगर दुसऱ्या कोणत्याही कारणासाठी तुमच्या समस्येविषयी बोलण्याची गरज असेल, तर तुम्ही ते सकारात्मक, विधायक रीतीने करावे.

उदाहरण : पुढीलपैकी कोणते अधिक करून देवाला साजेसे आहे?

> ''माझ्या वडिलांनी पुरी पंधरा वर्षे माझा लैंगिक छळ केला. माझ्या आईला ते माहीत असूनही तिने काहीच केले नाही.''

किंवा

> ''पुरी पंधरा वर्षे माझ्या वडिलांनी माझा लैंगिक छळ केला. देव मला बरी करीत आहे. माझ्या वडिलांसाठी मी प्रार्थना करते आहे. वडिलांच्या पूर्वआयुष्यात त्यांनाही दुखावले गेले होते, आणि ते सैतानी बलाच्या आहारी गेले होते हे माझ्या लक्षात आले आहे. वडील मला काय करतात ते माझ्या आईला माहीत होते. तिने मला मदत करायला हवी होती, पण भय आणि असुरक्षितता यांमुळे तिच्या अंगचे बळच गेले होते. त्या परिस्थितीत काय करावे तेच बहुधा तिला समजत नसावे, म्हणून ती तोंड दाबून गुपचूप बसली, वस्तुस्थितीकडे तिने डोळेझाक केली.''

वरीलपैकी दुसरे उदाहरण अधिक अर्थपूर्ण आहे, हे तुम्हांलाही पटेल असे मला वाटते. थोडेसेच शब्द पण ते विचारपूर्वक विवेकाने वापरले तर कथनाचा एकंदर नूरच बदलतो. लक्षात ठेवा, तुम्हांला बरे चांगले व्हायचे असेल तर कटुता मनी ठेवून चालणार नाही. तुमच्यामध्ये काही कटुता असेल तर ती तुमच्या बोलण्यातून उघड होण्याची दाट शक्यता आहे. तुमचे शब्द आणि तुमचा बोलण्याचा सूर, रीत यांमधून तुमच्याविषयी पुष्कळ काही उघड होते, मात्र तुम्ही स्वत:शी प्रामाणिक असायला हवे. मत्तय.१२:३४ मध्ये येशूने म्हटले आहे : ''...अंत:करणात जे भरून गेले आहे तेच मुखावाटे निघणार.''

एखाद्या समस्येपासून सुटायचे असेल तर त्याविषयी बोलायचे थांबवा. तुमच्या तोंडावर तुमच्या मनाचा प्रभाव असतो आणि तुमच्या मनावर तुमच्या तोंडाचा प्रभाव पडतो. एखाद्या गोष्टीविषयी विचार करण्याचे थांबविल्याशिवाय त्याविषयीचे बोलणे थांबवणे कठीण जाते. आणि तुम्ही एखाद्या गोष्टीविषयी सतत बोलतच राहाल तर तिच्याविषयी विचार करण्याचे थांबवणेही अवघड आहे.

*तुम्हांला जे करता येते ते करण्याचे ठरवा, करा आणि तुम्हांला करता येत नाही ते करण्यास देव तुम्हांला सहाय्य करील. तुम्हांला शक्य तेवढे मन लावून करा, देवावर विश्वास ठेवा आणि तो बाकी उरलेले पूर्ण करील.*

आपल्या जिभेवर संपूर्णपणे नियंत्रण ठेवण्यास काही वेळ लागेलच. पवित्र आत्म्याच्या सूचना, प्रेरणांप्रमाणे चाला, आज्ञापालन करा. त्याच्याकडून तुम्हांला शांत, गप्प राहण्याची सूचना मिळाली तर गप्प राहा. तुम्ही जसजसे आज्ञापालन कराल तसतसे दर वेळी तुम्हांला अधिक मोकळीक मिळेल.

या संबंधात सैतान तुम्हांला मोहपाशात पकडण्याचा यत्न करणारच म्हणून सावध असा. त्याला शब्दांची चांगलीच माहिती आहे. शब्द म्हणजे शक्ती साठवण्याची साधने! आणि तोंड हे शस्त्र सैतानाच्या बाजूने अगर त्याच्या विरोधात चालवता येते. म्हणूनच तुम्ही शब्दांची निवड अगदी काळजीपूर्वक केली पाहिजे. सैतान तुमच्या प्रेमळ, जिवलग, सरळ मित्रांना हाताशी धरील आणि बोलता बोलता तुमच्या समस्येचा विषय पुढे आणील. सुज्ञपणे, तारतम्याने वागा. त्यामुळे तुमची जखम पुन्हा उघडी होईल; त्यातून रक्त वाहू लागेल अशा कोणत्याही पाशात सापडू नका.

## तुमच्या भावभावनांचा पालट व्हावा यासाठी देवावर भरंवसा ठेवा

क्षमा करण्याचा मुद्दा, आणि निरोगी होण्याची क्रिया यात भावभावना महत्त्वाचा प्रमुख घटक आहेत. तुम्ही सर्वच्या सर्व निर्णय अगदी कराल तरीही कितीतरी काळ तुम्हांला काहीच फरक जाणवणार नाही. पूर्वी होते तसेच आहे, प्रभूचे आज्ञापालन करण्याचे ठरवल्यावरही काही बदल झाला नाही असे तुम्हांला वाटेल. अशा प्रसंगी पुढे जाण्यासाठी विश्वासाची गरज आहे.

तुम्ही तुमच्या वाट्याचे काय केले आहे आणि आता देवाने आपले काम करावे म्हणून वाट बघत आहात. तुमच्या भावना निकोप करणे, तुम्हांला बरे, स्वस्थ करणे, तुम्हांला दुखावले गेल्यासारखे वाटू नये हेच त्याचे काम आहे. तुम्हांला ज्याने छळले त्याच्याविषयीच्या भावना बदलण्याचे सामर्थ्य फक्त देवालाच आहे. आंतरिक आरोग्य, स्वास्थ्य फक्त देवालाच साध्य आहे, तोच ते देऊ शकतो. कारण तो पवित्र आत्म्याच्या सामर्थ्याने तुमच्यामध्ये राहतो (तुम्ही नव्याने जन्मला असाल तर) आणि तोच अंतरंगातील मनुष्याला बरे करू शकतो.

आरोग्य मिळण्यासाठी देव आम्हांला वाट पाहायला का लावतो? प्रतीक्षा करणे फारच अवघड असते आणि आम्ही कशी चांगल्या प्रकारे प्रतीक्षा करतो त्यावरच देवावर आमचा विश्वास आहे का नाही ते स्पष्ट होते. इब्री.६:१२ या वचनाप्रमाणे देवाची अभिवचने विश्वासाने आणि धीराने वतनवारसा म्हणून मिळतात. गलती.५:५ मध्ये प्रेषित पौलाने सांगितले आहे : ''कारण आपण आत्म्याच्या द्वारा विश्वासाने नीतिमत्त्वाची आशा धरून वाट पाहत आहो.''

आपण देहाला अनुसरून चाललो तर परिणामांची प्रतीक्षा करावी लागत नाही. तथापि, आमचा छळ करणाऱ्यांची स्वाभाविक मानवी रीतीने तड लावण्यासाठी केलेल्या प्रयत्नांना कधीच चांगले परिणाम मिळत नाहीत. देवाचा मार्ग उत्तम, कार्यकारी आहे, पण त्याचे कार्य बी पेरा आणि पीक मिळण्याची धीराने वाट पाहा या तत्त्वाने चालते. त्याच्या योजनेप्रमाणे चालल्याने आज्ञापालन केल्याने आपण उत्तम बीजाची पेरणी करतो. देवाची योजना अशी आहे :

- देवाकडून क्षमा *स्वीकारा* (आणि स्वत:वर प्रीती करा).
- तुमचा छळ करणाऱ्यांना क्षमा करून सोडण्याचा पर्याय *निवडून घ्या.*
- तुमच्या शत्रूंसाठी *प्रार्थना करा.*
- तुमचा छळ केला त्यांना *आशीर्वाद द्या.*
- देव तुमच्या भावना निरोगी करीत आहे असा *विश्वास ठेवा.*
- *वाट पाहा.*

आध्यात्मिक क्षेत्रात वाट पाहण्यानेच लढाईत यशस्वी व्हायचे असते. वाट पाहणे, आणि देवाकडे पाहत राहणे यामुळे ज्यांनी मुळातच ही समस्या आणली त्या सैतानी शक्तींवर दडपण आणले जाते. परिणामी या सैतानी शक्तींची पिछेहाट होऊन त्यांना काबीज केलेला मुलूख सोडून द्यावा लागतो. तुम्ही आपली नजर देवाकडे लावलेली असली म्हणजे तो शत्रूला तुमच्या मुलखातून हाकलून देतो :

> जो परात्पराच्या गुप्त स्थली वसतो तो सर्वसमर्थाच्या सावलीत राहील.
> परमेश्वराला मी माझा आश्रय, माझा दुर्ग असे म्हणतो; तोच माझा देव, त्याच्यावर मी भाव ठेवतो (स्तोत्र.९१:१-२).

स्तोत्र.९१ मधील बाकीचा भाग नीट लक्षपूर्वक वाचा. शत्रूंकडून तुम्ही कधीही पराभूत होणार नाही असे सांगणारी महान अभिवचने येथे आहेत. पवित्र शास्त्राच्या ‘‘विस्तारीत भाषांतरात’’ या स्तोत्राविषयी सांगितले आहे : ‘‘या संपूर्ण अध्यायातील महान अभिवचने पूर्ण होणे हे पहिल्या दोन वचनांतील अटी, सर्वथा पाळण्यावरच अवलंबून आहे.’’ म्हणजेच जे देवाच्या छायेत, त्याच्या गुप्त ठिकाणी वसती करतात, आणि परमेश्वर त्यांचा आश्रय व दुर्ग, गड आहे असे जाहीर करतात, जे आपला भार सर्वस्वी त्याच्यावर टाकून त्याच्यावर भरंवसा ठेवतात त्यांचे भले होते, हित होते.

येथे मी माझाच एक अनुभव सांगते. त्यावरून माझा मुद्दा स्पष्ट होईल. माझी एक मैत्रीण होती. तिच्यावर माझे प्रेम होते. ती माझ्या भरंवशाची होती. अनेक प्रसंगी तिने मला सहाय्य केले होते. तिने मला अगदी कठोरपणे दुखावले. माझ्याविषयी खोट्या अफवा पसरवण्यात आल्या, त्यामुळे माझ्या जीवनात मला पुष्कळ अडचणी आल्या. मानसिक यातना झाल्या.

दोष काढणे, चहाड्या करणे हे प्रकार चालूच होते. या गोंधळाला कारण असलेल्या त्या स्त्रीने अधिक विचाराने विवेकाने वागणे जरुर होते.

या विशिष्ट परिस्थितीमुळे माझ्या भावना प्रचंड प्रमाणात दुखावल्या गेल्या. मी अंतरंगात घायाळ झाले. माझ्या सेवाकार्यात माझ्यावर हा मोठाच मानसिक, भावनिक आघात झाला होता. कारण हा आघात ख्रिस्तामधील माझ्या सहकाऱ्याकडून झाला होता. मी तिच्याबरोबर सेवा करीत होते, शिवाय ती माझ्या विश्वासाची होती. तिला क्षमा केली पाहिजे हे मी जाणून होते. क्षमा केली नाही तर अक्षमाशीलतेचे हे वीष माझ्यामध्ये व माझ्या सेवाकार्यामध्ये पसरेल हेही मला समजत होते.

मी तुम्हांला वर सांगितल्याप्रमाणे क्षमेची सहा टप्प्यांची/पायऱ्यांची प्रक्रिया सुरू केली. क्षमा करण्याचे ठरवणे हा पहिला टप्पा तेवढासा अवघड नव्हता. नंतर मी क्षमेची प्रार्थना केली. तेही कठीण नव्हते. खुद्द त्या स्त्रीसाठी प्रार्थना करण्याची तिसरी पायरी मात्र जरा अधिक कठीण होती. पण तिला आशीर्वाद देणे, तिच्याविषयी काहीही न बोलणे हा चौथा टप्पा मात्र सर्वांत कठीण होता.

तिने जे काही केले होते त्याचा तिच्यावर काहीच उलट परिणाम झाला नव्हता. सर्व गोंधळ उडवून ती आपल्या ठिकाणी शांत, स्वस्थ असल्याचेच चित्र दिसत होते आणि इकडे माझ्या मनात भावनांचा कल्लोळ माजला होता. सर्वच अस्वस्थ, अशांत होते, अखेरीस तिला सैतानाने फसवले, आणि तिने मला जे केले ते देवाच्या आज्ञेप्रमाणे आहे अशा समजुतीने केले एवढे मानण्यापर्यंत माझी तयारी झाली होती.

माझ्या भावभावना बऱ्या, स्वस्थ व्हाव्या यासाठी विश्वासाने मी पाचवा टप्पा लागू करण्याच्या प्रयत्नात होते तरी पण या स्त्रीविषयी माझ्या भावनांमध्ये सहा महिने कसलाही बदल झाला नव्हता; प्रभुच्या सेवेत असणे, त्याची वाट पाहणे हा सहावा टप्पा माझ्यासाठी फारच अवघड होता. कारण मला सतत या स्त्रीबरोबर राहणे भाग होते. तिने जे केले त्याबद्दल तिने कधीही माफी मागितली नाही, अगर आपले चुकले, आपण केले ते बरोबर नव्हते असे कधीही दाखविले नाही. केव्हा केव्हा माझे मन अस्वस्थ होत असे की, मला वाटे आता एक दिवसही मला हे सहन होणार नाही. अंतरंगात भडका उडेल असे वाटत होते.

मी देवाला सांगत होते : ''मी माझ्या वाट्याचे काम केले आहे, आता माझ्या भावभावना बदलण्यासाठी मी तुझ्यावर विसंबून आहे.'' ही सर्व प्रक्रिया पूर्ण होण्यासाठी मला ठामपणे स्थिर टिकून राहणे भाग होते; माघार घेण्याचा प्रश्नच नव्हता. हे सर्व मी शिकून घेतले.

सुमारे सहा महिन्यांचा काळ गेला. या स्त्रीची व माझी गाठ पडे तेव्हा केव्हा केव्हा तिला ताडफाड बोलून मोकळे व्हावे असा जबरदस्त मोह मला होत असे, एवढी निकराची वेळ माझ्यावर आली होती. पण मी तसे काहीच केले नाही. माझ्यावरचा ताबा जाऊ देऊ नको, मला ताबा ठेवण्यास मदत कर एवढेच मी प्रभूला विनवून सांगणे माझ्या हाती होते. त्या सहा महिन्यांमध्ये माझ्या भावभावनांचे अनेक चढउतार मी अनुभवले. केव्हा केव्हा मी खूपच समंजसपणे वागत होते, केव्हा नव्हते.

एका रविवारी सकाळी उपासनेच्या वेळी देवाने मला दाखवले, सुचवले की, मी या स्त्रीकडे जाऊन तिला मिठी मारून सांगावे, ''माझं तुझ्यावर प्रेम आहे.'' देवाने हा विचार मनामध्ये घातला त्या क्षणी माझे शरीर जणू हे करण्यास अजिबात उत्सुक नसल्याचे मला स्पष्टपणे जाणवले. मी मनात म्हटले, *''प्रभू, हे नको असं नको, खरं तर तिनं माझ्याकडे यायला हवं, अशा स्थितीत तू नक्कीच मला तिच्याकडे जायला सांगणार नाहीस. खरं ना? समजा मी पुढे झाले, तिच्याकडे गेले तर माझे खरेच चुकले होते असा तिचा ग्रह होणार नाही का?''*

मला वाटत होते की त्या स्त्रीने माझ्याकडे येऊन माझी माफी मागावी, तरीपण मीच तिच्याकडे गेले पाहिजे असे सौम्य दडपण माझ्यावर असल्याचे जाणवत होते. देवपित्याने माझ्या जीवनासाठी राखून ठेवलेले आशीर्वाद मला मिळावेत यासाठी पवित्र आत्मा मला त्या दिशेने वळवण्याचा प्रयत्न करीत होता. आम्हांला कशामुळे आशीर्वाद लाभतील ते आम्हांला प्रभू वारंवार दाखवीत असतो. आमचे लक्ष तिकडे वेधून घेत असतो. परंतु आम्हांला ते आशीर्वाद कधीही मिळत नाहीत, कारण आम्ही हटून बसतो. तो करायला सांगतो ते करायचेच नाही हा हट्ट आम्ही सोडतच नाही.

अखेरीस माझ्या पायांच्या इच्छेविरुद्ध मी उठले आणि अगदी नाखुषीने कसेतरी एकएक पाऊल उचलून त्या स्त्रीकडे जाऊ लागले. माझ्या देहातील कणाकणाला तिकडे जाणे अगदी जिवावर आले होते, तरीपण प्रभूचे आज्ञापालन करायचेच असा निग्रह करून मी तिच्याकडे जाऊ लागले आणि तेवढ्यात तीही उठून माझ्याकडे येऊ लागली. खरोखर देव तिच्याशीही बोलत होता.

आम्ही जवळ आलो. मी सरळ तिला मिठी मारून म्हटले, ''मी तुझ्यावर प्रेम करते.'' तिनेही अगदी तसेच केले. आणि ते प्रकरण संपले. तिने अजूनही माझी माफी मागितलेली नाही; आणि जे घडले त्याचा कधी उल्लेखही केला नाही. तथापि, मी देवाने सुचवल्याप्रमाणे आज्ञापालन केले आणि देवाने दास्यत्वाचे अवजड जू मोडून टाकले. माझ्या दृष्टीने ती सर्व घटना, तो प्रसंग संपला होता, किंवा बऱ्याच अंशी संपला होता. अजूनही केव्हा केव्हा ही स्त्री मला दिसली, भेटली अगर कोणी तिचा उल्लेख केला तर मनात वेदनेची कळ आल्यासारखे वाटते खरे, पण त्या दिवसापासून या प्रसंगामुळे मला कधीही भावनिक वेदना किंवा यातना झाल्या नाहीत.

## आणखी एक मैल जाण्यास तुमची तयारी आहे का?

माझ्या आईवडिलांचा आदर करणे व त्यांना आशीर्वाद देणे या प्रश्नांचा निकाल करण्याची वेळ आली. या बाबतीत देव मला मार्गदर्शन देऊ लागला. माझ्यासाठी हे अगदी अवघड, कठीण काम होते. कारण माझ्याबाबतीत जे झाले, घडले त्याबद्दल दोघांपैकी एकानेही शब्दानेसुद्धा दु:ख वा खंत व्यक्त केली नव्हती. मला करावेसे वाटले नाही तरीही देवाच्या दृष्टीने जे रास्त, जे योग्य तेच करीत राहणे मला आवश्यक होते हेही मी जाणून

होते. ज्याला क्षमा करायची होती तो/ती त्या क्षमेसाठी पात्र अगर लायक आहे का नाही हा विचार क्षमा करण्यात कधीच नसतो हे लक्षात ठेवा. देवाच्या वचनाचे आज्ञापालन करण्याचा एक अविभाज्य भाग म्हणूनच क्षमा करणे निवडून घ्यायचे असते.

एकदा माझे वडील आजारी पडले. त्यांना दवाखान्यात ठेवले होते. आपण आता मरणार अशा समजुतीने त्यांनी प्रार्थना करण्यासाठी मला आणि डेव्हला बोलावून घेतले. आम्ही त्यांना विचारले, ''आपले तारण व्हावे असे तुम्हांला वाटते का?'' त्यावर त्यांनी होकार दिला. आम्ही त्यांच्याबरोबर प्रार्थना केली तेव्हा ते एवढेच बोलले, ''मला आतून अगदी मेल्यासारखे वाटते.''

ते म्हणाले, ''इकडे आत काही म्हटल्या काहीच नाही.'' त्यांना तारण हवे होते, पण त्यांनी जे काही केले असते त्याबद्दल त्यांना जराही वाईट वाटत नव्हते. त्यांनी मला जे काही केले त्याविषयी आमचे बोलणे झाले होते. आता त्यांनी एक लक्षणीय विधान केले. त्यांनी म्हटले, ''मी जे केले त्यामुळे तुला दु:ख झाले याचे मला वाईट वाटते, पण ते केले म्हणून मला खरोखरी, खरेच दु:ख वाटते असे मात्र माझ्याने म्हणवत नाही.''

माझ्या वडिलांना पश्चात्ताप झाला नव्हता, आणि त्यांनी खरोखर पश्चात्ताप केल्याशिवाय त्यांना तारण मिळणे शक्य नव्हते हे मला स्पष्टच दिसत होते आणि मला हेही समजत होते की, पश्चात्ताप हीही एक देणगी आहे, आपण केलेल्या कृत्याबद्दल मनापासून वाईट वाटणाऱ्या व्यक्तीला देवापासून ही देणगी मिळते. पण माझ्या वडिलांचे अंत:करण एवढे कठीण होते की आपला अहंकार बाजूस ठेवून आपली पापे पदरी घेण्याएवढे स्वत:ला नम्र, लीन करण्यास ते अजिबात तयार नव्हते.

पुढे कालांतराने देवाने मला सुचवले की माझ्या आईवडिलांना सेंट लुईस येथे आणून ठेवावे. म्हणजे ते आमच्या घराजवळ राहिले असते, तेथे आम्हांला त्यांची काळजी घेणे सोपे झाले असते. हेही माझ्यासाठी फार कठीण होते, कारण त्यापूर्वीच्या काळात माझे त्यांचे संबंध केवळ उपचारापुरते ''काय कसं काय? सुटीत जमलं तर भेटू,'' असे म्हणण्याएवढेच मर्यादित झाले होते. आता माझ्या मनात त्यांच्याविषयी कटुता अथवा राग, चीड उरली नव्हती. तरीपण त्यांच्या रोजच्या गरजा पुरवण्यासाठी, काळजी घेण्यासाठी ''आणखी एक मैल चालणे'' मला जमणारे नव्हते.

पण त्यांना घर बदलायला लावणे, ती व्यवस्था करणे हे ओझे देवाने नेमकेपणे माझ्या अंत:करणात ठेवले होते. देवाने मला हे करायला सांगितले होते, म्हणून तुम्हीही तसेच करावे असा सल्ला मी कधीच कोणाला देणार नाही. पुढेही असाच छळ चालू होण्याचा संभव असलेल्याच्या बाबतीत देव मी केले ते दुसऱ्याला करण्यास सांगणार नाही हे उघडच आहे. माझ्या आईवडिलांचे वय वाढत होते आणि त्यांची काळजी घेण्याची गरज होती. आमच्याशिवाय दुसरे कोण त्यांना पाहणार, काळजी घेणार?

त्यांच्यासाठी एक घर घ्यावे असे देवाने आम्हांला सांगितले, तेव्हा मला वाटले आपण त्यांच्यासाठी एक साधे, विशेष महाग नसलेले घर विकत घ्यावे. पण देवाने सांगितले

त्यांच्यासाठी चांगले घर घ्या. मग आम्ही त्यांची व्यवस्था एका चांगल्या घरात केली. हे घर आमच्या घरापासून साधारण दहा मिनिटांच्या अंतरावर होते. आम्ही त्यांच्यासाठी पलंग, खुर्च्या, सोफा, मेज, मोटार, भांडीकुंडी वगैरे खरेदी केले आणि त्यांची प्रत्येक गरज भागवली.

पण हे मला काही सोपे गेले नाही असेही मी प्रांजळपणे सांगते. तरीपण देव मला हे करायला सांगतो आहे हेही मी जाणून होते. मी आज्ञापालन केले नसते तर काय झाले असते ते नेमके मला सांगता येत नाही. पण मला देवाने विपुल आशीर्वाद दिले आहेत, देत आहे आणि त्याने सांगितल्याप्रमाणे मी वागले नसते, आज्ञापालन केले नसते तर हे आशीर्वाद मला कधीही मिळाले नसते हेही मी जाणते. आणि देवाने आमच्या सेवाकार्यासाठी विपुल आशीर्वाद अद्‌भुत प्रकारे दिले आहेत, कारण मी त्याच्याशी विश्वासू होते, त्याने सांगितले ते सर्व माझ्या आईवडिलांच्या संबंधात तंतोतंत केले - ते मला पुष्कळ कठीण होते तरीही केले. आज्ञापालन करण्यात चुकले नाही, म्हणूनच ते आशीर्वाद मिळाले. देव कधी कधी आम्हांला कठीण, अवघड गोष्टी करण्यास सांगतो हे नेहमी लक्षात ठेवणे महत्त्वाचे आहे.

माझे आईवडील आमच्या घराजवळ राहू लागले, त्याला तीन वर्षे झाली तरी माझ्या वडिलांमध्ये काहीच बदल झाल्याचे दिसले नाही. आता ते मला छळण्याचा, अत्याचार करण्याचा प्रयत्न अजिबात करीत नव्हते, पण त्यांच्या वागण्यातील नीचपणा, द्वेष व कटुता अद्याप तशीच पूर्वीसारखी होती. जीवनाकडे पाहण्याची त्यांची तीच पूर्वीची विकृत, विपरीत वृत्ती कायम होती. त्यांच्या चेहऱ्यावरचे भाव पाहून मला अजूनही कापरे भरत असे. तरी ते अतिशय दु:खीकष्टी दिसत होते. परंतु ते माझ्या आईला नीट वागवीत नव्हते. तरीही आमही त्यांना दयेने, ममतेने व प्रेमाने वागवीत होतो.

आम्ही कित्येक वर्षे माझ्या आईवडिलांसाठी अनेक चांगल्या गोष्टी केल्या. मग कुठे ते म्हणू लागले, ''धन्यवाद. मी तुमचा आभारी आहे. तुम्ही दोघेही माझ्याशी खूपच चांगले वागता. मला खरोखरी तुमचे कौतुक वाटते.''

आमच्या समजुतीप्रमाणे आम्ही माझ्या वडिलांसाठी शक्य ते सर्व काही केले होते असे मला वाटले. आता आम्हांला वाट पाहणे भाग होते. देवाने दुसऱ्या कोणाच्या अगर तुमच्या स्वत:च्या जीवनात कार्य करण्याची वाट पाहत असताना जे तुम्हांला रास्त व योग्य वाटते तेच न चुकता करीत राहणे अत्यंत महत्त्वाचे आहे हे कधीच विसरता कामा नये.

माझ्या अनुभवातून मी जे शिकले त्यातून काही मोलाचा सल्ला तुम्हांलाही देते : *देवाचे आज्ञापालन करा, तो सांगेल, दाखवील त्याप्रमाणे चाला, वागा.* केव्हा केव्हा हे फारच कठीण वाटेल, पण दासपणात, बंधनात राहणे त्याहूनही कठीण, अवघड आहे, हे विधान कधीही विसरू नका. *''मुक्त होण्यातही वेदना, दु:ख असले तरी बंधनात राहण्यात त्याहून अधिक यातना आणि वेदना आहेत.''*

# 17

# सूड घेणे प्रभू परमेश्वराकडे आहे

दुसरी एखादी व्यक्ती तुम्हांला त्रास देते, दुखवते तेव्हा तो/ती तुमचे काही देणे लागतो ही भावना प्रबळ होते. त्याचप्रमाणे तुम्ही दुसऱ्या कोणाला त्रास देता तेव्हा त्याच्याशी समेट करावा अगर कोणत्या तरी प्रकारे त्याचे नुकसान भरून द्यावे असे बहुधा तुम्हांला वाटत असेल. अन्याय, गैरवागणूक, कोणत्याही प्रकारची छळणूक या सर्वांमुळे आत्मिक क्षेत्रामध्ये ''देणे असलेले, न फेडलेले कर्ज'' साचून राहते. अशा प्रकारचे कर्ज चुकते केले पाहिजे ही जाणीव मनाला टोचणी लावून भावभावनांना छळते. दुसऱ्यांनी तुम्हांला जे देणे आहे अगर तुम्ही त्यांना जे देणे लागता त्या संबंधात सूडाची भावना पाहून भारभूत झाली अगर अंत:करणात फार काळ घर करून राहिली तर तुमच्या शरीरावर त्याचे विपरीत परिणाम निश्चितच दिसणार यात शंकाच नाही.

येशूने आपल्या शिष्यांना प्रार्थना करण्यास शिकवले : ''जसे आम्ही आपल्या ऋण्यांस ऋण सोडले आहे [अपराधांची क्षमा केली आहे, कर्ज माफ केले आहे, त्यांच्या विरुद्धचे किल्मिष, चीड काढून टाकली आहे] तशी तू आमची ऋणे आम्हांस सोड'' (मत्तय.६:१२). आमच्या पापांची देवाने क्षमा करावी ही विनंती करण्यास तो सांगत होता. त्याने पापांचा उल्लेख ''ऋण'' असा केला आहे. एक दुसऱ्याला जे काही देणे लागतो ते ''ऋण अगर कर्ज'' असते. येशूने म्हटले, देव आम्हांला आमची कर्जे माफ करील. कर्ज फेडले असे म्हणून सोडून देईल आणि आम्ही त्याचे कधीच काहीच देणे लागत नाही असे मानून आमच्याशी वागेल.

आणि आमचे ऋणकरी आहेत, ज्यांच्याकडून आम्हांला ''येणे'' आहे त्यांच्याशी आम्ही त्याच प्रकारे वागावे ही त्याची आज्ञा आहे. मी पुन्हा एकदा सांगते की, हे कठीण, अवघड

वाटेल, परंतु कोणाचा तरी द्वेष करीत राहणे आणि त्याला कधीच फेडता न येणारे कर्ज वसूल करण्यासाठी संपूर्ण आयुष्य खर्ची घालणे हे अधिक कठीण व अवघड आहे.

पवित्र शास्त्र सांगते देव आमचे नुकसान भरून देईल, आमची भरपाई करील (पाहा यशया ६१:७-८ पुढे). या शास्त्रलेखांकडे मी तेवढेसे लक्ष दिले नव्हते, पण क्षमा करणे, कर्ज माफ करणे या संबंधात मी या वचनांचा अभ्यास केला तेव्हा यातील मर्म मला उमजले. ज्याचा छळ झाला आहे, जो दुखावला गेला आहे, त्याच्यासाठी *भरपाई, मोबदला, परतफेड करणे, नुकसान भरून देणे* हे शब्द अतिमहत्त्वाचे आहेत. देव आम्हांला आमचा मोबदला देईल, नुकसान भरून देईल असे पवित्र शास्त्र सांगते त्याचा अर्थ असा आहे : आमचे जे येणे आहे ते स्वत: देव आम्हांला भरून देईल!

देव आमची भरपाई करून देईल, आमचा मोबदला आम्हांला देईल याविषयीची ही शास्त्रवचने तोंडपाठ करा.

> ‘‘तुमच्या अप्रतिष्ठेचा मोबदला तुम्हांस दुप्पट मिळेल, आपल्या उपमर्दाबद्दल मिळालेल्या वतनभागानेच ते आनंद पावतील; असे ते आपल्या देशात दुप्पट वतन पावतील.
>
> ‘‘कारण मला परमेश्वराला न्याय प्रिय आहे, अन्यायाच्या लुटीचा मला वीट आहे; मी त्यांना खात्रीने प्रतिफळ देईन; त्यांच्याशी सार्वकालिक करार करीन’’ (यशया ६१:७-८).

या पुढील प्रकरणांमध्ये आपण दुप्पट दुहेरी आशीर्वादांचा विचार करू. देव मोबदला देणार आहे, तो भरपाई करून देतो, सूड घेणे त्याच्याकडेच आहे असे कित्येक शास्त्रवचनांतून सांगितले आहे. पवित्र आत्म्याने यशया ४९:४ हे वचन माझ्या जीवनाला लागू केले : ‘‘मी तर म्हणालो होतो की मी व्यर्थ श्रम केले, मी आपले बळ उगीच व निरर्थक वेचिले, तथापि माझा न्याय परमेश्वराच्या हाती आहे; माझे प्रतिफळ माझ्या देवाच्या हाती आहे.’’

सूड घेणे म्हणजे लोकांशी जशास तसे या न्यायाने वागणे, त्यांनी केलेल्या छळाचे उट्टे काढणे, उसने फेडणे. पण सूड, सूडाचा प्रयत्न हे सर्व नेहमीच व्यर्थ, वायफळ ठरतात. त्यामुळे दु:ख दूर होत नाही अगर नुकसान भरून निघत नाही. उलट त्यातून अधिक नुकसान होते, वेदना होतात.

खरोखरी मी पुष्कळ वर्षे व्यर्थ परिश्रम केले. ‘‘व्यर्थ’’ म्हणजे निरुपयोगी, निरर्थक, तुम्ही व्यर्थ श्रम केले तर तुमचे सर्व प्रयत्न निष्फळ, निरुपयोगी ठरतात. या श्रमाने तुम्ही थकून जाल. शारीरिक, मानसिक आणि भावनिक झीज होईल. ज्यांनी तुम्हांला दुखावले आहे त्यांचे उट्टे काढण्याचा प्रयत्न केलात तसेच तुम्ही ज्यांना दुखावलेत त्यांची भरपाई करू पाहाल तर अखेर तुमच्यात जराही त्राण उरणार नाही.

ज्यांचा तुम्ही द्वेष करता, ज्यांच्यावर सूड उगवू पाहता ते सर्वच अनेकदा मौजमजा करीत, आनंदात असतात. तुमच्या भावनांशी त्यांना काही देणेघेणे नसते. तुमची अवस्था त्यांना

ठाऊक नसते आणि ते तुमची पर्वाही करीत नाहीत. या प्रकारे तुमचे दु:ख सोसणे हे व्यर्थ, वायफळ आहे. प्रियजनहो, तुम्ही दु:ख सोसता, आणि त्याचा सूड घेण्याची खटपट करता. पण तुमची ही खटपट व्यर्थ आहे. शास्त्रलेख सांगतात त्याप्रमाणे मीही माझी शक्ती व्यर्थ खर्ची घातली, माझे सर्व प्रयत्न निरर्थक ठरेल. मग कुठे माझे नुकसान भरून मिळावे म्हणून मी देवाकडे पाहू लागले.

भरपाई, मोबदला, कामगारांना मिळणारी भरपाई यांत एक अर्थाचे समान सूत्र आहे. देवासाठी कार्य करीत कामावर असताना तुमची हानी, नुकसान झाले तर तो तुमची भरपाई करून देतो. भरपाईमध्ये प्रतिफळ, बक्षीस हाही अर्थभाव आहे. पवित्र शास्त्राप्रमाणे स्वत: देवच आमचे प्रतिफळ आहे (पाहा उत्पत्ती १५:१), आणि आमच्यासाठी काही खास विशेष गोष्टी करून बक्षीस देतो. तो आम्हांला ''अनिर्वचनीय आनंद'' देतो (१ पेत्र.१:८) आणि सर्व बुद्धिसामर्थ्याच्या पलीकडे असलेली शांती'' देतो (फिलिप्पै.४:७). देवाने मला जीवनात एवढे विपुल आशीर्वाद दिले आहेत की ते खरेच मला मिळाले आहेत. मलाच एवढे चांगले, धन्य, धन्य वाटत आहे का असा केव्हा केव्हा प्रश्न पडतो.

बराच काळ माझ्या मनात द्वेष, तिरस्कार, चीड ओतप्रोत भरली होती. माझ्यात कटुता भरली होती. मनावर मणामणाचे ओझे होते. मला स्वत:चीच कीव येत होती. माझ्या सहवासात येणाऱ्या प्रत्येकावर विशेषत: माझ्याशी प्रेमाने वागणाऱ्या लोकांवर मी विनाकारण ओरडत असे. तेवढीच माझ्या कोंडलेल्या भावनांना मोकळीक!

लक्षात ठेवा, तुमच्यामध्ये जे भरलेले असते तेच तुमच्या मनाचे विचारांचे खाद्य असते. तुमच्यामध्ये संताप, राग, कटुता, तिरस्कार व चीड भरील असेल तर परिणामी तुम्ही इतर सर्व नाती बिघडवता आणि स्वत:लाही बिघडवून विकृत करता. तुमच्या पोटी असेल तेच ओठी येणार. तुमचे विचार, वृत्ती, प्रवृत्ती, तुमची देहबोली, हावभाव, हालचाली आणि बोलण्याचा सूर या सर्वांतून अंतरंगातील क्षोभ प्रगट होत असतो.

तुमच्या अंतरंगात विषारी विचार आणि वृत्ती भरली असेल तर त्याचा तुमच्या संपूर्ण जीवनावर परिणाम होणारच. त्याला पर्याय नाही. तेव्हा कर्जवसुली करण्याचे काम खुद्द प्रभूकडे सोपवून द्या. हे काम त्याच्याशिवाय अन्य कोणालाही योग्य प्रकारे करता येणार नाही. तुम्ही त्याचा मार्ग धरा, त्याच्या कलाने चाला. तो तुमची सर्व कर्जे वसूल करील आणि गतकाळातील तुमच्या सर्व नुकसानीची भरपाई करून देईल. त्याला हे करताना पाहणे खरोखरी भव्यदिव्य आहे.

## मी राजी आहे, पण कोणत्या प्रकारे?

तुम्हांला जेवढे देणे आहे, जेवढे येणे आहे ते सर्व तपशीलवार लिहून ठेवा. येथे मी आर्थिक देण्याघेण्याबद्दल नव्हे तर आत्मिक क्षेत्रातील घेण्यादेण्याबद्दल सांगत आहे. आता त्या कागदावर या टोकापासून त्या टोकापर्यंत मोठ्या ठळक अक्षरांनी लिहा : ''माफ केले,

रद्द केले.'' मोठ्याने बोला, ''कोणीही माझे कसलेही देणे लागत नाही आणि मी कोणाचे कसलेच देणे लागत नाही! मी ही सर्व कर्जे रद्द करून ती येशूकडे सोपवून देतो. आता सर्व त्याच्या हाती आहे. देणेघेणे आहे ते सर्व तोच भागवणार, वसूल करणार.''

तुम्ही कोणाला दु:ख दिले असेल, तर त्याला सांगा, ''माझं चुकलं, मला वाईट वाटतं, आता मला क्षमा करा.'' तुम्ही दुसऱ्यांना जे केले असेल त्याची परतफेड, भरपाई करण्यास कृपया आपले जीवन खर्ची घालू नका. ते निरर्थक आहे. देवच त्यांची भरपाई करून देईल. तो समर्थ आहे. याचे एक साधे सरळ उदाहरण पाहा.

मी माझ्या मुलांना वाढवीत होते तेव्हा गतकाळात मी सोसलेल्या छळामुळे माझ्या भावनांचे चढउतार चालूच होते. मी दुखावले गेले होते. देवाच्या मार्गाने कसे चालावे, वागावे ते तेव्हा माहीत नसल्याने मी अखेर माझ्याच मुलांना दुखवू लागले. त्यांच्यावर ओरडणे, रागावून बोलणे हे तर नित्याचेच होते. त्यातून मी फार रागीट, संतापी होते. माझ्यात जराही धीर, सहनशीलता नव्हती. माझ्याबरोबर राहणे वागणे अगदी कठीण होते, आणि माझे कशानेही समाधान होत नसे.

मी माझ्या मुलांसाठी अनेक कडक नियम लावून दिले. त्यानी माझे नियम पाळले की, मी त्यांना जवळ घेई, प्रेमाने वागवी, पण त्यांनी जर का नियम मोडले तर माझ्या तळपायाची आग मस्तकाला जाई. मी कधीच दयाळू, ममताळू नव्हते. लहानपणी मला वागवले गेले तसेच मी माझ्या मुलांना वागवीत होते हे माझ्या लक्षातच आले नाही. पूर्वी ज्यांचा छळ झालेला असतो ते लोक आपल्या मुलांशी असेच वागतात.

या प्रकारे वर्षानुवर्षे संघर्षाच्या वातावरणात वाढलेल्या माझ्या मोठ्या मुलाच्या मनात गोंधळ उडाला होता. त्याला असुरक्षित वाटत होते, तसेच त्याच्या व्यक्तित्वात काही समस्या आली होती. आमच्या दोघांत नेहमीच सलोख्याची नव्हे तर संघर्षाची प्रवृत्ती होती. थोडक्यात सांगावयाचे तर आमचे कधीच एकमेकांशी पटले नाही. अर्थात पवित्र आत्म्याचा बाप्तिस्मा मिळाल्यावर, आणि देवाचे वचन वाचल्यावर हे नुकसान भरून काढावे असे मी ठरवले. मी माझ्या मुलाला चांगले वागवले नाही, त्याचे नुकसान केले, याची त्याला परतफेड करून द्यावी असा माझा विचार होता, मी त्याला जे दु:ख, यातना दिल्या त्याचा मोबदला मी त्याला देणार होते असे वाटल्यास म्हणा.

पण मी केलेले हे नुकसान कसे भरून द्यावे, बिघडलेले हे नाते दुरुस्त कसे करावे ते खरोखरी मला समजत नव्हते. मी त्याची क्षमा मागितली, पण आणखी काय केले पाहिजे ते मला सुचेना. काही काळ मी एका भलत्याच विचारात अडकले आणि म्हटले आता मी त्याला तो मागेल ते सर्व देईन म्हणजे यातून मी सुटेन. कारण आता मी त्याच्या ऋणात होते. माझ्या मुलाचे व्यक्तीत्व कठोर, करारी आहे. त्यावेळी तो प्रभूबरोबर चालत नव्हता. माझ्या मनातील दोषीपणाची भावना सतत कशी वाढवावी हे त्याने चटकन समजून घेतले. त्याने भावनिक

दृष्टीने माझ्यावर नियंत्रण ठेवले होते. तो त्याला हवे ते मिळवत होताच आणि प्रभूबरोबरच्या माझ्या नव्या नातेसंबधाचा उपयोगही तो स्वत:च्या लाभासाठी करून घेऊ लागला.

एक दिवस मी त्याला त्याच्या वागण्याविषयी बोलत होते, त्याला वळणावर आणू पाहात होते. तेव्हा तो उलट बोलला, ''तू मला नीट वागवले असतेस तर मी असा वागलो नसतो.'' त्यावर मी काहीच बोलले नाही. मी तेथून उठले, दुसरीकडे जाऊन स्वत:चीच खंत करीत बसले.

परंतु या वेळी देवाने मला काही महत्त्वाचे सांगितले. त्याने म्हटले ''जॉइस, तुझ्या समस्यांवर मात करण्याची तुला आहे तेवढीच संधी त्यालाही आहे. त्याची समस्याही सुटेल, तुला कोणीतरी दुखावले म्हणून तू त्याला दुखावलेस. तुला वाईट वाटले, तू पश्चात्ताप केलास; आता तुला आणखी काही करण्यासारखे नाही. ते अगोदरच घडून गेले आहे ते दुरुस्त करण्यात संपूर्ण आयुष्य घालवण्यात काही अर्थ नाही. त्याने मोकळीक दिली तर मी त्याला सहाय्य करीन.''

प्रभूने सांगितले ते मी माझ्या मुलाला सांगितले पाहिजे हे मी जाणून होते. मी तसे केले आणि आता या पुढे त्याची भरपाई करण्याचे थांबवायचे असा निश्चय केला. काही वर्षे त्याला अवघड, अडचणीची गेली. पण नंतर अखेर तो सावरला. देवाकडे वळला आणि आता परिपक्व, निकोप होण्याच्या दिशेने त्याची वाटचाल सुरू आहे. आता तो आमच्या सेवाकार्यातील ''वर्ल्ड मिशन्स'' या विभागाचा तो संचालक आहे. आता तो माझा मुलगा, ख्रिस्तामधील सहकारी आणि एक चांगला मित्रही आहे.

माझे तुम्हांला सांगणे आहे की, तुमच्या जीवनातील या क्षेत्राची तपासणी करा. देवाला तुमची भरपाई करू द्या. त्याचे प्रतिफळ मोठे आहे. देवाच्या गोष्टींच्या संबंधात नेहमीच काही काळ प्रतीक्षा करावी लागते. परंतु देव तुम्हांला सांगतो ते तुम्ही करीत राहिलात तर हा प्रतीक्षाकाळ संपेल यात संशय नाही. तुमच्या हातून चुका होतील. पण चुका झाल्या तर पश्चात्ताप करा आणि पुढे चला.

एखादे लहान मूल चालायला शिकते तेव्हा ते काही एकदम झपझप चालत नाही; आरंभी ते अनेकदा पडते, धडपडते. पण ते पुन्हा उठते आणि चालत राहते. अगदी लहान मुलासारखे होऊन येशूकडे या. तुम्हांला घेण्यासाठी त्याने आपले हात पुढे केले आहेत. त्याच्या दिशेने चालत राहा. अनेकदा पडलात तरी पुन्हा उठून पुढे चालत राहा.

हे प्रकरण संपवण्यापूर्वी मी पुन्हा हा मुद्दा मांडते आहे : आम्हांला दुखावणाऱ्या लोकांची भरपाई करून देण्याच्या पाशात आपण सापडतो एवढेच नाही तर केव्हा केव्हा आमच्या छळणुकीशी कसलाच संबंध नसलेल्या लोकांवरही आम्ही आमच्या दु:खाचा भार टाकतो, त्यांना विनाकारण दुखावतो.

माझे भावनिक कर्ज माझ्या पतीकडून फेडून घेण्याचा मी कित्येक वर्षे प्रयत्न चालवला. कारण एकच, तो पुरुष होता, आणि माझे त्याच्याशी नाते होते. ही समस्या सर्वत्र आढळते.

काही स्त्रिया सर्वच पुरुषांचा द्वेष, तिरस्कार करतात; कारण कोणा पुरुषाने त्यांचा छळ केलेला असतो. आईकडून छळला गेलेला मुलगा मोठा होतो, आणि आपले संपूर्ण प्रौढपणाचे आयुष्य स्त्रियांचा द्वेष करण्यात, त्यांना छळण्यात खर्ची घालतो. हाही कर्ज फेडून घेण्याचा एक प्रकार आहे. कृपया लक्षात ठेवा, अशा वागणुकीने प्रश्न सुटत नाही, त्यामुळे कर्ज चुकते झाल्याचे आंतरिक समाधान कधीच मिळत नाही. कर्ज रद्द करण्याचा एकच मार्ग आहे आणि तो देवाचा मार्ग आहे.

# 18

# दुसऱ्यांबरोबर आनंद करण्यास मोकळीक

दुसऱ्यांना आशीर्वाद मिळालेले पाहून ज्याचा छळ झाला आहे त्याला आनंद होतो, तोही त्यांच्या आनंदात सहभागी होतो तेव्हाच भावनिक आरोग्य मिळाल्याचे खरे प्रमाण पटते. रोम.१२:१४ मध्ये दिलेल्या तत्त्वाचा आपण मागील प्रकरणांमध्ये चर्चाविचार केला आहे. हे वचन असे आहे : ''तुमचा छळ करणाऱ्यांना (तुमच्याशी क्रूरपणे वागणाऱ्यांना) आशीर्वाद द्या; आशीर्वादच द्या, शाप देऊ नका.'' आणि देवाचे वचन आम्हांला हेही शिकवते की, ''...आनंद करणाऱ्यांबरोबर आनंद करा आणि शोक करणाऱ्यांबरोबर शोक करा'' (रोम.१२:१५). दुसऱ्यांच्या आनंदात सहभागी व्हा, दुसऱ्यांच्या दु:खात, शोकात सहभागी व्हा.

ज्यांचा कधी छळ झाला नाही, त्यांचा छळ झालेल्या लोकांना हेवा वाटणे साहजिक आहे. पण ज्यांचा छळ झाला आहे, त्यांनी आपल्यामधील द्वेष, मत्सर, हेवा काढून टाकावा, म्हणजे त्यांना संपूर्ण भावनिक आरोग्य मिळेल हे सांगणे, पटवून देणे मला महत्त्वाचे वाटते.

एका सभेमध्ये मी कित्येक लोकांना उत्तेजनपर बोध करीत होते, तेव्हा प्रभूने ही गरज माझ्या लक्षात आणून दिली.

तेवढ्यात अचानक माझे पती व्यासपीठावर आले. कारण देवाने त्यांच्या अंत:करणात एका समर्थ वचनाची प्रेरणा दिली होती आणि ते इतरांना सांगण्याचे त्यांना अगत्य वाटले. डेव्ह म्हणाले, ''जॉईसच्या संदेशातून आताच पाचस्हा जणांना देवाकडून व्यक्तिश: वचनाचा संदेश मिळाला आहे. पण येथे बसलेल्या बहुतेक सर्व लोकांना याचा हेवा वाटतो आहे. प्रत्येकजण मनात म्हणतो आहे, ''हे वचन माझ्यासाठी असते तर बरे झाले असते.''

ते पुढे बोलले, ''देव माझ्या अंत:करणाशी स्पष्टपणे बोलला आणि त्याने तुमच्यासाठी हा निरोप दिला आहे : ''दुसऱ्यांना आशीर्वाद मिळतात तेव्हा त्यांच्यामुळे तुम्हांला आनंद, सुख वाटणार नाही, तोपर्यंत अशा प्रकारच्या गोष्टी (देवाकडून वचन मिळणे) तुमच्या बाबतीत कधीच घडणार नाहीत.'' या शब्दांचा लोकांवर मोठा परिणाम झाला. देवाने दुसऱ्या कोणाला उत्तेजनपर वचन दिले म्हणून त्यांना मोठा मत्सर वाटत होता.

दुसऱ्याला मिळालेल्या आध्यात्मिक कृपादानांचाही आपणाला हेवा वाटणे शक्य आहे. मला उत्तम गाता यावे ही माझी इच्छा होती म्हणून मी चांगले तालासुरावर सुरेल गीते म्हणणाऱ्या गायकांची गीते ऐकत असे आणि मनात म्हणे, *''माझा आवाज असा सुरेल असता तर...''*

एक दिवस देवाने म्हटले, ''हे पाहा, तुझ्या आनंदासाठी हे कृपादान मी दुसऱ्यांना दिले आहे. म्हणून तू त्याचां तिरस्कार करावा आणि मला हे दान मिळाले असते तर असे म्हणावे हे योग्य नाही.'' पुढे तो बोलला, ''मी त्यांना हे दान त्यांच्यासाठी दिलेले नाही, तर तुझ्यासाठी दिले आहे.''

त्याच प्रकारे माझ्यामध्ये देवाची जी कृपादाने आहेत ती इतर लोकांच्यासाठी आहेत. माझ्या कृपादानामुळे माझ्यावर जबाबदारी येते. कसून काम करावे लागते. पण त्यामुळे लोकांना आनंद मिळतो, आशीर्वाद लाभतात. तेव्हा आपण एकमेकांच्या कृपादानांचा लाभ घ्यावा, आनंद मानावा आणि कधीही मत्सर करू नये. देवाने तुमच्यासाठी काही माझ्या माझ्यामध्ये ठेवले आहे, आणि माझ्यासाठी तुमच्यामध्ये काही ठेवले आहे. म्हणूनच कोणीही कोणाचा हेवा, मत्सर करण्याचे काहीच कारण नाही.

असुरक्षितपणाची भावना हे मत्सर वाटण्याचे एक मुख्य कारण आहे असे मला वाटते. ख्रिस्तामध्ये असणे म्हणजे काय हेच माहीत नसल्याने असुरक्षित वाटत असते.

सैतान आमच्याशी लबाडी करतो. आमच्यापेक्षा दुसरे लोक अधिक चांगले आहेत, असे उगाचच खोटेनाटे सांगतो. तो आम्हांला असे नकारात्मक विचार करायला लावतो व शेवटी फशी पाडतो. हे विचार असे : *''त्याच्याकडे आहे ते माझ्याकडे असते तर...'' ''मी तिच्यासारखी असते तर...'' ''त्यांना करता येते ते मला करता आले असते तर...''* वगैरे वगैरे. आपल्याला वाटते आपण दुऱ्यांसारखे असतो तर ते आहेत तसे, तेवढे चांगले झालो असतो. असे चुकीचे, वाकडे विचार केल्याने आमचे मन, अंतरंग हेवा, मत्सर, द्वेष यांनी भरून जाते.

दहा आज्ञांपैकी एक अशी आहे : ''आपल्या शेजाऱ्याच्या घराचा लोभ धरू नको, आपल्या शेजाऱ्याच्या स्त्रीची अभिलाषा धरू नको, आपल्या शेजाऱ्याचा दास, दासी, बैल, गाढव अथवा त्याची कोणतीही वस्तू ह्यांचा लोभ धरू नको'' (निर्गम २०:१७).

*लोभ धरणे* म्हणजे ''मत्सरग्रस्त होऊन ...ची इच्छा धरणे'' ''दुसऱ्याकडे असलेल्या वस्तूची अथवा गुणाची सर्वत्र प्रशंसा होते हे पाहून ती वस्तू अथवा तो गुण आपल्याला असावा

अशी इच्छा धरणे व इच्छा केल्याने ती वस्ती, तो गुण मिळत नाही म्हणून होणारे दु:ख, वाटणारी खंत, होणारी वेदना म्हणजेच मत्सर, अशीही मत्सराची सविस्तर व्याख्या आहे. मत्सर वाटणे म्हणजे स्पर्धा सहन न होणे, अगर ज्याच्याकडे काही विशेष आहे त्याच्याशी वैर घेणे. मत्सरी मनुष्य त्याच्याकडे आहे ते इतरांना देण्यास अगर ते त्यांच्याकडे असू देण्यास कधीच तयार नसतो. थोडक्यात मत्सरी माणसाला स्वत: दुसऱ्याएवढे असण्याने समाधान होत नाही. त्याला दुसऱ्यापेक्षा आपण अधिक चांगले व्हावे असे वाटते.

जुन्या करारातील नियमशास्त्रामध्ये असे सांगितले होते की, देवाची कृपा परिपूर्णतेने संपादन करावी लागते आणि आपल्यातील उणेपण, अपूर्णता भरून निघावी यासाठी सतत यज्ञार्पणे करीत राहिले पाहिजे. हे तर अगदीच अशक्य होते. लोकांनी सतत खटपट केली, कसून प्रयत्न केले तर कुठे त्यांना पहिल्या नऊ आज्ञांचे पालन करता आले असते. पण ''लोभ धरू नको'' ही दहावी आज्ञा पाळणे त्यांना कधीच शक्य झाले नसते, कारण ''लोभाचा'' संबंध व्यक्तीचे अंत:करण आणि वासना, इच्छा यांच्याकडे आहे.

नियमशास्त्राच्या आदर्श मानदंडानुसार नीतिमान होण्या-असण्यासाठी प्रत्येकाला संपूर्ण नियमशास्त्राचे पालन पूर्णपणे करणे आवश्यक होते. बहुतेक नियमशास्त्राचे पालन करणे पुरेसे नव्हते. म्हणूनच सर्व लोक या दहाव्या आज्ञेच्या बाबतीत अडखळले होते. शेजाऱ्याचे घरदार त्याचे दासदासी अगर त्याच्याकडे असलेल्या इतर कोणत्याही वस्तू यांतून कशाचाही लोभ न धरणे, तसा विचारही मनात येऊ न देणे सर्वस्वी अशक्य होते. मानवजातीला तारणाऱ्याची अगदी तातडीने निकड का आहे ते या एकाच आज्ञेतून अगदी सूर्यप्रकाशाएवढे स्पष्ट होते. आम्हा मानवी जीवांना सहाय्याची मदतीची निकराची गरज आहे. नाही तर आम्हांला देवासमोर शुद्ध, स्वच्छ असे उभे राहण्याची अजिबात आशा नाही.

नव्या करारानुसार प्रत्येक व्यक्तीचे मूल्य आणि महत्त्व तिच्या ''ख्रिस्तामध्ये'' असण्यावर आधारलेले आहे. व्यक्तीला ज्याची ज्याची म्हणून गरज आहे त्या प्रत्येक गोष्टीसाठी सर्वस्वी त्याच्यावर विश्वास ठेवल्याने ''ख्रिस्तामध्ये'' राहता येते. ख्रिस्तच आमचे नीतिमत्त्व आहे. दुसऱ्याकडे जे आहे ते आम्हांला मिळाल्याने नव्हे तर येशूवरील विश्वासाने आम्ही योग्य, नीतिमान केले जातो. हे सत्य नीट समजून घेतले की सुरक्षितपणाची जाणीव, खात्री होते आणि मग दुसऱ्याचा द्वेष, मत्सर अगर हेवा करण्याची प्रवृत्तीच उरत नाही. गरज तर वाटतच नाही.

## एकाच शरीराचे अवयव - भाग

एक दिवस मी मत्सर या विषयाचे विवेचन करीत होते. तेव्हा हा मुद्दा समजावून सांगण्यासाठी देवाने मला एक उत्तम उदाहरण दिले. तुमच्या कल्पनाशक्तीचा उपयोग करा आणि याचा विचार करा : मला एकच शरीर-देह आहे, पण अनेक वेगवेगळे भाग - अवयव मिळून त्याची जडणघडण झाली आहे. माझ्या भौतिक शरीराचे विविध भाग असून प्रत्येक भाग दुसऱ्याहून भिन्न, वेगळा आहे. प्रत्येक भाग, अवयव वेगळा दिसतो. त्याचे कार्य वेगळे

आहे, आणि प्रत्येकाची शक्ती, क्षमता भिन्न आहे. काही भाग अधिक स्पष्ट उठून दिसतात, काही झाकलेले असून ते क्वचितच दिसतात, पाहिले जातात (१ करिंथ. अ.१२ मध्ये प्रेषित पौलाने हेच उदाहरण घेऊन ख्रिस्तशरीराची म्हणजे मंडळीची तुलना आमच्या शरीराशी केली आहे).

माझ्या हाताच्या बोटाला अंगठी घालायला मिळते आणि अंगठी बोटावर कशी शोभून दिसते ते डोळ्यांना पाहता येते. परंतु डोळ्याला मत्सर वाटू लागला, कुरकूर करू लागला, ''मलाही अंगठी हवी'' असे म्हणाला आणि त्या मत्सरी डोळ्याचे म्हणणे ऐकून त्यालाही अंगठी द्यावी असे देवाने ठरवले तर माझ्या देहाचे काय होईल, किती उलथापालथ होईल त्याची कल्पना करा!

तुमच्या बोटातली अंगठी घेऊन ती डोळ्यात घालण्याचा प्रयत्न करून पाहिलात तर मला काय सांगायचे आहे ते ताबडतोब तुम्हांला कळेल. डोळ्यावर अंगठी घालायची तर ती जागेवर राहावी यासाठी डोके सतत मागे कललेले ठेवावे लागणार. आणि मग डोळा बाकीच्या शरीराला मार्ग दाखवू शकणार नाही, कारण डोळ्याचा डोळा वर आकाशाकडे असल्याने त्याला जमिनीवरचे पुढचे काहीच दिसणार नाही.

तेव्हा पहिला मुद्दा असा आहे : देवाने आमच्यासाठी जे नेमले आहे ते करण्याऐवजी आपण जे नाही ते होण्याचा प्रयत्न केला, तर ख्रिस्ताच्या शरीरात, मंडळीत देवाने आम्हांला नेमून दिलेले कार्य करता येणार नाही. त्याचप्रमाणे डोळा अंगठी घालू पाहील तर त्याला बोटातली अंगठी, अंगठीची शोभा पाहता येणार नाही. देवाने त्याच्यासाठी नेमून दिलेले नयनसुख त्याला मिळणार नाही. बोटाला अंगठी मिळते, पण डोळ्याला अंगठी पाहता येते. उर्वरित शरीराला जे काही दिले आहे ते पाहण्याचा आनंद, सुख डोळ्याला दिले आहे.

दुसरा मुद्दा स्पष्टच आहे. एखादी व्यक्ती जे होण्यासाठी नेमली आहे, ते बाजूस ठेवून दुसरेच काही होण्याचा प्रयत्न करील तर तो मोठ्या लाभाला मुकला असे होईल. देहामध्ये नेमून दिलेल्या ठिकाणी राहून ठरवून दिलेले कार्य करण्यात समाधान मानले तरच त्याला स्वस्थता व शांती लाभेल. स्वर्गाच्या वाटेने चालणारे कित्येक लोक आनंदाने नव्हे, तर रडतखडत चालतात, त्याचे हेच कारण असावे असे व्यक्तिश: मला वाटते.

मी शिक्षण देत असताना देवाने हे उदाहरण माझ्या मनाला प्रगट केले. हात आणि पाप यांच्या उदाहरणाने त्याने ते मला अधिक स्पष्ट करून सांगितले. जरा हे लक्षात घ्या : माझ्या पायांना सर्व जोडे, बूट मिळतात तेव्हा माझ्या हातांना एवढा आनंद होतो की माझे पाय नवीन जोड्यामध्ये नीट जात नसतील तर माझे हात माझ्या पायांना जोडे, बूट घालण्यास मदत करतात!

आपल्या शरीराचे कार्य या प्रकारे चालणे अगत्याचे आहे. कोणत्याही अवयवाने दुसऱ्या कोणत्याच अवयवाचा कधीही हेवा करायचा नाही. परमेश्वराने आपल्याला एका विशिष्ट अनन्य हेतूने निर्माण केले आहे. प्रत्येक अवयव शरीरामध्ये त्याला नेमून दिलेले कार्य करीत

राहतो. देवाच्या दृष्टीने कोणताही अवयव दुसऱ्यापेक्षा अधिक चांगला नाही हे प्रत्येक अवयव जाणून आहे.

वेगवेगळे कार्य असले तरी त्यामुळे कोणताही अवयव दुसऱ्यापेक्षा कनिष्ठ, कमी प्रतीचा होत नाही. आपल्या ठिकाणी राहून नेमून दिलेले कार्य करीत प्रत्येक अवयव आवश्यक तेव्हा दुसऱ्या अवयवांना मदत करण्यास तत्पर असतो. हात पायांना म्हणत नाही, ''तुमचे नवे बूट घालण्यास मी मदत करीन असे तुला वाटत असेल तर ते चूक आहे. आजवर तुम्हांला खूप मदत केली. आता नाही. वास्तविक मलाही बूट घालायला पाहिजेत. नुसते अंगठ्या आणि हातमोजे घालून घालून मला कंटाला आलाय. मला पण बूट हवेत म्हणजे मीही तुमच्यासारखा होईन.''

नाही! असे कधी घडत नाही. पायांना नवे बूट मिळतात आणि ते घालण्यासाठी हातांची मदत लागते तेव्हा हात असे कधी म्हणत नाहीत आणि आमच्या परिचयाच्या कोणाला काही मदत हवी असली तर आम्हीही या प्रकारे बोलू नये. दुसऱ्यांना सर्व प्रकारे शक्य ती सर्व मत करण्यास आम्ही नेहमी तयार असावे. देवाने ठरवल्याप्रमाणे त्यांना होता यावे, त्यांच्यासाठी राखून ठेवलेले आशीर्वाद त्यांना मिळावे यांसाठी त्यांना सहाय्य करणे हे आमचे कर्तव्यच आहे.

आपणा स्वत:ला विचारा : ''मी डोळ्यात अंगठी घातली आहे काय? हातात बूट घातले आहेत काय?'' खरेच असा काही प्रकार असेल तर तुम्ही दु:खी, कष्टी आणि निराश असणार यात शंकाच नाही.

योहानकृत शुभवर्तमानाच्या तिसऱ्या अध्यायामध्ये पाहा. बाप्तिस्मा करणाऱ्या योहानाचे शिष्य त्याच्याकडे येऊन म्हणाले, ''आता येशूही तुमच्याप्रमाणे लोकांना बाप्तिस्मा देत आहे आणि बहुतेक लोक त्याच्याकडेच जातात. आपल्याकडे फारच थोडे लोक येतात.'' शिष्यांनी योहानाला हे बऱ्याचशा नाराजीने मत्सरभावनेतून सांगितले. योहानाला येशूचा हेवा, मत्सर वाटावा या हेतूने त्यांनी हे त्याला कळवले. ज्यांनी हा निरोप आणला त्या शिष्यांना अर्थातच असुरक्षित वाटत होते. योहानाच्या मनात येशूविषयी कटुता उत्पन्न व्हावी यासाठी सैतानाने त्या शिष्यांना हाताशी धरले होते.

त्यावर योहानाने उत्तर दिले : ''मनुष्याला स्वर्गातून दिल्यावाचून काहीच मिळू शकत नाही'' (योहान.३:२७). स्वर्गातून मिळालेल्या देणगीत, कृपादानात आपण संतुष्ट असावे.

योहान आपल्या शिष्यांना हेच सांगत होता की, येशू जे काही करीत होता त्यासाठी स्वर्गातून त्याला तसे कृपादान मिळाले होते. आपणाला कोणत्या कार्यासाठी पाचारण झाले होते ते योहानाला माहीत होते, आणि येशूला कोणत्या कार्यासाठी पाचारण झाले होते तेही योहानाला माहीत होते. आपले पाचारण आणि कृपादान यांच्या पलीकडे जाणे कोणाला शक्य नाही हेही त्याला माहीत होते. योहान आपल्या शिष्यांना सांगत होता, ''आहे त्यात संतुष्ट, समाधानी राहा.'' येशूचा अग्रगामी होण्यासाठी, त्याच्यासाठी मार्ग तयार करण्यासाठी देवाने

आपल्याला पाचारण केले आहे आणि येशूपुढे आघाडीवर येण्याची वेळ आली की आपणाला लोकांपासून एकीकडे राहणे जरुर आहे हे योहान जाणून होता.

लोक थव्याथव्याने येशूकडे जात आहेत हे शिष्यांनी येऊन योहानाला सांगितले तेव्हा त्याने शिष्यांना स्पष्टच सांगितले, ''त्याची वृद्धी व्हावी व माझा ऱ्हास व्हावा हे आवश्यक आहे'' (योहान.३:३०). तो अधिकाधिक प्रसिद्ध, लोकप्रिय होणे आणि मी बाजूला होणे अगत्याचे आहे. योहानाचे हे बोलणे, हे विचार किती मनमोकळे आणि प्रांजळ आहेत! ख्रिस्तामध्ये सर्वस्वी सुरक्षित असणे, त्याविषयी मनात कसलीच शंका नसणे किती तरी चांगले आहे! मग आपणाला कोणाशीही स्पर्धा करण्याचे कोणतेच कारण नाही.

## स्पर्धेपासून मुक्तता

प्रेषित पौलाने लिहिले आहे, ''आपण पोकळ अभिमान बाळगणारे, एकमेकांना चीड आणणारे व एकमेकांचा हेवा करणारे होऊ नये'' (गलती.५:२६). म्हणजेच आपण स्वत:ला मोठे समजू नये. एकमेकांशी स्पर्धा करू नये, कोणी कोणाला आव्हान देऊ नये, एकमेकांचा द्वेष, मत्सर आणि हेवा करू नये.

पौलाने आम्हांला सांगितले आहे की, आम्ही प्रभूमध्ये इतके वाढत जावे की आपण काही उपयुक्त प्रशंसनीय कार्य करावे, म्हणजे कोणा दुसऱ्याची तुलना करून पोकळ अभिमान बाळगण्याचे कारण उरणार नाही. आमचे काम हीच आमची प्रशंसा असेल (गलती.६:४).

देवाचे आभार माना. आम्ही ख्रिस्तामध्ये कोण आहो हे एकदा समजले की, दुसऱ्यांशी तुलना व स्पर्धा करून मनावरील ताणतणाव वाढवण्याची आपली प्रवृत्ती मावळेल. मनावरील भार, दडपण दूर होईल. आमचे कार्य, आमची संपादणूक याशिवाय आम्हा स्वत:ला मूल्य व महत्त्व आहे. म्हणूनच दुसऱ्या कोणापेक्षा अधिक चांगले होण्याची खटपट बाजून ठेवून देवाचे गौरव करण्याकडेच लक्ष लावावे.

लोक अनेकदा माझ्या पतीला किंवा मला विचारतात, ''मी करते ती सेवा करणाऱ्या स्त्रीशी लग्न केल्याने डेव्हला (माझ्या पतीला) काय वाटते?'' मी अनेक प्रकारे देवाची सेवा करते, मी रेडिओवरचा आवाज आहे, टीव्हीवरचा चेहरा आहे, मीच लोकांसमोर पुलपीटवर उभी राहून संदेश देते. नेहमी बहुतेक मीच लोकांमध्ये, लोकांच्या समोर असते. ते अधिक करून माझ्याविषयीच बोलतात. थोडक्यात आमच्या सेवाकार्यात माझाच सहभाग अधिक आहे. डेव्ह व्यवस्थापक, प्रशासक आहे. त्याचे काम व पद महत्त्वाचे आहे. पण तो जणू पडद्याआड असतो. मागे राहूनच तो सर्व कारभार पाहतो, माझे काम लोकांसमोर नेहमीच असते.

आमची ही व्यवस्था अनन्य आहे, कारण साधारणपणे हा क्रम नेहमी उलट म्हणजे पती पुढे आणि पत्नी मागे असे असते. सांघिक कार्यात पुरुषच महत्त्वाची बाजू सांभाळतो आणि पत्नी मागे राहून त्याला सहाय्य करते असेच साधारणपणे आढळते. पण माझ्या पतीला

सुरक्षित वाटते. ते करतात अगर करीत नाहीत त्यावर त्यांचे मूल्य अगर महत्त्व अवलंबून नाही. खरे तर ते एवढे स्वस्थ, सुस्थिर आहेत की, प्रभूचे आज्ञापालन करताना ते ख्रिस्तामध्ये मला जसे व्हायचे तसे होण्यास सर्व प्रकारे सहाय्य पुरवतात. माझ्या जीवनातून देवाचे पाचारण पूर्ण व्हावे म्हणून मला सहाय्य करण्यातच ते संतुष्ट व समाधानी आहेत, आणि हे करीत असताना ते त्यांच्या स्वत:च्या जीवनातील देवाचे पाचारण पूर्ण करीत आहेत.

डेव्हचे पाचारण व त्यांचे पद, दर्जा माझ्या पाचारणाएवढे निश्चितच महत्त्वाचे आहेत. फक्त ते लोकांच्या नजरेसमोर येत नाहीत एवढेच. सेवाकार्याचा कारभार व्यवस्था पाहणारे म्हणून ते आर्थिक बाजू सांभाळतात. आमचा कार्यक्रम *''लाईफ इन द वर्ड''* रेडिओ आणि टीव्ही केंद्रावरून प्रसारित करण्यासाठी करारमदार करतात आणि पूर्वीपासून प्रसारित होणाऱ्या आमच्या कार्यक्रमातून इष्ट ते फळ मिळते का हे पाहतात तसेच आमच्या सर्व प्रवासाची तजवीज तेच करतात.

आमच्या सभांमध्ये शास्त्राचे शिक्षण देणाऱ्या टेप (ध्वनिफिती) वितरणासाठी आम्ही मांडून ठेवतो. डेव्ह ती सर्व व्यवस्था पाहतात. तेच येणाऱ्या लोकांशी बोलतात, त्यांनीही माझ्याबरोबर पुलपिटवरून बोलावे, संदेश द्यावा अशी मी त्यांना अनेकदा विनंती केली. पण त्यांचे नेहमी एकच उत्तर आहे : ''माझी जागा तेथे पुलपीटवर नाही. मी कुठे राहून काय करायचे ते मला चांगले माहीत आहे आणि मी तेथेच राहून सेवा करणार.'' हे त्यांचे बोलणे स्वस्थ, सुस्थिर व परिपक्व माणसाचे केलेले निवेदन आहे.

लोक बहुधा नेहमीच डेव्हला विचारतात, ''कायहो, तुम्हीच का जॉयसचे पती?'' त्यावर ते म्हणतात, ''नाही, जॉयस माझी पत्नी आहे.''

आमच्या सेवाकार्यामध्ये डेव्ह अनेकानेक महत्त्वाची कामे करतात. पण आपल्या कामाचे स्वरूप ते नेहमीच या शब्दांत सांगतात : ''जॉयसचे कवच, आवरण होण्यासाठी देवाने मला पाचारण केले आहे. ती जेथे असावी अशी देवाची इच्छा आहे, तेथवर तिला नेणे हे माझे काम आहे. ती दुखावली जाणार नाही, अडचणीत येणार नाही, याची दक्षता मी घेतो.''

केव्हा केव्हा मला काही गोष्टी करायच्या असतात, पण डेव्ह मला त्या करू देत नाही. कारण त्याच्या दृष्टीने त्या अयोग्य, असमंजसपणाच्या असतात, अगर त्या करण्याची योग्य वेळ आलेली नसते. त्याच्या म्हणण्याप्रमाणे वागणे, त्याचे ऐकणे नेहमीच सरळ सोपे असते हे मी तरी म्हणणार नाही. पण त्याच्या कृपादानांमुळे आमच्या जीवनात आणि आमच्या सहसेवाकार्यात एक उत्तम समतोल साधला आहे हे मला चांगले पटले आहे.

सुरुवातीची एकदोन वर्षे डेव्हने आमच्या एकंदर परिस्थितीशी बरीच झटापट केली. खरे तर त्याला या सेवाकार्यात येण्याची मुळीच इच्छा नव्हती. परंतु मला देवाचे वचन शिकवण्याचे दिव्य कृपादान दिलेले आहे हे देवाने त्याला दाखवले. डेव्ह सांगतात, ''देवाने

मला माझ्या पत्नीच्या अधीन होण्यास सांगितले नाही, परंतु तिला दिलेल्या कृपादानाच्या मी अधीन असावे हे त्याने मला सांगितले.'' देवाने ते कृपादान कोणते हे दाखवून सांगितले की ते त्याचे, त्याने दिलेले आहे, आणि त्या कृपादानाच्या अधीन झाल्याने आणि त्याच्या पाचारणाप्रमाणे मला कार्य करण्यास मोकळीक दिल्याने डेव्ह वस्तुत: प्रत्यक्ष प्रभूलाच सादर झाले होते.

देवाने मला जे करण्यासाठी पाचारण केले आहे ते करण्यास त्यांनी मला मोकळीक दिली आहे. एवढेच नव्हे, तर ते करण्यसाठी जरुर ते सहाय्यही पुरवतात. डेव्ह मायर माझे पती आहेत हा माझाच मोठा बहुमान आहे असे मी समजते. माझ्या दृष्टीने ते सर्वश्रेष्ठ पुरुष आहेत. तसेच त्यांच्यासारखा दुसरा संतुष्ट आणि सुखी माणूस माझ्या तरी पाहण्यात नाही.

डेव्ह सुखी आहेत असे मी म्हणते ते अक्षरश: खरे आहे. ते भरभरून जीवनाचा आस्वाद घेतात. देवाच्या अधीन होऊन आज्ञापालन करणे आणि प्रभूने ज्यासाठी पाचारण केले नाही ते होण्याचा, करण्याचा हव्यास न धरणे यामुळेच आम्ही सुखी व आनंदी आहोत असे आम्हा दोघांनाही वाटते. त्यांची कोणाशीही स्पर्धा नाही, चढाओढ नाही. तो कोणालाच कशाचेही प्रमाण पुरावा देण्याचा प्रयत्न करीत नाहीत.

## सुस्थिर, मुळावलेले व पाया घातलेले

या पुस्तकाचा आरंभ केल्यापासून माझी तुमच्यासाठी हीच प्रार्थना आहे की, ''ख्रिस्ताने तुमच्या अंत:करणामध्ये तुमच्या विश्वासाच्या द्वारे वस्ती करावी; ह्यासाठी की, तुम्ही प्रीतीत मुळावलेले व पाया घातलेले असे असून तिची रुंदी, लांबी, उंची व खोली हे तुम्ही सर्व पवित्र जनांसह समजून घ्यावयास व बुद्धीस अगम्य अशी ख्रिस्ताची प्रीती ओळखून घ्यावयास शक्तिमान व्हावे'' (इफिस.३:१७-१९).

दुसऱ्यांशी चढाओढ करण्याच्या गरजेतून आम्ही सुटलो की मग त्यांना - दुसऱ्यांना - यशस्वी होण्यासाठी मदत देण्यास आम्ही मोकळे असतो. आम्ही खरोखरी कोण आहोत ते आम्हांला समजले म्हणजे मग स्वत:चे मोल व महत्त्व आम्हा स्वत:ला व इतरांना पटवून देण्याच्या प्रयत्नात आयुष्य खर्ची घालण्याचे कारणच उरत नाही.

आपण देवाला महत्त्वाचे आहो हे डेव्ह जाणून आहे. म्हणूनच त्याचे पद व माझे पद यांची तुलना करून जगाला काय वाटते त्याची त्याला पर्वा नाही. डेव्हचा निर्णय व जीवन ही अनेकांना एक साक्ष होईल अशी माझी पक्की खातरी आहे. देवाच्या राज्यामध्ये करण्यासारखे पुष्कळ काही आहे आणि देवाने आम्हा प्रत्येकाला व्यक्तिश: जे काही नेमून दिले असेल ते काम आपण सर्वांनी एकदिलाने केले तर ते अधिक इष्ट ठरेल, राज्याचे कार्य साध्य होईल.

*तेव्हा आपण सर्वांनी मत्सर, हेवा, स्पर्धा, चढाओढ, तुलना करणे, डावेउजवे पाहणे या कशालाही आमच्यामध्ये अजिबात थारा अथवा वाव देऊ नये.* लक्षात ठेवा हे सर्व प्रश्न, समस्या असुरक्षिततेच्या भावनेतून उद्‌भवतात. असुरक्षितपणाच्या भावनेपासून मुक्त होणे, त्यातून निर्माण होणाऱ्या समस्या आपल्याला कधीच सतावणार नाहीत ही उत्तम बातमी आहे. यशया ५४:१७ या वचनात सांगितले आहे : (शांती, नीतिमत्त्व, धार्मिकता, सुरक्षितपणा, विरोधावर विजय) हेच प्रभू परमेश्वराच्या सेवकांचे वतन आहे. देवाचे पुत्र व कन्या या नात्याने सुरक्षितता हा आमच्या वतनवारशाचा एक भाग आहे हेच यातून स्पष्ट होते. तुमच्या या वतनाचा लाभ आतापासूनच करून घ्या.

दुसऱ्यांसाठी आनंद करा. देव तुमच्यावर प्रीती करतो हे जाणल्याने मिळणारा संतोष, समाधान, शांती, आणि आनंद यांचा लाभ घ्या. येशू ख्रिस्तावरील तुमच्या विश्वासाच्या द्वारे देव तुम्हांला नीतिमान आणि मोलवान असे गणतो. तुमच्यावरील त्याच्या प्रीतीमध्ये भक्कम पाया घातलेले आणि दृढ मुळावलेले असा.

# 19

# भावनिक स्थैर्य

या पुस्तकात मागे एका प्रकरणात ज्याचा छळ झाला आहे, ज्याच्या स्वभावात लाजशरम मुरली आहे अशा व्यक्तींकडून होणाऱ्या विपरीत वर्तनाविषयी मी चर्चाविचार केला आहे (प्रकरण ४). या प्रकरणात मी भावनिक विपरीत सवयी आणि या सवयी मोडून भावनिक स्थैर्य कसे मिळवावे याविषयी विचार करणार आहे.

*सवय* म्हणजे चटक, जाणीवपूर्वक विचार न करता, कोणत्या तरी उत्तेजनाला प्रतिसाद म्हणून सहज आंतरिक सक्तीने होणारे वर्तन. दुखावलेले लोक कृतीऐवजी प्रतिक्रियाच करतात. त्यांचा कल तसाच असतो. त्यांच्या भावना दुखावलेल्या असतात, आणि त्याच्या आधारे प्रतिक्रिया करण्याकडे त्यांचा कल असतो. ते सुज्ञपणाने आणि देवाच्या वचनानुसार कृती करीत नाहीत.

मीही कित्येक वर्षे भूतकाळाची आठवण देणारी काही घटना, प्रसंग घडला अगर एखादी व्यक्ती माझ्यासमोर आली तर मी भयभीत होऊन भावनांच्या आड स्वत:ला लपवीत असे. आलेल्या प्रसंगाला विश्वासाने तोंड द्यावे हे माझ्या आवाक्याबाहेरचे होते. छळाला बळी पडलेल्या लोकांना या प्रकारच्या घटना, प्रसंग, दिङ्मूढ करतात, कारण अशा वेळी सर्व काही एवढ्या झटपट घडते की आपण काय करतो, असे का वागतो याचे भान त्याला येत नाही. उदाहरणार्थ, माझा छळ करणाऱ्याचे व्यक्तित्व जबरदस्त, प्रभावी, वर्चस्व गाजवणारे होते. माझ्या बालपणी माझ्यावर अनेक बंधने होती. नाना प्रकारे धाकदपटशा दाखवून माझा गैरफायदा घेतला गेला. तेव्हाच मी निश्चय केला, आणि स्वत:ला पुन:पुन्हा बजावून सांगितले की मी घर सोडून जाण्याएवढी मोठी झाले, स्वत:च्या पायावर उभी राहिले की, मग मी कोणालाही माझ्यावर कधीच वर्चस्व गाजवू देणार नाही.

त्या पुढच्या काही वर्षांमध्ये अधिकार, अधिकारी यांच्याकडे मी विकृत दृष्टीने पाहत होते. सर्व अधिकारी व्यक्ती माझ्या शत्रू आहेत असेच मी समजत होते. दुसरा कोणी माझ्यावर वर्चस्व ठेवून माझ्याकडून हेवे ते करून घेईल या प्रकाराची मला एवढी दहशत बसली होती की माझ्या आयुष्यात येणाऱ्या कोणाही व्यक्तीने मला काही माझ्या मनाविरुद्ध करण्यास सांगितले तर माझ्या तळपायाची आग मस्तकात जाई, मी रागाने ओरडे किंवा तेथून दुसरीकडे जात असे. अनेकदा याचे कारण अगदी किरकोळ, क्षुल्लक असे. मला न पटणारे, न आवडणारे असे कोणी काही बोलले, मला करायला सांगितले तर त्यामुळे माझी नाराजी, चीड उसळून येत असे. मी असे का वागते, एवढी का चिडते ते इतर कोणाहीप्रमाणे मलाही समजत नव्हते. माझे हे वागणे, विचित्र आहे, चूक आहे हे मी तर्काने जाणून होते, आणि मला तसे वागण्याची इच्छाही नव्हती, पण बदल करण्यास, नीट वागण्यास माझ्यात जराही ताकद नव्हती.

भावनिक वर्तन सवयीबद्दल देव मला शिकवू लागला. लोकांना ज्या प्रकारे काही रासायनिक पदार्थांची सवय लागते, त्यांच्या शरीराला ती ती द्रव्ये हवीच असतात. जसे मद्य, अमली पदार्थ, तंबाखू, साखर, कॅफीन, इ. त्याचप्रमाणे त्यांना मानसिक व भावनिक सवयी जडतात. सवय, व्यसन म्हणजे अविचाराने साधकबाधक विचार न करता केलेले, आवश्यक वाटणारे वर्तन. माझ्या जोरदार प्रतिक्रिया, रागाने ओरडणे वगैरे. ''तुम्हांला माझ्यावर वर्चस्व गाजवता येणार नाही'' हे दाखवण्याचा माझा प्रयत्न होता.

माझ्यावर कोणी काबू, नियंत्रण ठेवील याची मला एवढी दहशत बसली होती की, वस्तुस्थिती प्रत्यक्षात भयकारी असो वा नसो सर्व प्रसंगी मी स्वत:चे रक्षण करण्यासाठी जबरदस्त प्रतिक्रिया देत होते. ''तुम्हांला माझ्यावर वर्चस्व गाजवू देणार नाही,'' हे माझ्या संतापाचे सांगणे होते आणि ''मला तुमच्याशी काही देणेघेणे नाही'' हे निघून जाण्याचे, बाजूस होण्याचे सांगणे होते. एखाद्याने एखाद्या कामात भाग घेण्यास नकार दिला तर त्याला काही इजा होणार नाही, म्हणूनच माझ्या एखाद्या/कोणत्याही नातेसंबंधात काही दु:खकारक घडले तर एक तर मी ते धुडकावून लावी अगर त्याच्याकडे साफ दुर्लक्ष करीत असे. पण हे दोन्ही प्रकारचे वर्तनक्रम विपरीत आणि अशास्त्र आहेत. यात जडलेल्या विपरीत वर्तनसवयीला खतपाणी घालून विकृती अधिकच वाढवली जाते.

एखाद्याला अमली पदार्थाचे व्यसन जडले असेल तर त्याचे ते व्यसन दिवसेंदिवस वाढतच जाते. तो जेवढा त्या सवयीच्या आहारी जातो, तेवढी ती सवय त्याच्या हाडीमाशी खिळून बसते. अखेर ती सवय त्याला गिळून टाकते, सवय मोडलीच पाहिजे. म्हणजेच देहाला लागलेली चटक, भूक भागवता कामा नये आणि ती सवय सोडताना होणारा त्रास व दु:ख धीराने सोसले पाहिजे. मानसिक अगर भावनिक सवयीपासून सुटण्यासाठीही तसेच केले पाहिजे. सवय मोडताना होणारी वेदना सहन केली पाहिजे. दोन्ही बाबतीत ते एकच तत्त्व लागू पडते.

## सतत चिंता आणि युक्तीवाद करण्याची सवय

माझ्या मनाला चिंता करण्याची सवय लागली होती. मी सतत चिंता, चिंता आणि चिंताच करीत होते. काळजीचे कोणतेही कारण नसले तरी काहीतरी निमित्त मी शोधून काढीत असे. मी जबाबदारीची खोटीच जाणीव मनात उभी केली. माझ्यावर ज्यांची जबाबदारी नव्हती अगर उत्तरेही नव्हती अशा प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा माझा नेहमीच प्रयत्न असे. मी विचार करी, मनाशी काही ठरवीत सतत गोंधळलेल्या अवस्थेत जगत होते.

परिणामी माझ्या मनात सतत चिंता, काळजी आणि उलटसुलट विचार यांचे थैमान चालत असे. यामुळे मला जबरदस्त शारीरिक व मानसिक थकवा येत असे, माझ्या जीवनात उत्साह, आनंद नावालाही उरला नव्हता. तरीपण यावर नियंत्रण ठेवणे माझ्या शक्तीपलीकडचे होते. चिंता आणि युक्तिवाद हाच कोणत्याही प्रश्नावर माझा सर्वसाधारण स्वयंप्रतिसाद होता. माझे हे वर्तन विपरीत, असाधारण असले तरी माझ्या दृष्टीने ते सर्वसामान्य, नित्याचे होते कारण मी आतापर्यंत नेहमीच या प्रकारे प्रश्नांना सामोरी जात होते.

देवाचे वचन सांगते : ‘‘परमेश्वरावर भाव ठेव [टेकून राहा, अवलंबून राहा, निश्चिंत राहा]’’ (स्तोत्र.३७:३ विस्तारीत अनुवाद). पण तुमचा छळ झालेला असेल तर भरंवसा ठेवणे वाटते तेवढे सोपे नसते. हे आपली काळजी घेतली असा ज्यांच्याविषयी तुम्हांला भरंवसा होता त्यांनी काळजी घेतली नाही तर तुमचा गैरफायदाच घेतला मग काय? त्यांनी तुमचा भयंकर छळ केला, तुम्हांला दुखावले म्हणून पुन्हा आपल्याला कोणी असा त्रास देणार नाही, छळणार नाही असे तुम्ही स्वत:ला बजावले, दुसरे कोणी तुम्हांला त्रास देतील का तुमची काळजी घेतील हे तुम्ही पारखून देखील पाहिले नाही. तर आपले रक्षण व्हावे, यासाठी स्वत:भोवती संरक्षक तटबंदी उभारली.

प्रत्येक गोष्टीचा शेवट काय कसा होईल ते अगोदरच कल्पनेने पाहणे हा स्व-रक्षणाचा एक मार्ग आहे. हे तुम्हांला साध्य झाले तर आता सर्व आपल्या हाती, नियंत्रणात आहे आणि आता अचानक काही घडून आपली त्रेधातिरपीट उडणार नाही असे तुम्हांला वाटेल.

देव माझ्या जीवनामध्ये कार्य करू लागला तेव्हा त्याने मला स्पष्टपणे दाखवले की, मला चिंता व युक्तिवाद करण्याचे व्यसन लागले आहे आणि मी ही सवय सोडली पाहिजे. पण माझ्या जीवनात एखादा प्रश्न असला आणि तो सोडवण्यासाठी माझे प्रयत्न चालू नसतील तर मी आतल्या आत सर्वस्वी सैरभेर होत असे. माझ्या सभोवार सुरू असलेल्या प्रत्येक गोष्टीवर माझेच पूर्ण नियंत्रण असावे ही माझी दुर्दम्य इच्छा होती हे तुम्हांला माहीत आहेच. असे केल्याने मी कधीच दुखावली जाणार नाही असा माझा कयास होता.

*मी स्वत:च स्वत:ची चांगली काळजी घेईन ही माझी खातरी होती, पण दुसरे कोणी माझी नीट काळजी घेऊ शकेल हे मला पटत नव्हते.*

## स्वतःला विसरा, स्वतःचे लाड करू नका

येशूने म्हटले, ''...जर कोणी माझा अनुयायी होऊ पाहतो तर त्याने आत्मत्याग करावा [स्वत:ला विसरावे, दुर्लक्ष करावे, स्वत:ला व स्वहिताला नजरेआड करावे] आपला वधस्तंभ उचलून घ्यावा व मला अनुसरत राहावे'' (माक.८:३४ विस्तारित अनुवाद).

प्रभू मोठ्या धीराने, नेमस्तपणे माझ्यामध्ये कार्य करीत होता. मी त्याच्यावर विश्वास ठेवावा, आणि मी नव्हे तर तोच माझ्या प्रश्नाची समस्येची उकल करीत आहे ही खात्री बाळगावी हे त्यानेच मला शिकवले. चिंता आणि युक्तिवाद करणे सोडून विश्वासाने पुढे पाऊल टाकायचे एवढे मला करायचे होते. माझ्या मनाला चिंतेची जडलेली सवय मोडून काढायची होती. मी तसे केले, चिंतेची उर्मी उसळली की मी लगेच मन देवाच्या वचनाकडे लावीत असे. पुढे यथावकाश मी चिंतामुक्त झाले. देवाने त्यातून माझी पुरती सुटका केली.

पण हे काही सुखासुखी घडले नाही. मला भय वाटत होते, माझा ताबा सुटल्यासारखा झाला. केव्हा केव्हा मी मूर्खपणाही करीत असे. (एखाद्याला बंधनात खितपत ठेवण्यासाठी सैतान जंगजंग पछाडतो, वाटेल ते करतो, तो एखाद्याला भोंगळ, हास्यास्पद, थट्टामस्करीचा विषयही करतो.)

मार्क.८:३० या वचनातून येशूने आपल्याला शिकवले आहे की त्याला अनुसरण्यासाठी आम्ही स्वत:चे लाड पुरवता कामा नयेत. आमच्या मनाचे मार्ग सोडले पाहिजेत आणि त्याचा मार्ग धरला पाहिजे. स्वत:च स्वत:ची काळजी घेणे हा माझा मार्ग होता. पण आम्ही स्वत:ला त्याच्या हवाली करणे आणि तो आम्हांला कधीच सोडणार नाही वा टाकणार नाही हे सत्य अनुभवाने शिकून घेणे हा त्याचा मार्ग आहे (पाहा इब्री.१३:५). आणि हेच सत्य शिकण्यासाठी मला माझा मार्ग प्रथम सोडणे आवश्यक होते.

## दूध तुटलेल्या बालकाप्रमाणे

आपण या प्रकरणात विकृत सवयी मोडण्याविषयी चर्चा करीत आहोत. बहुधा हाच विचार मनी धरून स्तोत्रकर्त्याने लिहिले आहे : ''खरोखरच मी आपला जीव स्वस्थ व शांत ठेवला आहे, दूध तुटलेले बाळक आपल्या आईबरोबर असते तसा माझा जीव दूध तुटलेल्या बाळकासारखा माझ्या ठायी आहे'' (स्तोत्र.१३१:२). आपला जीवही ''दूध तुटलेल्या बाळकासारखा'' असे तो म्हणतो.

''जीव'' म्हणजे मन, इच्छा आणि भावना असा अर्थ अनेकदा सांगितला आहे. शरीराला काही सवयी जडतात तशा जिवाला म्हणजे मन, इच्छा, भावना यांनाही काही सवयी लागतात हे आपण शास्त्रलेखांतून पाहतो.

मी माझ्या मनाचा चिंता व युक्तिवाद करण्याचा हक्क हिरावून घेतला आणि मग एखाद्या बाळकाला लागलेली दुधाची बाटली अथवा चोखणी चोखायची सवय मोडून काढावी तसे

माझ्या मनाला जडलेली सवय सुटली. बाळाला दुधाची बाटली अगर चोखणी दिली नाही तर ते रडते, ओरडते. बाटली मिळावी म्हणून नाना प्रकार करते, तसे माझेही झाले. माझाही राग, संताप, चीड उफाळून येई. रडू कोसळे, मी स्वत:ची कीव करू लागे. केव्हा केव्हा मी भीतीने गळाठून जात असे. पण मी निश्चयाने देवाच्या मार्गाने चालत राहिले, माझ्या मार्गाकडे वळणारी माझी पावले देवाच्या मार्गाकडे कायमची वळली आणि मग मी चिंता भयमुक्त झाले.

आपण बंदिवानांना मुक्त करण्यासाठी आलो असे येशूने म्हटले (पाहा लूक.४:१८) तसेच पुत्र ज्याला मुक्त, स्वतंत्र करतो तो खरोखरी स्वतंत्र होतो असे त्याने सांगितले आहे (पाहा योहान.८:३६).

# 20

# आपुलकी, जवळीक आणि विश्वास

जिचा छळ झाला आहे अशा व्यक्तीला जवळीक साधणे अनेकदा अतिशय कष्टकारक असते. जवळीक साधण्यासाठी भरंवसा, विश्वास गरजेचा असतो. एकदा भरंवसा सुटला, तुटला की पुन्हा जवळीक सुखाची व्हायची तर प्रथम भरंवसा संपादन करणे अगत्याचे आहे.

लोकच नेहमी लोकांना दुखावतात. दुसऱ्यांनी आम्हांला कधीच दुखवू नये अशी अपेक्षा करणे, त्यासाठी दुसऱ्यावर विसंबून राहणे शक्य नाही. ''अहो, त्यात काय, लोकांवर भरंवसा ठेवा. ते तुम्हांला दुखावणार नाहीत,'' असे मी ठासून सांगितले ती प्रत्यक्षात तसा अनुभव येणे अशक्य. ते कदाचित तुम्हांला हेतुपुरस्सर दुखवणार नाहीत, तरीही लोक लोकांना दुखावतात हे वास्तव आपण स्वीकारावे हेच इष्ट.

माझे पती प्रेमळ, विवेकी, सरळस्वभावी गृहस्थ आहेत हे मी पूर्वीच सांगितले आहे. पण केव्हा केव्हा ते मला दुखवतात अशी वेळ येते आणि मी त्यांना दुखवते अशीही वेळ येते. अगदी परस्परांवर गाढ प्रेम करणारे लोकही प्रसंगी एकमेकांना दुखवतात आणि निराश, नाराज करतात.

आमचे लग्न झाल्यानंतर बऱ्याच वर्षांनी पतीशी जवळीक साधण्यात मला आनंद वाटला आणि एकमेकांच्या सहवासाचे सुख घेता आले. बऱ्याच काळाने आमचे लैंगिक जीवन सुरळीत झाले हे मी अगदी प्रामाणिकपणे सांगते. मला दुखवले जाईल, माझा गैरफायदा घेण्यात येईल अशा भयाने मला अजिबात स्वस्थता वाटत नव्हती. माझी मूळ प्रवृत्ती अशी होती की, ''आपणाला हे एकत्र येणे आवश्यकच आहे तर ते एकदाचे उरकून मोकळे होऊ

या म्हणजे मला ते विसरून दुसरे काही करता येईल.'' मी माझ्या खऱ्या भावना दाबून दडपून ठेवून मला या संबंधात आनंद वाटतो हे दाखवण्याचा कितीही प्रयत्न केला तरी खरा प्रकार, माझी वृत्ती माझ्या पतीला बरोबर जाणवलीच.

माझ्या या प्रवृत्तीने आपण नाकारले गेलो आहोत असे डेव्हला वाटले. डेव्ह प्रौढ, परिपक्व ख्रिस्ती नसते, माझ्या अंतरंगात काय चालले आहे ते प्रभूकडून त्यांना जाणवले नसते, तर माझ्या वृत्तीमुळे त्यांच्या पुरुषीपणाला धक्का बसला असता. मग नवरेपणाविषयी बोलायलाच नको! एकदा त्यांनी मला म्हटले, ''मी कोणत्या प्रकारचा पुरुष आहे हे तुझ्याकडून समजून घ्यायचा प्रसंग आला असता तर मग माझ्यावर गंभीर प्रसंग ओढवला असता.

माझा पती म्हणून प्रभूने मला पोक्त, सुज्ञ ख्रिस्ती पुरुष दिला म्हणून मी कृतज्ञ आहे. मी भावनिक आजारातून बरी होत असताना मी त्याला वैताग देऊन उद्ध्वस्त केले नाही म्हणूनही मी कृतज्ञ आहे. ज्यांचा छळ झाला आहे असे लोक अनेकदा अशाच अस्वस्थ, चिंताक्रांत लोकांशी विवाह करतात. मग संसारात नित्य कलह, भांडणे चालवून ते एकमेकांना उद्ध्वस्त करतात. त्यांच्या मागून त्यांच्या समस्यांचा भार त्यांच्या मुलांवर वारशाने येतो, आणि मग अस्वस्थ, चिंताक्रांत, यातनाग्रस्त माणसांची नवी पिढी पुढे येते. आणि ते दुष्टचक्र सतत चालूच राहते.

अनेक वर्षे मी हा जवळिकीचा विषय टाळत राहिले. लैंगिक संबंध आणि जवळीक या संबंधातील माझी विचारदृष्टी सुधारण्याची गरज आहे याची मला अंतरंगात खोलवर जाणीव होती. परंतु हा विचार आज करू उद्या करू असे म्हणत मी महिनेच्या महिने, वर्षांची वर्षे वाया घालवली. देव तुम्हांला काही गोष्टींचा लगेच निकार करण्यास सांगत असताना ते लांबणीवर टाकण्याची तुमची प्रवृत्ती आहे का? आपण अशी चालढकल करतो कारण काही गोष्टी एवढ्या वेदनाकारक असतात की, त्यांच्या नुसत्या विचाराने अंगावर काटा येतो, मग त्यांचा निकाल करणे दूरच राहते.

अखेर मी वेळकाढूपणा सोडून सत्याला सामोरे जाण्याचा निश्चय केला. या परिस्थितीतील सत्य असे होते : १) समस्या - प्रश्न माझा होता, पण त्यासाठी मी डेव्हला शिक्षा करीत होते. २) ते माझ्याशी अगदी धीराने, सहनशीलतेने वागत होते, पण माझ्या प्रश्नाची कड मीच लावणे आवश्यक होते. ३) मी वागत होते तशीच वागत राहिले असते तर सैतान माझा पराभव करील हे नक्की, कारण मी माझ्या भूतकाळाचा प्रभाव माझ्या वर्तमानकाळावर आणि भविष्यकाळावर पडू देत होते. ४) प्रश्न सोडवणे लांबणीवर टाकणे म्हणजे पवित्र आत्म्याची सरळ सरळ अवज्ञा करण्यासारखे होते.

अर्थातच मी खूपच भ्याले, घाबरले होते. सुरुवात कोठून कशी करावी हेच मला माहीत नव्हते. मला आठवते, मी काकुळतीला येऊन देवाला विचारले, डेव्हवर मी भरंवसा ठेवावा अशी तू अपेक्षा कशी ठेवतोस? समजा त्याने माझा गैरफायदा घेतला तर?... अगर ''असे झाले तर...'' सैतानाकडे ''जर...तर'' अशा असंख्य शक्यता आहेत.

मला आठवते, प्रभूने मला नेमकेपणाने सांगितले, ''मी तुला डेव्हवर भरंवसा ठेवण्यास सांगत नाही. तू माझ्यावर विश्वास, भरंवसा ठेव हेच माझे सांगणे आहे.'' यामुळे सदर परिस्थितीकडे पाहण्याची दृष्टीच बदलली. लोकांवर विश्वास ठेवण्यापेक्षा देवावर विश्वास ठेवणे मला सहज सोपे होते आणि मी प्रथम तेच केले.

देव मला माझ्या अंतरंगात जे दाखवील, जे सांगेल ते सर्व न चुकता करायचे आणि त्या विषयीच्या माझ्या भावभावनांची स्थिती देवावर सोपवून द्यावी असे मी निश्चित ठरवले. उदाहरणार्थ, आम्ही डेव्ह आणि मी एकत्र येत असू, तेव्हा मला दिवे मालवलेले आवडत. पण या प्रसंगी दिवे लावलेले असावे असे मनोमन जाणवल्याने मी ते मालवीत नसे. अर्थात हे अवघड होते. पण काही वेळा दिवे ठेवल्यावर मग पुढे पुढे ते सोपे झाले. आता त्या प्रसंगी दिवे असले किंवा नसले, मला काहीच फरक पडत नाही. कारण आता मी काहीही दडवून ठेवत नाही अगर तोंड लपवून बसत नाही.

आणखी एक उदाहरण पाहा. मला एकत्र यावेसे वाटते असे मी होऊन डेव्हला कधीच सांगत नसे. अनेकदा मला तशी इच्छा होत असे, माझ्या देहाची ती एक गरज होती, पण मी त्याच्याकडे जात नसे. पण मला सहवासाची इच्छा होईल तेव्हा कोणत्या तरी प्रकारे ती त्यांना कळवणे अगत्याचे आहे हे मला उमजले. हे तर फारच अवघड व कठीण होते. लैंगिक संबंध अगदी किळसवाणे अगर चूक आहेत आहेत असे मला नेहमी वाटत होते. कारण या बाबतीत लहानपणीच माझ्यावर अत्याचार झाले होते.

माझा पहिला लैंगिक अनुभव विपरीत, विकृत होता म्हणून लैंगिकतेकडे पाहण्याची माझी दृष्टीही विपरीत आणि विकृत होती. लैंगिक संबंध मुळात देवाने नेमले आहेत हे मला मनोमन समजत होते, पण पुढे जाण्यास माझ्या भावभावनांचे मोठेच अडखळण होते. पुन्हा एकदा निर्धाराने आज्ञापालन केल्याने हे बंधन तुटले, आणि आता या बाबतीतही मी मुक्त आहे.

कृपया लक्षात ठेवा, पवित्र आत्मा तुम्हांला काही करायला सांगतो तेव्हा ते तुम्हांला सहाय्य म्हणूनच असते. ते केल्याने तुम्हांला आशीर्वाद मिळून कोणत्या तरी बंधनातून तुमची सुटका होणार असते. पवित्र आत्मा सहाय्यक, मददगार आहे. तुमचे भले व्हावे हीच त्याची इच्छा आहे. लोक तुमचे नुकसान करतील, दु:ख देतील पण देव तसे कधीही करणार नाही. तो तुम्हांला करायला सांगतो त्यांपैकी काही गोष्टी दु:खकारक असतील, पण अखेर देव सर्व गोष्टी तुमच्या हिताच्या, लाभाच्या अशाच करील.

प्रभू मला दाखवत होता ते सर्व करणे मी चालूच ठेवले. त्यामुळे मला अधिकाधिक स्वतंत्रता, मोकळीक मिळाली, तशी ती तुम्हांलाही मिळेलच. या बाबतीतील उदाहरणे असंख्य आहेत. त्या सर्वांचा उल्लेख येथे करणे शक्य नाही. पण माझ्या बोलण्याचा मथितार्थ तुमच्या लक्षात येईलच. तुम्हांला तुमच्या परिस्थितीला तोंड द्यायचे आहे आणि जवळीक व भरंवसा या संबंधात तुम्हांला सहाय्य पुरवील.

*उरलेले संपूर्ण आयुष्य संशय आणि भीती यांच्या बंधनात राहण्यास नकार द्या.*

# प्रभूवर भरंवसा ठेवा

हे मी या पुस्तकात पूर्वीही ठिकठिकाणी सांगितल्याचे मला माहीत आहे. पण येथे तेच पुन्हा सांगण्याची प्रेरणा मिळाल्याचे मला जाणवते. भरंवसा धरणे, ठेवणे या आणि इतर बाबतीत मला हितकर, सहाय्यक झालेली मुख्य गोष्ट हीच की, देव आम्हांला लोकांच्यावर नव्हे तर खुद्द त्याच्यावर भरंवसा ठेवण्यास सांगतो आहे.

लोकांच्यावर समतोल रीतीने भरंवसा ठेवण्यास आम्हांला शिकता येईल. यात तोल सुटला तर आपण नक्कीच दुखावले जाणार. अशा प्रसंगांतून, परिस्थितीतून देव अनेकदा नात्याच्या बाबतीत समतोल राखण्याचे सुज्ञान शिकवीत असतो, हे लक्षात ठेवा.

या बाबतीत विचार करताना मी अनेकदा यिर्मया १७ कडे पाहते.

> परमेश्वर असे म्हणतो, जो इसम मनुष्यावर आपली भिस्त ठेवतो, मानवाला आपला बाहू करतो व ज्याचे अंत:करण परमेश्वरापासून फिरले आहे, तो शापित आहे. तो वैराणातल्या झुडपासारखा होईल; व जे कल्याण होईल ते तो पाहणार नाही; अरण्यातील रुक्ष स्थळे, क्षारभूमी व निर्जन प्रदेश यात तो वस्ती करील (यिर्मया १७:५-६).

या वचनांवर विचार करा. न्याय्यदृष्टीने प्रभूवर विश्वास ठेवायचा तो माणसावर ठेवला तर आमच्या वाट्याला शाप व संकटे हेच येणार. मानवाला आपला बाहु करणे म्हणजे स्वत:वर आणि/अगर दुसऱ्या माणसावर भिस्त ठेवणे.

माझ्या गरजा भागवण्यासाठी मी स्वत:कडे पाहते, तसेच दुसऱ्यांवर भरंवसा ठेवते तेव्हा सर्वच विफल होते. कोणीच माझे साहाय्य करीत नाही. आणि माझाही मला काही उपयोग होत नाही. आम्ही आमच्या गरजा भागवण्यास प्रभूला वाव द्यावा हीच त्याची अपेक्षा आहे. आम्ही प्रभूकडे पाहतो, त्याचा आश्रय करतो तेव्हा अनेकदा तो दुसऱ्यांच्या द्वारे आमच्या गरजा भागवतो. पण येथे आम्ही प्रभूचा आश्रय करून त्याच्यावर विसंबून असतो. तो ज्यांच्याद्वारे कार्य करतो त्या लोकांवर आमची भिस्त नसते. आणि हाच समतोल राखावा ही त्याची अपेक्षा आहे.

आणि आता ही उत्तम बातमी ऐका : ‘‘जो पुरुष परमेश्वरावर भाव ठेवतो, ज्याचा भावविषय परमेश्वर आहे तो धन्य’’ (यिर्मया १७:७).

भूतकाळात अनेकदा मी निराश, हताश होत असे, आणि माझ्या आसपास असणाऱ्या व्यक्तींवर मी संतापत, चिडत असे. कारण ते कोणीच मला हवे ते उत्तेजन, प्रोत्साहन देत नव्हते. परिणामी माझी वृत्ती चिडखोर झाली. मी स्वत:चीच कीव करी. माझा हा विचित्र स्वभाव माझ्या घरच्या आणि दुसऱ्या लोकांना काही केल्या समजत नव्हता. पण असा सर्वांचा रागराग केल्याने माझ्या गरजा मुळीच भागल्या नाहीत, कारण देवाकडे पाहण्याऐवजी मी लोकांच्याकडे पाहत होते.

मला प्रोत्साहन, उत्तेजन हवे असेल तेव्हा मी ते देवाकडे मागावे हे त्यानेच मला शिकवले. मी हे करण्यास शिकले तेव्हा मला आढळून आले की, त्यानेच निवडलेल्या साधनाच्या द्वारे तो आवश्यक ते प्रोत्साहन मला पुरवीत आहे. जे फक्त देवच मला/तुम्हांला देऊ शकतो ते लोकांच्याकडून मिळवण्यासाठी नातेसंबंधांच्या आधारे त्यांच्यावर दडपण आणण्याची काहीच गरज नाही हेही मी शिकले. आता या अध्यायातील पुढील वचन पाहा : आपण देवावर आपला भरंवसा ठेवला तर कोणती आशा मिळते ते लक्षात घ्या.

> तो जलाशयाजवळ लाविलेल्या वृक्षासारखा होईल, तो आपली मुळे नदीकिनारी पसरील, उन्हाची झळई येते तिला तो भिणार नाही, त्याची पाने हिरवी राहतील, अवर्षणाच्या वर्षी त्याला चिंता पडणार नाही. तो फळे देण्याचे सोडणार नाही (यिर्मया १७:८).

आम्ही माणसाच्या दुर्बल बाहूवर भिस्त ठेवण्याऐवजी आम्ही देवावर भिस्त ठेवली तर आम्ही सुस्थिर होऊ. मी या शब्दावर भर दिला आहे, कारण आमच्या चर्चेमध्ये हा शब्द विशेष महत्त्वाचा आहे. स्थैर्याची जाणीव नसेल तर जीवनामध्ये खरा आनंद कधीही मिळणार नाही.

ही वचने नीट वाचा, त्यांतून तुम्हांला लोकांच्यावर नव्हे तर देवावर भिस्त, भरंवसा ठेवण्याची प्रेरणा मिळो. *आपल्या गरजा भागवण्यासाठी दुसऱ्यांच्याकडे पाहू नका. देवाकडे पाहा. लोकांनी तुमचे काहीही, कसेही केले तरी देव सर्व ठीकठाक करील.*

जवळिकीविषयी आणखी एक महत्त्वाचा विचार पाहा. आम्ही परस्परांच्या सहवासाचा, मैत्रीचा वगैरे पूर्ण आनंद घ्यावा याचसाठी देवाने आम्हा सर्वांना निर्माण केले आहे. पवित्र शास्त्रामध्ये पतिपत्नीने परस्परांमध्ये संतुष्ट राहावे असे विशेषकरून सांगितले आहे : ''तुझ्या [मानवी जीवनाच्या] झऱ्याला आशीर्वाद [एकनिष्ठतेचा आशीर्वाद] प्राप्त होवो; तरुणपणी केलेल्या स्त्रीसह संतुष्ट ऐस'' (नीती.५:१८ विस्तारित अनुवाद).

तुमची पती/पत्नी आणि तुमचा विवाह-संसार यांचा आनंद लाभ घेण्यासाठी जवळिकीची आवश्यकता आहे. विश्वासाने एक पाऊल पुढे टाका; भयाला सामोरे जाऊन सुटका करून घेण्याच्या भीतीपेक्षा दुखावले जाण्याचे भयच तुमचे पाय खेचून तुम्हांला अधिक दुखावले आहे हे लक्षात घ्या. तुमच्या जीवनातील लोकांना देवाकडे सोपवा. त्यांना हाताळणे तुम्हांला जमणार नाही, पण तो समर्थ आहे.

## नातेसंबंधामध्ये समतोल साधण्याचे महत्त्व

तुमच्या व इतरांच्या नातेसंबंधातील समतोल कोठे बिघडला आहे का ते तपासून पाहा. ज्यांच्यावर तुम्ही वाजवीपेक्षा अधिकच विसंबून आहात असे कोणी तुमच्या जीवनात आहे काय? तुम्हांला काही अडचणी येतात, प्रश्न उभे राहतात तेव्हा तुम्ही कोठे वळता?

राजासनाकडे? का फोनकडे? स्वस्थता, सौख्य मिळावे यासाठी तुम्ही लोकांकडे पाहता का प्रभूकडे पाहता?

मला मागील एक गोष्ट आठवते. माझ्या पतीचे काही बरेवाईट होईल अशा भीतीने मी हैराण झाले होते. माझ्या मनात विचार आला : *''डेव्ह मेला तर माझं काय होणार? मी काय करू?''* धास्तीच्या पोटीच हा विचार आला होता. साधारणपणे असा विचार माझ्या मनात येत नसे. माझ्या अगोदर डेव्हचे निधन झाले तर मी काय करायचे हे कधी माझ्या मनातही आले नव्हते. संसारात सुखी असणाऱ्या बहुतेक स्त्रियांप्रमाणे मीही बऱ्याच अंशी माझ्या पतीवर अवलंबून होते. डेव्ह माझ्याशी नेहमीच चांगले वागतात. ते माझ्यासाठी अनेक गोष्टी करतात. त्या सर्वांच्या आठवणीने माझी अस्वस्थता, धास्ती अधिकच वाढली.

मग माझ्या अंत:करणाच्या गूढ गर्भी मला प्रभू माझ्याशी बोलला, ''जॉईस, डेव्ह मरण पावला तर तू आता करीत आहेस तेच करीत राहायचे. तू हे कार्य काही डेव्हच्या आधाराने करीत नाहीस. तो तुला प्रेरणा देत नाही. तुझ्याकडून कार्य करून घेणारा मी आहे. तेव्हा माझ्यावर विश्‍वास ठेव, तेच योग्य आहे. डेव्हवर भरंवसा ठेवच, पण समतोल ढळू देऊ नको.''

आता आणखी एक अखेरचे उदाहरण देते. यात माझ्या जीवनातील एका मैत्रीच्या आणि सहकार्याच्या नात्याचा संबंध आहे. भावनिक दृष्टीने दुखावलेल्या, घायाळ झालेल्यांना लैंगिक जवळीक पुन्हा मिळवून देणे पुरेसे नाही. खरे पाहता छळ झालेल्या लोकांना कोणत्याही प्रकारचे नाते टिकवणे अवघड, कठीण होते. त्यांच्या वैवाहिक संबंधात अंतराय येतो आणि त्यांची दु:खे, वेदना निराशा घेऊन सैतान त्यांच्या सर्वच निकटच्या नातेसंबंधांत बिघाड करू पाहतो.

जगातील इतर कित्येकांप्रमाणे बालवयात, घरामध्येच माझी छळणूक झाली. माझ्यावर अत्याचार झाले, पण त्या परिस्थितीतून सुटल्यानंतरही मला भेटणाऱ्या जवळजवळ प्रत्येकाकडूनच मी दुखावले जात होते. मग मी लग्न केले, मंडळीमध्ये सभासद झाले. मला वाटले, मंडळीतील लोक तरी नक्कीच मला दुखावणार नाहीत. पण मी मंडळीत सभासद होऊनही माझ्या वेदना, माझे दु:ख कमी झाले नाही. उलट काही बाबतीत अधिकच वाढले, तीव्र, टोकदार झाले असे मला दिसून आले. याचा माझ्यावर असा परिणाम झाला की पुरुषांचा मला भरंवसा वाटेना; कारण एका पुरुषानेच मला छळले होते, आणि त्या छळामुळे माझ्या वैवाहिक संबंधावर विपरीत परिणाम झाला होता. तसेच मित्रमैत्रिणी आणि नातेवाईक यांनीही मला वेळोवेळी दु:ख देऊन छळले होतेच. त्यामुळे कोणावर भरंवसा टाकण्यास मी घाबरत असे.

काही वर्षांचा काळ गेला. डेव्ह आणि मी आम्ही पूर्णवेळ सेवाकार्यात गुंतलो होतो. अशा वेळी एक जोडपे पतीपत्नी आमच्यासाठी कार्य करण्यास आले. निश्‍चितच प्रभूने त्यांना पाठवले होते. ''आमचे शस्त्रवाहक'' होण्यासाठी देवाने त्यांना अभिषेक केला होता. म्हणजे ते नियमितपणे आमच्यासाठी प्रार्थना करीत; ते आमच्या खांद्याला खांदा भिडवून कार्य करीत

आणि जेव्हा केव्हा काहीही करण्याची गरज पडे तेव्हा ते मदतीसाठी धावून येत असत. आमच्याशी ते फार चांगले वागत, त्यांच्यामुळे आमचा जीवनक्रम सुकर, सोपा झाला.

आम्हांला सहकारी सहाय्यक म्हणून हे जोडपे अगर त्यांच्यासारखे दुसरे कोणी मिळाले नसते तर आमच्या सेवाकार्याचे क्षेत्र, विस्तार अगदी वेगळ्या प्रकारे झाला असता. वर्षानुवर्षे छळ, यातना यांचा अनुभव घेतल्याने मी त्यांच्यापुढे माझे अंत:करण सहजपणे उघडे केले नाही. पण कालांतराने मी या लोकांवर विश्वास ठेवून त्यांच्यावर बऱ्याच अंशी अवलंबून राहू लागले.

एक दिवस मी हे वचन वाचले. येथे स्तोत्रकर्ता म्हणतो, ''जो माझा सखा, ज्याच्यावर माझा विश्वास होता, (ज्याच्यावर मी विश्वासाने अवलंबून होतो), ज्याने माझे अन्न खाल्ले त्यानेही माझ्यावर लाथ उगारली आहे'' (स्तोत्र.४१:९ विस्तारीत) हे वचन माझ्यासाठी, मला लागू पडणारे आहे हे जाणून प्रभू मला कोणाविषयी इशारा देत आहे ते काही समजेना. पण अलौकिक रीतीने पुन्हा पुन्हा हेच वचन माझ्यासमोर येऊ लागले. देव काहीतरी सांगतो आहे ही माझी खात्रीच होती. आता ते आमचे सहकारी पतीपत्नी मला दुखावणार असे तर देव सांगत नसेल ना? हा विचार माझ्या मनात आला.

अखेरीस स्वत: प्रभूनेच मला स्पष्टपणे समजावले की, आमच्या नातेसंबंधाचा समतोल मी ढळू देऊ नये. हाच सावधगिरीचा इशारा देवाने मला दिला होता. आमचे जिव्हाळ्याचे, आपुलकीचे संबंध राहावेत, आम्ही वर्षानुवर्षे निष्ठापूर्वक विश्वासाने देवाची सेवा करावी, त्याच्या राज्यासाठी भरपूर उत्तम फळ द्यावे हा देवाचा मनोदय होता तरी त्याने एक गोष्ट मला शिकवली. देवावर रास्तपणे ठेवायचा विश्वास त्या दोघांवर ठेवू नये हा त्याचा स्पष्ट इशारा होता. देवानेचहे पतीपत्नी माझ्या जीवनात आणले होते आाणि तोच त्यांना दुसरीकडे नेण्यास समर्थ आहे हेही त्याने मला दाखवले. त्याच्यावर भरंवसा ठेवण्याऐवजी मी सहाय्यासाठी त्यांच्यावर विसंबून राहिले तर त्याने निश्‍चितच त्यांना माझ्यापासून दूर नेले असते.

चांगल्या मैत्रीमध्ये जिव्हाळा असणे सशास्त्र आहे, पण त्यातही समतोल सांभाळणे अगत्याचे आहे. दावीद आणि योनाथान ह्यांचे उदाहरण पाहा. पवित्र शास्त्र सांगते, ''योनाथानाचे मन दाविदाच्या मनाशी इतके जडले की तो त्याला प्राणापेक्षा प्रिय झाला होता'' (१ शमु.१८:१). त्यांनी परस्परांना सहाय्य केले, एकमेकांच्या सहवासात आनंद घेतला. त्याचें कराराचे (आणभाक केल्याचे) नाते होते (व.३). उत्तम मैत्री महत्त्वाची आहे पण समतोलही तेवढाच महत्त्वाचा आहे.

मी समतोल साधण्यावर, राखण्यावर भर देते आहे. कारण प्रेषित पौलाने बोध केला आहे : ''समतोल, स्थिरचित्त, सावध असा; कारण तुमचा शत्रू सैतान हा (भुकेने व्याकूळ होऊन) गर्जणाऱ्या सिंहाप्रमाणे कोणावर तरी झडप घालून त्याला धरून गिळंकृत करावे म्हणून शोध करीत फिरत असतो'' (१ पेत्र.५:८ विस्तारीत अनुवाद). मनाचा तोल सांभाळा, मग सैतान तुम्हांला गिळून टाकू शकणार नाही, किंवा दुसऱ्याबरोबरचे तुमचे नाते तोडू शकणार नाही.

# 21

# मागा, मिळवा आणि स्वीकारा

पवित्र शास्त्रात याकोब ४:२ या वचनातून सांगितले आहे : ''...तुम्ही मागत नाही, म्हणून तुम्हांला प्राप्त होत नाही.'' मला चांगले आठवते की, हे वचन माझ्य जीवनात एक महान साक्षात्कार, दृष्टान्त ठरले. कारण अगोदर मी माझ्या स्वत:च्या ताकदीने व शक्तीने माझ्या स्वत:च्या योजनेप्रमाणे सर्व कामांची आखणी करून सर्व काही माझ्या मनाप्रमाणे साधण्याची खटपट करीत होते. मी स्वत:ला, माझ्या पतीला बदलण्याचा यत्न चालवला होता. माझी परिस्थिती बदलायची, मला अद्याप सतावणाऱ्या गतकाळातील सर्व गोष्टी स्वत:मधून काढून टाकायच्या आणि हे सर्व माझे मीच करायचे हे माझे ध्येयधोरण होते, आणि यात मी देवाकडे मात्र सहाय्य मागितले नाही.

मला चांगल्या गोष्टींची उणीव होती कारण मी त्या देवाकडे मागत नव्हते हे त्याने मला दाखवले. तेव्हापासून मला हव्या असणाऱ्या माझ्या गरजेच्या प्रत्येक गोष्टीसाठी मी त्यालाच विनंती करते.

देवाचे वचन सांगते : ''परमेश्वराच्या ठायी नित्य आनंद कर. म्हणजे तो तुझ्या इच्छा, तुझे मनोरथ आणि अंत:करणातील गूढ गुप्त विनंत्या पुरवील'' (स्तोत्र.३७:४ विस्तारीत अनुवाद). मी देवाकडे विनंती करू लागले तेव्हा त्याने माझ्या मागणीपेक्षा अधिक देऊन तोच माझी काळजी घेणार याचे प्रमाण पटवून दिले. त्याने मला दाखवून दिले की त्याच्याकडे काही मागायचे तर एखाद्या लहान मुलासारखे त्याच्याकडे जाऊन मागावे. मग तो माझी मागणी मान्य करील, तोच माझी काळजी घेई, आणि तोच माझ्या गरजा पुरवील.

गतकाळात छळणुकीमुळे झालेल्या जखमा भरून याव्यात, मागच्या दु:खाचा परिहार होण्याचा उपाय मिळावा या उद्देशाने तुम्ही हे पुस्तक वाचीत आहात असे मला वाटते. देवाने

आपले भंगलेले, उद्ध्वस्त अंत:करण निकोप, बरे करावे हीच तुमची गरज असेल. अंतरंगात झालेल्या प्रचंड उलथापालथीमुळे तुम्ही खचून निराश झाला असाल. माझीही तीच अवस्था झाली होती. तुम्हांला देवाचे सहाय्य मागण्याची गरज आहे. तेव्हा ही साधीसोपी प्रार्थना करा :

***हे प्रभू, मला बरं कर. आरोग्य दे. अडचणींतून बाहेर पडण्याचा मार्ग प्रशस्त कर. मला उत्तर दे. मी ज्या मार्गाने चालावे तो मार्ग मला दाखव, हे प्रभू मला सहाय्य कर.***

## येशूच्या नावाने मागा

देव तुमच्या गरजा पुरवील हे तुम्हांला मान्य होण्याअगोदर तुमच्या अंत:करणातील एका शंकेचे निरसन करणे अगत्याचे आहे असे मला वाटते. तुम्हांला मार्ग दिसण्याच्या संबंधात एक महत्त्वाची, कळीची बाब योहान.१६:२४ या वचनामध्ये आढळते. वधस्तंभावर जाण्यापूर्वी येशू त्याच्या शिष्यांबरोबर बोलताना म्हणाला, ''आतापर्यंत तुम्ही माझ्या नावाने [मी जो व जसा आहे त्याचे दर्शक] [एकही] गोष्ट मागितलेली नाही, पण आता मागा आणि मागत राहा आणि तुम्हांला मिळेल [दिले जाईल], यामुळे तुमचा आनंद [सौख्य, मोद] पूर्ण व संपूर्ण होईल'' (योहान.१६:४ विस्तारित अनुवाद).

येशूच्या नावाने मागणे याचा अर्थ काय ते पवित्र शास्त्राच्या विस्तारित अनुवादामध्ये (द ॲम्प्लिफाईड बायबल) स्पष्टपणे सांगितले आहे. येशूच्या नावाने मागणे म्हणजे काय हे तुम्ही नीट समजूनउमजून घेतले तर तुमच्या बाबती घडून यावयाच्या चमत्काराचा मार्ग प्रशस्त होईल.

येशूच्या नावाने मागणे म्हणजे येशू जो जसा आहे ते सर्व देवपित्यासमोर सादर करणे. म्हणून आपण राजासनासमोर जातो तेव्हा आम्ही कोण आहोत ते सांगत नाही, सादर करीत नाही, तर येशूला जो अधिकार आहे तोच सादर करतो. देवपित्याबरोबर असलेल्या कराराच्या नात्याने येशूला हा अधिकार मिळाला आहे.

आम्ही आमच्या चांगल्या कृत्यांचा अहवाल सादर करीत नाही. सादर करण्याजोगे परिपूर्ण असे आमच्याजवळ काहीही नाही. आपण पित्यासमोर जाऊन म्हणतो, ''हे परमेश्वरा मी येशूच्या नावाने आलो आहे.'' आपण हे म्हणतो तेव्हा वस्तुत: ''येशू जो व जसा आहे तोच मी तुला सादर करतो'' हे पित्याला सांगतो.

तुम्ही कोठेतरी, कोणाच्या तरी नावाने जाता तेव्हा तुम्ही तया व्यक्तीच्या अधिकाराने जात असता. उदा. सेंट लुईस येथील आमच्या पाळकसाहेबांचे व आमचे घनिष्ट संबंध आहेत. ते आमचे चांगले मित्र आहेत. त्यांच्या कचेरीत जाऊन मी तेथील कर्मचाऱ्यांना म्हटले, ''मला आता ताबडतोब पाळकसाहेबांना भेटायचे आहे, महत्त्वाचे काम आहे.'' त्यांचे कर्मचारी मला चांगले ओळखतात आणि मला आत पाळकसाहेबांकडे जाऊ देतात.

पण समजा मला स्वत:ला जाणे शक्य नसेल तर मी दुसऱ्या कोणाला तरी पाठवते. या व्यक्तीची पाळकांच्या कचेरीतील कोणाशी ओळख नसते. ही व्यक्ती तेथे जाऊन म्हणेल, ''मला आता लगेच पाळकसाहेबांना भेटलं पाहिजे.'' तर तेथील कर्मचारी त्याला लगेच आत जाऊ देणार नाहीत. पण त्याने म्हटले, ''जॉईस मायरनी मला पाठवलं आहे.'' तर तेच कर्मचारी माझ्या नावामुळे त्याचे स्वागत करतील. कारण माझे व पाळकसाहेबांचे मैत्रीचे नाते त्यांना माहीत आहे.

येशूच्या नावाने प्रार्थना करण्याचा अर्थ काय ते या उदाहरणावरून तुमच्या लक्षात आलेच असेल. म्हणूनच देवपुत्राच्या नावाने पित्याकडे गेल्यावर आपल्या मागण्या पूर्ण होण्याची अपेक्षा करता येते. तसे पाहता देवाने आमचे ऐकावे ही आमची लायकी नाहीच. येथे मी तुम्हांला एक महत्त्वाचा मुद्दा शिकवते आहे : देवाकडून काहीही घेण्याची, मिळण्याची आमची लायकी नाही, तशी आमची पात्रता नाही. मरण व मरणानंतर सर्वकाळ शिक्षा, शासन मिळणे एवढीच आमची लायकी आहे. परंतु त्याने आमच्याबरोबर नवा करार केला आहे. त्यानुसार आम्हांला येशूएवढी पात्रता मिळते, जे येशूला मिळते तेच आम्हांलाही मिळते. लायकी नसताना मिळालेल्या कराराचा आशीर्वाद हीच कृपेच्या संदेशाची भव्यता व दिव्यता आणि महानता आहे.

काहीही मिळण्याची आमची पात्रता नाही. पण येशूने जे संपादन केले, ज्यासाठी तो लायक होता ते आम्हांला मिळते आणि हे विनामूल्य आहे! ''विनामूल्य'' हा मोठा उत्साहवर्धक शब्द आहे. आमच्या सत्कर्मांनी आणि सद्वर्तनाने आशीर्वाद मिळवण्याची खटपट करण्याची आम्हांला काहीही गरज नाही. योहान.१६:२४ या वचनामध्ये येशूने म्हटले आहे : ''अगदी आतापर्यंत तुम्ही माझ्या नावाने [म्हणजे मी जो जसा आहे तसे सादर करून] एकही गोष्ट मागितलेली नाही. आणि त्याच वचनामध्ये त्याने आम्हांला एक नवी आज्ञा दिली आहे. त्याने म्हटले, ''पण आता तुमचा आनंद परिपूर्ण व्हावा यासाठी तुम्ही मागा, तुम्हांला मिळेल ते तुम्ही स्वीकारा.'' येथे येशूने दोन आज्ञा दिल्या आहेत : ''नुसते मागू नका, पण *मागा* आणि *स्वीकारा.* यासाठी की तुमचा आनंद पूर्ण व्हावा.''

## देवाच्या आशीर्वादांचा स्वीकार करा

देवाकडून स्वीकारावयाचे कसे हेच अनेक लोकांना माहीतच नसते. उदाहरणार्थ कोणत्या तरी पापाची क्षमा व्हावी, माफी मिळावी म्हणून देवाला विनवणी करण्यात ते आपले अर्धे आयुष्य खर्ची घालतात, पण त्याच्या क्षमेचा स्वीकार कधीही करीत नाहीत. ते सतत याचना करण्याच्या पावित्र्यात असतात. खरे तर मीही कित्येक वर्षे दररोज रात्री अशीच क्षमायाचना करीत होते.

माझे डेव्हबरोबर लग्न झाले तेव्हा त्याला देवाच्या वचनाविषयी विशेष अशी माहिती

नव्हती. आम्ही उपासनेसाठी जात होतो, देवावर माझी प्रीती होतीच. मी नव्याने जन्मले होते. पण ख्रिस्तामध्ये मी काय, कोण आहे ते मला माहीतच नव्हते, आणि माझे अंत:करण अद्यापही भंगलेलेच होते. भंगलेले अंत:करण म्हणजे व्यक्तित्व भंगलेले असणे - भग्न अंत:करण = भग्न व्यक्तित्व!

आमचे व्यक्तित्व भंगते, भग्न, उद्ध्वस्त होते, आणि मग आम्हांला देवाच्या हेतू, उद्देशानुसार कार्य करू शकत नाही. प्रत्येकाने पूर्ण समतोल व्यक्ती असावे, व्हावे हीच देवाची इच्छा आहे. तथापि, सैतान सतत आम्हांला सतावतो, हैराण करतो, परिणामी आमचे व्यक्तित्व भंगते, मोडते. आणि हे घडते तेव्हा आम्ही परस्परांशी नाते जोडण्याचा प्रयत्न केला तरी त्यालत वितुष्टच येते.

वर सांगितल्याप्रमाणे मी दररोज रात्री माझ्या बिछान्याजवळ गुडघे टेकून कळवळून प्रार्थना करीत होते. ''हे देवा, क्षमा कर, देवा मला क्षमा कर, क्षमा कर.'' प्रत्येक रात्री मी पुन्हा पुन्हा ''हे देवा, मला क्षमा कर, देवा मला क्षमा कर,'' हीच प्रार्थना करीत असे. किशोरवयापासून तारुण्यात पदार्पण करीपर्यंत माझ्या खांद्यावर जे दोषापराधाचे अवजड ओझे होते ते अद्यापही तसेच होते. मी त्याच ओझ्याचा वारंवार उल्लेख करीत होते.

वर्षदोन वर्षे हाच क्रम चालू राहिला. मग एक दिवस प्रभूने मला सांगितले, ''जॉईस, तू प्रथम क्षमा मागितलीस त्याच वेळी मी तुला क्षमा केली आहे, आता तू स्वत:ला क्षमा करणे जरुरीचे आहे.'' त्या काळात देवाची वाणी ऐकण्याचा प्रसंग माझ्यावर विशेषसा आला नव्हता. परंतु मी त्याच्या क्षमेचा स्वीकार करावा हेच तो सांगत आहे असे मला उमगले.

समजा तुम्ही कोणाकडे तरी पाणी मागितले. त्याने ते तुम्हांला दिले आणि तुम्ही ते प्याला नाहीत, तर त्यात पाणी देणाऱ्याने काय करावे? ''मला तहान लागलीय, कोणीतरी पेलाभर पाणी द्या हो, मी तहानेने व्याकूळ झालो आहे'' अशी विनवणी केल्यावर मिळालेला पाण्याचा पेला तसाच हातात धरून बसणे यात काय अर्थ आहे? तुम्ही पाणी प्यालाच नाहीत तर तुमची तहान भागणार कशी?

तुम्हांला क्षमेविषयीचे वचन सांगितले आहे, पण त्यावर विश्वास ठेवण्याची तुमची तयारी नसेल. तुम्ही म्हणत असाल, प्रथम क्षमा कशी असते कशी वाटते ते अनुभवून पाहू या. पण आपणाला क्षमा मिळाली आहे, हे मान्य करीपर्यंत तुम्हांला क्षमेचा अनुभव येणारच नाही. ''मला क्षमा झाली आहे,'' मला माफ केले आहे'' असे तुम्ही विश्वासपूर्वक म्हटले पाहिजे. आणि तुमच्या भावना आणि विश्वास यांचा मेळ बसेपर्यंत कदाचित महिनेच्या महिने तुम्हांला हेच शब्द पुन्हा पुन्हा उच्चारावे लागतील.

देवापासून घ्या, स्वीकारा असेच संपूर्ण पवित्र शास्त्रातून आम्हांला शिकवले आहे. पण ख्रिस्ती लोक काहीतरी मिळवण्याचा प्रयत्न नेहमीच करतात असे दिसते. करिंथ येथे योहानाच्या शिष्यांना पौलाने ''तुम्ही पवित्र आत्मा मिळवला का?'' असे विचारले नाही. त्याने

विचारले, ''तुम्ही [येशू 'ख्रिस्त' आहे असा] विश्वास ठेवला तेव्हा तुम्हांस पवित्र आत्मा मिळाला काय?'' (प्रे.कृ.१९:२).

जितके येशूला ''मिळवतात'' तितक्यांना देवाचे पुत्र होण्याची शक्ती मिळते, असे पवित्र शास्त्र सांगत नाही, तर ''जितक्यांनी त्याचा *स्वीकार केला* तितक्यांना म्हणजे त्याच्या नावावर विश्वास ठेवणाऱ्यांना त्याने देवाची मुले होण्याचा अधिकार *दिला''* (योहान.१:१२, तिरपा टाईप माझा).

येशू म्हणजे जीवनाची नदी, ज्यातून जीवनदायी पाणी सतत वाहत असते आणि त्याचा स्वीकार, स्वीकार आणि स्वीकार करण्यास आम्हांला आमंत्रण दिले आहे. येशूने म्हटले आहे :

> जो माझ्यावर विश्वास ठेवतो [जो मला बिलगून राहतो, माझ्यावर भरंवसा ठेवतो आणि माझ्यावर विसंबतो] त्याच्यातून [त्याच्या अंतरंगातून] शास्त्रात सांगितल्याप्रमाणे जिवंत पाण्याचे झरे आणि नद्या [सतत] वाहतील. पण येथे तो आत्म्याविषयी बोलत होता. त्याच्यावर विश्वास, भरंवसा ठेवणाऱ्यांना हा आत्मा नंतर मिळणार होता. कारण अद्यापपर्यंत [पवित्र] आत्मा दिला नव्हता, कारण तोपर्यंत येशूचे गौरव [मानमहिमा] झाला नव्हता (योहान.७:३८-३९ विस्तारीत अनुवाद).

देवाकडून मिळणे, स्वीकारणे याविषयी मी सविस्तर शिक्षण दिले आहे. याचे कारण एकच - देव लोकांना देऊ पाहतो ते आशीर्वाद लोक स्वीकारीत नाहीत अशी माझी खात्री पटली आहे. ख्रिस्ताच्या शरीरातील मंडळीतील प्रत्येक व्यक्तीने प्रौढ परिपक्व व्हावे आणि म्हणावे : ''होय, देवाचे हे अभिवचन माझ्याचसाठी आहे आणि मी ते स्वीकारणार, आपलेसे करणार म्हणजे मला यापुढे दोषापराधाच्या भाराखाली दबून राहण्याची गरज उरणार नाही,'' हीच माझी इच्छा आहे.

## देव तुमच्यावर पूर्णपणे प्रीती करतो

देवाच्या प्रीतीविषयी मी सहजपणे सलग दोन दिवस शिक्षण देऊ शकेन. देवाने आमच्यावरील आपल्या प्रीतीचे प्रमाण कसकसे पटवले आहे ते मी विविध प्रकारे स्पष्ट करून सांगेन; तथापि, त्याची प्रीती स्वीकारण्यास मला कोणालाही बळाने भाग पाडता येणार नाही. ही निवड ज्याची त्याने वैयक्तिकरित्या करायची आहे. आम्ही चुका केल्या, देवाच्या प्रीतीला आम्ही पात्र नाही हे आम्हांला माहीत असले तरीही आम्ही त्याची प्रीती स्वीकारली पाहिजे. तरच तो आम्हांला देणार आहे त्याचा पूर्ण लाभ घेता येईल.

पुढे दिलेली प्रार्थना दररोज तोंड उघडून मोठ्याने म्हणावी हे माझे तुम्हांला अगत्याचे सांगणे आहे :

***हे देवा तू माझ्यावर प्रीती करतोस हे मी जाणतो. मी त्या प्रीतीचा स्वीकार करते/करतो. आज मी त्या प्रीतीमध्ये चालणार आहे. मी तुझ्या प्रीतीच्या उबेत विसावणार आहे, कारण माझी पात्रता, लायकी नसली तरी तू माझ्यावर प्रीती करतोस हे मला माहीत आहे आणि हे देवा यामुळे मला अधिकच धन्यता वाटते.***

आज ख्रिस्ताच्या मंडळीला देवाची प्रीती याच एका संदेशाची नितांत आवश्यकता आहे. लोकांना देवाच्या प्रीतीचे प्रकटीकरण होणे हाच आजचा सर्वांत महत्त्वाचा, कळीचा मुद्दा आहे. लोकांना देवाच्या प्रीतीविषयीच्या शिक्षणापेक्षा देवाच्या प्रीतीचा वैयक्तिक अनुभव येणे, देव त्यांच्यावर किती प्रीती करतो ते समजणे महत्त्वाचे आहे.

अधोलोकाची सर्व बले आणि अधिपती तुमच्या विरोधात उभे ठाकले असले तरी ख्रिस्ताची प्रीती तुम्हांला विजय मिळवून देईल. जीवनातील झंझावाती वादळातून देवाची प्रीती तुम्हांला निभावून शांत, निवांत स्थळी नेईल. देव तुमच्यावर किती प्रीती करतो ते समजल्याशिवाय त्या प्रीतीचा साक्षात्कार झाल्याशिवाय तुम्ही महाविजयी होणार नाही (पाहा रोम.८:३७).

आम्ही चुका करतो, अपयशी होतो अशा प्रसंगीदेखील देव आमच्यावर प्रीती करतो हे आम्ही समजून घेणे आवश्यक आहे. आमच्या दृष्टीने आम्ही सर्व काही ठीकठाक केले आहे असे वाटते त्याच काळापुरती त्याची प्रीती मर्यादित नाही. आपण सदोदित त्याच्या प्रीतीविषयी निशंक असणे अगत्याचे आहे आणि विशेषत: कसोटीचे प्रसंग येतील सैतान आमची थट्टा करून आरोप करतो : ''तुमच्या हातून काहीतरी भलतेसलते झाले असणार.'' अशा प्रसंगी आम्ही त्याच्या प्रीतीची शंका घेऊ नये.

***सैतान आरोप करण्यास पुढे सरसावतो तेव्हा देव आमच्यावर प्रीती करतो हे आम्हांला माहीत असलेच पाहिजे.***

आमच्या हातून काही वावगे, घडू नये ते घडले, सैतानाचा शिरकाव होण्यास आम्ही वाव दिला, आम्ही अज्ञानाने काही केले तरीही देव आमच्यावर प्रीतीच करतो. देव आमच्या पक्षाचा आहे (पाहा रोम.८:२८) आणि आम्ही आम्हा स्वत:लाच ज्यात गुंतवून घेतले आहे त्या जंजाळातून सुटण्यासाठी काय करारे तेही तोच आम्हांला दाखवील. पण आम्हांला देवाच्या प्रीतीपासून तोडावे, वेगळे करावे हीच सैतानाची इच्छा आहे; देवाची औरस, नीतिमान मुले व मुली म्हणून जगण्यासाठी परत देवाच्या कृपेमध्ये जाण्याचा मार्ग आम्हांला मिळूच द्यायचा नाही हा सैतानाचा कावा आहे.

## येशू आपले वचन पाठवतो

आम्ही संकटात सापडतो तेव्हा आमची सुटका करण्याचे अभिवचन देवाने आपल्या वचनातून दिले आहे. स्तोत्र.१०७:२० मध्ये लिहिले आहे : "तो आपले वचन पाठवून त्यांस बरे करतो, नाशापासून त्यांचा बचाव करतो." आम्ही जे समजून घेणे आवश्यक आहे ते आम्हांला शिकवण्यासाठी येशूने आपला पवित्र आत्मा आमच्याकडे पाठवला आहे. त्याने आपल्या शिष्यांना सांगितले,

> मला अद्याप तुम्हांला बऱ्याच गोष्टी सांगायच्या आहेत. परंतु आताच तुमच्याने त्या सोसवणार नाहीत. त्या समजून घेणे, अगर स्वत:वर घेणे आताच तुम्हांला शक्य नाही.
>
> परंतु तो, सत्याचा आत्मा (सत्य देणारा आत्मा) येईल तेव्हा तो तुम्हांला मार्ग दाखवून संपूर्ण, समग्र सत्यात नेईल. कारण तो आपल्या स्वत:चे (स्वत:चा संदेश स्वत:च्या अधिकाराने) सांगणार नाही, बोलणार नाही; तर तो [पित्याकडून] जे ऐकेल [जो संदेश त्याला दिला आहे] तेच सांगेल [भविष्यकाळात जे घडणार आहे] होणार आहे ते तुम्हांला जाहीरपणे सांगेल.
>
> तो माझा बहुमान आणि गौरव करील, कारण जे माझे आहे त्यातून घेऊन ते तुम्हांला कळवील, सांगेल.
>
> जे काही पित्याचे आहे ते सर्व - प्रत्येक गोष्ट माझीच आहे. तो (आत्मा) माझे आहे त्यातून घेऊन ते तुम्हांला उघड, प्रकट करील या माझ्या म्हणण्याचा हाच अर्थ आहे (योहान.१६:१२-१५ विस्तारीत अनुवाद).

पवित्र आत्मा आम्हांला मार्ग दाखवून सत्यात नेईल या येशूच्या अभिवचनाने मला खूपच आनंद वाटतो. तो आम्हांला पुढे ढकलणार नाही, तर वाट दाखवून सत्यात नेईल याचेच मला अप्रूप वाटते. सैतान आमच्यावर दडपण आणून आम्हांला वाटेल तसे वळवू पाहतो पण पवित्र आत्मा आम्हांला हळुवारपणे हाती धरून पुढे नतो. यावरूनच एका प्रकारे आम्हांला कोण चालवीत आहे - देव का शत्रू - ते जाणून घेता येते.

आपल्यावर काही दडपण आले आहे, गोंधळ उडाला आहे, कोणते तरी नियंत्रण आपल्यावर आहे, ताणतणाव आले आहेत, असे वाटले तर ते देवाकडून नाही हे पक्के समजा. देव या प्रकारे कार्य करीत नाही. उलटपक्षी पवित्र आत्मा सत्य तुम्हांला सौम्यपणे हळुवारपणे प्रगट करील.

पण प्रकटीकरण तुम्ही स्वीकारले नाही तर त्यापासून तुम्हांला काहीच लाभ होणार नाही. आपल्या टेलिव्हिजनवर कार्यक्रमांचे प्रक्षेपण येत असते. पण ते कार्यक्रम पाहण्यासाठी, ऐकण्यासाठी प्रथम आपण आपला टीव्ही चालू केला पाहिजे. त्याचप्रमाणे देव आपल्या वचनामधून सांगतो त्या सत्याचा आपण स्वीकार केला पाहिजे.

आम्हांला विजयी, समर्थ, सर्व अडचणींवर मात करणारे जीवन जगण्यासाठी आम्हांला आवश्यक ते सर्व येशूने जिंकून घेतले आहे. येशूने संपादन केले, मिळवले ते सर्व घेऊन पवित्र आत्मा सारांशाने असे म्हणाला, ''आता मी विश्वासणाऱ्यांकडे जाईन, त्यांच्यामध्ये कार्य करीन. येशूने त्यांच्यासाठी जे संपादन केले, जी तरतूद केली आहे ते सर्व त्यांना कळवीन. मी त्यांना नीट मार्ग दाखवून सर्व सत्यात नेईन.''

आम्हांला सांगण्याशिकवण्यासारखे खूप काही आहे पण ते सर्व आम्हांला एकदम सोसवणार नाही हे येशूचे म्हणणे लक्षणीय आहे. जे त्याचे आहे ते पवित्र आत्मा घेईल आणि आम्हांला मार्ग दाखवून सर्व सत्यामध्ये नेईल हे अभिवचन त्याने दिले आहे.

## पवित्र आत्मा घ्या, स्वीकारा

मी नव्याने जन्मले, त्यानंतर बऱ्याच काळाने मला माझ्या जीवनात पवित्र आत्म्याच्या समक्षतेचा लाभ मिळाला. देवावर माझी प्रीती होती; आणि मी मेले असते तर स्वर्गात गेले असते. पण तेथे मी कशीबशी रडतखडत पोहोचले असते. पवित्र आत्म्याची सहभागिता नसती तर मी कधीच फळ देणारी ख्रिस्ती झाले नसते.

या पृथ्वीवर माझ्या जीवनाकडून देवाचे गौरव कधीच झाले नसते. मी दुसऱ्या कोणाला कधीही साक्ष देऊ शकले नसते. खरे सांगायचे तर मला पवित्र आत्मा मिळाला नसता तर ख्रिस्ती असण्याचा माझा दावा माझ्या जीवनात देवाच्या कार्याला अडखळण ठरला असता, कारण माझे वागणे, ख्रिस्तीपणाला साजेसे नसते.

मला काही ताळतंत्र नव्हता, पण त्याला माझा काही इलाज नव्हता. एखाद्या चांगल्या ख्रिस्ती व्यक्तीने जे करावे असा माझा समज होता ते सर्व मी न चुकता करीत होते, पण त्यात मला यश नव्हते, कारण मला देवाच्या वचनाचे जराही ज्ञान नव्हते. आणि माझ्या जीवनात त्या वचनाचे कार्य कसे होणार ते सत्य दाखवण्यासाठी किंवा प्रकट करण्यासाठी पवित्र आत्म्याचे मार्गदर्शक सामर्थ्य मला मिळाले नव्हते.

मी प्रथम माझ्या मुखाने ''मी येशू ख्रिस्तामध्ये देवाचे नीतिमत्त्व आहे'' असे उच्चारले तो दिवस खरेच दिव्य भव्य होता (पाहा १ करिंथ.१:३०). माझा आत्मा प्रफुल्लित झाला, अंतरंगात जीवन आनंदाने, सळसळते आहे असे मला वाटले. मला आठवते, मी म्हणू लागले, ''हे काय असावे? मातेला आपल्या उदरातील गर्भाची हालचाल जाणवते तसे माझे झाले. माझ्या अंतरंगात पवित्र आत्मा वसतीस आला होता.

पवित्र आत्मा मला मिळण्यापूर्वी मी नीतिमान आहे याची मला जाणीवच नव्हती. मी अगदी हीनदीन, अगदी वाईट आहे, माझ्या जीवनात सारा गोंधळच आहे असे मला वाटत होते. मला वाटले आता मला कसलीच आशा नाही. आणि सर्वांनी असेच पक्के समजावे ही सैतानाची इच्छा आहे. पण लक्षात ठेवा ते सर्व खोटे, लबाडीचे आहे.

पवित्र आत्म्याची सहभागिता याविषयी अधिक जाणून घेण्यासाठी *''नोईंग गॉड इंटिमेटली''* हे माझे पुस्तक तुम्ही जरुर वाचावे, तुम्हांला देवाच्या अगदी जवळ, अगदी निकट कसे जावे, राहावे आणि तुमच्या जीवनामध्ये पवित्र आत्म्याची परिपूर्णता कशी मिळेल ते मी या पुस्तकात समजावून सांगितले आहे. खरे तर ते पुढीलप्रमाणे प्रार्थना करण्याएवढे सोपे, सुलभ आहे. *हे प्रभू, मी माझ्या जीवनामध्ये तुझ्या पवित्र आत्म्याचा स्वीकार करतो. मला तुझ्या समक्षतेने भर आणि तुझी वाणी स्पष्टपणे कशी ऐकावी ते शिकव म्हणजे माझ्या आयुष्याचे सर्व दिवस तुला अनुसरता येईल.*

## देवाला तुम्ही मौल्यवान आहात

तुम्ही मोलवान, महत्त्वाचे आहात. देवाने तुमच्यासाठी काही योजना केली आहे. तुमच्या जीवनातून तो जे काही करणार त्याद्वारे तो स्वत:चे चांगुलपण आणि प्रेमदया प्रकट करणार आहे. तुम्ही काहीही केलेले असो अगर तुम्हांला दुसऱ्यांनी काहीही केलेले असो - गेलेला काळ भूतकाळात जमा झाला आहे त्यात काही बदल होत नाही. देवाने तुमच्यासाठी उज्ज्वल भविष्यकाळ नेमलेला आहे. तुमचे जीवन अद्‌भुत आनंदमय होईल. पण तुम्ही त्याचा स्वीकार केला पाहिजे. मी वर सांगितल्याप्रमाणे तुम्ही सहमत होऊन, ''होय, हे माझ्यासाठी आहे'' असे म्हटले पाहिजे.

आम्हांला जे गरजेचे आहे ते आपल्या स्वत:कडे आहे हे येशूने मोठ्याने, उच्च स्वराने सांगितले आहे : ''मग सणाच्या शेवटल्या दिवशी येशू उभा राहून मोठ्याने म्हणाला, कोणी तान्हेला असेल तर त्याने माझ्याकडे यावे आणि प्यावे'' (योहान.७:३७). तुम्हा स्वत:ला स्वत:साठी काही करणे शक्य नाही, ते त्याने केव्हाच तुमच्यासाठी केले आहे. आता तो सांगतो आहे तुम्ही त्याच्याकडे यावे, ते घ्यावे व प्यावे, ते आत्मसात करावे, स्वत:मध्ये स्वीकारावे आणि हे विश्वास ठेवल्याने तुम्हांला करता येईल, पण विश्वास ठेवणे हे तुमच्याकडेच आहे.

प्यावे - पिणे म्हणजे सेवन करणे, उत्सुकतेने स्वीकारणे, जाणीवपूर्वक स्वीकारणे असे अर्थभाव या शब्दामध्ये आहेत. येशूचे हे शब्द लक्षात ठेवा : ''तुम्ही अजून माझ्या नावाने काही मागितले नाही, मागा आणि मागत राहा, म्हणजे तुम्हांला मिळेल. ह्यासाठी की तुमचा आनंद परिपूर्ण व्हावा'' (योहान.१६:२४). तुम्ही मागितले आणि ते मिळाले, स्वीकारले की मग तुमचा आनंद परिपूर्ण होईल.

ख्रिस्तविरहित लोकांसारखे आम्ही स्वत:च उदास आणि निराश असलो तर उदास जगावर आमचा काय, कसा प्रभाव पडणार? या लोकांच्यावर देवाच्या दयेचे तेज प्रकट व्हावे हीच देवाची इच्छा आहे. देवाने केलेली तरतूद आम्ही स्वीकारली की आम्हांला संपूर्ण आनंद लाभेल. ख्रिस्ताची मंडळी अशीच पूर्ण आनंदी होण्यासाठी नेमली आहे.

आपण देवाचे आशीर्वाद घेण्याचे पात्र, साधन आहो. अशा प्रकारे कार्य करा, वागा. तुमच्यासाठी तरतूद म्हणून येशूने स्वतःच्या प्राणांचे मोल देऊन जे सिद्ध केले आहे, ते घ्या, आत्मसात करा, त्याच्या वचनाचा अभ्यास करा, त्याने दिलेल्या अभिवचनांची खात्री करून घ्या. या प्रकारे प्रार्थनेतून त्याला विनंती करा.

***हे प्रभू परमेश्वरा, हा मी येथे आहे, माझ्यावर वृष्टी कर, वर्षाव कर, तुझ्या पवित्र आत्म्याने माझ्यासाठी जे काही ठेवले आहे ते मी पूर्णपणे स्वीकारतो.***

# 22

# अंतरंगात शक्ती मिळणे

भूतकाळापासून सुटका आणि मुक्तता मिळवण्यास तुम्हांला सहाय्य करणे हाच या पुस्तकाचा उद्देश आहे. हा भूतकाळ पाच मिनिटांपूर्वीचा असो अथवा पन्नास वर्षांपूर्वीचा असो, तुम्हांला ह्या संदेशाची नेहमीच गरज लागणार. गतकाळामधील खंतखेदापासून सुटका होण्यासाठी तुमचा भूतकाळ काळाकुट, भयानक असलाच पाहिजे असे नाही. समजा, उद्या सकाळी उठताक्षणी तुम्ही ठरवले आजपासून सरळ, सात्विकपणे वागायचे आणि सकाळचा चहा घेण्याअगोदरच तुम्ही रागावलात तर गतकाळापासून सुटका होण्याची तुम्हांला गरज आहे.

आपल्या हातून घडलेल्या एखाद्या चुकीचे भांडवल करायचे, तुमच्या तोंडून उच्चारू नयेत असे काही शब्द आले असतील, तुमच्या हातून घडलेले एखादे पाप अगर तुमच्या विरुद्ध दुसऱ्या कोणी केलेले पाप वगैरेंचा आधार घेऊन तुम्हांला कचाट्यात पकडावे ही सैतानाची इच्छा आहे. तुमच्या हातून जे घडले अगर तुम्हांला कोणी काही केले असेल त्यापासून तुमची सुटका करावी हीच देवाची इच्छा आहे. या दोन्ही बाबी देवाला सारख्याच महत्त्वाच्या आहेत. भग्नहृदयी जनांस बरे करावे, आमच्या जखमांस पट्टी बांधावी, आमचे वळ बरे करावे यासाठी येशू आला हे शास्त्रलेखांमधून आपण पाहिलेच आहे. आम्हांला शोकाऐवजी हर्षरूपी तेल द्यावे, राखेऐवजी सौंदर्य, शिरोभूषण द्यावे यासाठी तो आला. प्रभू परमेश्वराचे गौरव व्हावे यासाठी आम्हांला त्याने लावलेले रोप असे धार्मिकतेचे वृक्ष करण्यासाठी तो आला (पाहा यशया ६१:१-३).

स्वत: येशूने म्हटले आहे : ''परमेश्वराचा आत्मा माझ्यावर आला आहे, कारण दीनांस सुवार्ता [शुभवर्तमान] सांगण्यास त्याने मला [अभिषिक्ताला,मशीहाला, ख्रिस्ताला] अभिषेक

केला आहे. त्याने मला पाठविले ते अशासाठी की, धरून नेलेल्यांची सुटका व अंधळ्यांस पुन्हा दृष्टीचा लाभ, ह्याची घोषणा करावी, ठेचले जात आहेत त्यांस सोडवून पाठवावे'' (लूक.४:१८).

माझा दृढ विश्वास आहे की, देव आताच येथे तुमच्याबरोबर आहे. तुमच्या भूतकाळातील काही वेदना, दु:खापासून तुमची सुटका करावी म्हणून देवाने तुमच्या जीवनामध्ये हा समय आणला आहे. कदाचित तुम्हांला भावनिक दु:खापासून सुटकेची गरज असेल. तुमच्या भावनांवर कित्येक वर्षांपूर्वी घाव घातलेले असतील. कदाचित कोणीतरी अलीकडेच तुमचे काही वाकडे केले असेल, आणि त्याला क्षमा केल्याने देवाच्या आशीर्वादांना तुम्ही अंतरला आहात. बंधनात पडलेल्या सर्वांना मुक्त करण्यासाठी येशू आला. तुम्हांला आणि मला त्याची रोज गरज लागणार हे त्याला माहीत होते.

भग्न अंत:करण बरे व्हावे, दु:खवेदनेपासून सुटका होण्याचा हा संदेश मी जेव्हा जेव्हा देते तेव्हा उठावे आणि मी जे व्हावे, असावे ते सर्व देवाच्या इच्छेप्रमाणे करावे असे मला उत्कटपणे वाटते. तुम्ही जसे व्हावे, असावे अशी देवाची इच्छा आहे तसे पूर्णपणे व्हा. अर्धेमुर्धे अगर पावपट, पाऊणपट होण्यावर समाधान मानू नका. पूर्ण होण्याचा निश्चय करा हेच माझे तुम्हांला सांगणे आहे.

इफिस.३:१६ या वचनातून प्रेषित पौलाने प्रार्थना केली आहे : ''त्याने आपल्या ऐश्वर्याच्या समृद्धीप्रमाणे तुम्हांला असे दान द्यावे की, तुम्ही त्याच्या आत्म्याच्या द्वारे अंतर्यामी बलसंपन्न व्हावे.'' *[तुमच्या अंतरंगाच्या अंतरंगात आणि व्यक्तित्वामध्ये स्वत: त्याने वसती करावी.]* (विस्तारीत अनुवाद, अधोरेखन माझे).

अंतर्यामी आम्हांला भावनिक आरोग्य मिळण्याची गरज आहे. आमच्या भावना आमच्या जिवाचा एक भाग आहेत. आम्ही आत्मा आहो आणि आम्हांला जीवही आहे. आमचे मन, आमची इच्छाशक्ती आणि आमच्या भावना हे आमच्या जिवाचे घटक आहेत. आम्ही काय, कोणता विचार करावा ते आमचे मन आम्हांला सांगते. आम्हांला काय हवे ते आमची इच्छा आम्हांला कळवते आणि आमच्या भावनांच्या सहाय्याने आम्हांला काय कसे वाटते ते समजते.

दुसऱ्या लोकांनी तुम्हांला दुखावले, सतावले की सैतान पुढे सरसावतो आणि तुमच्या भावनिक जखमा आणखी चिघळाव्यात म्हणून झटतो. नीती.१८:१४ मध्ये असे आहे : ''मनुष्याचे चित्त आपली व्याधिक सहन करते, पण व्याकुळ चित्त कोणाच्याहने प्रसन्न करवेल?'' तुम्ही अंतरंगामध्ये मोडलेले, भंगलेले असावे, जीवनात सर्वांच्याच वाट्याला येणारे दु:ख तुम्हांला सोसता येऊ नये हीच सैतानाची मनीषा आहे.

पण तुम्हांला महान शक्तिसामर्थ्याने बलसंपन्न करून अधिक बळकटी देण्यासाठी पवित्र आत्मा तुमच्या अंतरंगामध्ये आणि व्यक्तित्वामध्ये येऊन तेथे वस्ती करतो. तो तुम्हांला देवाच्या वचनाचे स्मरण करून देतो. ''तू आपला भार परमेश्वरावर टाक म्हणजे तो तुझा पाठिंबा होईल; नीतिमानाला तो कधीही ढळू देणार नाही'' (स्तोत्र.५५:२२).

आम्हांला आंतरिक शक्तीसामर्थ्य असेल तर जीवनातील प्रश्नांना, समस्यांना नीटपणे तोंड देता येईल. आंतरिक शक्ती नसेल तर आम्हांला वाहतुकीच्या कोंडीतून देखील बाहेर पडता येणार नाही! माझ्या अंतरंगात एवढा गोंधळ होता की जीवनातील लहानसहान प्रश्नांना तोंड देणेही मला मुळीच जमत नव्हते.

आमच्या भावनांच्या झालेल्या जखमांमुळे आम्हांला दैनंदिन प्रश्नांचीही उकल करता येत नाही. एखादा तिरसट दुकानदार, आम्ही सांगितलेले न ऐकणारे लहान मूल, आध्यात्मिक दृष्ट्या प्रौढ, परिपक्व नसलेला/ली पती/पत्नी यांच्याशी वागण्यासाठी आम्हांला दुखावलेल्या भावना निकोप असणे गरजेचे आहे.

अंतरंगात समस्या असल्या की बाह्य समस्याही पुढे येतात, पण आम्हांला अंतरंगात बलसंपन्न केलेले असेल, पवित्र आत्म्याच्या सामर्थ्याने आमच्या अंतर्यामी सर्व प्रकारे सुस्थिर, बलवान, शक्तिवान केलेले असेल तर आमच्यासमोर येणाऱ्या सर्व लहानमोठ्या गोष्टींना आम्ही सहजपणे तोंड देऊ.

## त्याच्या प्रतिरूपाप्रमाणे तुमचे रूपांतर होऊ द्या

प्रत्येकाची बलस्थाने असतात तशी मर्मस्थानेही असतात. याला तुम्ही आणि मी कोणीच अपवाद नाही. आम्हांला वेदनेच्या बंधनात जखडून ठेवणाऱ्या गोष्टींपासून आमची सुटका व्हावी हीच देवाची इच्छा आहे. ती पवित्र आत्म्याच्या सामर्थ्याच्या द्वारे आम्हांला शक्ती, बल देईल आणि आमची स्वभावप्रवृत्ती आत्म्याच्या नियंत्रणाखाली असावी यासाठी आमच्या व्यक्तित्वाला सुयोग्य आकार देईल.

देवाचे सहाय्य आम्हांला नसेल तर आमच्या व्यक्तित्वामध्ये अनेक बाबतींत उणेपण येईल. आमच्या स्वाभाविक इच्छा आणि प्रवृत्ती पवित्र आत्म्याला विरोध करणाऱ्या आहेत (पाहा गलती.५:१७). आम्ही आमचा स्वार्थच धरून राहिलो तर आमचे जीवन गलती.५:१९-२० मध्ये सांगितल्याप्रमाणे होईल. कलह, मत्सर व राग ही आमची मुख्य लक्षणे असतील. मग आम्ही असाच मानसिक विचका झालेल्या लोकांशी परिचय वाढवून एकमेकांच्या वेदना दु:खात भर घालीत राहतो. पण नातेसंबंध, मैत्री हे जीवनाचे एक मुख्य अंग आहे, आणि दुसऱ्या लोकांचा सहवास टाळणे हे कोणालाच शक्य नाही.

देवाबरोबरचे (देवत्वाबरोबरचे) आमचे नाते, आमचे स्वत:बरोबरचे नाते आणि आमचे दुसऱ्यांबरोबरचे नाते, संबंध यांचाच विचार पवित्र शास्त्रात प्रामुख्याने केला आहे. आम्हा स्वत:लाच जर आम्ही आवडत नसलो तर मग आपले दुसऱ्या कोणाशी कधीही पटणार नाही. हे मी मागेही सांगितले आहे. आमचा आमच्याशीच कलह, वाद चाललेला असतो म्हणूनच दुसऱ्यांबरोबर आमची नेहमी भांडणे होतात.

ख्रिस्ताच्या प्रतिमेनुसार आमची जडणघडण व्हावी यासाठी पवित्र आत्मा आमचा सहाय्यकारी आहे. रोम.८:२९ मध्ये देवाविषयी लिहिले आहे : ''कारण ज्यांच्याविषयीचे

त्याला पूर्वज्ञान होते त्यांनी आपल्या पुत्राच्या प्रतिमेप्रमाणे बनावे म्हणून त्याने त्यांना अगाऊच नेमून ठेवले; ह्यात हेतू हा की तो पुष्कळ बंधुजनांमधला ज्येष्ठ असा व्हावा.''

आमच्या घायाळ, दु:खक्लेशमय भूतकाळापासून आमची सुटका झालीच पाहिजे हे सत्य आपणाला पुरेपूर पटले तर आम्हांला देवाचे सामर्थ्य मिळू न आमच्या व्यक्तित्वाचे रूपांतर ख्रिस्ताच्या प्रतिमेप्रमाणे होईल, देवाबरोबरचे आमचे नातेसंबंध सुधारतील, दुसऱ्यांशीही आम्ही समंजसपणे वागू. आमच्या स्वत:च्या प्रश्नांना आम्हांला सामोरे जाता येईल आणि आम्हांला स्वत:कडे पाहण्याची एक नवी निकोप दृष्टी मिळेल.

तुमचा छळ झाला, त्यात तुमचा काहीही संबंध नसला तरी त्याबद्दल तुम्ही अद्याप स्वत:लाच दोष देत असाल, तुमचेच काही तरी चुकले असणार नाहीतर लोकांनी तुम्हांला छळले नसते असेही तो तुम्हांला पटवून देईल. तुमचा लैंगिक छळ झाला असेल तर सैतान तुम्हांला सांगेल, दोष तुमचाच आहे, नाहीतर त्या दुसऱ्या व्यक्तीने अगर व्यक्तींनी तुमचा गैरफायदा घेतला नसता, तुम्हांला असे वापरून घेतले नसते. परंतु लक्षात ठेवा, तुम्हांला अयोग्य, गैर कारणासाठी उत्पन्न केलेले नाही, आणि तुमचा जो काही छळ झाला तो सरळसरळ तुमच्यावर अन्यायच होता.

एखाद्या लहान मुला/मुलीचा छळ झाला तर छळ करणाऱ्याला ''तुमच्यापुढे काही समस्या आहे, त्याला मी कारण नाही, तुम्ही तुमची समस्या माझ्यावर ढकलत आहात, पण मी ती घेणार नाही'' असे सांगण्याचे बळ त्याला/तिला नसते.

मग पुढे मोठेपणी ही छळणूक अशीच चालू राहते, तेव्हा सैतानाच्या लबाडीपासून स्वत:चा बचाव करणे आम्हांला अधिकच कठीण जाते. सैतान आमचे विपरीत विचार आमच्या मनात आम्हांला पुन्हा पुन्हा ऐकवतो :

*माझं काय चुकतंय? माझं कुठं चुकतंय? माझ्यातच काही दोष असला पाहिजे नाहीतर माझ्यावर असला प्रसंग आलाच नसता! मी काय वाईट करतोय/करतेय?*

*तू मला असं टाकून बोलण्यासारखं मी काय केलंय? तू मला कधीच प्रेमाने जवळ घेत नाहीस, पाठीवरून हात फिरवत नाहीस, याचं कारण काय? मी काही वाईट केलंय का?*

*मी आईकडे व बाबांकडे गेले की ते मला जवळ येऊ देत नाहीत, मला रागाने दूर ढकलतात. का? का? माझ्या आईबाबांना मी नकोशी का झाले? त्यांनी मला माझ्या का टाकून दिलं? तुम्ही मला तुमच्या मुलीसारखं नव्हे, तर तुमच्या रखेलीसारखं का वागवता? मी तुमचं काय वाईट केलंय? माझं कुठं काय चुकलं?*

*माझ्या ओळखीच्या कोणालाच अशी वागणूक मिळत नाही. माझ्यातच काहीतरी दोष असणार म्हणून माझं असं होतंय!*

काही लोक आंतरिक वेदनेचे हे रडगाणे मनाला वरचेवर पुन्हा पुन्हा वर्षानुवर्षे ऐकत लहानाचे मोठे, प्रौढ होतात. मग ते आपणावर कोणी प्रेम करील का ते शोधू लागतात. कारण आजवर त्यांना मिळायला हवे ते प्रेम मिळालेच नसते. ते प्रेमाचे एवढे भुकेले असतात की

ते दुसऱ्या कोणावर करू शकत नाहीत. देवाने नेमून दिलेल्या दिल्यानुसार प्रेम करणे त्यांना जमतच नाही.

मी हे स्वत:च्या अनुभवातून सांगते आहे. तुम्ही सतत या प्रकारे आंतरिक वेदनेने हैराण झाला असाल, तर सर्वसाधारण नाते जोडणे आणि दुसऱ्या कोणाहीकडून सर्वसामान्य अपेक्षा ठेवणे हे तुम्हांला अत्यंत कठीण जाईल. आजवर तुमचा दुसऱ्यांनी छळ केला आहे, आणि आता तुमचा मित्र/मैत्रीण, पती/पत्नी यांनी त्या छळाची भरपाई करावी, तुमची माफी मागावी असे तुम्हांला वाटेल. पण मित्र/मैत्रीण, पती/पत्नी यांनी त्या छळाची भरपाई करावी, तुमची माफी मागावी असे तुम्हांला वाटेल. पण मित्र/मैत्रीण यांच्याकडून अशी अवास्तव अपेक्षा ठेवल्याने त्यांना फारच अवघडल्यासारखे होऊन ते तुमच्यापासून चार पावले दूरच राहू पाहतील. त्यांच्या समजुतीप्रमाणे, कुवतीप्रमाणे जे द्यायला हवे ते सर्व तुम्हांला देण्याचा त्यांचा प्रयत्न असेल, परंतु जोवर वेदनामय भूतकाळापासून तुमची सुटका होत नाही, तोपर्यंत तुमच्यासाठी कोणी कितीही केले तरी ते अपुरेच पडणार!

मला पूर्वीचा एक काळ आठवतो. तेव्हा मला काही म्हटल्या काहीच सुख नव्हते. डेव्हने दुसरे काहीतरी करावे, काहीतरी आणखी अधिक करावे हीच माझी इच्छा व अपेक्षा होती. आणि त्यानेही वर्षानुवर्षे माझ्या म्हणण्याप्रमाणे करण्याचा मनापासून प्रयत्न केला. वेदनेच्या कचाट्यातून माझी सुटका व्हावी, मला स्वस्थता मिळावी यासाठी त्यांनी त्यांच्याने होईल ते सर्व काही केले.

डेव्ह खरोखरी सुसस्वभावी, मनमिळाऊ आहे. मला सुखी करण्याचा त्यांनी आटोकाट प्रयत्न केला. पण एक दिवस माझ्याकडे रोखून पाहत ते म्हणाले, ''बाई ग,'' (डेव्हला अगदी वैताग आला की तो मला ''बाई'' म्हणतो. पण असा प्रसंग क्वचितच येतो.) डेव्हने म्हटले, ''बाई ग, आता नीट ऐकून घे. मी तुला सुखी करण्याचा प्रयत्न केला आहे. पण आता हद्द झाली. तुला सुखी करणं कधी शक्य नाही. मी काहीही केलं तरी तुला ते पटत नाही. मी काही तुला सुखी करू शकणार नाही.'' शेवटी त्यांनी म्हटले, ''आता हे ऐक. आता मी तसा प्रयत्नही करणार नाही.''

## तुमचे रिते रिकामे अंतःकरण पूर्णपणे भरण्यास देवाला मोकळीक द्या

या पेचप्रसंगात मला शक्ती देण्यासाठी पवित्र आत्मा माझ्या अंत:करणामध्ये कार्य करीत होता याबद्दल मी देवाला धन्यवाद देते. मी नुकतेच देवाचे वचन वाचू लागले होते. माझ्या सर्व समस्या, माझे आताचे दु:ख, वेदना, प्रश्न वगैरे दुसऱ्या कोणाच्या चुकीने आले नव्हते. दोष दुसऱ्या कोणाचा नव्हता, माझाच होता, समस्येचे मूळ माझ्यामध्येच होते. म्हणून माझ्या जीवनाचा पालट व्हावा म्हणून मी देवाबरोबर कार्य करू लागले.

अनेक विवाहित लोकांच्या संसाराची नौक घटस्फोटाच्या खडकावर आदळून फुटते. कारण आपली पत्नी/पती आपल्याला सुखी करू शकत नाही हे त्यांना उमजते. ते म्हणतात, ''तू मला सुखी करणार नसशील तर मला हे नाते नको, मी या नात्यात राहणार नाही.'' मग ते सुखाच्या शोधात दुसऱ्या कोणाचा आश्रय करतात, पण त्यांच्या मनात रुतलेले नकाराचे शल्य त्यांना स्वस्थता मिळू देत नाही.

नकाराचे शल्य तुम्हांला उदास, असुरक्षित कते. तुम्हांला स्वत:चे यथार्थ मूल्य समजत नाही. आपल्यात काही कमी आहे अशा समजुतीने तुमचा स्वत:वर भरंवसा उरत नाही. या दुष्टचक्रातून जोवर तुमची सुटका होत नाही, तोवर तुम्हांला आपणा स्वत:विषयी चांगले वाटण्यासाठी दुसऱ्या कोणाची तरी गरज पडते. व्यसनी माणसाला वरचेवर नशेच्या मात्रा हव्या असतात, तसे मलाही दररोज वारंवार माझ्या आत्म-मूल्याची जाणीव कोणीतरी करून देणे आवश्यक होते.

मला वरचेवर ही खात्री पटवून देण्याची निकड होती. कारण माझ्या उणेपणाच्या भावनेलाही सीमा नव्हती. आणि माझ्याकडे जेवढे लक्ष दिले जाई तेवढी माझी ती गरज वाढत जाई.

नकाराचे हे शल्य ज्यांच्या जीवनात खोल रुतलेले असते त्या लोकांना नेहमीच असुरक्षित वाटते. आपण कोणाला प्रिय नाही, आपल्यावर कोणीही प्रेम करीत नाही अशी त्यांची दृढ भावना झालेली असते. त्यांचे व्यक्तित्व भंगलेले असते. ते आतून अगदी उद्ध्वस्त झालेले असता. आपण ठीकठाक आहोत असे वाटावे, यासाठी ते नेहमी, सतत कोणता तरी आधार शोधीत असतात. ते प्रत्येक गोष्ट करून पारखून पाहतात. दुसरी चांगली नोकरी घेतात, बढती मिळवतात, आध्यात्मिक कृपादान, मंडळीमध्ये एखादे पद, चांगले मित्र, चांगले कपडे, चांगली मोटारगाडी, चांगले घर, चांगला समाजसमूह, सतत प्रशंसापर शब्द अशा बाह्य प्रोत्साहनाची त्यांना गरज भासते. ते जणू नेहमीच असे म्हणतात : ''मला सांगा, मी ठीक आहे ना?'' त्यांच्या मनात हेच विचार असतात : ''हे लोक मला चांगलं म्हणतील का? माझं नेहमीच बरोबर असू दे.'' असुरक्षित, अवशान नसेलल्यांना सुधारणे त्याचे चुकते हे सांगणे शक्य नसते. कारण त्यांना अगोदरच स्वत:विषयी खूप हीनपणाची भावना असते.

असुरक्षित लोकांविषयीच्या या गोष्टी मला चांगल्या माहीत आहेत. कारण यातील प्रत्येक समस्या माझीही समस्या होती. कैवारी, मार्गदर्शक पवित्र आत्मा आणि देवाचे वचन ह्यांनी मला निराशेच्या खाचेतून बाहेर काढले, राखेऐवजी शिरोभूषण दिले तेव्हा माझी सुटका झाली.

आमच्यामध्ये कार्य करण्यासाठी पवित्र आत्म्याची अधिकृतपणे नेमणूक केलेली आहे. तो आमची अंत:करणे प्रत्यक्ष देवाने परिपूर्ण करतो. प्रेषित पौलाने आमच्यासाठी केलेली प्रार्थना तुम्ही पुन्हा एकदा बारकाईने पाहा, त्यावर विचार करा. ''ख्रिस्त'' हे तुम्ही सर्व पवित्र जनांसह समजून घ्यावयास [*अनुभवाने आत्मसात करण्यास*] बुद्धीस अगम्य अशी ख्रिस्ताची प्रीती

ओळखून घ्यावयास शक्तिमान व्हावे; असे की तुम्ही देवाच्या सर्व पूर्णतेइतके परिपूर्ण व्हावे [*तुम्हांला दिव्य समक्षता विपुलपणे लाभावी*] (इफिस.३:१९ विस्तारित).

आम्ही प्रत्यक्ष देवाने परिपूर्ण झाल्यावर आम्हांला दुसऱ्यांच्या भलावणीची आशा करण्याचे कारणच नाही. आम्ही देवाच्या प्रीतीने एवढे ओतप्रोत भरून वाहू की, ती प्रीती आमचे त्याच्याबरोबरचे नाते, आमच्या स्वत:बरोबरचे नाते आणि दुसऱ्यांबरोबरचे नाते अशा सर्वांतून ओसंडत राहील. तुम्ही देवाला मोकळीक दिली तर तो तुम्हांला तुमच्या भूतकाळातील वेदनादु:खांपासून सोडवील, मुक्त करील. देव देतो ते आरोग्य स्वीकारा, पवित्र आत्म्याला तुमच्या अंत:करणात त्याच्या इच्छेप्रमाणे कार्य करू द्या. जीवनाचा आनंद पूर्णपणे घेण्यासाठी आवश्यक ती खात्री, ते आश्वासन तो तुम्हांला पूर्णपणे देईल. आपला भूतकाळ मागे कसा टाकावा, कधी पूर्वीची आठवण झाली तर त्यांनी वेदनांचे दु:ख वाटू नये हे सर्व तोच तुम्हांला दाखवील, शिकवील. जो देवाला पूर्णपणे समर्पित झाला आहे त्याला उपदेशक ५:२० मधून हे अभिवचन दिले आहे : ‘‘त्याला आपल्या आयुष्याच्या दिवसांची फारशी चिंता वाटणार नाही, देव त्याच्या आनंदास अनुरूप असतो.’’

# 23

# अखेरीस मुक्तता

**भा**वनिक आरोग्य मिळवून मोकळेपणी जीवनाचा आनंद घेण्यासाठी चालावी लागणारी वाट अगदी सोपी आहे असे नाही. तथापि, बंधनात खितपत पडून राहण्यापेक्षा मुक्त होण्याच्या दिशेने नेटाने पुढे जात राहणे केव्हाही अधिक चांगलेच आहे.

> म्हणून ख्रिस्ताने देहाने [तुमच्याआमच्यासाठी दु:ख] सोसले तसेच तुम्हीही तेच मनोवृत्तीरूपी शस्त्र धारण करा; कारण ज्याने देहाने दु:ख सोसले [ज्याची चित्तवृत्ती ख्रिस्तासारखी आहे] तो [सहेतूक] पापापासून निवृत्त झाला आहे [त्याने आता स्वत:ला आणि जगाला संतोष देणे थांबवले आहे, तो आता देवाला संतोष देतो.]
>
> ह्यासाठी की तुम्ही आपले देहामधील उरलेले आयुष्य माणसांच्या वासनांप्रमाणे नव्हे, तर देवाच्या इच्छेप्रमाणे चालवावे (१ पेत्र.४:१-२ विस्तारित अनुवाद).

या शास्त्रवचनांचा काळजीपूर्वक अभ्यास केल्याने हेच स्पष्ट दिसते की, आपण आपल्या मनामध्ये नेहमी उचित, योग्य तेच विचार ठेवावे, करावे. उदा. *''पापाच्या गुलामगिरीत राहण्यापेक्षा मी योग्य तेच करण्यासाठी ख्रिस्ताबरोबर दु:ख सोसणे अधिक पसंत करीन.''*

विजय संपादन करून यशस्वी होण्यासाठी उचित मानसिकता ठेवणे महत्त्वाचे आहे. मला मुक्त करण्यास येशू समर्थ आहे, त्याची तशी इच्छा आहे हे प्रथम मला उमजले, तेव्हा सुटका करून घेण्यास स्वतंत्र होण्यास मी तयार होते. पण माझी वृत्ती अशी होती : ''आता क्षणभरही मी दु:ख सोसणार नाही, आतापर्यंत खूप सोसले, सहन केले आणि भावनिक वेदना, दु:खाचा ज्यात जरातरी संबंध आहे अशा कशालाही मी सादर होणार नाही.'' पवित्र

आत्म्याने कृपाळूपणे मला कित्येक शास्त्रभाग दाखवले. त्यांच्या अभ्यासातून माझी मनोवृत्तीच चुकीची आहे हे मला समजून आले. मी योग्य तेच विचार केले पाहिजेत, यथार्थ मानसिकता ठेवणे अगत्याचे आहे हे उमजले.

मग मी असा विचार केला : *आता आणखी दु:ख सोसण्याची माझी इच्छा नाही, पण बंधनात राहण्यापेक्षा मी दु:ख सोशीन. मी बंधनात असेपर्यंत दु:ख सोसावेच लागणार, ते अटळ आहे. पण या दु:खाला अंत नाही. मी येशूच्या अधीन झाले, तो नेईल तिकडे गेले, मुक्त होण्यासाठी आवश्यक ते सर्व सोसले तर त्यात थोडा वेळ दु:ख, वेदना होतील, परंतु ते दु:ख विजयाकडे नेणारे असेल. भावनिक वेदनांपासून मुक्त असे नवीन जीवन प्राप्त होईल.*

शारीरिक तंदुरुस्ती हे आणखी एक चांगले उदाहरण आहे. अयोग्य आहार, अवेळी खाणेपिणे, व्यायाम न करणे, यामुळे माझे शरीर बेढब झाले की साहजिकच मन उदास होणार, सतत दमल्यासारखे वाटून उत्साह उरणारच नाही. परिणामी दु:खही होणार, आणि ही परिस्थिती सुधारण्यासाठी मी काहीच केले नाही तर हे दु:ख, उदासपणा सतत वाढतच राहणार. माझे शरीर नीट तंदुरुस्त व्हायचे तर व्यायाम, योग्य आहार हे आवश्यक होते. त्याचबरोबर चुकीच्या गोष्टी वर्ज्य करणे जरुर होते.

व्यायाम करू लागले, काही दिवस अंग खूपच दुखले. मला काहीबाही खाण्याची सवय लागली होती. आता ते पदार्थ खाल्ले नाहीत तर माझे मस्तक सैरभैर होई. हेही एका प्रकारचे दु:ख सोसणेच आहे. व्यायाम करण्यासाठी रोज थोडा वेळ काढणे आवश्यक होते. यातूनही काही दु:ख होईल, कारण येथेही भावनांच्या आहारी न जाता मला योग्य तेच निवडायला हवे होते.

या उदाहरणावरून हे लक्षात येते की, शारीरिक तंदुरुस्ती नसेल तर उगाचच निरर्थक दु:ख भोगावे लागते, त्यापासून सुटायचे असेल तर आपणाला दुसऱ्या कोणत्या तरी प्रकारे दु:ख भोगावे लागते. तथापि हे वेगळ्या प्रकारचे दु:ख आहे. त्यातून विजय मिळून अखेरीस दु:खापासून सुटका होते.

## योग्य दुःखसहन आणि अयोग्य दुःखसहन

पुढील शास्त्रवचने पाहा, त्यांवर मननचिंतन करा. आपल्यामध्ये बदल होत असताना दु:ख होते, कारण कोणतेही बदल वेदनादायक असतात. अशा प्रसंगी आपण विश्वासाने आनंदी राहण्याचा निश्चय करावा. देव आमच्यावर प्रीती करोत म्हणून आमचे ‘‘योग्य दु:खसहन’’ देखील अखेरीस सुपरिणाम साधते. येथे परिपक्व शीलस्वभाव होणे हाच सुपरिणाम आहे.

> आपण ज्या कृपेमध्ये आहो त्यात आपला प्रवेशही त्याच्या द्वारे विश्वासाने झाला आहे; आणि आपण देवाच्या गौरवाच्या आशेचा अभिमान बाळगतो. इतकेच नाही, तर संकटांचाही अभिमान बाळगतो. कारण आपल्याला ठाऊक आहे की, संकटाने धीर, धीराने शील व शीलाने आशा निर्माण होते; आणि आशा लाजवीत नाही कारण आपणाला दिलेल्या पवित्र आत्म्याच्या द्वारे आपल्या अंत:करणात देवाच्या प्रीतीचा वर्षाव झाला आहे (रोम.५:२-५).

अनेक लोकांची मानसिकता चुकीची असते. त्यामुळे ते जीवनात आनंद मिळण्याइतपत कधीच परिपक्व होत नाहीत. परिपक्वतेबरोबर नेहमी स्थैर्यही लाभते. स्थैर्य नसेल तर आम्हांला शांती व आनंद यांचा कधीच अनुभव येणार नाही.

दु:ख सोसण्याचे दोन प्रकार आहेत. एक योग्य व दुसरा अयोग्य. प्रेषित पेत्राने विश्वासणाऱ्यांना आवर्जून सांगितले आहे की, त्यांनी कधी चुका, अपराध केल्याबद्दल दु:ख भोगू नये. तर योग्य ते केल्याबद्दल प्रसंगी दु:ख सोसावे. आपणाला भोगावे लागणारे दु:ख योग्य आहे का अयोग्य ते ज्याचे त्याने पडताळून पाहावे. १ पेत्र.३:१४ मध्ये तो सांगतो, ‘‘परंतु नीतिमत्त्वामुळे तुम्हांला दु:ख जरी सोसावे लागले तरी तुम्ही धन्य...’’

आमचा विवेकभाव शुद्ध राहावा अशा प्रकारे आम्ही जीवनक्रम चालवावा हा बोध त्याने व.१६ मधून केला आहे. पुढे व.१७ मध्ये तो सांगतो : ‘‘कारण चांगले करणे करूनही तुम्ही (अन्यायाने) दु:ख सोसावे अशी देवाची इच्छा असली तर वाईट करून दु:ख सोसण्यापेक्षा ते बरे आहे.’’

हा एक अतिमहत्त्वाचा भाग आहे. दु:खसहनावियी अनेक लोकांची मानसिकता चुकीची असते म्हणून त्यांना मुक्ततेचा आनंद कधीच अनुभवता येत नाही. तुमच्या सर्व दु:खाक्लेशांपासून तुमची सुटका करावी, तुम्हांला भयवेदनामुक्य करावे ही येशूची इच्छा आहे हे तुम्ही तुमच्या ख्रिस्ती जीवनात कधी ना कधी ऐकलेच असेल. आणि ते सत्य आहे. त्याची ही इच्छा आहेच. परंतु यात बदल घडणे अपेक्षित आहे आणि बदल होणे कधीच सरळ सोपे नसते.

प्रसूतीच्या वेळी मूल जन्माला येत असताना वेदना होतात, कळा येतात, या प्रक्रियेतील सर्वांत कठीण समयाला ‘‘स्थित्यंतराचा समय’’ असे म्हणतात. मी तेहतीस वर्षे वेदनेचे जीवन जगले. मला वेदना, दु:खांपासून मुक्त करावे ही येशूची इच्छा मला उमजली तेव्हा माझ्या आयुष्यातील ‘‘स्थित्यंतराचा काळ’’ सुरू झाला. तो माझा पालट, रूपांतर करीत होता. जगाकडून मी विरूप, विपरीत होण्यापूर्वी मी जशी होते, माझ्याविषयी त्याचा - ख्रिस्ताचा जो मनोदय होता, त्याप्रमाणे माझी जडणघडण नव्याने होऊ लागली. आणखी काही वर्षे मला क्लेश झाले. पण हा दु:खभोग वेगळ्या प्रकारचा होता. हे क्लेश सोसणे निरर्थक नव्हते. या

दु:खसहनातून प्रत्यक्षात आशा उत्पन्न झाली; कारण ''स्थित्यंतराच्या या काळात'' माझ्यात होणारे बदल मी स्वत: पाहत होते.

अर्थात हे बदल नेहमीच मोठे, भव्य नव्हते. पण प्रभूने माझा धीर टिकवून ठेवला, मला मला निराश होऊ दिले नाही. आता या वेदना सोसवत नाहीत, अशी स्थिती होई तेव्हा मला त्याच्याकडून विशेष आशीर्वाद प्राप्त होत आणि माझी खातरी पटत असे की, तो माझ्या अगदी जवळ, माझ्यावर लक्ष ठेवून आहे. आणि हेच आशेचे मोठे कारण होते.

## धातू शुद्ध करणाऱ्याची भट्टी

योग्य प्रकारे दु:ख भोगणे म्हणजे धातू शुद्ध करणाऱ्यांच्या भट्टीत तावूनसुलाखून शुद्ध होऊन निघणे हे लक्षात घ्या आणि पुढील शास्त्रवचने वाचा. त्यातून तुम्हांला विशेष सांत्वन आणि समाधान मिळेल. या वचनांचा एक खास अर्थ आहे.

> त्याच्या आगमनाच्या दिवशी कोण निभावेल? तो प्रगट होईल तेव्हा कोण टिकेल? कारण तो धातू गाळणाऱ्याच्या अग्नीसारखा, परटाच्या खारासारखा आहे; रूपे गाळून शुद्ध करणाऱ्यासारखा तो बसेल व लेवीच्या वंशजांस शुद्ध करील. त्यांस सोन्यारुप्याप्रमाणे शुद्ध करील, मग ते धर्माने परमेश्वराला बलि अर्पण करतील (मलाखी ३:२,३).

एकदा मी ऐकलेली एक गोष्ट तुम्हांला सांगते. त्यावरून वरील शास्त्रवचनांचे मर्म तुमच्या लक्षात येईल. युरोपखंडातील ही गोष्ट ऐका. एकदा एक मनुष्य सोनाराच्या दुकानात गेला. त्याला काही वस्तू विकत घ्यायच्या होत्या. दुकानात जाऊन त्याने तेथील वस्तू पाहिल्या, आपल्या पसंतीच्या वस्तू निवडल्या. पण  या सर्व वेळात तो दुकानदार तेथे नव्हताच. आता वस्तूंची किंमत करून पैसे चुकते करावे म्हणून तो इकडेतिकडे मालक कोठे दिसतो का ते पाहू लागला. शोधता शोधता तो दुकानाच्या मागील बाजूस गेला. तेथे एक दार दिसले, दार उघडेच होते. त्यातून बाहेर जाण्याचा मार्ग होता. हा माणूस तेथे गेला, त्याने दारातून बाहेर डोकावून पाहिले. तेथे दुकानदार (खरे तर धातू गाळणारा) आपल्या भट्टीजवळ बसला होता. भट्टी धगधगत होती. त्यावर एक मोठे भांडे ठेवलेले होते. भांड्यातील रस उकळत होता. तो दुकानदार त्या उकळत्या रसाकडे एकटक नजरेने पाहत होता. त्या गिऱ्हाईकाने त्याचे लक्ष वेधून घेतले. दुकानात येऊन वस्तूंची किंमत घ्या असे त्याला सांगितले.

गिऱ्हाइकाने विनंती करीत म्हटले, ''पाच मिनिटे इकडे या. मी घेतलेल्या वस्तू पाहा, त्यांची किंमत सांगा म्हणजे मला हा व्यवहार पुरा करता येईल.'' पण त्या धातू गाळणाऱ्याने सरळ ''नाही'' म्हटले. ''मला इथून एक मिनिटभरही हालता येत नाही, या भांड्यात सोने आहे आणि त्यातील सर्व अशुद्धता, हीण जळून जाईपर्यंत ते असेच उकळत ठेवले पाहिजे.

मला अगदी शुद्ध सोनं हवंय. भट्टी अधिक तापली तर सोनं जळेल आणि विस्तव कमी झाला तर त्यातील हीण तसंच राहील.''

त्याने सांगितले, ''मला इथून आत जाणे शक्य नाही, मला सतत इकडेच पाहिले पाहिजे. हे काम पूर्ण झाले की मी आत येईन.'' गिऱ्हाईक म्हणाले, ''त्याला किती वेळ लागेल?'' तो दुकानदार बोलला, ''भांड्यातील या रसामध्ये मला माझे प्रतिबिंब स्पष्टपणे दिसेल तेव्हा सोने शुद्ध झाल्याचे कळेल. तोपर्यंत मला असेच पाहणे भाग आहे.''

मला तर ही गोष्ट फारच सुंदर, मनोरम वाटते. देव सतत माझ्यावर लक्ष ठेवून आहे, तोच माझे, माझ्या जिवाचे रक्षण करतो, माझ्यावर येणारी संकटे, होणाऱ्या परीक्षा वगैरे सर्व गोष्टींवर त्याची नजर आहे, त्या परीक्षा अडचणी इ. कठीण असह्य होऊ नयेत, याची काळजी तोच घेतो. (जसे धातू गाळणारा अग्नीची तीव्रता कमी-अधिक होऊ देत नाही.) माझ्यामध्ये त्याला साधावयाचे कार्य व्यवस्थित व्हावे यासाठी आवश्यक तेवढेच दडपण भार तो ठेवतो. हे सर्व या गोष्टीवरून आपण शिकावे.

१ करिंथ.१०:१३ या वचनातून प्रेषित पौलाने सांगितले आहे की देव आमची परीक्षा आमच्या सहनशक्तीपलीकडे होऊ देणार नाही, आणि प्रत्येक परीक्षेच्या वेळी त्यातून सुटण्याचा मार्गही तो दाखवील. आपण देवावर भरंवसा ठेवावा. तो आमच्या शक्तीपलीकडे आमची परीक्षा कधीच होऊ देणार नाही.

मी सांगते ते ऐका, तुमची सहनशक्ती किती आहे, तुम्हांला कितपत सोसवेल हे तुमच्यापेक्षा देवाला चांगले माहीत आहे. त्याच्यावर विश्वास ठेवा, तो विशुदध करण्याच्या या प्रक्रियेतून तुम्हांला निभावून नेईल आणि मग तुम्ही शुद्ध बावनकशी सोन्यासारखे झळाळत राहाल.

## ध्येयाच्या दिशेने नेटाने पुढे चला

धातू गाळणाऱ्याच्या अग्नीने शुद्ध होणे ही आयुष्यभर चालणारी प्रक्रिया आहे हे तुम्ही समजून घेतले तर योग्य दुःखसहन करणे अधिक सोपे जाईल. हे सत्य जाणूच प्रेषित पौलाने लिहिले आहे : ''एवढ्यातच मी मिळवले, किंवा एवढ्यातच मी पूर्ण झालो आहे असे नाही, तर ज्यासाठी ख्रिस्त येशूने मला आपल्या कह्यात घेतले ते मी आपल्या कह्यात घ्यावे म्हणून मी त्याच्यामागे लागलो आहे'' (फिलिप्पै.३:१२).

पौलाने आपल्या लेखांमध्ये ख्रिस्ती जीवन शर्यतीत धावण्यासारखे असल्याचा उल्लेख आवर्जून केला आहे.

> शर्यतीत धावणारे सर्व धावतात पण एकालाच बक्षीस मिळते हे तुम्हांला ठाऊक नाही काय? असे धावा की तुम्हांला ते मिळेल. स्पर्धेत भाग घेणारा प्रत्येकजण सर्व गोष्टींविषयी

इंद्रियदमन करतो. ते नाशवंत मुगूट मिळवण्यासाठी असे करतात. आपण तर अविनाशी मुगूट मिळवण्यासाठी असे करतो. म्हणून मीही तसाच धावतो, म्हणजे अनिश्चितपणे धावत नाही; तसेच मुष्टियुद्धही करतो, म्हणजे वाऱ्यावर मुष्टिप्रहार करीत नाही, तर मी आपले शरीर कुदलतो व त्याला दास करून ठेवतो. असे न केल्यास कदाचित मी स्वत: पसंतीस न उतरलेला असा ठरेन (१ करिंथ.९:२४-२७).

प्रभू परमेश्वरावर विश्वास ठेवा. तो तुम्हांला समाप्तिरेषेपलीकडे नेईल. नेटाने पुढे जाण्याचा निश्चय करा. ख्रिस्ताने तुम्हांला आपल्याकडे ज्यासाठी घेतले आहे ते स्वत:कडे घेण्यास सतत झटत राहा. तुमचे तारण करण्यासाठी त्याने तुम्हांला स्वत:जवळ घेतले आहे.

तुमच्या तारणामध्ये केवळ मरणोत्तर स्वर्गामध्ये राहण्यास घर, एवढेच नाही तर त्यात या जीवनातील अनेक लाभांचाही समावेश आहे. तुमचा नवा जन्म झाला त्याच दिवशी तुमच्या सर्वकाळच्या तारणाचा आरंभ झाला आहे, आणि ते कधीच संपणार नाही. वैऱ्याने तुमच्याकडून हिरावून घेतलेले तुमचे तुम्हांला पुन्हा परत द्यावे याचसाठी देवाने तुम्हांला आपल्याजवळ घेतले आहे. परंतु देव देऊ करतो ते घेण्याचा दृढ निश्चय तुम्हांलाच करायचा आहे.

स्वस्थ बसून राहू नका. विजय आपोआप आपल्या पदरी पडेल म्हणून निष्क्रिय असू नका. हा विजय आमच्या कर्मांनी नव्हे, तर देवाच्या कृपेनेच मिळतो हे खरे, परंतु आम्ही प्रत्यक्षात पवित्र आत्म्याशी सहकार्य करूनच त्याच्या मार्गदर्शनाने एक एक पाऊल पुढे टाकणे आवश्यक आहे.

डेव्ह ग्रॅन्ट यांनी *द ग्रेट लव्हर्स मॅनिफेस्टो* नावाचे एक पुस्तक लिहिले आहे. त्यात ते म्हणतात, ‘‘सर्व काही ठीकठाक, सहजसुलभ असते तेव्हा आमची वाढ कधीही होत नाही. आम्ही बसल्या बसल्या वाया जातो, आपण माणसे मुळातच अत्यंत आळशी आहोत. सोप्या वाटा धुंडाळत राहणे हे आमचे कायमचे काम आहे. तथापि, वास्तविक पाहता वाढ, विस्तार होण्यासाठी आम्हांला काही ताणतणावांची नितांत गरज आहे. संघर्ष, झगडणे आमच्या हिताचे आहे आणि झगडणे चांगले आहे, ते जिवंतपणाचे लक्षण आहे. त्यामुळे आम्ही हालचाल करीत जिवंत असतो ही गोष्ट आपण मान्य केली तरच आपली वाढ होणार. एरवी ते शक्य नाही. पौल म्हणतो, ‘‘मी धावतो, नेटाने पुढे जातो.’’ या शब्दांतून ताणतणाव, दडपण, झगडणे या अर्थछटा स्पष्ट होतात. ख्रिस्ती जीवनक्रम सोपा नाही हेही यावरून स्पष्ट होते.

ग्रँट यांनी आपल्या पुस्तकात उदाहरणादाखल पुढील गोष्ट सांगितली आहे : ‘‘अवकाशामध्ये गेल्यावर वजनरहित अवस्था प्राप्त होते. या स्थितीत मधमाशा काय करतील, कशा वागतील ते पाहण्यासाठी शास्त्रज्ञांनी काही मधमाशा अवकाशयानातून अंतराळात नेल्या. त्या वजनरहित वातावरणात मधमाशा सोडण्यात आल्या. त्या सहजपणे आकाशात तरंगत राहिल्या. या प्रयोगाविषयी दिलेल्या अहवालाची अखेर एका मार्मिक

वाक्याने केली होती : *''त्यांना ही सफर खूपच आनंदाची होती पण त्या सर्व मेल्या!''* श्री. ग्रॅन्ट ह्याचें म्हणणे मला शंभर टक्के मान्य आहे. ते म्हणतात, ''तरंगत राहिल्याने आपणाला कधीच काही लाभ होणार नाही, हित साधणार नाही.''

## कठीण काळात चिकाटी सोडू नका

जुन्या कराराच्या काळातील संदेष्टा, हबक्कूक कठीण काळाविषयी सांगतो. त्याने ''कठीण काळाचा'' उल्लेख ''उच्च स्थाने'' या शब्दांनी केला आहे. या कठीण काळात स्थिर राहावे, घसरू नये म्हणून देवाने आपल्याला हरणाच्या पायासारखे पाय दिले आहेत असे तो सांगतो :

> अंजिराचे झाड न फुलले, द्राक्षीच्या वेलीला फळ न आले, जैतुनाचे उत्पन्न बुडाले, शेतात धान्य न पिकले, मेंढवाड्यातील कळप नाहीतसे झाले व गोठ्यात गुरेढोरे न उरली,
>
> तरी मी परमेश्वराच्या ठायी हर्ष पावेन, मला तारण देणाऱ्या देवाविषयी मी उल्लास करीन.
>
> परमेश्वर प्रभू माझे सामर्थ्य आहे, तो माझे पाय हरणाच्या पायासारखे करतो, तो मला माझ्या उच्च स्थानावरून चालू देतो (हबक्कूक ३:१७-१९).

येथे 'हरीण' या शब्दाने एका विशिष्ट हरणाचा उल्लेख केला आहे. हे हरीण डोंगराळ भागातच राहते. ते फारच चपळ असून उंचच उंच डोंगरकडे, सुळके यांवून ते सहजपणे पळते, फिरते. ते या उंच कड्यांच्या कंगोऱ्यांवरून सहजपणे उड्या मारीत या कड्यावरून त्या कड्यावर जाते. आमची पावले सुस्थिर राहावीत हीच आमच्यासाठी देवाची इच्छा आहे. त्यामुळे आमच्या वाट्याला अडचणी, संकटे आली तरी आम्ही घाबरून जात नाही, अजिबात भयभीत होत नाही.

खरोखरी विजयी होण्यासाठी आम्ही वाढत वाढत अशा ठिकाणी पोचले पाहिजे की, तेथे कठीण संकटाच्या काळात न घाबरता आम्ही त्या काळाचे आव्हान स्वीकारण्यास तयार असले पाहिजे. पवित्र शास्त्राच्या विस्तारीत अनुवादामध्ये (द ॲम्प्लिफाईड बायबल) ''उच्च स्थाने'' याची फोड करताना ''संकटे, अडचणी, दु:खक्लेश किंवा जबाबदारी'' हे शब्द सुचवले आहेत. याच काळामध्ये आमची वाढ होत असते.

तुम्ही आपल्या जीवनाकडे मागे वळून पाहिले, तर तुम्हांला असे आढळेल की, सुलभ, सर्वसामान्य काळात आपली वाढ होत नाही, तर कठीण काळातच आपण जोमाने वाढतो. कठीण काळात तुम्ही जे मिळवले, संपादन केले असेल त्याचा लाभ सुखाच्या काळात घेता येतो. एका प्रकारे हे जीवनाचे तत्त्वसूत्रच आहे. तुम्ही संपूर्ण महिनाभर कसून काम करता,

महिना संपल्यावर पहिल्या तारखेला पगार मिळाला की, तुम्हांला अत्यानंद होतो. तुम्ही व्यायाम केला, योग्य तोच आहार घेतला तर तुमचे शरीर निरोगी, धडधाकट राहील. तुम्ही तुमचे घर, घराचा परिसर, आवार सर्व स्वच्छ केले तर तुम्हांलाच प्रसन्न वाटेल. घरात आनंदाने राहता येईल.

येथे मला इब्री.१२:११ हे वचन प्रकर्षाने आठवते. ''कोणतीही शिक्षा तत्काली आनंदाची वाटत नाही, उलट खेदाची वाटते. तरी ज्यांना तिच्याकडून वळण लागले आहे, त्यांना ती पुढे नीतिमत्त्व हे शांतीकारक फळ देते.''

देवावरील प्रीतीमुळे जो कोणी त्याची सेवा करतो, जे योग्य तेच करतो, कारण ते रास्तच असते. काही उत्तम, चांगले वतन वारशाने मिळावे यासाठी तो ते करीत नाही. अर्थात अखेर शेवटी त्याला निश्चितच आशीर्वाद मिळणार, यात संशय नाही. प्रभू परमेश्वराचे गौरव करण्यासाठी निकोप, निरोगी राहण्यास झटा आणि अखेरीस तुम्हीही गौरवित व्हाल.

# 24

# भिंती नको, पूल बांधा

तट-भिंती म्हणजे संरक्षणाचे साधन. आपणा सर्वांचीच अशा भिंती बांधण्याची प्रवृत्ती असते. दुसऱ्यांकडून मानसिक इजा होऊ नये, झालीच तर तिला अडथळा व्हावा म्हणून आपण अशा भिंती उभारतो. मनाभोवती तट बांधून आपण स्वत:चे रक्षण करू पाहतो. माझे पती अगदी प्रेमळ आहेत तरी केव्हा केव्हा ते मला दुखावतात हे मी पूर्वी अनेकदा सांगितले आहे. माझ्या पतीने माझ्या भावना दुखावल्या की मी लगेच भिंत उभारत असे — हे मी आत्मिक दृष्टीने सांगत आहे. या भिंतीच्या आड दडून त्याच्या भावनिक हल्ल्यापासून स्वत:चा बचाव करीत असे. मग माझी ही प्रवृत्ती माझ्या लक्षात आली. पण दुसऱ्यांना बाहेर ठेवण्यासाठी मी मनात भिंती उभारल्या की मी स्वत:लाही कोंडून घेत असे. तेथे आत कोणीही नसे हे वास्तव पवित्र आत्म्याने मला दाखवले.

कित्येक लोक असे एकटे एकाकी जीवन जगतात. कारण स्वत:चे रक्षण करण्यासाठी त्यांनी स्वत:च स्वत:भोवती तटबंदी बांधलेली असते. पण या भिंती अखेरीस तुरुंगाच्या भिंती होतात आणि लोक त्या कटुतेच्या एकांतवासात खितपत पडतात. ''धरले तर चावते, सोडले तर पळते'' अशी त्यांची अवस्था होते. भावनिक वेदना होऊ नये, त्या टळाव्यात, स्वत:चे रक्षण व्हावे यासाठी ते संरक्षक भिंती बांधतात, पण दु:खवेदना सोसण्याची तयारी नसल्याने ते कोणावर प्रेम करू शकत नाहीत आणि कोणी त्यांच्यावर प्रेम करीत नाही.

सरळसामान्यपणे जीवन जगणे, आल्या प्रसंगाला तोंड देणे यात थोडेफार दु:ख आहे, परंतु संपूर्ण आयुष्यभर दु:खवेदना टाळण्याचा प्रयत्न करणे हे त्याहून अधिक क्लेशाचे आहे.

येशू आरोग्य देणारा, बरे करणारा आहे, आपल्या दु:खक्लेशाच्या प्रसंगी तो नेहमी आमचे सांत्वन, समाधान करण्यास सज्ज आहे.

मला प्रभूकडून प्रेरणा मिळाली आहे की तुम्हांला आवर्जून सांगावे : ''आताच विश्वासाने पुढे पाऊल टाका आणि तुम्ही बांधलेल्या या भिंती तोडून मोडून टाका. त्या एकांतवासाच्या बंधनातून मोकळे व्हा! कदाचित हे म्हणणे ऐकून तुमच्या अंगावर शहारे येतील. अशा भिंतींच्या आड दडण्याची तुमची जुनी सवय असेल तर मला वाटते तुमचे अवसानच संपेल! परमेश्वर देवाने यरीहो नगराची तटबंदी पाडून जमीनदोस्त केली. त्याप्रमाणे तुम्हांला इतरांपासून विभक्त करणाऱ्या या भावनिक भिंती पाडून टाकील, तुम्हांला सोडवील (पाहा यहोशवा २:१-२१; ६:१-२७). ''विश्वासाने यरीहोच्या गावकुसाभोवती सात दिवस फेऱ्या घालण्यात आल्यावर ते पडले'' (इब्री.११:३०).

लोकांना बाहेर ठेवण्यासाठी मी आडभिंती बांधल्या आहेत हे येशू मला दाखवतो तेव्हा प्रत्येक वेळी विश्वासाचे पाऊल उचलावे लागते. स्वत:च स्वत:चे रक्षण करू पाहण्याऐवजी माझा रक्षक म्हणून त्याच्यावर विश्वास ठेवणेच मला इष्ट वाटते.

देव रक्षण करतो, तोच संरक्षण पुरवतो हे अभिवचन देणारी अनेक वचने पवित्र शास्त्रामध्ये आहेत. यशया ६०:१८ हे वचन मला विशेष धीर देणारे आहे, ''यापुढे तुझ्या देशात कसलाही जुलूम अगर तुझ्या सीमेच्या आत उजाडी व नाश यांचे नावही ऐकू येणार नाही; तारण माझा कोट व कीर्ती माझी वेस आहे असे तू म्हणशील.

या वचनातून मला महत्त्वाचा संदेश मिळतो : येशू ख्रिस्ताच्या द्वारे तारण माझ्याभोवती संरक्षक तटबंदी आहे. मी त्याची झाले त्या क्षणापासून माझ्या रक्षणाची जबाबदारी त्याने स्वत:वर घेतली आहे : परंतु ते आशीर्वाद माझ्या जीवनात क्रियाशील, सक्रिय होण्यासाठी अगत्याचे होते. प्रभूचे संरक्षण नाकारून स्वत:च स्वत:ची काळजी घेण्याची खटपट करीत राहिले तर माझ्या जीवनातील कष्ट, क्लेश कधी संपणार नाही, बंधने तुटणार नाहीत.

देवाकडून संरक्षण याविषयी आणखी एक अद्‌भुत शास्त्रवचन पाहा : ''आणि म्हणून तुम्हांवर प्रसन्नपणे कृपा करण्यास परमेश्वर उत्कटतेने वाट पाहत आहे. तुम्हांवर करुणा, दया करावी, तुम्हांला प्रेमदया दाखवावी यासाठी तो स्वत:ला उंच करतो. कारण देव नि:पक्षपाती न्यायाचा देव आहे, जे त्याची उत्साहाने, उत्कटतेने वाट पाहतात ते खरोखरी धन्य (सुखी, सुदैवी, हेवा करण्याजोगे), जे त्याची अपेक्षा धरतात, आणि त्याचा शोध करतात, [त्याचा विजय, त्याची कृपा, त्याची प्रीती, त्याची शांती, त्याचा आनंद, त्याची अनन्य, अनुपम, अखंड साथसोबत] यांची उत्कट आस धरतात ते धन्य आहेत (यशया ३०:१८ विस्तारीत अनुवाद)

या वचनाचा बारकाईने अभ्यास केला तर सहज ध्यानी येईल की आमचे चांगले करण्यासाठी, आम्हांला न्याय देण्यासाठी देव संधीची वाट पाहत आहे. परंतु जे त्याची प्रतीक्षा

करतात, त्याच्या सहाय्याची अपेक्षा ठेवून आहेत, त्यांच्याच साठी तो हे सर्व करतो, हे विसरून चालणार नाही. ‘‘स्वयंसंरक्षणाचा’’ हा खटाटोप सोडा आणि देव आपले संरक्षण करील या अपेक्षेने त्याच्यावर विसंबून राहा, तुमचे रक्षण करण्याची त्याला संधी द्या, मोकळीक द्या.

*देव देवच असू द्या*

विश्वासाने तुम्ही या नव्या क्षेत्रात पाऊल टाका. तुमचा कधीच मनोभंग होणार नाही, भावनिक इजा होणार नाही असे ठाम आश्वासन देणे मला शक्य नाही. परंतु मी नक्की सांगते, ‘‘परमेश्वर देव न्यायी आहे. म्हणजे तो योग्य वेळी समतोल साधून त्याच्या मार्गाने चालल्याबद्दल तुम्हांला प्रतिफळ देईल.

आपल्या समस्या, प्रश्न, आणि क्लेशकारक परिस्थिती यातून निभावून जाण्यासाठी देवाच्या मार्गाने चालणाऱ्याला दिव्य भव्य आशीर्वाद लाभणार यात शंकाच नाही. ‘‘शास्त्रात लिहिल्याप्रमाणे तुझ्यामुळे आमचा वध दिवसभर होत आहे; कापावयाच्या मेंढरांप्रमाणे आम्हांला गणिले आहे, उलटपक्षी ज्याने आपणावर प्रीती केली त्याच्या योगे ह्या सर्व गोष्टींत आपण महाविजयी ठरतो’’ (रोम.८:३६,३७).

एकाच वेळी महाविजयी ठरणे आणि कापावयास नेले जाणाऱ्या मेंढरांप्रमाणे असणे कसे शक्य आहे? याचे उत्तर अगदी सोपे आहे : ‘‘आमचा गैरफायदा घेतला जात आहे आणि देवही आमच्या सुटकेसाठी येत नाही असे वाटले तरीही आम्ही महाविजयी आहोतच, कारण या सर्व गोंधळाच्या निराशाजनक स्थितीतही अंतरंगात आम्हांला खातरी आहे, पक्की जाणीव आहे की आमचा देव आम्हांला कधीही सोडणार नाही, अगर टाळणार नाही आणि योग्य त्या क्षणाला, नेमक्या रेळी आमची सुटका तर होईलच, पण प्रतिफळही मिळेल.

## पूल बांधणे

एक दिवस प्रार्थना करीत असताना पवित्र आत्म्याने मला दाखवले की, माझे जीवन दुसऱ्यांसाठी एक पूल असे झाले आहे. ते या पुलावरून पुढे देवाकडील त्यांच्या स्थानावर जातात. यापूर्वी कित्येक वर्षे मी माझ्या जीवनात फक्त भिंतीच बांधल्या होत्या, पण आता हे बदलले आहे. जेथे पूर्वी भिंती होत्या तेथे आता पूल आहेत. माझ्या बाबतीत ज्या ज्या अवघड, अन्यायाच्या आणि त्रासदायक गोष्टी घडून आल्या त्या सर्व आता बदलल्या, तेथे आता प्रशस्त वाटा झाल्या आहेत. या वाटांनी दुसऱ्यांनी धीराने पुढे जावे आणि मला मिळाले तसे स्वातंत्र्य स्वत:साठी घ्यावे.

*आता मी भिंतीऐवजी पूल बांधण्यास शिकले आहे.*

‘‘देव पक्षपाती नाही’’ (प्रे.कृ.१०:३५). मी या पुस्तकाच्या पाचव्या प्रकरणात हा उल्लेख केलाच आहे. तो एकासाठी करतो तेच दुसऱ्यासाठीही करतील, मात्र त्याचे आज्ञापालन करणे

अगत्याचे आहे. या पुस्तकामध्ये दाखवलेले नियम, आज्ञा, तत्त्वे तुम्ही पाळाल तर माझ्याप्रमाणे तुमचीही सुटका होईल, तुम्हांलाही स्वतंत्रतेचा अनुभव येईल. मग तुम्हीही दुसऱ्यांची वाट सोपी व्हावी म्हणून पूल बांधणारे व्हाल. लोकांना दूर बाहेर ठेवणारी भिंत यापुढे बांधणार नाही.

इब्री.५:९ मध्ये येशूचा उल्लेख ‘‘युगानुयुगीच्या तारणाचा कर्ता’’ या शब्दांनी केला आहे. देवाकडे जाण्याच्या मार्गावर तो आमचा अग्रगामी झाला, त्याने आमच्यासाठी मार्ग प्रशस्त केला; म्हणूनच आता आम्हांला हा मार्ग चालण्यास सोपा झाला आहे. त्याच्यासमोर जणू घनदाट अरण्य होते. तो या अरण्यातून पुढे गेला आहे आणि आता त्याच्या मागे चालणाऱ्या आम्हांला थेट सुलभपणे पुढे जाता येते. घनदाट झाडे, लतावेली, काटे जाळ्या वगैरे काहीही आमच्या आड येत नाही. त्याने आमच्यासाठी स्वत:ला पवित्र, समर्पित केले. त्याच्या यज्ञार्पणाचे लाभ आम्हांला मिळत आहेत. आता इतरांसाठी यज्ञार्पण, त्याग करण्याची संधी तो आम्हांला देत आहे, आम्ही ही संधी साधली की आम्हांला मिळालेले लाभ, आशीर्वाद त्यांनाही मिळतील.

जो आनंद, जे प्रतिफळ त्याच्यापुढे होते त्याकरिता येशूने वधस्तंभ सहन केला (इब्री.१२:२). मार्ग अवघड वाटू लागला. अडथळे आले की मी स्वत:ला बजावून सांगते, ‘‘जॉयस नेटाने पुढे जा, धीर सोडू नको. पुढे आनंदी आनंद आहे.’’

भिंती पाडून पूल बांधायचा निश्चय करा. कितीतरी लोक जीवनात भरकटलेले आहेत, आयुष्याच्या भोवऱ्यात सापडले आहेत, त्यांचा वाटाड्या होऊन त्यांना वाट दाखवणाऱ्याची गरज आहे. आपण त्यांच्यापुढे चालून मार्गदर्शन करू या. आपण त्यांच्यासाठी अग्रगामी का होऊ नये?

भिंती का पूल? निवड तुमची तुम्हीच करायची आहे.

## राखेऐवजी शिरोभूषण

तुमच्या भिंतींचे पूल करावे हीच प्रभूची इच्छा आहे. तसेच त्याने आपल्या वचनामधून अभिवचन दिल्याप्रमाणे तुम्हांला राखेऐवजी शिरोभूषण द्यावे असा त्याचा मनोदय आहे.

> प्रभू परमेश्वराचा आत्मा मजवर आला आहे; कारण दीनांस शुभवृत्त सांगण्यास परमेश्वराने मला अभिषेक केला आहे, भग्नहृदयी जनांस पट्टी बांधावी, धरून नेलेल्यांस मुक्तता व बंदिवानांस बंधमोचन विदित करावे,
>
> परमेश्वराच्या प्रसादाचे वर्ष, व आमच्या देवाचा सूड घेण्याचा दिवस विदित करावा, सर्व शोकग्रस्तांचे सांत्वन करावे,
>
> सीयोनातील शोकग्रस्तांस राखेच्या ऐवजी शिरोभूषण घालावे, त्यांना शोकाच्या हर्षरूप तेल द्यावे. खिन्न आत्म्याच्या ऐवजी प्रशंसारूप वस्त्र द्यावे, ते अर्थात अशासाठी की,

परमेश्वराच्या गौरवार्थ त्यांस धार्मिकतेचे वृक्ष, परमेश्वराने लावलेले रोप म्हणता यावे म्हणून त्याने मला पाठवले आहे (यशया ६१:१,२,३).

यशया ६१ मधील ही अभिवचने विपुल आणि सधन आहेत.ही सर्व वाचून लक्षात घ्या. त्यातील एकाही अभिवचनापासून आपण वंचित राहायचे नाही असा दृढ निश्चय करा. या पुस्तकाच्या प्रत्येक वाचकाला या अभिवचनांप्रमाणे प्राप्त होवो हीच माझी प्रार्थना आहे, आणि या बाबतीत तुम्हीही माझ्याशी सहमत असणार ही खातरी आहे.

देवाने आपला एकुलता एक पुत्र आम्हांला दिला आहे. त्याने त्याचा कार्यभाग पूर्ण केला आहे. देवाच्या वचनाप्रमाणे चालून वागून मी माझा कार्यभार पूर्ण केला, व्हावा या उद्देशाने हे पुस्तक लिहिले आहे. आता तुम्हीही पक्का निश्चय करून सर्व काही देवाकडे विश्वासाने सोपवून तुमच्या जीवनात कार्य करण्यात त्याला मोकळीक द्या.

तुमच्या जीवनात त्याने या गोष्टी करीपर्यंत धीर धरा,
खचून जाऊ नका.
तो तुमच्या जखमांना पट्टी बांधून बरे करील;
तुमचे भग्न अंत:करण बरे करील;
तुमच्या जीवनात तुम्हांला सर्वतोपरी स्वतंत्र करील
तुमच्या कैदखान्याची दारे उघडून टाकील,
तो तुम्हांला शोकाऐवजी आनंद देईल
खिन्न, खचलेल्या निराश आत्म्याऐवजी
प्रशंसारूप वस्त्र देईल
*आणि*
राखेच्या ऐवजी शिरोभूषण देईल

# 25

# काहीही वाया जाणार नाही

आपल्या सर्व चिंता, काळज्या तुम्ही परमेश्वराकडे सोपवून दिल्यात तर तुमच्या जीवनातील कोणताही अनुभव कोणतीच बाब वाया जाणार नाही, निरर्थक ठरणार नाही. तुमचे खंडविखंड जीवन उद्ध्वस्त रणभूमीसारखे दिसले तरी तुमच्या भूतकाळाचे तुकडे घेऊन येशू त्याला नव्याने आकार देऊन ते सुंदर करील.

येशूने पाच भाकरी व दोन लहान मासे घेऊन पाच हजारांना पोटभर जेवू घातले. तेव्हा त्याने त्याच्या शिष्यांना सांगितले, ''...काही फुकट जाऊ नये म्हणून उरलेले तुकडे गोळा करा'' (योहान.६:१२). शिष्यांनी उरलेले तुकडे गोळा केले, ते बारा टोपल्या एवढे भरले. आरंभी येशूला दिलेल्या भाकरी व मासे यांच्यापेक्षा हे कितीतरी पटीने अधिक होते.

भय, भीती, धास्ती, असुरक्षितता, भावनिक सवयी, नाकारले गेल्याच्या दृढमूल भावनेचे बंधन या सर्वांपासून येशूने मला मुक्त केले, सोडवले. मग त्याने माझ्या भंगलेल्या जीवनाला पुन्हा नव्याने आकार दिला, आणि त्याच्या लोकांना शिक्षण देण्याचे विशेष कार्य मला दिले. निकोप, पूर्ण होणे, सुखीसफल जीवन कसे जगावे, सेवा कशी करावी, आणि प्रेमळ नातेसंबंध कसे जोडावे, जीवन अर्थपूर्ण कसे करावे त्याविषयी त्यांना मार्गदर्शन करण्याची जबाबदारी त्याने मला दिली आहे.

देव, डेव्ह आणि मी स्वत: यांच्याकडून बिनशर्तपणे प्रीतीचा स्वीकार कसा करावा, ते मी शिकले आहे. माझा पती सर्व काही माझ्या मनाप्रमाणे, मला हवे तसे, हवे तेव्हा करतोच असे नाही. पण आता मला यात काही वावगे वाटत नाही. कारण त्याच्यावर विनाअट प्रीती कशी करावी ते मी शिकून घेतले आहे.

आमचे लग्न झाले, तेव्हा प्रथम विनाअट प्रीती म्हणजे काय ते मला माहीतच नव्हते. माझ्या घरच्या लोकांना प्रत्येक गोष्ट माझ्या मनाप्रमाणे करावी लागे. त्यांनी तसे केले नाही तर त्यांचे माझ्यावर प्रेम नाहीच असा माझा ग्रह होई.

माझे अंत:करण भग्न, विदीर्ण झाले, मी खचून गेले, तेव्हा माझ्या जवळच्या नात्यातील प्रत्येकालाच माझे मन रंजवण्यासाठी खूपच कष्ट घ्यावे लागले. ते माझ्याशी स्पष्ट बोलू शकत नव्हते, म्हणून त्यांनाही त्रास झाला. कोणत्याच गोष्टीविषयी ते मला त्यांचे प्रामाणिक वास्तविक मत सांगू शकत नव्हते. त्यांना शांतता हवी होती, म्हणून मला आवडेल, रुचेल तेवढेच मला सांगणे त्यांना भाग होते.

समजा मी डेव्हला म्हटले, ''चला, आपण कॉफी घेऊ या.'' त्यावर ''आता मला कॉफी नको,'' असं म्हणणं त्यांना शक्यच नव्हते. कारण लगेच माझी मर्जी जात असे; तोंड वाकडे होई. एकंदर सर्व माझ्या मनाप्रमाणे करून घेण्याचा माझा हाच उपाय होता. मी अंतरंगातून मोडले होते. आत सर्व तुटले होते. मन उद्‌ध्वस्त होऊन मी अगदी निष्क्रिय झाले होते. माझ्यावर अत्याचार झाले होते आणि या अत्याचाराशी कसलाच संबंध नसलेल्या प्रत्येकाककडून मी माझ्या वेदनांची किंमत वसूल करून घेत होते.

तुमचा छळ झाल्याने तुमच्यावर अत्याचार झाल्याने तुम्ही उद्‌ध्वस्त, भग्न झाला असाल तर मानवप्राणी म्हणून तुमच्या हक्कांचा उपमर्द झाला आहे म्हणूनच खचून गेल्याची भावना तुमच्या मनाला व्यापून वाहिलेली असणार. अशा छळाला, अत्याचाराला बळी पडलेले कित्येकजण अखेर निराश होऊन म्हणतात, ''हे माझ्या शक्तीपलिकडचे आहे. माझ्याने आता हे सोसवत नाही.'' या लोकांना जीवनात दररोज येणाऱ्या प्रश्नांची अडचणींची धास्ती वाटत नाही, भग्न अंत:करणाच्या प्रश्नाने ते अगदी खचून गेलेले असतात. आमच्यापैकी अस्ताव्यस्त, अव्यवस्थित कुटुंबात लहानाचे मोठे झालेले असे जे आहेत ते जवळ जवळ कायमच असुरक्षित, भयग्रस्त जीवन जगतात आणि त्यांचे घरसंसारही अस्ताव्यस्त अव्यवस्थित असतात.

बाह्य परिस्थितीच्या रेट्याने खचून न जाता सुस्थिर राहण्यासाठी आम्हांला आंतरिक शक्तीची गरज आहे. आमच्या भंगलेल्या स्वप्नांचे तुकडे एकत्र करून आम्हांला ख्रिस्ताच्या प्रतिमेप्रमाणे पुन्हा घडण्यासाठी आम्ही देवाला मोकळीक दिली पाहिजे. आणि यासाठी अद्याप आम्ही उराशी कवटाळून ठेवलेले काही तुकडे त्याला फेकून देणे अगर त्यांचा चुरा करणे आवश्यक आहे. मग ते भंगलेले पात्र घेऊन आपल्या वचनाच्या पाण्याने ते चांगले भिजवून त्याचा गोळा करून तो ते आपल्या कुंभाराच्या चाकावर ठेवून त्याला सुबक आकार देईल आणि आम्ही जे काही उरलेसुरले ते त्याला देऊ त्यातून काही अद्‌भुत, नेत्रदीपक असे करण्यास तो महासमर्थ आहे. त्याच्या हातांचे कौशल्य केवळ अवर्णनीय आहे.

या जगात अडचणी संकटे येतील हे येशूने आम्हांला अगोदरच सांगून ठेवले आहे. त्याने म्हटले, ''तुम्हांला माझ्यामध्ये [परिपूर्ण] शांती आणि खातरी मिळावी म्हणून मी या गोष्टी

तुम्हांला सांगितल्या आहेत. या जगामध्ये तुम्हांला संकटे, परीक्षा, दु:ख व क्लेश आणि निराशा व वैफल्य यांना सामोरे जावे लागेल. परंतु धीर धरा, [भिऊ नका, घाबरू नका, भरंवसा दृढ धरा] कारण मी जगाला जिंकले आहे [तुम्हांला इजा करण्याची जगाची शक्ती मी काढून घेतली आहे, आणि ते तुमच्या खातर जिंकले आहे] (योहान.१६:३३ विस्तारित अनुवाद).

या जीवनात संकटे टाकू म्हटले तरी ते कोणालाच शक्य नाही. पण येशूवर विश्वास ठेवणाऱ्यांनी आनंदित, हसतमुख असावे, त्यांना धास्ती नाही. ''नीतिमानाला फार कष्ट होतात तरी परमेश्वर त्या सर्वांतून त्याला सोडवितो'' (स्तोत्र.३४:१९). तथापि देव आमची ताबडतोब सुटका करतो असे त्याचे वचन सांगत नाही. प्रथम आम्हांला काही थोडेफार सोसावे लागणारच.

जीवन नेहमीच मरणावर मात करते, आणि प्रकाश नेहमी अंधारावर मात करतो. देवाचे वचन नसेल तर मला भविष्यकाळ अंधाराच भासेल. आम्हांला अंधारापासून सोडवण्यासाठी येशू आला आहे. तो म्हणतो, ''जो कोणी माझ्यावर विश्वास ठेवतो [मला बिलगून राहतो, माझ्यावर भरंवसा ठेवून माझ्यावरच विसंबून राहतो], त्याने अंधकारात राहू नये म्हणून मी जगात प्रकाश असा आलो आहे'' (योहान.१२:४६ विस्तारित अनुवाद). अंधारात खितपत पडून दु:खक्लेश भोगत राहण्याऐवजी आपण सतत येशूला अनुसरावे आणि त्याचा आदर्श समोर ठेवून आपला जीवनक्रम चालवावा हेच इष्ट आहे (पाहा योहान.१२:२६).

तुम्ही भग्न, मोडलेले, खचलेले, हताश, निराश हतवीर्य असाल तर तुम्हांला पुढे जाणे शक्यच नाही. तथापि, या पुस्तकातील साक्षींच्या द्वारे तुम्हांला देवाचे वचन पुरेशा प्रमाणात मिळाले आहे, तुम्ही आता तुमच्या भूतकाळाच्या बंधनात नाही, एवढे ज्ञान आता तुम्हांला झालेच आहे, मात्र त्यासाठी तुम्ही प्रभूला अनुसरले पाहिजे. येशूने म्हटले आहे : ''तुम्ही माझ्या वचनात राहिला [माझे शिक्षण दृढ धरून त्याप्रमाणे आचरण करीत राहिला] तर खरोखर माझे शिष्य आहा; तुम्हांला सत्य समजेल व सत्य तुम्हांला बंधमुक्त करील'' (योहान.८:३१-३२).

## सतत प्रभूच्या मागे चालत राहा

देवाने लोकांच्या अंतकरणात स्वप्नांची पेरणी, रोपणी व लावणी केली आहे. परंतु पुष्कळ लोक शेवटपर्यंत टिकून राहत नाहीत. अंतरंगातील स्वप्न पूर्ण होण्यासाठी अखेरपर्यंत नेटाने त्याच्या मागे चालत राहिलेच पाहिजे. अनेकजण आरंभ करतात, आणि सोडून देतात. पुन्हा पुढे येतात आणि मागे जातात. काही पावले, थोडे अंतर चालल्यावर पुन्हा सर्व सोडून मागे फिरतात. भग्न हृदयामुळे त्यांची आशा खचून जाते म्हणून ते मागे जातात असे मुळीच नाही; तर शेवटपर्यंत टिकून राहण्यासाठी आवश्यक अशी आंतरिक शक्ती, दृढ निश्चय त्यांच्या ठायी मुळीच नसतो.

येशू तुमच्या जखमांना पट्टी बांधील, बऱ्या करील, तुमचे वळ बुजवील. त्याचे वचन तुमच्या जिवाचे औषध आहे (पाहा नीती.४:२०-२२). दररोज नियमाने देवाचे वचन वाचा, त्यात चुकू नका. मग तुम्ही रोज रोज एक वचन वाचले तरी हरकत नाही. मनन चिंतनपर एखादे पुस्तक वाचावे (उदा. *मी लिहिलेले स्टार्टिंग युवर डे राईट*). रात्री झोपते वेळी मनात देवाकडील सात्विक विचार आणा. उदा. मी येशू ख्रिस्तामध्ये देवाचे नीतिमत्त्व आहे, देव माझ्यावर प्रीती करतो. माझ्या भविष्यकाळासाठी त्याने उत्तम योजना केली आहे, आणि पुढीलप्रमाणे विश्वासपूर्ण प्रार्थना करा :

***हे प्रभू परमेश्वरा, माझा विश्वास आहे की, तू माझ्यावर प्रीती करतोस. माझ्या जीवनाचे मोडकेतोडके तुकडे घेऊन तू त्यांतून माझ्या हिताचे, चांगले असे काही करशील ही माझी खात्री आहे. रोम.८:२८ मध्ये तुझे वचन आहे, ''...देवावर प्रीती करणाऱ्यांस म्हणजे त्याच्या संकल्पाप्रमाणे बोलावलेल्यांस देवाच्या करणीने सर्व गोष्टी मिळून कल्याणकारक होतात.'' हे प्रभू, मी तुझ्यावर प्रीती करतो, माझी खात्री आहे की, तू मला क्षमा केली आहेस. हे परमेश्वरा माझ्या भग्नहृदयासाठी तुझा उपाय मी स्वीकारतो.***

रात्री झोपताना मनात वेडेवाकडे विचार आणू नका. आपले जीवन उद्ध्वस्त, अस्ताव्यस्त झाले आहे, त्यातून कधीही सुटका होणार नाही, काहीही चांगले होणार नाही, परिस्थितीत फरक पडणार नाही; अशा नकारात्मक विचारांना अजिबात थारा देऊ नका. देवाचे वचन हेच तुमचे औषध आहे, इलाज आहे. हे तुमचा देह, तुमचा जीव व तुमचा आत्मा यांच्यासाठी हे उत्तम औषध आहे. देवाच्या वचनाचा नीट अभ्यास करा म्हणजे वचन व आत्मा हे दोन्ही तुमच्या जीवनात एकत्रितपणे कार्य करतील.

पवित्र शास्त्रातून वाचलेले एखादे वचन तुम्हांला स्वत:साठी घ्यावयाचे, आत्मसात करायचे असेल तर त्याचा आपल्या प्रार्थनेमध्ये समावेश करा. उदा. स्तोत्र.३०:११-१२ ही वचने रात्री विसावा घेण्यापूर्वी देवाची स्तुती करण्यासाठी घ्यावी. स्तोत्रकर्त्याच्या सुरात सूर मिसळून तुम्हांलाही प्रार्थनेतून देवाची उपासना करता येईल : *''तू माझा विलाप दूर करून मला नाचावयास लाविले आहे, तू माझे गोणताट काढून मला हर्षरूपी वस्त्र नेसविले आहे. ह्यासाठी की, माझ्या आत्म्याने तुझे गुणगान गावे, गप्प राहू नये. हे परमेश्वरा, माझ्या देवा मी सर्वकाळ तुझे उपकारस्मरण करीन.''*

देव तुमच्या जीवनात त्याच्या आत्म्याची वृष्टी करण्यास आतुर आहे. तुम्ही फक्त प्रार्थना करा : *''हे प्रभू, माझ्या जीवनामध्ये कार्य कर. तुला जे हवे ते तू करा. मी ज्यांना दुखावले आहे त्यांना तू बरे कर, आणि मलाही बरे कर.''*

# तुमच्या वेदना, व्यथा वाया जाणार नाहीत

लहानपणीही मी कधीच मनमोकळी, निश्चिंत नव्हते. सदोदित मला कसली ना कसली काळजी, चिंता लागलेली असे. झोपेतून उठल्यावर खेळत बसले असे मला आठवतच नाही. मला नेहमीच माझी कीव येत असे. कारण एकच माझे लहानपण, किशोरवय आणि तरुणपणाची पहिली काही वर्षे हा सर्वच काळ माझ्या दृष्टीने वाया गेला होता. मग मी लग्न केले, त्यात कसलेच सुख मिळाले नाही. ती पाच वर्षे अत्यंत चिंतेची, ओढगस्तीची गेली. तीही वाया गेली, असेच मला वाटले. पुढे मोठेपणी वाटू लागले, आतापर्यंतचे सर्व जीवन वाया गेले,ही सर्व वर्षे फुकट गेली. परंतु देवाने ही वाया गेलेली सर्व वर्षे एकत्र केली आणि माझी व्यथा दूर करून सुटकेचा, मुक्तीचा संदेश सर्वांना सांगण्यास बळ दिले.

आजपर्यंत मला आलेल्या प्रत्येक जीवघेण्या, दु:खद अनुभवातून देवाने मोलाचे असे काही निवडून काढले. *माझ्या या उद्ध्वस्त, विफल जीवनातील अस्ताव्यस्तपणामधून देवाने काही चांगले, उत्तम कसे निवडून काढले,* सर्व काही हिताचे कसे केले असा प्रश्न साहजिकच तुम्हांला पडला असेल. पण देवाचे मार्ग अनन्य, वेगळे आहेत. त्याविषयी आपणाला काहीच माहीत नसते. माझी सर्व वाया गेलेली वर्षे घेऊन तो त्यांच्यायोगे हजारो लाखो लोकांपर्यंत दिव्य संदेश पोचवण्याचे कार्य करीत आहे. हे लोक मला सांगतात, ''आम्ही दररोज तुमचा संदेश ऐकतो.''

केव्हा केव्हा मला नवल वाटते, हे लोक काय ऐकत असतील? माझी किती हीन, दयनीय परिस्थिती होती. मी किती निराश होते, आणि देवाने मला पुन्हा कसे नीट बरे केले, हेच मी सांगते. आणि देव त्यांच्यासाठीही तसेच करील ही आशा आणि विश्वास त्यांना माझ्या संदेशामधून मिळत आहे. माझ्या भग्न अवस्थेचे मोल मान्य करून तो त्याचा उपयोग दुसऱ्या लोकांची भग्न अवस्था दूर व्हावी यासाठी करीत आहे.

आपले आजवरचे जीवन व्यर्थ, वाया गेले, आपणच ते वाया घालवले असे तुम्हांला वाटत असेल. पण वाया गेलेल्या गोष्टींचा सतत विचार केल्याने तुमची प्रगती होणार नाही. तुम्हांला नवी दिशा मिळणारच नाही. तुम्ही देवावर विश्वास ठेवला तर तुमच्या उरलेल्या आयुष्यातून देव काहीतरी दिव्य भव्य साकार करीलच करील ही खात्री ठेवा. मग उरलेले आयुष्य थोडे असो वा अधिक असो, तुमच्याजवळ जो काही वेळ उरला असेल त्यात देव काही एवढे अद्‌भुत भव्य करील की, आतापर्यंत तुम्ही भोगलेल्या सर्व दु:खाची भरपाई होईल. हे कार्य करताना देवाला पाहणे, हाही एक रोमांचक अनुभव ठरेल आणि वाया गेलेल्या दिवसांविषयी तुम्हांला कधीही पुन्हा खंत वाटणार नाही.

आज मी जे काही करते आहे ते करणे मला कधीच शक्य नाही. देवाने मला सेवेसाठी पाचारण केले तेव्हा माझी कशी हीनदीन अवस्था होती, आणि मी होते तशीच पुढेही राहण्याची मला जराही इच्छा नव्हती. मी ज्या स्थितीत होते, त्यातून बाहेर कसे यावे, अधिक

चांगले, वेगळे कसे व्हावे हे मला तर मुळीच समजत नव्हते. देवाने काही वर्षे कार्य करून मी जेथे असावे अशी त्याची योजना होती तेथे त्याने मला आणले. पण माझी खात्री आहे की, या अखेरच्या काळात तो नीतिमत्त्वाचे कार्य अधिक झपाट्याने करीत आहे.

## जे अशक्य वाटते ते देव करील

लक्षात ठेवा, खालच्या दिशेने जाण्यापेक्षा वरच्या दिशेने जात राहणे केव्हाही श्रेयस्कर. मग त्याला कितीही वर्षे लागली तरी काही हरकत नाही. प्रार्थना करा, *''हे देवा माझी विनंती ऐक. माझे हे मोडंकतोडकं जीवन घे, आणि सर्व तुकडे उचलून घे, काहीही वाया जाऊ देऊ नको.''* तसेच मोडलेले, तुटलेले राहू नका. तुमचा भूतकाळ आणि भविष्यकाळ निश्चयपूर्वक विश्वासाने देवाकडे सोपवून द्या.

मार्थाचा भाऊ लाजर मेला तेव्हा तिला वाटले तसेच तुम्हांला वाटत असेल. ती येशूला म्हणाली, ''प्रभुजी, आपण येथे असता तर माझा भाऊ मेला नसता'' (योहान.११:२१). येशू तेथे त्यांच्याकडे लवकरही येऊ शकला असता, पण त्याने तसे केले नाही. लाजर मरण पावला व त्याला कबरेत ठेवले आणि मगच तो तेथे आला. काही उद्देशाने त्याने विलंब लावला असे पवित्र शास्त्र सांगते. एकंदर परिस्थिती सर्वस्वी अशक्य व्हावी, आणि त्यातून काही चांगले झाले तर ते नक्कीच देवाचे कार्य आहे असे सर्वांना मान्य करावे लागले असते, म्हणूनच त्याने विलंब लावला (योहान.११:१-११).

देव आमची परिस्थिती बदलण्यासाठी काही करीत नाही अगर आपल्या अपेक्षेप्रमाणे झटपट कार्यकृती करीत नाही तेव्हा तो काही उद्देशानेच विलंब लावतो हे आपण नीट समजून घेतले पाहिजे. आता या प्रसंगातून निभावून जाणे केवळ अशक्य असे आम्हांला वाटते. आम्ही आशा सोडतो तेव्हा देव सहाय्य करतो. तो आमचा किती व कसा कैवार घेतो, तो किती अद्‌भुत, समर्थ आहे त्याची प्रचीती आम्हांला येते (पाहा २ इति.१६:९).

देवाची सेवा करण्याचा माझा प्रयत्न कितीतरी वर्षे सुरू होता. मला पवित्र आत्म्याच्या सामर्थ्याचा स्पर्श करण्यासाठी त्याने एवढी वाट का पाहिली? त्याने हे कार्य दोन वर्षांपूर्वी, चार वर्षांपूर्वी का केले नाही? माझ्या जीवनातील त्याचे कार्य हा एक चमत्कारच आहे याचे प्रमाण पटावे म्हणूनच तो योग्य वेळ येण्याची वाट पाहत होता. माझे जीवन घेऊन सेवाकार्यासाठी देवाने त्याचा उपयोग करणे हा खरेच चमत्कार आहे.

येशूने बारा शिष्यांची निवड केली. त्याने त्यांची ''व्यक्तित्व क्षमता चाचणी'' घेतली असती तर सामूहिक सेवाकार्यासाठी आवश्यक ते गुण त्यांच्याठायी नाहीत हेच आढळून आले असते. त्या परीक्षक-विश्लेषकांनी येशूला सांगितले असते, ''नाही, हे लोक तुमच्या कामाचे नाहीत. तुम्ही आपले दुसरे लोक पाहा. तुमच्या कार्यासाठी आवश्यक असे गुण असलेल्यांची निवड करा.'' त्यांनी दिलेल्या अहवालात असे शेरे दिसले असते : ''पेत्र चंचल वृत्तीचा, भावनाप्रधान आहे; केव्हाही रागाने भडकतो. थोमा तर सदाचा शंकेखोर,

संशयी आहे. आणि याच प्रकारे क्रमाक्रमाने सर्वच शिष्य ''कार्यास अपात्र'' ठरले असते.

येशूने त्या बाराजणांची निवड करण्यापूर्वी संपूर्ण रात्रभर प्रार्थना केली होती हे लक्षणीय आहे (पाहा लूक.६:१२-१६). आम्हांला ज्यासाठी पाचारण केले आहे त्यासाठी आमची निवड करण्यापूर्वी त्याने किती काळ प्रार्थना केली असेल? हा प्रश्न केव्हा केव्हा माझ्या मनात येतो. येशूला आम्हा प्रत्येकाची अगदी खडा न् खडा माहिती आहे. त्याच्या नजरेतून आमची कोणतीच गोष्ट सुटलेली नाही तरी पण त्याने आमचीच निवड केली आहे. कारण? त्याला भग्नहृदयी जनांना बरे करायचे आहे. सर्व तुकडे एकत्र करून त्याला आपले सामर्थ्य दाखवायचे आहे आणि त्याने निवडलेले लोक जेवढे अधिक दुर्बल, अशक्त, तेवढे त्याचे सामर्थ्य त्यांच्यामधून अधिक प्रमाणात दिसून येते.

मी देवाची सेवा करू लागले तेव्हा दर आठवडी स्वत:ची कीव करीत अश्रू ढाळण्यात माझा अर्धाअधिक वेळ खर्ची पडायचा. तथापि, असे असतानाही पवित्र शास्त्राभ्यास शिकवण्यासाठी मला अभिषेक झालाच होता. आता मी करते तसा उपदेश तेव्हाही करीत होते, प्रभावी संदेश देत होते, परंतु देवाने अद्याप मला माझ्याच घरात जणू डांबून ठेवले होते. मी पंचवीस लोकांना पवित्र शास्त्र शिकवीत होते. काही वर्षे असेच चालले. मग हळूहळू त्याने मला आजच्या जगण्याची सेवाकार्यासाठी संधी दिली. आज ही सेवा सर्व जगभर चालू आहे.

मी माझ्या अगदी खासगी जीवनात देवाला कार्य करू देईपर्यंत तो मला सार्वजनिक सेवाकार्यासाठी मोकळीक देणार नव्हता हे या प्रसंगातून शिकले. बारीकसारीक गोष्टींतही विश्वासू, प्रामाणिक राहण्याच्या या काळात माझी हळू हळू पण जोमाने प्रगती होत होती. गौरवापासून गौरवाकडे वाटचाल सुरू झाली होती (२ करिंथ.३:१८).

यात सर्वांत महत्त्वाचे म्हणजे आम्ही कोठे आहोत एवढेच देव पाहत नाही, तर आम्ही कोठे जातो आहोत त्याकडेही त्याचे लक्ष असते आणि या सर्व प्रवासात अंतिम ध्येय सदोदित समोर ठेवूनच तो आम्हांला वागवून घेतो. आमच्या त्याच्या नात्याच्या सुरुवातीपासूनच तो आमच्यावर बिनशर्त प्रीती करीत असतो. त्याची प्रीती मिळवण्यासाठी आपणाला हजार लटपटी खटपटी करण्याची काही गरज नाही. आपण त्या प्रीतीचा फक्त स्वीकार करायचा, तेवढे पुरेसे आहे.

देवाच्या समक्षतेमध्ये जाण्यासाठी आपण कधी कधी अगदी कसून प्रयत्न करतो, पण त्याच्यापासून, त्याच्या समक्षतेपासून दूर जाणे सर्वस्वी अशक्य हेच यातील वास्तव आहे. तो सतत आमच्या मागे असतो.

स्तोत्र.१३९:७-१० मध्ये स्तोत्रकर्त्याने देवाविषयी लिहिले आहे :

> मी तुझ्या आत्म्यापासून कोठे निघून जाऊ? मी तुझ्या समक्षतेपासून कोठे पळून जाऊ? मी वर आकाशात चढलो तरी तेथे तू आहेस, अधोलोकी मी आपले अंथरूण केले तरी पाहा, तेथे तू आहेस. मी पहाटेचे पंख धारण करून समुद्राच्या अगदी पलीकडल्या तीरावर जाऊन

राहिलो, तरी तेथेही तुझा हात मला चालवील. तुझा उजवा हात मला धरून ठेवील.

याच स्तोत्रात व.१६ मध्ये स्तोत्रकर्ता म्हणतो, ''(आमचा) एकही दिवस उगवण्यापूर्वी ते सर्व तुझ्या वहीत नमूद करून ठेवले होते.'' देव सतत आमचाच विचार करीत असतो हे त्याने व.१७-१८ मधून सांगितले आहे : ''हे देवा, मला तुझे संकल्प किती मोलवान वाटतात! त्याची संख्या किती मोठी आहे? ते मी गणू लागलो तर वाळूच्या कणांपेक्षा अधिक ठरतील; मला जाग येते तेव्हाही मी तुझ्याजवळच असतो.''

तुम्हांला दुसऱ्यांनी दिलेल्या वागणुकीवरून आपले स्वत:चे मूल्य ठरवू नका. तुम्ही ख्रिस्तामध्ये कोण आहात, कसे आहात त्याच्या आधारेच तुमचे मूल्य स्वीकारा.

प्रभू परमेश्वर जवळ नाही, तो कोठेतरी दूर आहे असे कधी कधी तुम्हांला वाटेल, पण याच कारणाने देवाच्या वचनाचे चांगले ज्ञान असणे महत्त्वाचे आहे. यशया संदेष्ट्याने परमेश्वरासमोर आपले गाऱ्हाणे मांडले. तो म्हणाला, ''तुझे लोक म्हणतात परमेश्वराने मला सोडले आहे, टाकले आहे. माझ्या प्रभूला माझा विसर पडला आहे.''

> [आणि परमेश्वराने उत्तर दिले] स्त्रीला आपल्या पोटच्या मुलाची करुणा येणार नाही एवढा तिला आपल्या बाळाचा विसर पडेल काय? कदाचित स्त्रियांना विसर पडेल पण मी तुला विसरणार नाही.
>
> ''पाहा, मी तुला आपल्या तळहातावर कोरून ठेवले आहे; तुझे कोट नित्य माझ्या दृष्टीसमोर आहेत.'' (यशया ४९:१४-१६).

आपल्या मुलांची छायाचित्रे अगदी हाताशी ठेवण्याचा आरंभ मुळात आईवडिलांनी केला असे नाही. देवाजवळ त्याच्या मुलांची चित्रे सदोदित सर्वत्र असतात. पुन्हा कधी तुमच्या मनात स्वत:च्या मूल्या-महत्त्वाविषयी शंका आलीच तर लक्षात ठेवा तुमचे चित्र त्याच्या तळहातावर कोरलेले, गोंदलेले आहे.

# 26

# दुप्पट नुकसानभरपाई

आजवर तुमच्यावर कोणतेही प्रसंग आलेले असोत, तुमचा कितीही, कसाही गैरफायदा घेतलेला असो, तुम्ही देवाला चिकटून, बिलगून रहिलात तर तो तुम्हांला निश्चित प्रतिफळ देईल. देवाचे वचन सांगते : ''आणि विश्वासावाचून त्याला संतोषविणे अशक्य आहे; कारण देवाजवळ जाणाऱ्याने असा विश्वास ठेवला पाहिजे की, तो आहे आणि त्याचा शोध झटून करणाऱ्यांना तो प्रतिफळ देणारा आहे'' (इब्री.११:६).

देव कठोर शिक्षा करणारा आहे असे अनेक लोकांना वाटते. अर्थात त्यांना देवाची जवळून ओळख नसते हे उघडच आहे. प्रीती हाच देवाचा स्वभाव आहे (पाहा १ योहान.४:८) आणि तो स्वाभाविकपणे प्रतिफळ देणारा आहे.

आम्ही प्रतिफळाची अपेक्षा करावी हीच देवाची इच्छा आहे. तो प्रतिफळ देईल या विश्वासाने वाट पाहावी हेच त्याला अपेक्षित आहे. त्याच्याजवळ येणाऱ्या प्रत्येकाने तो अस्तित्वात आहे व प्रतिफळ देणारा आहे हा विश्वास धरला पाहिजे असे त्याचे वचन सांगते. आमची स्थिती काय कशी होती, कशी आहे, आम्हांवर काय काय गुदरले वगैरे कशावरही लक्ष न लावता आम्ही देव आमच्यासाठी काय करणारा, आम्ही त्याच्याशी विश्वासू राहिलो की काय होणार याचेच विचार मनामध्ये सतत आणावे. ''मला प्रतिफळ मिळणार आहे'' असे ठामपणे बोलताना आमची साक्ष त्याच्या स्तुतीने ओतप्रोत भरलेली असावी.

प्रतिफळाच्या अपेक्षेने आमची आशा नेहमी प्रफुल्लित राहते त्यामुळे आमची सर्व संकटे आंतून निभावून जातो. पवित्र शास्त्र सांगते, वधस्तंभाचा तिटकारा, किळस असूनही त्याच्यापुढे पलीकडे जो आनंद, जे प्रतिफळ होते त्यामुळे येशूने तो सहन केला. आम्हीही तसेच करावे. सहज गुंतवणाऱ्या गोष्टी, मोह, सर्व प्रकारचे व्यत्यय या सर्वांपासून लक्ष काढून

फक्त येशूकडे पाहात असावे. तोच आमच्या विश्वासाचा उगम, आरंभकर्ता, मार्गदर्शक आणि परिपूर्ण करणारा आहे. तोच आम्हांला परिपक्वतेप्रत नेईल (इब्री.१२:२).

वेतन, पगार मिळण्याची शाश्वती नसेल तर कामावर जावे असे कोणालाही वाटणार नाही. सहनशक्तीबद्दल बक्षीस मिळणार असेल तर आपल्या मनाला उभारी येते, आणि त्या उत्साहाच्या भरात आपण नेटाने अखेरपर्यंत झटत राहतो. प्रयत्न मध्येच सोडून देत नाही. आम्ही म्हणतो, ''काही हरकत नाही. मी यातून सहज पुढे जाईन, कारण यातून मला काहीतरी मिळणार अशी खात्री आहे.''

देव प्रेमळ पिता आहे, तो आम्हा सर्वांची काळजी घेणारच हे जाणून घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे. त्याचे आमच्याविषयीचे चांगुलपण या कारणाने आम्ही त्याच्याशी विश्वासू असतो. तो आमच्या जीवनात प्रतिफळ देऊन आमच्यावर आशीर्वादांचा वर्षाव करतो. तो आमचे काही देणे लागतो असे नाही तर त्याचा झटून आस्थेने शोध करणाऱ्यांना प्रीती दाखवणे हा त्याचा स्वभावच आहे, म्हणून तो आम्हांला आशीर्वाद देतो.

आणि तुम्हीही देवाची आणखी जवळून ओळख व्हावी म्हणून झटत नसता, आतुर झालेले नसता, तर हा संदेश पूर्ण होण्याआधीच तुम्ही हे पुस्तक केव्हाच बाजूला टाकले असते. परंतु तुम्ही अजूनही हे पुस्तक वाचीत आहात, देवाविषयी पूर्वी माहीत नसलेले जाणून घेण्यास उत्सुक आहात हेच यातून स्पष्ट होते. तुम्ही प्रभूचा झटून विश्वासाने शोध करणारे आहात, तेव्हा तुम्हांला नक्की प्रतिफळ मिळणार ही माझी खातरी आहे.

## देव तुमच्यावर लक्ष ठेवून आहे

देवाचे लक्ष तुमच्याकडे आहे. तुम्ही करता ती प्रत्येक गोष्ट तो पाहतो. स्तोत्रकर्ता म्हणतो, ''माझे बसणे व उठणे तू जाणतोस तू दुरून माझे मनोगत समजतोस'' (स्तोत्र.१३९:२). पवित्र शास्त्र सांगते, ''परमेश्वराचे नेत्र अखिल पृथ्वीचे निरीक्षण करीत असतात; जे कोणी सात्विक चित्ताने त्याच्याशी वर्ततात त्यांचे सहाय्य करण्यात तो आपले सामर्थ्य प्रगट करतो...'' (२ इतिहास १६:९). देवावरील तुमच्या विश्वासाचे प्रतिफळ तुम्हांला द्यावे यासाठी देव उत्सुकतेने संधी शोधीत असतो.

येशूने म्हटले आहे, ''पाहा, मी लवकर येतो आणि प्रत्येकाला ज्याच्या त्याच्या कृत्याप्रमाणे देण्यास माझ्याजवळ वेतन आहे'' (प्रकटी.२२:१२). या पृथ्वीवर असताना लोक करतात त्या कृत्यांबद्दल त्यांना वेतन मिळणार हाच याचा अर्थ आहे. आता हे वेतन एका बाजूस आनंदवर्धक असेल तर दुसऱ्या बाजूने भीतीदायक असेल. आमच्यावर देवाची नजर आहे, लक्ष आहे, त्याच्या नजरेतून कोणाचे काहीही सुटणार नाही हे आपण उमजून घेणे जरुरीचे आहे.

देव कधी झोप घेत नाही की त्याला डुलकीही लागत नाही (पाहा स्तोत्र.१२१:४). बंद दारांच्या आड, दूर लोकांच्या नजरेआड चाललेल्या सर्व गोष्टी त्याला दिसतात, त्याच्या

नजेरतून काही सुटत नाही, लपून राहत नाही. आमच्या प्रत्येक बारीकसारीक गोष्टीकडे देवाचे लक्ष आहे हे आम्हांला खरोखरी मान्य आहे अशा प्रकारे आम्ही आमचा जीवनक्रम चालवला पाहिजे. आम्ही बोलत असतो, सुखदु:खाच्या गोष्टी एकमेकांना सांगतो तेव्हा तेथे देव अदृश्य पाहुणा असा आहे, तो आपला शब्द न् शब्द ऐकत आहे याची जाणीव आपण ठेवलीच पाहिजे.

येशूने आपल्या अनुयायांना सावधगिरीचा इशारा दिलाच आहे :

> माणसांनी पाहावे ह्या हेतूने तुम्ही आपले धर्माचरण, चांगली कृत्ये सार्वजनिक रीतीने अगर लोकांसमोर कधी करू नका; काळजी घ्या, नाहीतर तुमच्या स्वर्गातील पित्याकडून तुम्हांला प्रतिफळ मिळणारच नाही. म्हणून तुम्ही गोरगरीबांना मदत करता, दानधर्म देता तेव्हा ते गुपचूप द्या. ते ढोंगी, दांभिक लोक सभास्थानात आणि चौकाचौकत वाजंत्री लावून आपल्या दानधर्माची जाहिरात करतात तसे तुम्ही करू नका. त्यांना लोकांच्याकडून मानमरातब आणि स्तुतीप्रशंसा यांची अपेक्षा असते. मी तुम्हांला सत्य सांगतो त्यांना त्यांचे प्रतिफळ अगोदरच पुरेपूर मिळाले आहे (मत्तय.६:१-२ विस्तारित अनुवाद).

लोकांचे लक्ष वेधून घ्यावे, लोकांच्या नजरेत भरावे म्हणून आपण काही करीत असू तर लोकांच्या कडून होणारी स्तुती, प्रशंसा, बोलबाला हेच आमचे प्रतिफळ आहे, देवाकडून आणखी काहीच प्रतिफळ मिळणार नाही. देवाकडील प्रतिफळाच्या बदल्यात लोकांकडून प्रतिफळ घेऊ नका. देव तुम्हांला देणार आहे त्याची प्रतीक्षा करा, वाट पाहा, कारण लोक तुम्हांला देतील त्यापेक्षा देव देणार ते अनंतपटीने अधिक चांगले असणार याच शंकाच नाही.

येशूने पुढे सांगितले आहे, ‘‘तू तर दानधर्म करतोस तेव्हा तुझा उजवा हात काय करतो हे तुझ्या डाव्या हाताला कळू नये, अशा हेतूने की, तुझा दानधर्म गुप्तपणे व्हावा म्हणजे तुझा गुप्तदर्शी पिता तुला तुझे फळ (उघडपणे) देईल’’ (मत्तय.६:६).

आपण नुसती ढोर मेहनत करतो, कितीही केली तरी त्याचे चीज होत नाही असे तुम्हांला वाटेल. कदाचित तुम्ही तुमच्या मंडळीने चालवलेल्या बालवाडीत दहा वर्षे सेवा केली असेल, आणि त्याबद्दल तुम्हांला काही आईवडिलांकडून ‘‘आमच्या मुलांकडे तुम्ही नीट लक्ष देत नाही’’ असे तक्रारी, कुरकुरीचे शब्दच मिळाले असतील. कदाचित तुम्ही मंडळीमध्ये वडील म्हणून सभासदांना ५-७ वर्षे अनेक प्रकारे सहाय्य करूनही कोणी आभाराचा एक शब्दही उच्चारला नसेल. तुम्ही मध्यस्थीची प्रार्थना करीत असाल आणि तुम्ही दुसऱ्यांसाठी प्रार्थना करता आहात याची कोणाला जाणीवही नसेल. पण हे सर्व तुम्ही प्रभूसाठी करायचे म्हणून करीत राहा, त्यात चुकू नका.चांगले करीत राहा, त्यात मागे हटू नका, निराश, उदास होऊ नका. देवाच्या वतीने तुम्ही दुसऱ्यांसाठी जे काही करता त्यावर त्याचे लक्ष असते. योग्य, रास्त उद्देशाने तुम्ही कोणाला कधी मदत केली, कोणाला केव्हा क्षमा केली ते सर्व त्याला

माहीत असते आणि तो तुम्हांला त्याचे प्रतिफळ देईल. रास्त उद्देशाने नेहमी कार्य करीत राहा. देव तुम्हांला त्याचे निश्चित प्रतिफळ देईल.

## संकटे, अडचणी येतात तेव्हा काय करावे

आज ना उद्या, उशीरा वा लवकर जीवनात कधी तरी संकटे, अडचणी येणारच. अडचणी, संकटे आपणा प्रत्येकाच्या वाट्याला कमी अधिक प्रमाणात येतातच. प्रत्येकालाच कसोटीच्या काळातून जावे लागते आणि हवामानाच्या अंदाजात प्रत्येक वादळाची सूचना अगोदरच दिलेली नसते.

एखाद्या दिवशी आपण सकाळी उठतो आणि म्हणतो आज सर्व काही छानच होणार, कसली चिंता नाही की काळजीही नाही. पण तो दिवस संपण्यापूर्वी आपल्या ध्यानीमनी नसणारी संकटे कोसळतील आणि आपण हैराण होऊ नका, खचून जाऊ नका.

अडचणी, संकटे जीवनाचा एक भागच आहेत. तेव्हा आपण त्यांना तोंड देण्यास तयार असावे हेच इष्ट. संकटे येण्यापूर्वीच त्यांना तोंड देण्यास स्वत:ला तयार करणे फारच अवघड असते. स्वत:ला बळकट करून आपण सज्ज असले पाहिजे.

संकट येते तेव्हा प्रार्थना हीच आवर्जून करण्याची पहिली गोष्ट आहे. *''हे देवा मला भावनिक बळ दे, स्थिर राहण्यास सहाय्य कर.''* तुमच्या भावनांच्या महापुरात वाहवत जाऊ नका. देवावर भरंवसा ठेवणे ही करायची दुसरी गोष्ट आहे. भय वाटू लागले की, प्रार्थना करा.

भावनिकदृष्ट्या स्थिर राहा, आणि प्रार्थना करा, चुकू नका. तुम्ही दिलेले शब्द पाळा, ठरलेली कामे करा. तुमच्यापुढे काही अडचण, समस्या आहे म्हणून देवाची सेवा करण्याचे सोडू नका, थांबवू नका. संकटे, अडचणी असतानाही देवाला दिलेली वचने पाळण्याचा समयच जगातील सर्वांत उत्तम समय आहे. संकटे, क्लेश, दु:ख वगैरेंनी तुम्ही खचून जात नाही हे पाहून सैतान मागे हटेल. काही काळ तरी तुम्हांला सतावणार नाही.

''चांगले करण्याचा आपण कंटाळा करू नये; कारण आपण न खचलो तर यथाकाळी आपल्या पदरी पीक पडेल'' (गलती.६:९).

संकटे, अडचणी येतात तेव्हा तुम्ही चार गोष्टी कराव्या; त्या अशा : भावनावश होऊ नका, मन स्थिर ठेवा. देवावर भरंवसा ठेवा. भयभीत होऊ नये म्हणून ताबडतोब प्रार्थना करावी; आणि चांगले करीत राहा आणि प्रतिफळ मिळण्याची अपेक्षा धरणे ही पाचवी गोष्ट करावी.

परंतु संकटे येतात तेव्हा बहुधा आपण यातील एकही गोष्ट करीत नाही. याचे कारण एकच आम्ही काही योजना आखलेली नसते. संकटे, अडचणी नसल्या तरी आपण या गोष्टींचा सराव करून सज्ज राहावे हेच इष्ट आणि हितावह आहे.

पुढे काही अडचण येईल; बिकट प्रसंग ओढवेल म्हणून आजपासून तयार राहण्यासाठी पुढीलप्रमाणे अधूनमधून बोलत राहा : ''मी देवाशी प्रामाणिक, एकनिष्ठ, विश्वासू राहणार आहे. आणि देव माझ्या हानीची, दु:खाची दुप्पट भरपाई करून देणार आहे. सैताना, तुला काय वाटलं? तू मला क्लेश देणार, चिंताक्रांत करणार? पण लक्षात ठेव मला दुप्पट आशीर्वाद मिळणार आहेत. कारण मी देवाचा झटून आस्थेने शोध करणारा असा आहे.''

## तुमच्यासाठी देवाची इच्छा

तुमच्यासाठी देवाची हीच इच्छा आहे : तुमच्यासाठी दुप्पट आशीर्वाद राखून ठेवले आहेत, ''कारण त्याचा उत्कट आस्थेने झटून शोध करणाऱ्यांना तो प्रतिफळ देणारा आहे'' (इब्री.११:६ पाहा) यावर तुमचा विश्वास आहे.

येथे एक अट आहे हे तुमच्या लक्षात आलेच असेल. ''विश्वास ठेवला पाहिजे'' हीच ती अट आहे. आणि जेथे काही विशेष हक्क असतो तेथे जबाबदारीही असते. तुम्ही तुमचा कार्यभाग पूर्ण केलात तर देवही आपला कार्यभाग पूर्ण करण्यास मागे राहणार नाही.

तुमच्यावर संकटे, अडचणी येणारच, पण त्याला तुम्ही कसा प्रतिसाद देता तेच महत्त्वाचे आहे. धीर सोडू नका, निराश होऊ नका, उदासीन, नकारी वृत्ती सोडा. अडचणी येतील तेव्हा आशा सोडू नका. मनावरचे मळभ झटकून टाका, आणि पुढे जात राहा. संकटांना एक वरचीही बाजू असते. संकटे येतात तेव्हा देवाच्या सांत्वनाचा, प्रीतीचा अनुभव येतोच येतो.

येशूने म्हटले आहे, ''जे करतात ते धन्य, त्यांच्या सुखाचा दुसऱ्यांना हेवा वाटावा, [त्यांचे सौख्य देवाची अपार अनुपम कृपा व प्रीती यांच्या अनुभवातून येते] कारण त्यांचे सांत्वन केले जाईल'' (मत्तय.५:४ विस्तारीत अनुवाद).

देवाकडून होणारे सांत्वन, समाधान किती महान, आश्चर्यकारक आहे हे आपणाला खरोखर समजले असेल तर त्याचे रोमहर्षक सांत्वन मिळवून त्याचा अनुभव घेण्यासाठीच संकटांना तोंड देणे खरे श्रेयस्कर ठरेल. पवित्र शास्त्र सांगते, ''आपल्या प्रभू येशू ख्रिस्ताचा देव व पिता जो करुणाकर पिता व सर्व सांत्वनदाता देव, तो धन्यवादित असो. तो आमच्यावरील सर्व संकटांत आमचे सांत्वन करतो. असे की, ज्या सांत्वनाने आम्हांला देवाकडून सांत्वन मिळते त्या सांत्वनाने आम्ही जे कोणी कोणत्याही संकटात आहेत, त्यांचे सांत्वन करावयास समर्थ व्हावे'' (२ करिंथ.१:३-४).

*आम्ही दुसऱ्यांचे सांत्वन करावे म्हणून देव आमचे सांत्वन करतो.*

## देवाच्या कृपेचा लाभ घ्या

आमच्या जीवनात दररोज, वारंवार आपण ही कबुली द्यावी : ''मी देवाच्या कृपेस पात्र आहे आणि देव मला मनुष्यांच्या मर्जीस पात्र करतो. मी देवाच्या कृपेमध्ये वावरतो.''

तुमच्यावर देवाची कृपा असली की लोकांना तुम्ही प्रिय होता, तुमच्यासाठी काही करण्यास ते आनंदाने तयार असतात. पण आपण हे का करतो त्याचे कारण मात्र त्यांना माहीत नसते. याला स्वाभाविक कारण काहीच नसते. ते तुमच्याकडे ओढले जातात. तुमच्याशी चांगले वागावे असे त्यांना वाटते, तुम्हांला आशीर्वाद असे व्हावे हीच त्यांची इच्छा असते.

देवाचा कृपाप्रसाद खरेच अद्भुत आहे. ज्यांनी छळ, अत्याचार सोसले आहेत त्यांनी आपल्या मनातील सर्व विषय, भावना, विचार झटकून टाकून देवाकडून विपुलपणे मिळणाऱ्या या बिनमोलाच्या बहुमोल कृपेच्या देणगीचा लाभ घेत राहावे. त्यांनी विशेषेकरून हेच शिकून घ्यावे. स्वत:ला लीन व नम्र करतात त्यांना आपल्या जीवनात कृपेचा अधिकाधिक अनुभव येतो.

पेत्र असाच एक क्षणोक्षणी नाराज होणारा, चिडणारा शीघ्रकोपी होता. पण तो स्वत:ला नम्र करण्यास शिकला आणि त्याने आपल्या जीवनात देवाच्या कृपेचा लाभ घेतला.

## देवाचे आशीर्वाद कल्पनातीत महान आहेत

मी परमेश्वरावर माझी चिंता टाकण्यास शिकले, मला स्थिर, सशक्त करण्यास त्याला मोकळीक दिली म्हणूनच आज मला दुप्पट आशीर्वादांचा लाभ झाला आहे, आणि त्याच आशीर्वादांच्या द्वारे आज आम्ही देवाची सेवा करीत आहोत. देवाने आम्हांला टीव्हीवरून संदेश देण्यास पाचारण केले आहे. एके दिवशी सकाळी देवाच्या आत्म्याने डेव्हला सांगितले - डेव्ह तेव्हा आपले केस विंचरीत होता - ‘‘मी तुला आणि जॉयसला एवढा सर्व काळ टीव्हीवरून संदेश देण्यासाठीच तयार केले आहे.’’

एवढी वर्षे आम्ही प्रामाणिकपणे, विश्वासूपणे त्याची सेवा करीत होतो. पण या काळात तो आम्हांला आणखी मोठ्या कार्यासाठी तयार, सज्ज करीत आहे हे कधी आमच्या स्वप्नातही आले नव्हते. या काळात आम्ही त्याच्या मार्गदर्शनाने कोठेही जाऊन सभा घेण्याचे कार्य विश्वासूपणे करीत होतो. या सभांना पाचपन्नास-शेशंभर लोक येत असत. हॉटेलमध्ये राहण्यासाठी पैसे नसल्याने आम्ही रस्त्याच्या कडेला असलेल्या मोटारी ठेवण्याच्या जागेत विसावा घेत असू. मानधन मिळो वा न मिळो, ते थोडे असो किंवा अधिक असो, आम्ही कोठेही जाऊन संदेश देण्यास तयार होतो. लोकांचे आक्षेप, बरीवाईट टीका हे आम्ही धीराने सोसले. आमच्या स्वत:च्या मंडळीने आम्हांला पाठिंबा दिला नाही, तरी आम्ही खचलो नाही. हे सर्व काही भावी काळातील महान सेवेसाठी पूर्वतयारी असे होते.

विश्वासू राहिले पाहिजे आहे आम्ही जाणून होतो, पण देवाचे प्रतिफळ एवढे महान असेल याची आम्हांला जराही कल्पना नव्हती. आम्हांला आता हजारो लाखो लोकांना देवाचे वचन सांगण्याची सुसंधी मिळाली आहे. हे सर्वच श्रोते देवाचे वचन ऐकण्यास उत्सुक आहेत, देवाची अधिक जवळून ओळख करून घेण्यास आसुसले आहेत. *आमचा लाइफ इन द वर्ड* (जीवनात देवाचे वचन) हा कार्यक्रम दररोज ४० टीव्ही केंद्रांवरून प्रक्षेपित केला जातो. हा

कार्यक्रम जगाच्या दोन तृतीयांश भागात अडीच अब्जांहून अधिक लोकांपर्यंत पोहोचतो. १९८८ पासून आम्ही पन्नासांपेक्षा अधिक पुस्तके प्रसिद्ध केली आहेत. त्यांपैकी छत्तीस पुस्तके पंचेचाळीस भाषांतून अनुवादरूपाने प्रसिद्ध झाली आहेत. या पुस्तकांच्या तीस लाखांहून अधिक प्रती लोकांनी घेतल्या आहेत. मी फक्त प्रभूचीच प्रौढी मिरवते. देवाने आमच्यासाठी प्रतिफळ योजून ठेवले होते. आमच्यावर प्रतिवर्षी त्याच्या आशीर्वादांचा अधिकाधिक वर्षाव होतो आहे.

देवाने मला धीर दिला त्या वेळी त्याच्या मनात ही एवढी भव्य दिव्य योजना होती हे मला मुळीच माहीत नव्हते. त्याने मला सांगितले होते : ''जॉयस धीर धर, टिकून राहा, मी दु:खाक्लेशांमुळे झालेल्या तुझ्या हानीची दुप्पट भरपाई करून देईन. सैतानाने तुझ्या वाइटासाठी जे जे केले ते ते सर्व तुझ्यासाठी चांगले व्हावे असे मी करीन. मग तुला अनेक लोकांना सहाय्य करता येईल.''

देव प्रत्येकासाठी हेच सांगतो, हाच संदेश देतो. पूर्वतयारीच्या काळात आपण स्थिर राहून सहन केले पाहिजे. पण त्याच वेळी आम्हांला खात्री पटते ''आपल्याला ठाऊक आहे की, देवावर प्रीती करणाऱ्यांस म्हणजे त्याच्या संकल्पाप्रमाणे बोलाविलेल्यांस देवाच्या करणीने सर्व गोष्टी मिळून कल्याणकारक होतात'' (रोम.८:२८).

तेव्हा आता जेव्हा संकट, अडचण येईल तेव्हा ते सर्व झटकून टाका. तुम्ही देवावर प्रीती करीत असाल, आणि तुमच्या सर्व शक्तीक्षमतेनिशी त्याच्या इच्छेनुसार जीवनक्रम चालवीत असाल, तर सर्व काही तुमच्या चांगल्यासाठीच घडून येईल अशी खात्री ठेवा. आम्ही चांगल्या देवाची सेवा करतो. तो वाईट गोष्टी घेऊन त्या आमच्यासाठी हितावह, उत्तम अशा करतो.

## देवाचा महान विनिमय

देव विनिमय, अदलाबदल करतो. आम्हांला नको असलेली सर्व अडगळ घेतो आणि त्या बदल्यात तो आमच्यासाठी राखून ठेवलेले उत्तम ते सर्व देतो.

उदाहरणार्थ, मी डेव्हशी लग्न केले तेव्हा माझ्याकडे पैसा नव्हता. माझ्याकडे मोटारगाडी नव्हती, पण डेव्हकडे मोटार होती. आमचे लग्न झाले आणि अचानक मला पैसा व मोटार दोन्ही मिळाले. कारण डेव्ह आणि मी आम्ही पतीपत्नी झालो तेव्हा त्याचे होते ते सर्व आपोआप माझे झाले.

त्याच प्रकारे, आम्ही येशूला समर्पित होतो तेव्हा असेच होते. तो वर आहे आणि आम्ही त्याची वधू आहोत. केवळ त्याला भेटल्या-बोलल्याने आम्ही त्याच्या अभिवचनांचे वारस होत नाही, पण विवाहातल्या प्रमाणे आपण स्वत: त्याला पूर्णपणे समर्पित झाल्यानेच आम्ही अभिवचनाचे वारस होतो. असंख्य लोकांना येशूबरोबर बोलायचे, भेटायचे असते, आणि त्यांना वाटते एवढे केले की दुप्पट आशीर्वाद मिळतील.

येशूच्या नामामध्ये सामर्थ्य आहे. जे ''त्याचे'' आहेत त्यांनाच या सामर्थ्याचा लाभ घेता येतो. मी डेव्हशी लग्न केले तेव्हाच त्याचे नाव मला मिळाले, तोपर्यंत मला त्याचे नाव 'नव्हते.' तुम्ही प्रभूकडे येऊन तुमच्या जीवनातील प्रत्येक गोष्ट त्याला समर्पण करता, तुमचे सुखदु:ख, अडचणी, अन्याय सर्व त्याच्या स्वाधीन करता तेव्हा ते सर्व घेऊन त्यातील सर्व अयोग्य, वाईट गोष्टींच्या बदल्यात जे उत्तम ते देव देतो, तसे अभिवचनच त्याने दिले आहे.

येशूने म्हटले आहे :

> माझ्यावर तुमची प्रीती असेल तर तुम्ही माझ्या आज्ञा पाळाल'' (योहान.१४:१५). त्याच्यावर प्रीती करून त्याच्या आज्ञा पाळतात त्यांना यशया ६१:७ मध्ये सांगितल्याप्रमाणे देवाकडून अदलाबदलीने महान गोष्टी मिळतील. ''तुमच्या अप्रतिष्ठेचा मोबदला तुम्हांस दुप्पट मिळेल; आपल्या उपमर्दाबद्दल मिळलेल्या वतनभागानेच ते आनंद पावतील; असे ते आपल्या देशात दुप्पट वतन पावतील, त्यांस सार्वकालिक आनंद प्राप्त होईल.''

# 27

# झटकून टाका ते

या पुस्तकामध्ये आपण भूतकाळाचे जोखड फेकून देणे आणि देवाकडून प्रतिफळ मिळवण्यासाठी नेटाने पुढे जाणे याविषयी चर्चा केली, त्यातील मुख्य तत्त्वे कोणती तेही पाहिले. आपल्या जीवनात ही तत्त्वे लागू करण्यासाठी नित्य नव्या संधी मिळतच असतात. तुम्हांला विशेष वाटणारा कोणीतरी कधीतरी तुम्हांला दुखवील, तुम्हांला वाईट वाटेल, धक्का बसेल असे काहीतरी करीलच. असे होईल तेव्हा तुम्हांला पुन्हा देवाची प्रीतीच निवडून घ्यावी लागेल. तुम्हांला ज्याने दुखावले त्याला क्षमा करून त्याच्यासाठी प्रार्थना करावी, त्याला आशीर्वाद द्यावा, प्राप्त परिस्थिती देव बदलून ती तुमच्या हितासाठी होईल असे करील. एवढे करा आणि त्याच्याकडून प्रतिफळ मिळण्याची वाट पाहा.

तुमच्या विश्वासाला प्रोत्साहन द्यावे, तुम्हांला भावनिक दु:खावेदनांपासून मुक्ततेसाठी उच्च प्रतिफळ घेण्यास नेटाने पुढे जाता यावे यासाठी देवाने पवित्र शास्त्रामध्ये विजयाचे अनेक वृत्तान्त नमूद केले आहेत. हे लोक आपली अप्रतिष्ठा, खंत, खेद झटकून टाकण्यास शिकले आणि ते परमेश्वराशी विश्वासू राहिले. विश्वासूपणाबद्दल दुप्पट आशीर्वाद मिळालेल्या अनेक लोकांच्या हकिगती पवित्र शास्त्रात नमूद केल्या आहेत.

योसेफ खाड्यातून राजमहालात गेला. सिंहाच्या गुहेतून आलेल्या दानीएलाला उच्च पदावर बढती मिळाली.

रूथ शेतातील सरवा वेचून उदरनिर्वाह करीत होती. कारण ती आपल्या सासूशी एकनिष्ठ होती. रूथ नसती तर तिची सासू एकटी, एकाकी पडली असती. त्यांचे पती मेले होते. आपल्या लोकांच्याकडे आश्रयाला जाणे रूथला सहज शक्य होते. तिच्या सासूने “तू माघारी

जा'' असे आवर्जून सांगितले होते. पण ती म्हणाली, ''नाही, मी तुमच्याबरोबरच राहणार. तुमचे लोक ते आता माझे लोक, तुमच देव तोच माझा देव. मी परत जाणार नाही'' (पाहा रूथ १:१६). मग देवाने तिच्यावर कृपा केली. रूथचा विवाह बवाजबरोबर झाला. बवाज त्या देशातील सर्वांत धनवान मनुष्य होता.

एस्तेरचे उदाहरण पाहा. ही तरुणी भयभीत होती. तिला राणीपद देऊ केले होते, पण ते स्वीकारण्यास तिचे मन धजावत नव्हते. तथापि, ती देवाशी विश्वासू होती. देव दाखवील, ते करण्यास ती राजी होती. अखेर ही पोरकी पोर राजाची राणी, पट्टराणी झाली आणि तिने एक संपूर्ण राष्ट्र वाचवले.

*आणि ईयोबाचे उदाहरणही पाहण्याजोगे आहे.*

ईयोबाविषयी विशेष म्हणजे देवाने त्याला वेदना क्लेश यांचा अनुभव दिला. त्याच्यावर नाना संकटे येऊ दिली, कारण तो या सर्वांतून सहीसलामत निभावून विजयी होईल हे देव जाणून होता. ईयोब भरंवशास पात्र आहे हेही देवाला माहीत होते. तुम्ही ईयोबाचे पुस्तक अद्याप संपूर्ण वाचले नसेल तर आता जरुर वाचा.

सैतानाला वाटले, देवाचे संरक्षण आहे, म्हणूनच ईयोब देवाशी विश्वासू आहे. तेव्हा देवाने सैतानाला सांगितले, ''ठीक आहे, आम्ही त्याचे काही संरक्षण काढून घेतो, आणि तरीही तो माझ्याशी विश्वासूच राहील हे तुला दिसेल'' (पाहा ईयोब १:१२). देवाने सैतानाला मोकळीक दिली. सैतानाने ईयोबाच्या प्रत्येक चांगल्या गोष्टीचा नाश केला. ईयोबाचे जीवन वगळता सैतानाने त्याचे सर्वस्व हिरावून घेतले. तरीही ईयोब देवाशी विश्वासू राहिला. देवावरची त्याची निष्ठा तसूभरही ढळली नाही.

ईयोबाच्या विश्वासूपणाचा परिणाम काय झाला पाहा. ''ईयोबाने आपल्या मित्रांसाठी प्रार्थना केली तेव्हा परमेश्वराने ईयोबाच्या दु:खाचा परिहार केला. पूर्वी ईयोबाची मालमत्ता होती तिच्या दुप्पट परमेश्वराने त्याला दिली'' (ईयोब ४१:१०). ईयोबाने आपल्या मित्रांसाठी प्रार्थना केली तेव्हा परमेश्वराने त्याला बंधमुक्त केले आणि त्याची धनसंपत्ती त्याला परत दिली हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे. ईयोबाला परखडपणे बोलून त्याची निराशा करणारे होते तेच हे 'मित्र.' ते त्याचे सांत्वन करण्यासाठी आले होते, पण त्यांनी त्यालाच दोष दिला, त्याची उणीदुणी काढली. परंतु परमेश्वराने ईयोबाला त्याचे पूर्वी होते त्यातून दुप्पट दिले, कारण वेदनाक्लेश अनुभवत असतानाही ईयोब विश्वासाने योग्य, चांगले तेच करीत राहिला.

ईयोबावर संकटपरंपरा कोसळली त्यापूर्वी त्याच्याकडे होते त्याहून अधिक म्हणजे दुप्पट परमेश्वराने त्याला दिले. ईयोबाने सर्व दु:ख संकटे धीराने सोसली म्हणून देवाने त्याला दुप्पट आशीर्वाद दिले. ईयोब ४२:१२,१३ पाहा : ''परमेश्वराने ईयोबाचे उत्तरवय पूर्ववयाहून अधिक सुखसंपन्न केले, चौदा हजार मेंढरे; सहा हजार उंट, बैलांच्या हजार

जोड्या आणि हजार गाढवी इतक्यांचा तो धनी झाला. त्याला आणखी सात पुत्र व तीन कन्या झाल्या.''

तुम्हांला आशीर्वादादाखल शेळ्यामेंढ्या, उंट, बैल, गाढवे अगर आणखी संतती नको असेल. तुमच्या विश्वासूपणाबद्दल तुम्हांला दुप्पट आशीर्वाद कसे कोणत्या प्रकारे द्यावे ते देव जाणून आहे. परंतु नेटाने पुढे जात राहणे, आणि आपले दुप्पट आशीर्वाद घेणे यासाठी तुमच्या मार्गात येणारी सर्व दु:खे, संकटे झटकून टाकण्यास तुम्ही शिकून घेणे आवश्यक आहे.

''एक शेतकरी आणि त्याचे गाढव'' ही गोष्ट मला खूप आवडते. या शेतकऱ्याचे गाढव एका कोरड्या खोल विहिरीत पडले. ते गाढव दु:खाने किंचाळत ओरडत राहिले. इकडे शेतकरी त्याला बाहेर काढण्याच्या खटपटीस लागला. त्या बिचाऱ्या गाढवाला बाहेर काढण्याचा उपाय काही त्याला सुचेना. शेवटी त्याने ठरवले, ही विहीर खूप खोल आहे. तिला पाणीही नाही. खरेतर ती बुजवायला हवी. गाढव काय ते म्हातारे झाले आहे. त्याचा काही उपयोगही नाही. त्याला खोल खड्ड्यातून बाहेर काढणे खूपच त्रासदायक आहे, तेव्हा ही विहीरच मातीने भरावी. मग त्याने आपल्या शेजाऱ्यांना मदतीसाठी बोलावले. तो त्यांना म्हणाला, ''चला जरा मदत करा ही विहीर माती टाकून भरूया. मग गाढवही आपोआप मातीत पुरले जाईल.''

झाले. शेजाऱ्यांनी खोरी, फावडी, कुदळी घेतल्या आणि विहिरीत माती भरण्याचे काम सुरू केले. काय घडते आहे, त्याचा परिणाम काय होणार ते गाढवाने लगेच ओळखले. ते मोठा गळा काढून रडू लागले. त्याने हंबरडा फोडला. आपल्यावर अचानक असा भयानक प्रसंग ओढवले तर आम्हीही सामान्यत: असेच रडू, ओरडू लागणार नाही का? त्या गाढवानेही आरंभी असेच केले. पण रडण्याओरडण्याने काही साध्य होत नाही असे पाहून ते एकदम शांत, चूप झाले. वरील बाजूने बरीचशी माती विहिरीत ढकलून झाल्यावर त्या शेतकऱ्याने सहज आत डोकावून पाहिले आणि तो चकितच झाला. त्या गाढवाच्या पाठीवर पडणारी सर्व माती झटकून टाकून ते त्या मातीवर उभे राहत होते.

ते शेजारी आणि तो शेतकरी यांनी टोपल्याच्या टोपल्या माती त्या गाढवाच्या पाठीवर ओतली, पण गाढव ती सर्व माती झटकून एक एक पाऊल वर वर येत होते. अखेर ती विहीर मातीने जवळजवळ भरून गेली. गाढवाने एक पाय उचलून वर टाकला आणि ते सरळ विहिरीच्या बाहेर आले!

या गोष्टीतून आपणाला खूप काही शिकण्यासारखे आहे. संकटे, अडचणी येतील तेव्हा आपण कण्हणे, कुंथणे जरा थांबवून शांत राहून, ऐकू लागलो तर आमच्या संकटात काय करावे ते देवच आम्हांला सांगेल.

देवाच्या दयेने आणि कृपेने मलाही माझ्या जीवनातील कित्येक गोष्टी झटकून टाकता आल्या. दुखावलेल्या भावना, आजवर सोसलेला छळ, अत्याचार, गैरवागणूक,

अन्यायाच्या अनेक गोष्टी, निर्दयपणा वगैरे कितीतरी मी सरळ झटकून टाकले आणि हे सगळे झटकून टाकत असतानाच माझ्या प्रतिफळासाठी विश्वास ठेवण्यासही मी शिकले म्हणून देवाचे आभार मानते.

देवाकडून प्रतिफळाची अपेक्षा ठेवली म्हणजे आशा अंकुरते. देव आपल्याला असेच असहाय्य सोडणार नाही, तो आमच्यासाठी काही तरी चांगले करणार अशी खात्री वाटते. तुमच्या परिचयाचे लोक केव्हा कोणत्या तरी कारणाने चिडतील, संतापतील तेव्हा त्यांना म्हणा, ''झटकून टाका ते,'' एखाद्या उदास, नाराज माणसाची तुमची भेट झाली तर त्याला सांगा, ''झटकून टाका ते!'' तुमच्या परिचयाचे लोक कोणीतरी त्यांच्या भावना दुखावल्या म्हणून खाली मान घालून खंत करीत असतील तर त्यांना म्हणा, ''चला, झटकून टाका ते!'' हा संदेश ऐकण्याची ज्याला ज्याला गरज आहे त्याला त्याला तो मोकळेपणे सांगा. माझी तुम्हांला पूर्ण परवानगी आहे.

## दुःखे, संकटे, अडचणी येणारच

तुम्हांला वाटेल की, आपण देवाची सेवा करीत आहोत तेव्हा संकटे वगैरे आमच्या वाटेला जाणारच नाहीत. आम्हांला संपूर्ण संरक्षण मिळेल. पण हे खरे नाही. खरं सांगायचं तर देव तुम्हांला दुसऱ्यांची सेवा करण्यास, सुवार्तासंदेश सांगण्यास पाठवील, तर तुम्हांला अडचणी येणारच याची खात्री ठेवा. पण अग्नीच्या धगधगीत तापलेल्या भट्टीत टाकलेल्या त्या तीन हिब्रू तरुणांप्रमाणे तुम्ही त्या अग्निपरीक्षेतून सहीसलामत बाहेर पडाल. शद्रक, मेशख व अबेद्नगो ह्यांच्याप्रमाणे तुम्हांलाही विस्तवाची जराही झळ लागणार नाही. तुमच्या अंगाला धुराचा वासही येणार नाही (पाहा दानीएल ३:२३-२७).

येशूने आपल्या शिष्यांना अशुद्ध आत्म्यांवर अधिकार दिला. या अशुद्ध आत्म्यांनी शिष्यांना त्रास देण्याचा प्रयत्न केला असता, शिष्य ज्यांना संदेश सांगणार होते त्या लोकांनी विरोध केला, ऐकण्याचे नाकारले तर काय करायचे तेही येशूने त्यांना सांगून ठेवले आहे :

> नंतर त्या बारा जणांस आपल्या जवळ बोलावून तो त्यांना जोडीजोडीने पाठवू लागला; त्याने त्यांस अशुद्ध आत्म्यावरचा अधिकार दिला,
>
> आणि त्यांस आज्ञा केली की, वाटेसाठी काठीवाचून दुसरे काही घेऊ नका; भाकरी, झोळणा, किंवा कमरकशात पैसे घेऊ नका.
>
> तरी वहाणा घालून चाला. दोन अंगरखे घालू नका.
>
> आणखी तो त्यांस म्हणाला, तुम्ही कोठेही एखाद्याच्या घरी उतराल तेव्हा ते ठिकाण सोडीपर्यंत तेथेच राहा.
>
> आणि ज्या ठिकाणी तुमचे स्वागत होणार नाही व जेथील लोक तुमचे ऐकणार नाहीत,

तेथून निघताना, त्यांना साक्ष व्हावी म्हणून आपल्या तळपायाची धूळ तेथेच झटकून टाका. *मी तुम्हांस सांगतो त्या गावापेक्षा सदोमाला त्या (न्यायाच्या) दिवशी सोपे जाईल* (मार्क.६:७-१०).

येशूची सेवा करण्यासाठी आवश्यक ते सर्व प्रत्येक गोष्ट तो पाहून देईल. तरतूद करील हेच येशूने आपणा सर्वांना दाखवले आहे. शिष्यांना जास्तीचे कपडे, पैसे यांची काही गरज नव्हती. त्यांच्यावर येणाऱ्या अडचणी, संकटे वगैरेवर त्यांना अधिकार दिला होता. आणि कोणी तरी त्यांना नाकारले, झिडकारले तर ते त्यांनी सरळ झटकून टाकायचे होते. मग त्यांनी जाऊन सर्वत्र पश्चात्तापाचा आणि तारणाचा संदेश सांगितला.

देवाने तुमचा उपयोग करून घ्यावा, आपण देवाबरोबर चालावे असे तुम्हांला वाटत असेल तर नाकारले जाण्याचा काही अनुभव तुम्हांला घेतलाच पाहिजे. आणि तुम्हांला जवळचे, महत्त्वाचे वाटणारे लोकच तुम्हांला नाकारतील, झिडकारतील अशी दाट शक्यता आहेच. कदाचित तुमच्या घरचे लोक, जवळचे आप्त, जिवलग मित्र हेच तुम्हांला नाकारतील.

देवाने तुम्हांला स्पर्श केला, तुम्हांला त्याच्याशी दृढ नाते जोडायचे आहे, मंडळीतील तुमच्या काही स्त्रियांपेक्षा त्याच्या अधिक जवळ जावे असे तुम्हांला वाटले तर तुमचे हे मित्रही तुम्हांला झिडकारतील. लोकांना स्वत:ला जेथे जायचे नसते तेथे ते दुसऱ्यांनाही कधी जाऊ देत नाहीत. त्यांना लौकिक इच्छावासनांचे चोचले पुरवायचे असतील आणि तुम्हांला आत्म्याने चालायचे असेल तर तुमच्या निवडीबद्दल ते उघडउघड तुमचा द्वेष करू लागतील.

त्या काळात येशूला विरोध करणाऱ्या लोकांच्याविषयी त्याने म्हटले आहे : ‘‘त्यांनी विनाकारण माझा द्वेष केला’’ (योहान.१५:२५). एक दिवस यातील शोकांतिका अचानक माझ्या ध्यानात आली. हे खरोखरी अतिभयंकर होते. येशूने नेहमी लोकांचे भले केले. त्याने त्यांच्याशी चांगले वागण्याचा प्रयत्न केला, पण याबद्दल त्याच्यावर प्रीती करण्याऐवजी त्यांनी त्याचा द्वेषच केला. यात खरी शोकांतिका लोकांचीच झाली.

योसेफाला एक स्वप्न पडले. त्यामुळे त्याच्या भावांनी त्याचा द्वेष केला (पाहा उत्पत्ती ३७:५). स्तेफन कृपा व सामर्थ्य यांनी युक्त, पूर्ण होता. त्याने लोकांमध्ये महान आश्चर्ये आणि चमत्कार केले. परंतु त्याची बुद्धिमत्ता, सुज्ञता आणि आत्म्याच्या प्रेरणेने तो बोलत असे यामुळे धर्मपुढाऱ्यांनी त्याचा द्वेष केला. त्यांनी त्याला अटक केली, त्याची चौकशी करून अखेर त्याला दगडमार करून ठार केले (पहा प्रे.कृ.६:८-१२; ७:५८).

दुसऱ्यांच्या द्वेषाला, मत्सराला, हेव्याला पात्र होणे अगदी सोपे आहे. हे एक मोठे नवलच वाटते. तुम्ही चांगले होण्याचा, वागण्याचा प्रयत्न केलात तर नक्कीच कोणी तरी तुमचा द्वेष करू लागते. पण ते तुमच्यावर रागावतात त्याच प्रकारे तुम्ही त्यांच्यावर रागावलात तर तुम्ही आशीर्वादांना मुकणार यात शंकाच नाही. लोकांना कधी आपणा स्वत:ला त्यांच्या पातळीवर खाली खेचून घेऊ देऊ नका. ते झटकून टाका, आणि वरच्या दिशेने पाऊल उचला.

नाकारले गेल्याची खंत सहज झटकून टाकणे कठीण आहे, त्यात वेदना आहे. दुखावलेल्या भावना कुरवाळत बसणे अधिक क्लेशकारक आहे. म्हणूनच नकाराची आणि निराशेची धूळ झटकून टाकण्यास शिका.

एकदा मी कोणाला तरी मदत करीत होते. मी योग्य तेच करते आहे असे मला मनोमन वाटत होते. मी तर नेहमीच कामात गढलेली असते. आता काय काम करावे हा प्रश्न मला कधीच पडत नाही. तेव्हा या व्यक्तीला मदत करण्यासाठी मला खरोखरी माझा वेळ खर्च करावा लागत होता. पण मी कितीही केले तरी त्या व्यक्तीला ते अपुरेच वाटे. काही केल्या तिचे समाधान होत नव्हते. त्यामुळे माझी अस्वस्थता वाढली. मी या माणसाला मदत करावी अशी देवाची इच्छा असल्याचे मला वाटले, कारण हे माझे ख्रिस्ती म्हणून कर्तव्यच होते. परंतु मी कितीही, काहीही केले तरी ते पुरे पडेना. मी केलेले काहीच त्याच्या मनास येईना, आणि त्याने मला समजूनही घेतले नाही. शेवटी माझी यातून सुटका झाली ती अशी : त्या व्यक्तीला मदत करणे एवढीच माझी जबाबदारी आहे, त्या व्यक्तीच्या आनंदाची जबाबदारी माझी नाही हे लक्षात आले आणि मी या पेचातून सुटले.

आम्ही जे करीत आहोत त्या प्रत्येक गोष्टीमुळे प्रत्येकाने आनंदी, सुखी व्हावे असे आम्हांला अनेकदा वाटते. पण आम्ही करतो त्या प्रत्येक गोष्टीने प्रत्येकजण सुखी, आनंदी होईलच हा विचार आम्ही बाजूस ठेवला पाहिजे. आम्हांला जे योग्य, इष्ट वाटते ते आम्ही केलेच पाहिजे, देव आम्हांला दाखवतो, सांगतो ते केले पाहिजे, त्यात चुकता कामा नये. परंतु प्रत्येकजण आपल्या आनंदासाठी जबाबदार असतो याची जाणीव आपण ठेवलीच पाहिजे. म्हणजे आनंदी व्हायचे की नाही हे ज्याचे त्याने/तिने ठरवायचे असते.

येशूने आपल्या शिष्यांना उपदेश करण्यास सुवार्ता सांगण्यास पाठवले. त्यांना नेमून दिलेले काम त्यांनी केले. पण त्याने त्यांना आणखीही बहुमोलाचा सल्ला दिला होता. लोकांनी त्यांचे स्वागत केले नाही त्यांचा संदेश ऐकला नाही, मानला नाही, तर त्यांचा नकार आणि बेपवाईची वृत्ती त्यांनी आपल्या पुढच्या मार्गात आड येऊ द्यायची नव्हती. त्यांनी आपले नेमलेले कार्य तसेच पुढे चालू ठेवायचे होते.

प्रत्येकजण तुमचे स्वागत करीत नाही, तुमचे सांगणे सर्वच ऐकत नाहीत. तुम्हांला मानीत नाहीत, म्हणून सेवाकार्य सोडून स्वत:ची कीव करीत निराशेत बसू नका. ते सर्व झटकून टाका. पुढे चला. दुसऱ्या गावात, दुसऱ्या व्यक्तीकडे जा, देवाने तुमच्या जीवनात केलेल्या कार्याची साक्ष तुमच्या तोंडून ऐकण्यास आतुर असणाऱ्याकडे जा. कदाचित त्याला ही साक्ष ऐकण्याची निकराची गरज असेल.

नकार, हेटाळणी यांमुळे तुमची पावले जड झाली, जागच्या जागी खिळून राहिली तर नकारात्मक प्रवृत्तीचा जय झालाच असे समजा. तुम्ही करता आहात ते कोणालाही आवडत नाही म्हणून तुम्ही चांगले करण्याचे सोडून द्यावे हे रास्त नाही. तुम्ही तसे मुळीच करू नये.

मी तर थोडे धाडस करून म्हणेन की, तुम्हांला बढती देऊन वरच्या पातळीवर नेण्यास देव तयार असला की, आता तुम्ही आहात तेथे तुमच्यावर नाकारले जाण्याची वेळ येईल आणि नकाराचे हे साधन घेऊन सैतान तुम्ही आहात तेथेच तुम्हांला ठेवण्याचा अगर त्याहून खाली ओढण्याचा प्रयत्न करील.

लोक पवित्र आत्म्याने परिपूर्ण होतात तेव्हा त्यांच्या घरचे लोकच त्यांना झिडकारतात, अनेकांना असा अनुभव येतो त्यामागे हेच कारण आहे. हे लोक मोठ्या उत्साहाने घरी जातात. आनंदाच्या भरात घरच्यांना सांगतात. आता आम्ही प्रभूसाठीच जगणार, आणि घरचे लोक त्यांच्याकडे चमत्कारिक दृष्टीने पाहतात तेव्हा त्यांना मोठा धक्का बसतो. एकाएकी 'स्वकीय' 'परकीय' झाल्याचा अनुभव त्यांना येतो. सैतान त्यांच्या जवळच्या लोकांनाच हाताशी धरून त्यांना नाकारण्यास लावतो. त्यांनी परत मागे फिरावे, पूर्वीचे चाकोरीतले जीवन जगावे याचसाठी त्याचा हा खटाटोप असतो.

## एक पायरी वर या

विहिरीत पडलेल्या त्या गाढवाप्रमाणे तुम्हीही छळ, नाकारले जाणे, वगैरे सर्व झटकून टाका. आणि याप्रकारे होणारी पिछेहाट वरच्या दिशेने जाण्यासाठी वापरावी. देवाने तुमच्यासाठी योजून ठेवलेले जीवन मोकळेपणाने जगता येईपर्यंत हाच क्रम चालू ठेवा. मातीच्या आधाराने ते गाढव वर आले, तुम्ही छळणुकीच्या आधारे वर या. तुम्ही देवाबरोबर एका नव्या पातळीवर आला आहात. तुमचा विश्वास कालच्या पेक्षा आज अधिक दृढ, सक्षम झाला आहे. पुन्हा परत तुम्हांला छळणूक सोसावी लागेल. दुरुत्तरांचा भडिमार होईल, तेव्हा तुम्ही त्याला तोंड देण्यास सज्ज व्हाल.

आजपासून पुढे रोज तुम्ही देवाबरोबर वरच्या पातळीवर, समर्थपणे चालात राहाल, कारण तुम्ही त्याच्याशी विश्वासू राहण्याचा निश्चय केला आहे. काही झाले तरी मागे हटायचे नाही हा तुमचा दृढ निश्चय आहे. अंतरंगात वसती करणाऱ्या पवित्र आत्म्याचे सामर्थ्य तुम्हांला मिळाल्यामुळे तुमच्या शत्रूला आता तुम्ही अधिक भयकारी झाला आहात.

तुम्ही येशूवर विश्वास ठेवला आहे, त्याचा पवित्र आत्मा तुम्हांला मिळाला आहे, म्हणून आता तुम्ही प्रार्थना करून जीवनात उत्तम ते स्वीकारण्यात तयार आहात. देवाचे प्रतिफळ मिळण्याच्या दिशेने नेटाने पुढे जाण्यास तुम्ही सज्ज आहात. तुमच्या साक्षीमुळे सैतानाच्या कार्याची जबरदस्त हानी होणार आहे. परिणामी तो भडकणार व अनेक लोकांना शक्य त्या सर्व प्रकारे चिथावणी देऊन तुमच्या कार्यात व्यत्यय आणण्यास लावील, ते तुम्हांला विरोध करतील.

पण पुन्हा त्या गाढवाची गोष्ट लक्षात घ्या. स्वत:ला नम्र करा आणि सर्व झटकून टाका. वैऱ्याने तुमच्याविरुद्ध योजिलेली प्रत्येक गोष्ट एक पायरी वर जाण्यासाठी वापरा; या प्रकारे पायरी पायरीने देवाने तुमच्यासाठी योजिलेल्या ठिकाणाकडे जा.

उदाहरणार्थ, देवाने डेव्हला व मला आमच्या मंडळीतून बाहेर जाण्यास सुचवले. याच मंडळीत असताना देवाने आमच्यामध्ये आपले कार्य सुरू केले होते. देवाने आम्हांला दुसऱ्या मंडळीत नेले. तेथील पाळकांनी आम्हांला स्वीकारले, आम्हांला प्रार्थनापूर्वक आशीर्वाद दिले.

पवित्र शास्त्र सांगते, ''आमचे युद्ध रक्तमांसाबरोबर नाही तर सत्तांबरोबर, अधिकाऱ्यांबरोबर सध्याच्या काळोखातील जगाच्या अधिपतीबरोबर, आकाशातल्या दुरात्मासमूहाबरोबर आहे'' (पाहा इफिस.६:१२). आम्हांला पुढे जाता येऊ नये यासाठी सैतान लोकांना हाताशी धरून आडकाठी आणण्याचा प्रयत्न सुरूच ठेवील. शक्य तर तो आमच्या जवळच्या परिचयाच्या आणि प्रेमातल्या लोकांचाच या कामी उपयोग करील. आमच्या परिचयातील लोकांनी आम्हांला दिलेली दूषणे, त्यांची नाराजी व गैरमर्जी आम्हांला अधिक मर्मभेदक व क्लेशमय वाटतील.

केव्हा लोकांची नापसंती, नाराजी यांचे आपणाला एवढे भय वाटते की, आपण देवाबरोबर वरच्या पातळीवर एक तसुभरही जाणार नाही. लोकांना हे आवडणार नाही असे समजून आपण जागीच स्वस्थ बसून राहू. खरे तर आपण नेहमी देवापुढे मस्तक लववले पाहिजे, पण तसे न करता आपण लोकांसमोर माथे किती वेळा झुकवतो ते पाहिले तर तुमचे तुम्हांलाच आश्चर्य वाटेल.

येशूने म्हटले आहे, ''जो तुमचे ऐकतो तो माझे ऐकतो. जो तुमचा अव्हेर करतो, तो माझा अव्हेर करतो. तो ज्याने मला पाठवले त्याचा अव्हेर करतो'' (लूक.१०:१६). लोकांनी आम्हांला नाकारणे, आपण व्यक्तिश: घेऊ नये हेच तो आम्हांला सांगतो आहे. आम्ही प्रभूला अनुसरत असताना लोकांनी आम्हांला नाकारले तर ते येशूला आणि देवपित्याला नाकारतात हाच त्याचा अर्थ आहे.

आता आणखी एक नीट लक्षात घ्या : तुम्ही आपले अंत:करण प्रभूला दिलेत त्यापूर्वीच देवाने तुमच्यासाठी केलेली योजना सैतानाने ओळखली होती, आणि तुम्हांला ती स्वीकारता येऊ नये यासाठी त्याने जंगजंग पछाडले. तुमचे पाचारण जेवढे मोठे तेवढे तुम्हांला होणारा विरोधही मोठा आणि अधिक तीव्र. आध्यात्मिक जगातील संघर्ष लढणे, झगडणे यांकडे तुम्ही देवाच्या वचनाच्या प्रकाशात पाहिले तर तुमच्यावर आलेली सर्व संकटे त्यानेच पाठवली होती हे तुमच्या लक्षात येईल. कारण देव तुम्हांला आशीर्वाद देण्यासाठी कार्य करीत आहे हे तो जाणून होता.

पण यहोवा, सेनाधीश परमेश्वर आहे - तो सैन्यांचा धनी, प्रभू आहे. तोच तुमच्यासाठी लढत आहे. म्हणूनच तुम्ही महाविजयी ठरता. तुमच्यावरून चालेले युद्ध अगोदरच जिंकलेले आहे. तुमच्या पूर्वीच्या दु:खाक्लेशांबद्दल तुम्हांला दुप्पट आशीर्वाद मिळण्याचे अभिवचन दिले आहे.

# प्रभूच्या आनंदाने परिपूर्ण राहा

प्रेषित पौलाने म्हटले आहे : “मी आता मनुष्याची की देवाची मनधरणी करावयास पाहत आहे? मी मनुष्यांना संतुष्ट करावयास पाहात आहे काय? मी अजूनपर्यंत मनुष्यांना संतुष्ट करीत राहिलो असतो तर मी ख्रिस्ताचा दास नसतो” (गलती.१:१०).

शास्त्रलेखातील या पुढची वचने पाहा : सर्व विरोध, अडवणूक वगैरे सर्व पौलाने नाकारून, झटकून टाकले आणि तो आनंदाने पुढची वाटचाल करीत राहिला.

> आणि प्रभूचे वचन [ख्रिस्ताद्वारे सर्वकालचे तारण ही सुवार्ता] त्या सर्व प्रांतात पसरत गेले.
> तेव्हा यहूदी लोकांनी भक्तिमान व कुलीन स्त्रियांना व नगरातील मुख्य पुरुषांना चिथविले आणि पौल व बर्णबा ह्यांचा छळ करून त्यांना आपल्या सीमेबाहेर घालवून दिले.
> त्यामुळे ते आपल्या मायांची धूळ त्यांच्यावर झटकून इकुन्यास गेले.
> इकडे शिष्य आनंदाने व पवित्र आत्म्याने पूर्ण झाले. (प्रेषित.१३:४९-५२)

सतत आनंदाने आणि पवित्र आत्म्याने परिपूर्ण राहा. पवित्र आत्मा, त्याचा आनंद तुमच्या संपूर्ण जिवाला व्यापून राहो. अंतरंगात वसणाऱ्या प्रभूच्या समक्षतेच्या द्वारे मिळणाऱ्या आनंदावर तुमचे मन, इच्छा आणि भावना केंद्रित ठेवा. दुसरे तुमच्याविषयी काय म्हणतात, लोकांना काय वाटते यासारख्या वायफळ गोष्टीविषयी चिंता करीत बसाल तर तुमचा आनंद हरवून जाईल. भित्रेपणा, भिडस्तपणा साफ झटकून टाका आणि आत्म्याने परिपूर्ण व्हा, आत्म्याकडून प्रोत्साहन घ्या (पहा इफिस.५:१८). कोणतीही अडचण येवो, की अडथळा येवो, कितीही विरोध झाला तरी आनंदाने परिपूर्ण राहा. प्रत्येक परिस्थितीत तुम्ही जे करावे असे देवाला वाटते तेच करण्यास सर्वस्वी झटा.

तुम्ही लोकांना हवे तसे वागत नाही, त्यांच्या मनाप्रमाणे प्रत्येक गोष्ट करीत नाही, म्हणून ते तुमच्यावर जराही दया करीत नसतील, त्यांच्याकडे प्रीतीचा अभावच असेल तर तो त्यांचा आणि देवाचा प्रश्न आहे. लोकप्रिय होणे हे तुमच्या जीवनाचे ध्येय नसावे. देवाची इच्छा पूर्ण करण्यासाठीच जगा.

देवाच्या आज्ञेचे पालन करण्यासाठी योसेफाने किती प्रकारचा छळ, निराशा झटकून टाकली त्याचा विचार करा. त्याच्या भावांनी विश्वासघाताने त्याला गुलाम म्हणून विकले. पोटीफराच्या बायकोने त्याच्यावर खोटे आरोप केले, त्याने प्यालेबरदाराला सहाय्य केले तेव्हा योसेफाने त्याल केलेली िवनंती तो विसरला. पण योसेफ नेटाने पुढे जात राहिला. परिणामी योसेफावर संपूर्ण राज्याची जबाबदारी सोपवण्यात आली. त्याने सोसलेले दु:ख क्लेश, आपत्ती यांच्याबद्दल देवआने त्याला दुप्पट भरपाई दिली. त्याला महान आशीर्वाद मिळाले (पहा उत्पत्ती ३७-निर्गम १).

त्याचप्रमाणे लोकांना दानीएल देखील आवडत नव्हता. तो सात्विक, देवाला भिऊन वागणारा होता. त्यानेही उपेक्षा, नाकारले जाणे सहन केले. त्याला उचलून भुकेल्या सिंहाच्या गुहेत टाकून दिले, पण देवाने त्या सिंहांची तोंडे बंद केली. दानीएलासाठी देवाने काय केले ते राजाने पाहिले तेव्हा त्याने जाहीर केले, ''मी फर्मावतो की, माझ्या साम्राज्याच्या सर्व हद्दीतील लोकांनी दानीएलाच्या देवापुढे कंपित होऊन त्याचे भय धरावे; कारण तो जिवंत देव आहे; तो सर्वकाळ जवळ आहे; त्याचे राज्य अविनाशी व त्याचे प्रभुत्व अनंत आहे'' (दानी.६:२६).

दानीएल खंबीरपणे देवाबरोबर चालत राहिला. त्यामुळे संपूर्ण राष्ट्र प्रभावित झाले आणि त्यांनी ''ज्याने दानीएलास सिंहाच्या पंजातून सोडविले तोच बचाव करणारा व मुक्तिदाता आहे. तो आकाशात व पृथ्वीवर चिन्हे व उत्पात घडवणारा आहे'' (दानीएल ६:२७).

पौलाने थेस्सलनीकाकरांस लिहिलेल्या दुसऱ्या पत्रामध्ये देवाचे स्पष्ट आभार मानले आहेत, कारण विश्वासणारे विश्वासात वाढत होते, त्यांची परस्परांवरील प्रीती सतत वाढत होती, छळ, संकटे, अतोनात क्लेश सोसत असतानाही ते विश्वासात स्थिर, खंबीर राहिले (पहा २ थेस्सल.१:३ पुढे).

पुढे व.६ मध्ये पौलाने या विश्वासणाऱ्यांना धीर देऊन सांगितले आहे की, त्यांना संकटात टाकणाऱ्या लोकांची देव संकटानेच परतफेड करील. तसेच त्यांना प्रतिफळ देण्याचे देवाने निश्चयपूर्वक ठरवले आहे हेही त्याने सांगितले आहे.

> तुम्हांवर संकट आणणाऱ्या लोकांची संकटाने परतफेड करणे आणि संकट सोसणाऱ्या तुम्हांस आम्हांबरोबर विश्रांती देणे हे देवाच्या दृष्टीने न्याय आहे म्हणून प्रभू येशू प्रगट होण्याच्या समयी ते होईल. तो आपल्या सामर्थ्यवान दूतांसह स्वर्गातून अग्निज्वालेसहित प्रगट होईल, तेव्हा जे देवाला ओळखत नाहीत व आपल्या प्रभू येशूची सुवार्ता मानीत नाहीत, त्यांचा तो सूड उगवील (२ थेस्सल.१:६-८).

तेव्हा देवाच्या दृष्टीने जे रास्त ते केले म्हणून तुमचा छळ होत असेल तर खचू नका, आनंद करा. प्रेषित पेत्राने म्हटले आहे : ''कारण पाप केल्याबद्दल मिळलेले ठोसे तुम्ही निमूटपणे सहन केल्यास त्यात काय मोठेपणा? पण चांगले केल्याबद्दल दु:ख भोगणे व ते निमूटपणे सहन करणे हे देवाच्या दृष्टीने उचित आहे'' (१ पेत्र.२:२०).

योग्य ते केल्याबद्दल तुम्हांला दु:ख सोसावे लागते तेव्हा येशू तुम्हांला 'धन्य' असे म्हणतो. त्याने सांगितले आहे, ''नीतिमत्त्वाकरिता ज्यांचा छळ झाला आहे, ते धन्य, कारण स्वर्गाचे राज्य त्याचे आहे'' (मत्तय.५:१०).

न्यायाने वागणाऱ्या आणि योग्य तेच करणाऱ्या लोकांचा छळ झाला तर ते धन्य, आणि सुखी आहेत. कोणालाही त्यांच्या सौख्याचा हेवा वाटावा. ते नव्याने जन्मलेले, देवाचे मूल आहेत, त्यांना देवाची कृपा व तारण मिळाले आहे. स्वर्गाचे राज्य त्यांचेच आहे.

पेत्राला अपयश झटकून टाकावे लागले. पौलाला नाकारले जाण्याची खंत टाकावी लागली. आणि देवाने तुमचा उपयोग करून घ्यावा असे तुम्हांला वाटत असेल तर तुम्हांलाही अपयश आणि नकाराची खंत दोन्ही झटकून टाकणे अगत्याचे आहे. पण लक्षात ठेवा, तुमच्यासाठी दुप्पट प्रतिफळ राखून ठेवले आहे.

क्षमा न करण्याची प्रवृत्ती, राग, संताप, चीड, संकट, आणि आत्मदया हे सर्व झटकून टाका. नाकारले जाणे, दुखावले जाणे, विश्वासघात, चहाडी, निंदा, दोषीपण, निवाडा, आणि यहूदाचे चुंबन (मित्रांनी घात करणे) हेही सर्व झटकून टाका. नातेवाईकांबरोबरचे वाद, मित्रांबरोबरचे मतभेद, अनोळखी लोकांशी होणारे वाद हे सर्व झटकून टाका. तुमच्या स्वत:मधील उणिवांमुळे वाटणारी खंत, निराशा सर्व झटकून टाका.

मागचे मागे टाका आणि पुढे जा.

*शोकाचा काळ संपला आहे, आता आनंद करण्याचा समय आला आहे.*

# 28

# अद्‌भुत प्रतिफळ

**या** पुस्तकाच्या पहिल्या आवृत्तीची मुद्रिते (प्रुफे) मी वाचीत होते, त्या वेळी देवाने समर्थपणे कार्य केले आणि मी आणि माझे वडील यांच्यातील बिघडलेले नातेसंबंध सुधारले. मनातील अढी त्याने दूर केली. आमची मोडलेली मने, विदारलेली अंत:करणे पुन्हा सरळ नीट केली. माझ्या या वृत्तान्ताच्या अखेरीअखेरीस हा चमत्कार घडला. हा काही योगायोग अगर अपघात नव्हता. या पुस्तकात याही वृत्तान्ताचा समावेश व्हावा ही परमेश्वराची योजना होती यात संशय नाहीच.

मी माझ्या वडिलांना क्षमा केलीच होती. आमचे नातेसंबंध ताणून तुटण्याच्या बेतात आले होते. या नात्यात कोणालाच मोकळेपणा व स्वस्थता नव्हती. त्यानी माझ्यावर जे अत्याचार केले त्याची जबाबदारी त्यांनी कधीही स्वीकारली नव्हती. त्यांनी माझ्याशी केलेले वर्तन मला सर्वस्वी उद्‌ध्वस्त करणारे ठरले हेही त्यांनी मान्य केले नव्हते. किती तरी वर्षे मी माझ्या परीने माझ्या आईवडिलांशी नाते ठेवण्याचे प्रयत्न केले, पण त्यातून काही विशेष लाभ झाला नाही. आमच्या नात्यातील अवघडलेपण होते तसेच राहिले.

हे सर्व मुद्दे, मनातील अढी व आकस घेऊन मी दोनदा माझ्या आईवडिलांशी बोलण्याचा प्रयत्न केला, पण त्यातही काही यश आले नाही. मनमोकळेपणे बोलण्याच्या या प्रत्येक प्रयत्नातून रागात भरच पडली. धुसफूस वाढली, एकमेकांवर पुन्हा पुन्हा दोषारोप झाले आणि हाती काहीच लागले नाही. पण अखेरीस दार उघडले गेले, देव गुप्तपणे कार्य करीत होता. काहीही बदल होणार नाही असे वाटत असतानाही त्याचे कार्य सुरूच होते.

माझ्या आईवडिलांना मी माझ्या घराजवळ घर पाहून दिल्यानंतर देव मला पवित्र शास्त्रातील ''आपल्या आईवडिलांचा मान राख'' (निर्गम २०:१२) या आज्ञेविषयी सांगू लागला. येथे मला अगदी प्रांजळपणे खरे सांगितले पाहिजे : त्यांचा मान राखण्यास, आदर

करण्यास माझी तयारी आणि इच्छाही होती, पण हे कसे करावे तेच मला काही सुचत नव्हते. मी जाऊन त्यांना भेटत होते, त्यांची विचारपूस करीत होते, त्यांच्यासाठी प्रार्थना करीत होते, त्यांच्यासाठी भेटी पाठवीत असे. पण तरी प्रभू मला सांगत होता, ''तुझ्या आईवडिलांचा मान राख.'' देव मला काहीतरी दाखवीत आहे हे मला माहीत होते, पण ते काय आहे ते मला समजत नव्हते.

अखेर एका सायंकाळी मी पुन्हा ''तुझ्या आईवडिलांचा मान राख'' हे शब्द ऐकले. मी प्रभूला म्हटले, ''माझ्या समजुतीप्रमाणे मी त्यांच्यासाठी सुचले ते सर्व केले आहे. आता याहून अधिक काय करावे, देवाची इच्छा काय आहे ते मला समजत नाही.''

मग मी परत प्रभूचे बोलणे ऐकले, ''आपल्या अंत:करणात त्याचा आदर कर.'' त्यावर मी विचारले, ''मी कशासाठी त्यांचा आदर करावा?'' त्यावर प्रभूने मला दाखवले की, मी माझ्या अंत:करणात त्यांचे आभार मानवो, त्यांचा आदर करावा. कारण त्यांनी मला जीवन दिले, मला अन्नवस्त्र, निवारा दिला, मला शिक्षण दिले.

मी बाह्यात्कारी त्यांच्यासाठी खूप काही करीत होते, पण देवाचे लक्ष अंतरंगाकडे असते. आईवडिलांविषयी मनात कोमल भावना ठेवणे मला जमत नव्हते. मग त्यांचे मनोमन आभार मानणे दूरच - त्यांच्या संबंधात मला फक्त छळ आणि वेदना व दु:खच आठवत होते. पण प्रभूकडून मला पुन्हापुन्हा हेच शब्द ऐकू येत होते. हे महत्त्वाचे आहे असे जाणून त्याने सांगितल्याप्रमाणे मी केले.

मी अशी प्रार्थना केली, ''हे देवा, माझे आईवडील आणि त्यांनी मला दैहिक जीवन - रक्तामांसाचे शरीर दिले म्हणून मी तुझे आभार मानते. त्यांनी मला या जगात आणले, माझे पालनपोषण केले आणि मला शिक्षण दिले. हे केल्याबद्दल मी त्यांचा आदर करते. देव सांगत होता त्याचे मर्म मला समजले आणि माझ्या जीवनामध्ये माझ्या आईवडिलांकडून मिळालेल्या सहयोगाबद्दल मी त्यांना धन्यवाद दिले.

त्यानंतर एक आठवड्याने एक विशेष घटना घडली. *लाइफ इन द वर्ड* हा आमचा नवा कार्यक्रम टीव्हीवरून प्रक्षेपित होत होता. माझ्या घरच्या लोकांनी तो कार्यक्रम पाहिल्याचे मला समजले. ते सर्व माझ्या आईवडिलांना हा कार्यक्रम पाहा असे आग्रहाने सांगत होते. हा कार्यक्रम कोणत्या वाहिनीवर, केव्हा दिसतो असे माझ्या आईवडिलांनी मला विचारले, तेव्हा मला जाणवले की, या कार्यक्रमात लहानपणी माझा छळ झाला त्याचा उल्लेख आहे हे त्यांना सांगितले पाहिजे. कारण ज्यांचा असा छळ झाला आहे, ज्यांच्यावर अत्याचार झाले आहेत, अशा लोकांना सहाय्य करणे हाच या कार्यक्रमाचा उद्देश असून देवाने मला याचसाठी पाचारण केले होते.

त्यांनी आपल्या टीव्ही संचावर हा कार्यक्रम पाहिला तर त्यांची प्रतिक्रिया काय असेल, त्यांना काय वाटेल ते मला समजणे, त्याची कल्पना करणे शक्य नव्हते, कारण टीव्हीवर त्यांनी हे शब्द ऐकले असते : ''लहानपणापासून माझा छळ झाला, माझ्यावर अत्याचार झाले...'' मला त्यांना दुखवायचे नव्हते. मी अगदी बुचकळ्यात पडले, पण मी तरी काय करणार? मी माझी पार्श्वभूमी, अनुभव अगदी स्पष्ट मनमोकळेपणे सांगते म्हणूनच लोकांना आपली व्यथा मला सांगणे सुलभसोपे वाटते. या संबंधात मी खूप प्रार्थना केली. आणि मग मी, माझे पती डेव्ह आणि मुले मिळून एकत्र मोकळेपणी चर्चा केली. मी काय करते आहे,

या कार्यक्रमात काय आहे ते आईवडिलांना स्पष्टपणे कळवले तर आमचे उरलेसुरले नाते संपेल, तरीपण आम्ही ठरवले की, मी देवाच्या सांगण्याप्रमाणे करावे. माझ्या जीवनासाठी असलेली देवाची इच्छा पूर्ण करावी.

आम्ही जाऊन त्यांना भेटलो. मी त्यांना सर्व सत्य वस्तुस्थिती सांगितली. मी त्यांना म्हटले, तुम्हांला दु:ख, वेदना देण्यासाठी मी हे करीत नाही, पण ज्यांना सहाय्य करण्यासाठी मला देवाने बोलावले आहे ते करण्यासाठी मला अन्य कोणताच पर्याय नाही.

*आणि चमत्कार करण्याचे देवाचे सामर्थ्य मी पाहिले, मी अनुभवले.*

मी सांगितले ते सर्व माझ्या आईने आणि माझ्या वडिलांनी शांतपणे ऐकून घेतले. ते रागावले नाहीत, त्यांनी काही दोषारोप केले नाहीत. ते सत्याला सामोरे गेले, त्यांनी सत्यापासून पाठ फिरवली नाही.

मग माझ्या वडिलांनी डेव्हला आणि मला सांगितले की त्यांनी माझ्या बाबतीत, मला जे काही केले त्याबद्दल त्यांना खूप दु:ख झाले आहे. वाईट वाटते. ते म्हणाले, ‘‘मला वाईट वाटते, दु:ख झाले आहे हे देवाला माहीत आहे. आणि जर कोणत्या तरी प्रकारे जे केले ते पुसून टाकणे, परत घेणे शक्य असेल तर ते घेण्याची माझी तयारी आहे.’’ त्यांनी माझ्याकडे कबुली दिली की त्यांच्यावर कोणाचे तरी नियंत्रण होते आणि त्यांनी जे केले ते न करणे, त्यापासून परावृत्त होणे त्यांच्या हाती नव्हते. ते आणखी म्हणाले की, लहानपणी माझाही असाच छळ झाला होता. मोठ्यांनी लहानांचा छळ करायचाच असतो अशा समजुतीने त्यांच्या हातून ते दुर्वर्तन घडले.

त्यांनी आणखीही महत्त्वाचे सांगितले, अलीकडेच त्यांनी छळणूक, अत्याचार वगैरेविषयी टीव्हीचे कार्यक्रम पाहिले होते. लैंगिक छळ व अत्याचार खरोखर किती भयानक व घातक आहे ते त्यांच्या लक्षात आले. त्यांनी मला सत्य सांगण्यास मोकळीक दिली. ‘‘जे घडले ते स्पष्ट सांग, परिणामाची चिंता करू नको, मला आता तुझ्याशी नाते - पित्याचे आणि मित्राचे नाते जोडायचे आहे.’’ माझ्या आईचा आनंद गगनात मावत नव्हता. कारण आता तिला तिची मुलगी, जावई नातवंडे सर्वांशी जिव्हाळ्याचे ममतेचे नाते जोडणे सहज शक्य होते.

त्या दिवसापासून पुढे माझ्या वडिलांमध्ये बदल झाल्याचे दिसले. ईस्टर, ख्रिसमस अशा महत्त्वाच्या दिवशी ते उपासनेसाठी मंडळीत जात, पण त्यासंबंधी ते अधिक काही बोलत नव्हते. त्यांनी अद्याप आपले अंत:करण येशूला दिले नव्हते आणि त्यांच्याशी पटणे, जमवून घेणे अजूनही कठीणच होत. कालांतराने माझ्या आईने मला सांगितले, ‘‘मला वाटतं देव तुझ्या वडिलांच्या अंतरंगात कार्य करीत आहे. मी त्याना बिछान्यावर बसून अश्रू ढाळताना अनेकदा पाहिले आहे.

मग एकदा उपकारस्मरणाच्या दिवशी (थँक्स गिव्हिंग डे) माझ्या आईने मला निरोप पाठवून सांगितले, ‘‘आज तुझ्या वडिलांना बरं वाटत नाही. त्यांना आज कौटुंबिक भोजनासाठी येणे जमणार नाही. त्यांना येण्याची खूप इच्छा आहे, पण त्यांना खूपच वाईट वाटतंय. तू आणि डेव्ह येऊन त्यांना भेटाल का? त्यांना तुमच्याशी काही बोलायचे आहे.’’

आम्ही तिकडे गेलो. त्यांच्या खोलीत आम्ही जाता क्षणी ते रडू लागले आणि बोलले, ‘‘मी तुला जे काही केलं त्याचं मला अतिशय दु:ख होतंय, खूप वाईट वाटतंय. गेली तीन वर्षे मी हेच सांगायचा प्रयत्न करीत होतो, पण मला धीरच कसा तो होईना.’’

ते नेमके हेच शब्द बोलले. आम्ही माझ्या आईवडिलांसाठी नवीन घर घेतले, त्यांना आमच्याजवळ राहण्यासाठी आणले त्याला याच दिवशी बरोबर तीन वर्षे झाली होती. आम्ही परमेश्वराचे आज्ञापालन केले. त्याच्या मार्गदर्शनाप्रमाणे चाललो ते जणू एका बीजाचे रोपण केले होते. माझ्या वडिलांच्या बाबतीत सैतानाचे कंबरडे मोडले जाण्याची ती सुरुवात होती. आता त्यांनी खऱ्या पश्चात्तापाने दु:खशोकाचे अश्रू ढाळले. मी म्हटले, ''बाबा, काही काळजी करू नका. मी तुम्हांला क्षमा करते.''

त्यांनी डेव्हचीही क्षमा मागितली. डेव्हने म्हटले, ''होय, मीही तुम्हांला क्षमा केली आहे.''

नंतर मी माझ्या वडिलांना विचारले, ''बाबा, आता तुम्ही आपला तारणारा म्हणून ख्रिस्ताचा स्वीकार करणार का?''

त्यांनी म्हटले, ''होय.''

आता त्यांनी खरोखर पश्चात्ताप केला होता. या वेळी सर्वच वेगळे होते. त्यांनी प्रार्थना केली, प्रभूचा स्वीकार केला. त्यानंतर काही दिवस त्यांच्या मनात शंकांचे काहूर माजले होते. आपण अतिशय वाईट आहोत, क्षमा मिळण्याची आपली लायकी नाही असे त्यांना वाटत होते. पण अखेर त्यांच्या मनातील संशय, शंकांचे मळभ दूर झाले आणि त्यांनी बाप्तिस्मा घेण्याची इच्छा व्यक्त केली.

मग दहा दिवसांनी आम्ही माझ्या वडिलांना बाप्तिस्मा दिला. एखाद्या व्यक्तीच्या जीवनात एवढा आमूलाग्र पालट झाल्याचे मी यापूर्वी कधीच पाहिले नव्हते. हे मी अगदी प्रामाणिकपणे सांगते आहे. अद्याप त्यांची प्रकृती बरी नाही. त्यांना सतत काही दुखते, खुपते, पण त्यांच्या तोंडून तक्रारीचा एक शब्दही ऐकू येत नाही. माझ्या परिचयाच्या लोकांमध्ये आता त्यांच्यासारखा प्रेमळ मनुष्य दुसरा नाहीच. एवढे त्यांचे वागणे सुधारले आहे.

माझ्या वडिलांनी जे केले त्याची किंमत त्यांनी चुकती केली का? होय पूर्णपणे किंमत दिली. आता ते वृद्ध आहेत. त्यांना विशेष कोणी मित्र नाहीत. त्यांचे हिंडणे, फिरणे आता जवळजवळ थांबले आहे. पण माझा खरोखरी विश्वास आहे की त्यांना प्रेम दिल्याने, सतत अखंड प्रेम दिल्याने, माझ्या अंतरंगात त्यांचा आदर राखून देवाचे आज्ञापालन केल्याने अखेरीस त्यांच्या भोवताली असलेली तटबंदी ढासळली आणि ते पश्चात्ताप करण्यास प्रवृत्त झाले.

''तुम्ही पश्चात्ताप केलात, तो दिवस माझ्या जीवनातील एक अत्यंत महान, महत्त्वाचा दिवस आहे'' असे माझ्या पतीने डेव्हने त्यांना सांगितले. आणि माझ्याविषयी सांगायचे तर यशया संदेष्ट्याच्या द्वारे देवाने दिलेले अभिवचन मला आता पूर्णपणे समजले आणि उमजले आहे.‘‘

तुमच्या अप्रतिष्ठेचा मोबदला तुम्हांस दुप्पट मिळेल; आपल्या उपमर्दाबद्दल मिळालेल्या वतनभागानेच ते आनंद पावतील; असे ते आपल्या देशाता दुप्पट वतन पावतील; त्यांस सार्वकालिक आनंद प्राप्त होईल. (यशया ६१:७).

आम्हांला दुप्पट आशीर्वाद मिळाला आहे, छळली गेलेली व्यक्ती व तिला छळणारी व्यक्ती या दोघांनाही देवाने पुन्हा पूर्वपदावर सुस्थिर केले आहे.

देव विश्वासू आहे, चांगला आहे. मोठमोठी स्वप्ने पाहा आणि आशा कधीही सोडू नका.

# तारणाची प्रार्थना

देव तुमच्यावर प्रीती करतो आणि त्याला तुमच्यासोबत वैयक्तिक नातेसंबंध हवे आहेत. तुम्ही जर येशू ख्रिस्ताला आपला वैयक्तिक तारणारा म्हणून स्वीकारले नसेल, तर आताच तुम्ही त्याचा स्वीकार करू शकता. त्याच्यासाठी तुमचे अंतःकरण उघडा आणि ही प्रार्थना म्हणा...

"पित्या, मी तुझ्याविरुद्ध पाप केले आहे याची मला जाणीव आहे. कृपा करून मला क्षमा करा. मला शुद्ध कर. तुझा पुत्र येशू ह्याच्यावर विश्वास ठेवण्याचे वचन मी देतो. तो माझ्यासाठी मरण पावला - तो वधस्तंभावर मरण पावला तेव्हा त्याने माझे पाप स्वतःवर घेतले असा माझा विश्वास आहे. तो मेलेल्यांतून उठला असा माझा विश्वास आहे. आता ह्या क्षणी मी माझे जीवन येशूला समर्पण करतो.

पित्या, पापक्षमेची आणि सार्वकालिक जीवनाची देणगी तू मला दिलीस म्हणून मी तुझा/तुझी आभारी आहे. तुझ्यासाठी जगण्यासाठी कृपा करून मला मदत कर. येशूच्या नावात, आमेन."

तुम्ही मनापासून ही प्रार्थना केली म्हणून देवाने तुमचा स्वीकार केला आहे, तुम्हांला शुद्ध केले आहे, आणि आध्यात्मिक मरणाच्या बंधनातून तुम्हांला मुक्त केले आहे. पुढील शास्त्रभाग वाचून त्यावर मनन करण्यासाठी वेळ काढा आणि तुमच्या नवीन जीवनात तुम्ही देवाबरोबर वाटचाल करत असताना त्याने तुमच्याशी बोलावे म्हणून त्याला विनंती करा.

- योहान. 3:16
- 1 करिंथ. 15:3-4
- इफिस. 1:4
- इफिस. 2:8-9

- 1 योहान. 1:9
- 1 योहान. 4:14-15
- 1 योहान. 5:1
- 1 योहान. 5:12-13

ख्रिस्तासोबतच्या नातेसंबंधात तुमची वाढ होण्यासाठी तुम्हांला उत्तेजन मिळावे म्हणून पवित्र शास्त्रावर विश्वास ठेवणाऱ्या चांगली मंडळी (चर्च) तुम्हांला मिळावी म्हणून प्रार्थना करा. देव नेहमी तुमच्यासोबत असेल. तो रोज तुम्हांला मार्गदर्शन करील आणि तुमच्यासाठी त्याच्याकडे असलेले विपुल जीवन कसे जगावे हे तो तुम्हांला दाखवील!